INSTITUTE OF DISTANCE AND OPEN LEARNING

UNIVERSITY OF MUMBAI

Re-accredited with 'A' Grade by NAAC

# प्रथम वर्ष कला

# मराठी (अनिवार्य)

| डॉ. राजन वेळुकर, | डॉ. धनेश्र्वर हरिचंदन, | प्राचार्य डॉ. नरेश चंद्र |
|---|---|---|
| कुलगुरु, | प्राध्यापक नि. संचालक | उप-कुलगुरु, |
| मुंबई विद्यापीठ, मुंबई. | दूर व मुक्त अध्ययन संस्था मुंबई. विद्यापीठ मुंबई, | मुंबई विद्यापीठ, मुंबई. |

**प्रकल्प समन्वयक** : **डॉ. दिनेश काळे**
समन्वयक मराठी
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**अभ्यास समन्वयक** : **डॉ. धनाजी गुरव**
प्राचार्य व मराठी विभाग प्रमुख
डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, महाड,
जिल्हा - रायगड

**लेखन** : **डॉ. गोविंद काजरेकर**
मराठी विभाग प्रमुख
रावसाहेब गोगटे जोगळेकर महाविद्यालय,
बांदा –पाणवळ, ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग

**डॉ. बाळासाहेब लबडे**
मराठी विभाग प्रमुख
खरे-ढेर महाविद्यालय, गुहागर
ता.गुहागर, जि. रत्नागिरी

**प्रा. दौलत कांबळे**
साहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग
साकेत महाविद्यालय, कल्याण (पुर्व),
जिल्हा - ठाणे

**प्रा. आनंद गांगण**
साहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग
महात्मा फुले रात्र महाविद्यालय,
भाईवाडा, परळ, मुंबई

**प्रथम वर्ष कला - मराठी (अनिवार्य)**

**प्रकाशक** : प्राध्यापक व संचालक
दूर व मुक्त अध्ययन संस्था,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**अक्षर जुळवणी** : गांवकर लेझर पॉईंट,
बोरिवली (प), मुंबई – ४०००९२

# प्रथम वर्ष कला

### मराठी अनिवार्य

## अभ्यासक्रम

**अ) अभ्यासासाठी नेमलेली साहित्यकृती**

१) **निवडक मराठी कथा (संपादित) कथासंग्रह**

२) **कविता शतकांची (संपादित) कवितासंग्रह**

**ब) व्यावहारीक मराठी - विभाग एक**

१) मराठी लेखनाचे नियम व विरामचिन्हे

२) वर्तमानपत्रासाठी वृत्त आणि वृत्तांत लेखन

३) भाषांतर

४) अर्जलेखन

**व्यावहारीक मराठी - विभाग दोन**

१) इतिवृत्तलेखन

२) वर्तमानपत्रासाठी जाहिरात लेखन

३) कार्यालयीन टिप्पणी

४) सारांश लेखन

# प्रथम वर्ष कला

## मराठी अनिवार्य

### अनुक्रमणिका


| घटक क्र. | घटकाचे नाव | लेखक | पृष्ठ |
|---|---|---|---|
| **अ)** | **अभ्यासक्रमासाठी नेमलेल्या साहित्य कृती** | | |
| १) | कथा वाङ्मय प्रकार | - प्रा. दौलत कांबळे | १ |
| २) | मराठी कथेची वाटचाल | - प्रा. दौलत कांबळे | १३ |
| ३) | निवडक मराठी कथा | - डॉ. बाळासाहेब लबडे | २२ |
| ४) | निवडक मराठी कथा संग्रहाची वैशिष्ट्ये | - डॉ. बाळासाहेब लबडे | ३६ |
| ५) | कविता एक वाङ्.मय प्रकार | - डॉ. गोविंद काजरेकर | ४१ |
| ६) | कविता शतकांची मधील कविता | - प्रा. आनंद गांगण | ५२ |
| ७) | कविता शतकांची मधील कविता संग्रहाची वैशिष्ट्ये | -प्रा. आनंद गांगण | ६९ |
| **ब)** | **व्यावहारीक मराठी - विभाग : एक** | | |
| ८) | मराठी लेखनाचे नियम व विरामचिन्हे | - प्रा. दौलत कांबळे | ८२ |
| ९) | वर्तमानपत्रासाठी वृत्त आणि वृत्तांत लेखन | - -,,- | ८६ |
| १०) | भाषांतर | - -,,- | ९८ |
| ११) | अर्जलेखन | - -,,- | १०७ |
| **ब)** | **व्यावहारीक मराठी - विभाग : दोन** | | |
| १२) | इतिवृत्तलेखन | - प्रा. दौलत कांबळे | ११४ |
| १३) | वर्तमानपत्रासाठी जाहिरात लेखन | - -,,- | १२२ |
| १४) | कार्यालयीन टिप्पणी | - -,,- | १२५ |
| १५) | सारांश लेखन | - -,,- | १३३ |

# १

# कथा वाङ्मय प्रकार

**घटक रचना**

१.० प्रस्तावना

१.१ उदिष्ट्ये

१.२ साहित्य म्हणजे काय?

१.३ साहित्याचे प्रकार

१.४ कथा या साहित्य प्रकाराचे स्वरुप

१.५ कथा या साहित्य प्रकाराचे उपप्रकार

१.६ कथा या साहित्याचे प्रकाराचे घटक

१.७ सारांश

१.८ प्रश्नावली

१.९ संदर्भ ग्रंथ सुची

## १.० प्रस्तावना

प्रथमवर्ष कला-मराठी या विषयासाठी निवडक मराठी कथा हा कथा संग्रह अभ्यासाला लावण्यात आला आहे. या कथासंग्रहाचा अभ्यास करण्यापूर्वी 'कथा' या वाङ्मय प्रकाराचा अभ्यास करणे गरजेचे आहे. त्यामुळे मराठी कथेची वाटचाल आणि 'निवडक मराठी कथा' कालखंडानुसार कथा कशी विकसित होत गेली हे समजणे सोपे होईल. तसेच प्रवाह अंगाने कथा समजून घेता येतील. कथा संग्रहातील कथांचा अभ्यास करणे सोपे जाईल होईल.

## १.१ उदिष्ट्ये

आपल्याला 'निवडक मराठी कथा' हा कथासंग्रह अभ्यासाला आहे. या कथा संग्रहातील कथा समजून घेण्यापूर्वी आपल्याला 'कथा' हा साहित्य प्रकार समजुन ध्यावा लागेल. त्यासाठी कथा या साहित्य प्रकाराचा परिचय आणि त्याचे प्रकार, समजून घेणे सोपे जाईल. कथा या साहित्य प्रकाराची ओळख करून घेणे. कथेच्या घटकांची ओळख करुन घेणे, हे महत्वाचे उदिष्ट्य आहे.

## १.२ साहित्य म्हणजे काय?

'कथा' हा साहित्यप्रकार आहे. हा साहित्य प्रकार समजून घेण्यापूर्वी साहित्य म्हणजे काय हे समजून घ्यावे लागेल. साहित्य ही व्याख्या व्यापक अर्थाने वापरली जाते. साहित्य असे म्हणताच कथा, कविता, कादंबरी, नाटक, चरित्र-आत्मचरित्र, लघुनिबंध, प्रवासवर्णने इ. ललित साहित्यप्रकार स्पष्ट होतात. साहित्याचे शास्त्रीय साहित्य आणि ललित साहित्य असे दोन विभाग केले जातात. सौंदर्य, लालित्य या अर्थाने वापरला जाणारा 'ललित' हा शब्द ललित साहित्याचे वेगळेपण अधोरेखित करतोच पण साहित्याचे स्वरुप, साहित्याची प्रयोजने, साहित्याचे हेतू आणि साहित्याचे अर्थही स्पष्ट करतो.

इ.स. ९०० च्या कालखंडामध्ये ‘साहित्य’ हा शब्द काव्यमीमांसेचे शास्त्र या अर्थाने रुढ झाला. संस्कृतमध्ये राजशेखर, कुंतक यांनी साहित्य ही संज्ञा वापरली. संस्कृत साहित्यशास्त्रकारांनी साहित्याचे स्वरुप स्पष्ट करताना लिहिले आहे, **‘‘शब्द व अर्थ यांचे परस्परांना अनुरुप असे सौंदर्यशालित्व म्हणजे साहित्य होय.**’’ भारतीय संस्कृत साहित्यशास्त्रकारांनी आणि पाश्चात्य साहित्यशास्त्रकारांनी आपआपल्या समकालीन साहित्याचा म्हणजेच कविता आणि नाटकाचा आधार घेऊन काव्य-नाटकाच्या व्याख्या केलेल्या आहेत. प्राचीन साहित्य म्हणजेच वाङ्मय हे प्रामुख्याने काव्य-नाटकापुरतेच मर्यादित होते. आधुनिक साहित्यविचारात काव्य-नाटक हे साहित्याचे प्रकार म्हणून अभ्यासले, ओळखले जातात. कविता आणि नाटकाच्या व्याख्यांच्यासह साहित्याची वरील व्याख्या अर्थपूर्ण, समर्पक, उचित असल्याचे दिसते. शब्द आणि अर्थ ही साहित्याची दोन्ही अंगे असल्याचे दिसते. शब्द आणि अर्थ ही दोन्ही अंगे अनुरुप असणेच पुरेसे नाही तर त्या अनुरुपतेचे सौंदर्यशालित्व अत्यावश्यक आहे. हे अनुरुप सौंदर्यशालित्व साहित्य म्हणजे काय ते स्पष्ट करते.

मराठी भाषेतील ‘साहित्य’ या शब्दाचे शब्दकोशातील अर्थ असे आहेत - साहित्य म्हणजे सामग्री, साधने, सहवास, संगत, स्नेह, ऐक्य, संबंध, साहाय्य, मदत, साहित्याचे हे विविध अर्थही आज मानवी जीवनातील साहित्याचे स्थान स्पष्ट करताना दिसतात.

प्राचीन साहित्य वाणीमय होते. त्यातून वाङ्मय, ललित वाङ्मय, विदग्ध वाङ्मय अशी साहित्याची ओळख होती. साहित्य या शब्दाला इंग्रजी Literature हा शब्द पर्यायी म्हणून ओळखला जातो. Literature, साहित्य, सारस्वत, वाङ्मय, विरुद्ध वाङ्मय असा विविध नावांनी ओळखला जाणारा साहित्य हा प्रकार मानवी जीवनाचा अविभाज्य भाग बनून मानवाला त्याच्या विकासाबरोबर प्रगतीबरोबर साथ देत आलेला आहे.

हिंदी साहित्यशास्त्रात साहित्याची व्याख्या अशी दिलेली आहे - **‘‘सहित् शब्द और अर्थ का यथावत् संयोग ही साहित्य है। ’’**

‘साहित्य ही अनुकृतीची अनुकृती आहे’ असे प्लेटो म्हणतो. साहित्य ही अनुकृती आहे असे सांगताना तो सर्जनशील अनुकृती आहे असे ॲरिस्टॉटल सांगतो. साहित्य जीवनशास्त्र आहे. ती संसृतीटीका आहे असे मॅथ्यु अर्नाल्ड म्हणतो. साहित्य हा जीवनाचा वारसा आहे असे त्यात आपल्या वर्तनाचे प्रतिबिंब उमटते असे लिसेरो म्हणतो. साहित्य म्हणजे काय, हे समजून, उमजून घेताना त्याची अनुभूती घडणे अर्थपूर्ण ठरते. साहित्य हा मानवी मनाचा, आत्म्याचा, हृदयाचा हुंकार आहे. जगण्याचा श्वासोच्छ्वास आहे. साहित्य मानवाच्या सुखाचा सोबती आणि जीवनाचा विरंगुळा आहे. साहित्य आनंद, आल्हाद, सुख, समाधान, शांती आहे. साहित्य मानवाचे दुसरे जीवन आहे.

**साहित्याचे प्रकार**

ललित साहित्य, ललित वाङ्मय, वाङ्मय, सारस्वत इ. नावांनी ओळखल्या जाणाऱ्या साहित्याचे पुढील प्रकार आहेत —

१. **<u>कथाकाव्य</u> - आर्ष महाकाव्य, विदग्ध महाकाव्य, खंडकाव्य, आख्यानकाव्य, कथाकाव्य इ. ना**

२. **<u>नाटक</u> - सुखात्मिका, शोकात्मिका, फार्स, नाटक इ.**

३. **<u>भावकाव्य</u> - भावकविता, सुनीत, विलापिका, हायकू इ.**

४. **<u>कथा-कादंबरी</u> - कथा, लघुकथा, दीर्घकथा, कादंबरी, कादंबरिका इ.**

५. **<u>चरित्र</u> - चरित्र, आत्मचरित्र, आठवणी, प्रवासवर्णन, व्यक्तिचित्र इ.**

६. **ललितलेख - निबंध, ललितनिबंध, आठवणी, प्रवासवर्णन, व्यक्तिचित्र इ.**

साहित्याचे विविध प्रकार आहेत. आज साहित्य म्हटले की, कथा, कविता, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र प्रवासवर्णन आणि लघुनिबंध हे प्रकार पुढे येतात. आधुनिक मराठी साहित्यात याच साहित्यप्रकारांची ओळख अधोरेखित होते. साहित्याच्या निर्मितीपासून साहित्यरुपात बदल होत गेले आहेत. साहित्याचा आत्मा तोच राहिला तरी शरीररुपी नावे मात्र बदलत गेली. सततचा बदल हे जिवंतपणाचे लक्षण मानले जाते. तेच साहित्याच्या नि साहित्यप्रकारांच्या बाबतीत घडले आहे. १८१८ पूर्वी साहित्य म्हणजे पद्यातून लिहिले गेलेले वाङ्मय असेच समीकरण होते. मराठी साहित्यात महानुभावांचे गद्यचरित्र ग्रंथ, बखर गद्य एवढेच काय ते गद्य होते. प्रकारांच्या बाबतीत आजच्या साहित्यप्रकारातील काव्य आणि नाटक आणि मोठ्या प्रमाणावरील कथाकाव्ये प्राचीन साहित्यात आढळतात. त्यावरून साहित्याची पूर्वपरंपरा लक्षात येते.

## १.३ साहित्याचे प्रमुख प्रकार

१. **काव्य (कविता)** -

२. **कथा** -

३. **कादंबरी** -

४. **नाटक** -

५. **चरित्र-आत्मचरित्र, आत्मकथन**

६. **प्रवासवर्णन-लघुनिबंध, ललितगद्य**

### कथा : एक साहित्यप्रकार

**प्रास्ताविक**

कथा हा साहित्य प्रकार प्राचीन आहे. आधुनिक काळात तो लोकप्रिय झाला. कथा सांगणे, कथा ऐकणे हा समाजातील मानवाचा उपजत व स्वाभाविक सहजधर्म आहे. गोष्ट किंवा गोष्टींची परंपरा संस्कृतमध्ये होती. मनोरंजनासाठी लोक एकत्र जमत. विद्या, संपत्ती, शील, बुद्धी, वय यात समानता असलेले लोक एकत्र जमून जी चर्चा करत तिला 'गोष्टीसभा' असे नाव होते. 'समानविद्या वित्तशीलबुद्धिवयसानुरुपैरालापैरेनत्रासनबन्धो गोष्टी अशी गोष्टीसभेची व्याख्या सांगितली जाते. चांगल्या गोष्टी, वाईट गोष्टी, परगोष्टी, गद्यगोष्टी, काव्यगोष्टी, गीतगोष्टी, नृत्यगोष्टी, वाद्यगोष्टी, वीणागोष्टी असे गोष्टींचे प्रकार होते. गद्य गोष्टीत आख्यान, आख्यायिका, इतिहास, पुराणातील गोष्टी इत्यादीचा समावेश होतो. साहित्य या प्रकारांची व्याप्ती मोठी आहे.

आधुनिक काळात गोष्टीला कथा म्हणुन ओळखले जावु लागले. आधुनिक काळात तंत्रबद्ध रचनेच्या साह्याने कथेची लघुकथा झाली. जे काही सांगायचे ते कल्पनेने रचून गोष्टीसारखे सांगितले की त्याची कथा होते. लघुकथा हा जागतिक साहित्यातील लोकप्रिय साहित्यप्रकार आहे. लघुकथा हा साहित्यप्रकार कमालीचा लवचिक, मायावी प्रकार मानला जातो. ढगा सारखा त्याला कोणताही आकार प्राप्त होतो, असे बेटस्ने म्हटले आहे. प्राचीन साहित्यातील हा प्रकार १९ व्या शतकात गोष्ट-कथा-लघुकथा असा विकास पावल्याचे दिसते. अनेकत्वातून एकत्व व्यक्त करणे हा जीवनाचा तसाच कलांचा धर्म आहे. तोच कथेतूनही व्यक्त होतो.

१९४५ नंतर काळात लघुकथा नवकथेच्या रुपाने पुढे आली. १९६० नंतर दलित, ग्रामीण, महानगरीय, स्त्रीवादी, विज्ञानकथा इ. वाङ्मयप्रवाहातून कथेने आपली वाटचाल पुढे सुरु ठेवल्याचे दिसते. दीर्घकथा, लघुकथा, रुपककथा ही कथेचीच रुपे आहेत. 'कथा' हा

साहित्यप्रकार हळूहळू बदलत गेला. निवेदन भाषा पात्र, घटना प्रसंग याचे स्वरुप ही बदलले. कथातून समाज वास्तवाचे चित्रण अधिकतेने होऊ लागले.

## १.४ कथा या साहित्याचे प्रकाराचे स्वरुप

'कथा' एक साहित्यप्रकार म्हणून कथेच्या विविध व्याख्यांच्या आधारे कथा म्हणजे काय, ते स्पष्ट करता येईल. कथेच्या घटकांचा विचार करता कथेत विशिष्ट कालक्रमाने घडलेल्या घटनांचे कथानक असते. ज्यांच्या संदर्भात घटना घडल्या, ती पात्रे कथेचे असतात. पात्र व घटनांच्या परस्पर संबंधातून निर्माण झालेले ताण, संघर्ष व गुंतागुंत कथेत असते. आणि या सर्व घटकांचा उत्कर्षबिंदू कथेत येऊन कथेच्या शेवटी घटनांचा आशय येतो. या सर्व कथेच्या घटकांचा विचार करून कथेची पुढीलप्रमाणे व्याख्या करता येईल.

**''एका विशिष्ट स्थळकाळी पात्रांच्या परस्परसंबंधातून घडलेल्या घटनांचे एका दृष्टिकोनातून केलेले चित्रण म्हणजे लघुकथा होय.''**

प्रत्येक कथेतील घटकांचे प्रमाण वेगळे असते. लेखकाची, कथेची प्रकृती वेगळी असते. एखाद्या कथेत घटना तर एखाद्या कथेत पात्रे महत्त्वाची असतात. एखाद्या कथेत दृष्टिकोन महत्त्वाचा असतो. कथेतील पात्रे, प्रसंगचित्रण एका जीवनानुभवाला अर्थ देण्यासाठी अवतरत असतात. लघुकथा ही एक संघटना, अर्थपूर्ण सुव्यवस्था असते. कथेचे हे सुसंघटित, एकात्म, सेंद्रिय, चैतन्यपूर्ण रुप आपल्याला जाणवत असते. कथेची सुसंघटना स्पष्टपणे जाणवते. या घटकांना अनुसरून कथेची पुढील व्याख्या करता येईल.

**''कथात्म साहित्याला अत्यावश्यक ठरणाऱ्या सर्व महत्त्वपूर्ण घटनांची अल्पावकाशात साधलेली अर्थपूर्ण संघटना म्हणजे कथा होय.''**

वरील विवेचनाच्या आधारे कथा म्हणजे काय ते समजून घेतल्यानंतर कथा या साहित्यप्रकाराच्या मराठी व पाश्चात्य समीक्षकांनी केलेल्या विविध व्याख्यांच्या आधारे या साहित्यप्रकाराचे स्वरुप स्पष्ट करता येईल.

इंग्रजी साहित्य अभ्यासकांच्या मते कथेचे स्वरुप पुढील प्रमाणे.

१. **स्टीव्हेन्सन** - The short story is not the transcript of life but a simplification of some side of it.

२. **एच.जी. वेल्ल –** A piece of short story or fiction which can be read in twenty minutes would be a short story**.** अर्ध्या तासात वाचून संपेल असे कसलेही गद्यसाहित्य म्हणजे कथा.

३. **एलरी सेजविक** - कथेत सुरुवात व शेवट हीच महत्त्वाची आहेत. "A story is like a horse-race. It is the start and the finish that count most.'

४. **बेट्स** - ''लघुकथेला कुठल्याही विषयाचे वावडे नसून लघुकथेचा विषय हा सर्वस्वी लेखकाच्या मर्जीवर अवलंबून असतो.''

५. **चेकॉव्ह** - ''कथेला सुरुवात व शेवट नसावा आणि एकही अनावश्यक गोष्ट कथेत येता कामा नये. कथेच्या सुरुवातीला जर भिंतीवर लटकत असलेल्या बंदुकीचे वर्णन लेखकाने केले असेल तर कथेत ती बंदूक चालवली गेलीच पाहिजे.''

६. **एलिझाबेथ बॉवेन** - कथेचा पहिला आवश्यक गुण म्हणजे तिच्या निर्मितीची अपरिहार्य आवश्यकता.

७. **जॉन हॅडफील्ड** - फार दीर्घ नसलेली गोष्ट म्हणजे लघुकथा. A story is not too long.

८. **एडगर ॲलन पो** - कथेत वापरली जाणारी सर्व साधने व योजिलेल्या क्लृप्त्या वाचकाच्या

मनावर एकच एक परिणाम करणाऱ्या असाव्या, म्हणजेच कथेत वापरला जाणारा एकही शब्द असा नसावा की ज्यामुळे या पूर्वनियोजित संस्काराला बाध येईल.

इसवी सन १८३२ मध्ये ॲडगर ॲलन पो प्रथम आधुनिक लघुकथा तंत्राचा वापर केला. नंतर १० वर्षांनी त्याने लघुकथेची व्याख्या सांगितली. यांच्या व्याख्येनुसार लघुकथेची आवश्यक अंगे अशी -

**१. हा विशिष्ट ठसा उमटविण्याच्या एकमेव हेतूने त्याला आवश्यक ठरतील तेवढ्याच प्रसंगांची योजना कुशल कथाकार आपल्या कथेत करतो.**

**२. कथेच वापरली जाणारी सर्व साधने वा युक्त्या हा एकच एक संस्कार बळकट करणारी असावी. म्हणजेच कथेतील पहिल्या वाक्यापासून शेवटच्या वाक्यापर्यंत किंबहुना कथेत आलेला प्रत्येक शब्द हा पूर्वनियोजित संस्काराला पोषक असावा.**

**३. ह्या सर्व साधनांनिशी तयार झालेली एक संपूर्ण, सलग एकसंघ कलाकृती परिणामकारी ठरते.**

<u>मराठीतील ज्येष्ठ समीक्षकांनी कथे विषयी केलेली विवेचन</u>

१. **ना.सी. फडके -** 'कमीत कमी पात्रे आणि कमीत कमी प्रसंग वापरून थोड्या वेळात परिणामकारकरितीने सांगितलेली व ऐकणाऱ्याच्या मनावर एकच एक ठसा उमटविणारी हकिकत म्हणजे लघुकथा होय.

२. **गंगाधर गाडगीळ -** लघुकथा लेखकाविषयी एवढेच ध्यानात ठेवायचे की जीवनाच्या ढिगाऱ्यात तो आपला हात खुपसतो आणि मग वाचकापुढे मूठ उघडून म्हणतो - 'ही पाहा, जीवनातील मोलाची भवसत्ये!'

३. **इंदुमती शेवडे -** कथेच्या स्वरुपाबाबत निष्कर्षात्मक लिहिताना इंदुमती शेवडे म्हणतात - 'स्वतंत्र वाङ्‌मयप्रकार म्हणून कथेचे अस्तित्व अबाधित आहे. तिची पृथगात्मकता कायम राहिली आहे. एक पृथगात्म वाङ्‌मयप्रकार म्हणून तिची व्यवच्छेदक लक्षणे दोन : एक तिच्यातील अनुभवाची एकात्मता एकजिनसीपणा, एक विविधता आणि दुसरे या गुणांशी संलग्न असलेले तिची एकसंस्कारित्व' कथेची ही लक्षणे विचारात घेऊन त्या कथेची व्याख्या अशी करतात - ''एकात्म अशा कथात्म अनुभवाची अर्थपूर्ण संघटना.'

४. **भालचंद्र नेमाडे** - लघुकथा हा कमी लांबीचा, चिंचोळा भाषिक अवकाश पुरविणारा, एकसुरी आशयसूत्रातून स्वकालाचे संकुचित म्हणून तीव्र संवेदन देणारा प्रकार आहे.

वरील विविध व्याख्यांच्या आधारे कथा म्हणजे काय ते स्पष्ट करता येईल. कोणत्याही एका व्याख्येच्या आधारे कथा या साहित्यप्रकाराचे स्वरुप स्पष्ट करता येणार नाही, हेही इथे लक्षात घेतले पाहिजे. कथेच्या विविधतेमुळे, वैचित्र्यामुळे सर्व प्रकारच्या कथांना एखाद्या निर्णायक व सूत्रबद्ध व्याख्येत बसविता येत नाही.

थोडक्यात लघुकथा म्हणजे पूर्वनियोजित संस्कार घडवून आणण्याच्या उद्देशाने आवश्यक तेवढ्याच साधनांद्वारे, कालक्रमानुसार नव्हे, तर चढत्या क्रमाने घटनांची गुंफण करून अंती एकच एक संस्कार करणारी परिणामकारक हकिकत म्हणजे कथा होय.

**एकुणच कथा या साहित्यप्रकाराचे पुढील विशेष सांगता येतील -**

१. कथेच्या विषयाला व स्वरुपाला आणि विशिष्ट प्रमाणात लांबीला बंधने नसली तरी तिच्यावर तिच्या आकारामुळेच बंधन पडते.

२. कथेच्या एककेंद्रीपणामुळे तिच्या संस्कारात एकता ही अपरिहार्यपणे येत असते.

३. कथेची लघुता, संस्काराची एकता यामुळे तिच्या रचनेत, संघटनेत एककेंद्रित्व, मितव्यय, संक्षेप, संपृक्तता व नेमकेपणा स्वभावतःच येतात.

४. कथेला अवकाशाची मर्यादा असल्यामुळे तिच्यातून मांडल्या जाणाऱ्या आशयाच्या व्याप्तीला व परिणामाला नैसर्गिक मर्यादा येतात.

५. कथेचे नैसर्गिक स्वरुपच लघु असल्यामुळे त्यातून सामान्यतः एकच एक संस्कार उमटत असतो. ही कथेची काही वैशिष्ट्ये आहेत. यातून कथेचे स्वरुप स्पष्ट होण्यास मदत होईल.

१९४५ नंतर पुढे आलेल्या नवकथेचाही विचार करणे आवश्यक आहे. गंगाधर गाडगीळ नवकथेविषयी लिहितात, 'नवकथा हे एक मोठे वर्तुळ आहे. जुन्या कथेचे वर्तुळ हे या मोठ्या वर्तुळाचा लहानसा भाग आहे.' नवकथेत घटनांचे अगर प्रसंगांचे आणि एकूण कथानकाचे मध्यवर्ती स्थान ढळते. कथानक हे साध्य न राहता साधन बनते. मानवी मनाचे सूक्ष्मातिसुक्ष्म व्यापार, प्रवाही संज्ञारुपाची परस्पर सुसंगत किंवा असंगत आवर्तने, स्थूल आणि सूक्ष्म पातळ्यांवर धावणाऱ्या विकार, वासनांच्या निसटत्या हालचाली, या सर्वातून जाणवणारे अश्रद्ध, अस्वस्थ जीवनादर्श ही नवकथेची उद्दिष्ट्ये बनली. नवकथेची ही परिमाणे गाडगीळांनी जवळजवळ दोन दशके मराठी वाचकांना दाखविली. आजच्या उद्ध्वस्त विश्वात वावरणाऱ्या संवेदनाशील वृत्तींना खोलवर जाणवणारी विमनस्कता, कटूता, जुगुप्सा, आत्मपीडेची जोरदार इच्छा, उपरेपणाची भावना यांचे नवे रसायन गाडगीळांनी बनविले व ते व्यक्त करण्यासाठी संज्ञाविष्काराच्या प्रतिमा संकराच्या, वितळणाऱ्या रुपकाच्या वेगवेगळ्या रचना आपल्या कथांतून साकार केल्या. ते मराठी नवकथेचे प्रणेते ठरले.

नवकथेनंतर आधुनिक प्रयोगशील मराठी कथा पुढे आली. विकास सारंग, श्याम मनोहर, एस.डी. इनामदार, अनिरुद्ध बनहट्टी, अनिल रघुनाथ कुलकर्णी इ. कथाकारांनी ही कथा लिहिल्याचे दिसते. ही कथा अत्यंत व्यक्तिनिष्ठ आणि खाजगी असल्याचे दिसून येते. या कथेला आभासाच्या नव्या वाटा धुंडाव्या लागतात. या कथेने प्रतिमा-प्रतिकांचा, विरुपाचा आणि कटूगोड वृत्ती आणि रुचिसंकरांचा या कथाकारांनी अवलंब केला. क्षणात उदात्त, गंभीर तर क्षणात विनोद, टवाळी करणारे भाव या कथांत दिसतात.

## १.५ कथा या साहित्याचे प्रकाराचे उपप्रकार

कथा हा सर्वात साहित्य प्रकार जुना आणि सर्वात नवा साहित्यप्रकार आहे. जगातील सर्व साहित्याचा पाया कथनात्मक आहे. साहित्यप्रकारांच्या कालक्रमानुसार लघुकथेचा जन्मक्रम शेवटचा लागतो. कथनाची आवड मानवाला आदिमकाळापासून आहे. अतिप्राचीन साहित्यातील कथारुपांचा विचार करता ऋग्वेदातील यम-यती कथा, महाभारतातील कर्णपर्वातील हंसकाकीय आख्यान, लघुकथेला जवळचे आहे. बौद्ध वाङ्मयातील जातककथाही लघुकथेला जवळच्या आहेत.

प्राचीन साहित्यातील बृहत्कथासार, कथा कलाद्रुम, वेताळ-पंचविशी इ. कथासंग्रहातील अनेक कथा लघुकथेसारख्या आहेत.

मानव संस्कृतीच्या अगदी प्राथमिक अवस्थेत होता व शिकार करून आपली उपजीविका करीत होता, त्या काळातही तो गोष्टी सांगत व ऐकत होता. त्या आदिमास्थितीत त्याने सांगितलेल्या जादूटोण्याच्या, भूताखेतांच्या, यक्षकिन्नरादिकांच्या देवकथा, प्राचीन काळी देवदानवांच्या, असामान्य मानवांच्या किंवा वेदांमधून, सुमेरियन लोकांच्या गिलगमश महागाथेतून, इलियड-ओडिसीमधून, नॉर्स लोकांच्या सागामधून सांगितलेल्या दैवतकथा, धर्मग्रंथांतून, संतचरित्रांतून, सांगितलेल्या नीतिकथा, इसापनीती, पंचतंत्रातील प्राणिकथा, मध्ययुगात बॅलॅड्ल, क्रॉनिकल्स, पोवाडे, लावण्या इत्यादी प्रकारांतून सांगितलेल्या राजेरजवाड्यांच्या व वीरांच्या

शौर्यकथा, किंवा अगदी सामान्य लोकांनी गावातल्या वडाच्या पाराशी व शहरातल्या बाजारठाण्यावर रंगवून सांगितलेल्या हकिकती, अरेबियन नाईटस् सारख्या अद्‌भुतकथा किंवा ठकसेन राजपुत्राच्या, बीरबलाच्या, तेनालीरामाच्या चातुर्यकथा किंवा आजीने नातवंडाला सांगितलेल्या शिशुकथा हे सर्व कथाप्रकार मानवाच्या कथनाच्या हौसेची साक्ष ठरतात.

याचबरोबर लोककथा, नीतिकथा, नक्षत्रकथा, व्रतकथा, आख्यायिका, परीकथा, बोधकथा, जलप्रलयकथा, बायबलमधील कथा असेही उपप्रकार आहेत.

आधुनिक साहित्यात कथा, लघुकथा, दीर्घकथा, लघुत्तमकथा, रुपककथा, कथामालिका, साखळी कथा, नवकथा इ. कथेचे उपप्रकार आहेत.

**प्राचीन भारतीय कथासाहित्य -**

भारतीय कथासाहित्याला फार मोठी परंपरा आहे. वैदिक वाङ्मयात, रामायण, महाभारतातील बोधकथा, बौद्ध जातके, जैनपूर्णी, पंचतंत्र, हितोपदेश, कथासरित्सागर, वेताळपंचविशी, सिंहासनबत्तिशी, शुकसप्तमी, प्राणिकथा, नीतिकथा, ठककथा इत्यादी प्रकारचे कथासाहित्य आहे.

१३व्या शतकातील महानुभाव साहित्यात मराठीतील पहिली लिखित गोष्ट आढळते. लीळाचरित्र ग्रंथातील अनेक प्रसंग तसेच दृष्टांतपाठातील चक्रधरांचे दृष्टांत हे मराठीतील आद्य कथासाहित्य म्हणता येईल. त्यापूर्वी मराठी लोककथा, चंद्रहास कथा, राजा धिंग माथा शिंग सारखी कथा, श्रावणसाखळी, पैशाचं झाड सारख्या कथांची बीजे मराठीत आढळतात. मराठीतील कथालेखकाचा पहिला मान महिंद्रव्यासांना जात असला तरी 'वैजनाथ कलानिधी' हा मराठीतील आद्य कथाग्रंथ होय.

महानुभाव गद्य साहित्याच्या समकालीन आंग्ल साहित्यात यॉसरने (१३४०-१४००) लिहिलेल्या कॅटरबरी कथा आढळतात. बोकाचीको (१३१३-१३५५) या इटालिअन लेखकाच्या 'रेकलेरॉन' संग्रहातील कथाही आढळतात. मात्र कथालेखनाच्या जाणिवेने लिहिलेले हे साहित्य नव्हे.'

**१९ व्या शतकातील कथा -**

कथात्म साहित्याच्या महाप्रवाहातून कथा वेगळी झाली ती १९ व्या शतकात. १८ व्या शतकात या महासागरातून कादंबरी वेगळी झाली. १९ व्या शतकात युरोप, इंग्लंडमध्ये नियतकालिकांचा उदय झाला. नियतकालिकांसाठी कथालेखनाची निर्मिती झाली. जर्मनी, अमेरिका, फ्रान्स आणि रशिया या चार देशात कथालेखन जास्त होऊ लागले. एडगर ॲलन पो हा महत्त्वाचा कथाकार होय. पोने कथेचे विवेचन करून लक्षणे स्पष्ट केली. गीर मेपोला, अंतान चेकॉव्ह, ओ. हेन्री हे महत्त्वाचे पाश्चात्य कथाकार होत. पाश्चात्य कथेत पो ने सांगितलेली कथेची लक्षणे महत्त्वाची आहेत. लघुकथेची सेंद्रिय एकात्मता, तिची संपूर्णता व स्वयंपूर्णता, त्याद्वारा व्यक्त होणारा एक अनुभव आकृतिबंध या त्याने सांगितलेल्या घटकांचे लघुकथेच्या अभ्यासात व विवेचनात महत्त्वाचे स्थान असल्याचे दिसते.

**मराठीतील लघुकथा -**

मराठी लघुकथा १९व्या शतकात नियतकालिकांच्या जन्माबरोबर जन्माला आली. मराठी ज्ञानप्रसारक (१८५०) हरिभाऊंचे करमणूक (१८९०), मासिक मनोरंजन (१८९५) मधून स्फूट गोष्ट पुढे आली.

१९२० नंतर एक स्वतंत्र, स्वायत्त वाङ्मयप्रकार म्हणून कथेचा विचार झाला. दिवाकर कृष्णांनी हरिभाऊ - वि.सी. गुर्जरांच्या गोष्टीला लघुकथा बनविले. १९२० ते १९४० मधील कथा मोपासा परंपरेतील विशिष्ट परिणाम साधण्याकडे कल असलेली होती. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात तिच्या प्रकृतीत बदल झाला तो य.गो.जोशी, वामन चोरघडे यांच्या कथेमुळे.

१९४५ मध्ये गाडगीळ-भावे-गोखले-माडगूळकर यांनी लघुकथेला नवकथा बनविले. १९२० ते ४० आणि १९४० ते ६० या काळातील कथेपुढील लेखनादर्श यात खूप अंतर आहे. १९४० नंतर कथेच्या कथा विस्तारल्या जाऊन जीवनदर्शनाचे तिच्यातील सुप्त सामर्थ्य वाढीला लागले. अतिशय कमी काळात घडून आलेला मराठी कथेचा विकास उल्लेखनीय आहे.

१९६० नंतर मराठी कथा अधिकच समृद्ध, प्रयोगक्षम व कलासंपन्न झाली. मराठी कथेत नवीन साहित्यप्रवाह/वाङ्मयप्रवाह निर्माण झाले. ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, नागर/महानगरीय, आदिवासी, ऐतिहासिक, पौराणिक, प्रादेशिक, विज्ञानकथा, गूढकथा, रहस्यकथा इ. प्रवाह पुढे आले. रुजले, वाढले. या दरम्यानची मराठी लघुकथा चेकॉव्हप्रणीत मार्गाने प्रवास करीत करीत खूपच प्रगत झाली आहे. तिच्या कथा विस्तारल्या आहेत. जीवनदर्शनाचे तिच्यातील सुप्त सामर्थ्य वाढले आहे. मराठी लघुकथा पाश्चात्य लघुकथेपक्षा वयाने लहान असली तरी, तिने आपल्या अल्पवयात स्वतःचा घडवून आणलेला विकास निःसंशय उल्लेखनीय आहे. आजची मराठी कथा पाश्चात्य कथेच्या पुढे गेलेली नसली, तरी ती फारशी मागेही नाही.

## १.६ कथा या साहित्य प्रकाराचे घटक

**कथेचे घटक** - कथा व कादंबरी हे दोन्ही साहित्यप्रकार कथात्म साहित्याच्या वर्गातील असल्याने दोन्ही साहित्यप्रकाराचे मूलघटक समानच आहेत. कथेच्या घटकांचा विचार कथेची समष्टी, कथा बांधणी विचार, कथा तंत्राचा विचार म्हणूनही केला जातो. कथेचे घटक पुढील प्रमाणे -

१. **कथानक / कथावस्तू**

२. **कथार्थ /कथाबीज/अनुभवार्थ/आशयसूत्र**

३. **पात्र - व्यक्तिचित्रण/स्वभावदर्शन/व्यक्तिरेखाटन**

४. **वातावरण-देशकालवातावरण**

५. **निवेदन, कथनपद्धती, निवेदनशैली, निवेदनपद्धती, संवादवर्णन, कथनभाष्य**

६. **भाषा-भाषाशैली**

**कथानक, पात्र, वातावरण, निवेदनपद्धती व भाषा** हे कथेचे मूलघटक आहेत. या घटकांच्या आश्रयाने कथाकार कथानिर्मिती करीत असतो. कथेच्या घटकांचे/समष्टीचे/अंगांचे स्वरुपविवेचन कथेची कलाप्रकृती समजण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरेल. या सर्व घटकांची मांडणी अत्यावश्यक अपरिहार्यतेतून होणे अगत्याचे असते. एलिझाबेथ बॉवेन म्हणते - 'The first necessity is necessariness.' कथेचे पहिले आवश्यक तत्त्व म्हणून या आवश्यकता तत्वाचा उल्लेख करता येईल. कथात्म साहित्यकृतीची संहिता विविध निवेदनप्रकारातून भाषेच्या माध्यमातून घडत असते. कथानक, पात्र, वातावरण हे घटक त्यातूनच मूर्त होत असतात आणि या सर्वातून एकात्मपणे कथात्म साहित्यकृतीतील अनुभवार्थाची व कथार्थाची निर्मिती होत असते. म्हणजे अनुभवार्थ, आशयसूत्र, कथानक, पात्र, वातावरण, निवेदन व भाषा अशी घटकांगे मिळून कथात्म साहित्यकृतीची समष्टी घडत असते.

कथासाहित्याच्या घटक अंगाचा विचार पुढीलप्रमाणे करता येईल.

### १. अनुभवार्थ/कथार्थ

इतर साहित्यप्रकारांतील अनुभवार्थाप्रमाणेच कथेतील अनुभवार्थ हा मानवी जीवनासंबंधी असतो. तसेच तो कल्पकतापूर्ण असतो. कथाकाराभोवती एक वास्तव, लौकिक स्वरुपाचे जीवनविश्व असते. या वास्तव, प्रत्यक्ष विश्वाच्या पार्श्वभूमीवर तो आपल्या कथेत एक कल्पित कथारूप विश्व निर्माण करतो. या काल्पनिक विश्वात तो माणसाच्या स्वतःशी, इतरांशी, समाजाशी, निसर्गाशी किंवा एखाद्या अज्ञात शक्तीशी येणाऱ्या संबंधांचे चित्रण करीत असतो. या

संबंधातून मानसिक, आत्मिक, सामाजिक, राजकीय, निसर्गनिष्ट इत्यादी स्वरुपांचे मानवी अनुभवविश्व उभारले जाते. कथेतून चित्रित केलेले मानवी भावविश्व जाणिवेचा तसेच नेणिवेच्या पातळीवरील असू शकते. यामुळेच कथेतील काल्पनिक विश्व वास्तवाचा आभास निर्माण करणारे तसेच अद्‌भुतरम्यही असू शकते. कथागत अनुभव हा अनेकविध प्रकृतींचा असू शकतो. अनुभवविषयाप्रमाणे कथेतील अनुभवाचे रूप बदलत राहाते. तो गंभीर, काव्यात्म, विनोदगर्भ, नाट्यात्म, उपरोधगर्भ, चिंतनात्म असा विविध प्रकृतींचा असू शकतो. कथागत अनुभव अंर्तभुत प्रकृतीचा, व्यक्तिकेंद्री तसाच बहिर्मुख प्रकृतीचा, तटस्थपणे घेतलेला असाही असतो. तरल, हळूवार, सामाजिक, सांस्कृतिक असे अनेक प्रकारचे अनुभव कथांचे विषय झालेले आढळतात. अनुभवरुपांतील या वैचित्र्यातूनच कथा या साहित्यप्रकाराला रुपबंधाचे वैचित्र्य लाभलेले दिसते.

कथेचे विषय असंख्य असू शकतात. किंबहुना लघुकथेला कोणत्याही गोष्टीचे वावडे नाही. जीवनाच्या एका विशाल परिघात कथेची कथावस्तू प्रवास करीत असते. प्राचीन, अर्वाचीन अशा कोणत्याही घटकात कथेची कथावस्तू सापडू शकेल. रोजच्या जीवनातील संघर्षात कथाप्रसंग निवडून त्यातून नेमके कथाबीज निवडून प्रतिभावंत कथाकार कथानिर्मिती करीत असतो. कथावस्तूत त्याच्या प्रभावीपणाला महत्त्व असते. या प्रभावानुसार त्याच्या प्रभावीपणाला महत्त्व असते. या प्रभावानुसार व्यक्ती-पात्र-प्रसंग-वातावरण इ. घटकांची निर्मिती साधता येते.

**कथानक**

कथानक हा कथा या शब्दापासून बनला आहे. कथा हा शब्द 'कथ्' या धातूपासून बनला असून त्याचा अर्थ सांगणे किंवा वर्णन करणे असा आहे. कथानकाचा शब्दशः अर्थ कथेचे छोटे रूप किंवा सारांश असा आहे. साहित्यात कथानक म्हणजे ते तत्व, जे कालक्रमानुसार शृंखलाबद्ध केलेल्या घटनांना दृढता देऊन गती प्रदान करते व त्यांच्या भोवती घटनांची मालिका वेलीप्रमाणे आपला पसारा वाढवते. कथानकाला इंग्रजीत plot असे म्हणतात. यात अर्थकारणमीमांसा व कुतुहलनिर्मिती या दोन गुणांमुळे आकर्षकता आलेली असते. कथेत कथानकाचा आधार असतो. कथेत समग्र घटनांचा संग्रह असतो. ते सुयोग्य असे संकलन असते. कथानकात विश्वसनीयता हीच सत्याची कसोटी मानली जाते. याचबरोबर उत्कंठा व जिज्ञासा असावी. एकूणच कथानकाचे एक विलक्षण आकर्षण कथेत असते. कथानकाचे काही प्रमुख गुण मौलिकता, संभवनीयता, सुसंघटितता, रचनाकौशल्य, रोचकता आणि रंजकता हे आहेत.

कथानकातून कथेतील अनुभवार्थ साकारला जातो. घटना व पात्रे एकमेकांना घडवीत कथानकाची उभारणी करीत असतात. कथानक हा कथेतील एक गतिशील घटक असतो. कथेत घटनांचा प्रवाह कथांकित केलेला असतो. कथाकार कथेतील घटनांची, कृतींची व इतर तपशीलांची निवड करतो आणि त्यांच्या गुंफणीतून विशिष्ट प्रकारचे कथानक तयार करतो. कथानकात गुंफलेल्या घटना बाह्य तशाच मानसिक स्वरुपाच्या असू शकतात. अशा स्वरुपाच्या किमान तीन घटना कथेत घडणे आवश्यक असते. त्याशिवाय कथेला रूप, आकार येत नाही. कथानकाला आदि,मध्य व अंत असेल तरच त्याला समग्रता प्राप्त होते. कालक्रम व कार्यकारणभाव, संभवनीयता आदी तत्वांनुसार घटनांची गुंफण झालेली असेल तर तिला कथानक (plot) म्हणता येईल असे ई.एम. फॉर्स्टरने म्हटले आहे.

कार्यकारणभाव व कालानुवर्तित्व ही कथानकाच्या संघटनेतील प्राथमिक तत्वे म्हणता येतील. खरेतर कथाकाराला केवळ एखादे कथानक वाचकाला सांगायचे नसते, तो विशिष्ट कथार्थाची निर्मिती करीत असतो. विशिष्ट भावाशय निर्माण करून तो कथेतून मांडण्यासाठी कथानकाचे उपयोजन असते.

**व्यक्तिचित्रण -**

कथागत अनुभवार्थ हा कथानकाप्रमाणेच पात्र या कथांगाच्या आश्रयानेही मूर्त होत असतो. म्हणजेच पात्र हाही कथेचा एक महत्त्वपूर्ण मूलघटक ठरतो. पात्रांचे प्रमुख कथात्म कार्यही कथार्थाची निर्मिती हेच असते. कथाकार एखाद्या व्यक्तीची वृत्ती, कृती, उक्ती, भावना, विचार, कल्पना, संवेदना, जीवनदृष्टी, जीवनपद्धती इत्यादींच्या चित्रणातून त्या व्यक्तीची एक शब्दरुप प्रतिमा कथेत निर्माण करतो. व्यक्तीच्या या शब्दरूप प्रतिभेला 'पात्र' असे म्हटले

जाते. या कथेतील शब्दरूप पात्रांना प्रत्यक्षातील माणसांप्रमाणे शारीरिक, मानसिक व सामाजिक अंगे लाभलेली असतात.

कथागत प्रत्येक पात्राला स्वतःचे असे विशिष्ट व्यक्तित्व लाभलेले असते. मात्र हे पात्र प्रत्यक्षातील व्यक्तीप्रमाणे स्वतंत्र नसते. कथार्थाची निर्मिती हे त्याचे कार्य असल्याने ते त्या कथार्थाला बांधलेले असते. कथेतील पात्र हे कथासंहितेच्या अंगभूत घटक म्हणून जसे क्रियाशील असते तसेच त्या पात्राचे भावविश्व प्रत्यक्षातील मानवी भावविश्वाशी विशिष्ट प्रकारचे नाते प्रस्थापित करीत असते. कथेतील पात्रे ही प्रत्यक्षातील माणसांच्या कृतींची अनुकृती करीत असतात, असे ॲरिस्टॉटलने म्हटले आहे.

कथाकाराला पात्र निर्माण करत असताना काही नैसर्गिक मर्यादा असतात. एखाद्या पात्राचा संपूर्ण जीवनप्रवास कथेत चित्रित केला जाऊ शकत नाही. पात्रचित्रणातील विस्ताराला तपशिलांच्या भरगच्चपणाला कथेत वावच नसतो. मर्यादित अवकाशात मोजक्या साधनांनी प्रयोजनपूर्ण पात्र निर्मिती करणे हे कलाकारासमोरील एक कलात्मक आव्हान असते.

फॉर्स्टरच्या मते व्यक्तिरेखांचे/पात्रांचे दोन प्रमुख प्रकार मानता येतात -

१. स्थिर प्रकृतीची अपरिवर्तनशील पात्रे.

२. गुंतागुंतीची व परिवर्तनशील (विकासक्षम) पात्रे.

थोडक्यात ललित साहित्यात व्यक्तिदर्शन अतिशय महत्त्वाचे असून कथानकप्रधान आणि व्यक्तिप्रधान अशा दोनच भागात ललितसाहित्य विभाजित करता येईल. त्यातील कथानकापेक्षा व्यक्तिदर्शन हेच महत्त्वाचे असते. ना.सी.फडके म्हणतात - कथानकापेक्षा व्यक्तिदर्शन हेच अधिक महत्त्वाचे असते.

**वातावरण -**

कथेतील घटना, पात्रे एखाद्या पोकळीत घडत, जगत नसतात.  कथा ही एका विशिष्ट स्थलकालाच्या चौकटीत, एका विशिष्ट भौगोलिक तसेच सामाजिक, सांस्कृतिक परिसरात घडत असते. याबरोबरच कथेतून एखादी भाववृत्तीही प्रकट होत असते. या सर्व घटकांतून कथेतील वातावरण तयार होत असते. वातावरण हाही कथेचा मूलघटक होय.

कथाकाराने वातावरणाच्या तपशिलांच्या केलेल्या निवडीमागे त्याची कलादृष्टी असते आणि विशिष्ट कथाहेतूंसाठी त्यांचे उपयोजन होत असते. कथेतील वातावरणाचे अस्तित्व पार्श्वपटासारखे नसते. वातावरण हा कथार्थाच्या निर्मितीतील एक क्रियाशील घटक असतो. कथेतील वातावरणाचे प्राथमिक स्वरुपाचे प्रयोजन म्हणजे कथेसाठी एक काल्पनिक परिसर निर्माण करणे हे होय. विशिष्ट स्थलकालाच्या चित्रणामुळे कथेतील वातावरण कल्पनेच्या पातळीवर संवेद्य होत असते. मात्र वातावरणाचा एक घटक केवळ याच स्तरावर क्रियाशील असू शकतो. कथेतील पात्र, घटना, प्रसंग, नाट्य, संघर्ष याबाबत वातावरण हा घटक महत्त्वपूर्ण जबाबदारी पार पाडत असतो.

कथेत स्वाभाविकता आणि सजीवता उत्पन्न होण्याच्या दृष्टीने देशकाल वातावरणाचे फार महत्त्व असते. कथेतील प्रत्येक पात्र व त्याचे कार्य हे कोणत्यातरी विशिष्ट देशकाल वातावरणाशी निगडित असते. कथेतील घटनाप्रसंग आणि व्यक्तिस्वभाव यातील कार्यकारण भाव अधिक स्पष्ट करण्यासाठी या वातावरणाचा उपयोग होतो. कथागत पात्रांचे स्वभावधर्मही या वातावरणामुळे अधिक स्पष्ट होते. म्हणूनच देशकालवातावरण हे एक स्वतंत्र तत्व मानले जाते. हे वातावरण तीन प्रकारे आपल्या प्रत्ययास येते - १. इंद्रिय संवेदनांच्या भाववृत्ती जागृत करणारे वातावरण. २. मानवी सौंदर्यानुभूती जागे करणारे वातावरण. ३. वाचकांची समरसता उत्पन्न करणारे वातावरण. प्रत्येक कथेत कोणत्या ना कोणत्या प्रकारचे वातावरण असणे आवश्यक असते. वातावरणामुळे वर्ण्य विषयास उठावदारपणा येतो. कथेची पार्श्वभूमी भौगोलिक आणि सामाजिक प्रकारची मानली जाते.

**निवेदन -**

निवेदन किंवा कथन हे कथेचे एक व्यवच्छेदक वैशिष्ट्य आहे. कथाकार कथा सांगण्यासाठी एक निवेदन-पात्र निर्माण करतो आणि त्या पात्राच्या विशिष्ट दृष्टिकोनातून

वाचकाला/श्रोत्याला कथा सांगत असतो. यामागे कथाकाराचा कलाहेतू असतो. या हेतुनुसार कथाकार निवेदक-पात्राच्या दृष्टिकोनातून कथेतील विविध घटकांची विशिष्ट रीतीने संघटना करीत असतो. अशा प्रकारे कथेतील संपूर्ण भावविश्वाचे सूत्रसंचालन कथाकार करीत असतो. कथासूत्राशी एकरूप होऊन लिहिणे, समरसून निवेदन करणे व तिच्याकडे अलिप्तपणे पाहून निवेदन करणे हे निवेदनाचे दोन मुख्य प्रकार आहेत. या दोन प्रकारात कथार्थानुसार विविध छटा संभवतात.

निवेदनाचे प्रथमपुरुषी निवेदन व तृतीयपुरुषी निवेदन असेही दोन प्रकार आहेत. प्रथमपुरुषी निवेदक हे कथेतील एक पात्र असते. हे पात्र कथेत केंद्रवर्ती किंवा दुय्यम स्वरुपाचे असते.

तृतीयपुरुषी निवेदन हे कथेबाहेरील एक निवेदक-पात्र असते. कधी हा निवेदक सर्वज्ञ, सर्वसाक्षी असतो तर कधी तो सामान्य निरीक्षक असतो. कथेच्या निवेदनाचा निर्णय कथाकाराने घेतलेला असतो. निवेदन हा कथार्थाच्या निर्मितीतील एक महत्त्वाचा घटक असतो. तृतीयपुरुषी निवेदक कधी भाष्य करीत, भावनात्मक परिणाम साधीत निवेदन करतो तर कधी तो पूर्ण उदासीन, अलिप्त वृत्तीने कथन करतो. त्याच्या दृष्टिकोनातून एखादी भावनिक वृत्ती, विचार प्रणाली किंवा मूल्यभाव असू शकतो तर कधी त्याचा दृष्टिकोण मूल्यनिरपेक्ष, भावनिरपेक्ष असू शकतो.

कथानिवेदक कधी घटनाप्रसंगांचे नाट्यात्म दर्शन घडवितो तर कधी पात्राच्या जाणिवेच्या पातळीवर जाऊन अनुभवकथन करतो. कथावस्तू व निवेदक यांमधील अंतर हा निवेदकाच्या दृष्टिकोनाशी निगडित असलेला एक घटक आहे. कथानिवेदक कथेत पात्रप्रसंगादींचे वर्णन/कथन करतो तसेच काहीवेळा पात्रप्रसंगादीवर भाष्यही करतो. काहीवेळा अर्थविवरणाबरोबर तो मूल्यमापनही करीत असतो. निवेदक हा भाष्याद्वारे जीवनासंबंधी तत्वविचारही मांडतो. निवेदनातून कथाकार कथेची निर्मिती करतो. निवेदनातून कथानक आकारत जातो. पात्रनिर्मिती साधतो. अप्रत्यक्ष पद्धतीने निवेदन आणि प्रत्यक्ष पात्रमुखातून निवेदन असे निवेदनाचे दोन प्रकार होतात. संवाद व स्वगत भाषण यांचा समावेश पात्रमुखातून निवेदनात होतो. संवाद हा निवेदनातील एक घटक आहे. पात्रनिर्मिती हे संवादाचे प्रमुख प्रयोजन होय.

**भाषा**

कथेची संहिता ही भाषेने साकार होत असते. कथेची भाषा ही एका कल्पित विश्वाची भाषा असते. ते कल्पित विश्व निर्माण करणारी ती भाषा असते. कवितेच्या भाषेप्रमाणे कथेची भाषा लक्षवेधक असते. कथेची भाषा गद्यसदृश्य, व्यवहारातल्या परिचित भाषेचा आभास निर्माण करणारी असते. मात्र व्यवहारातील भाषेपेक्षा तिचे स्वरुप वेगळे असते. एखाद्या कथेसाठी कथाकार विशिष्ट रीतीने भाषेचा वापर करतो. कथागत अनुभवानुसार कथाकाराची विशिष्ट भाषारुपाची निवड ठरत असते. कथेतील निवेदक, दृष्टिकोण, तिच्यातील अनुभव घेण्याची पद्धती इत्यादीनुसार हे भाषारुप निश्चित होत असते. भाषा हा एका अर्थाने निवेदनाचाच एक घटक असतो.

कथेचे वरील सर्व घटक एकत्रितपणे कथार्थाची निर्मिती करीत असतात. ते एकमेकांवर अवलंबून असतात. एकमेकांवर संस्कार करीत एकमेकांचे स्वरुप निश्चित करीत असतात आणि त्या सर्वांमधून कथासमष्टी साकार होत असते.

कथा ही कलानिर्मितीच्या उद्दिष्टातून तसेच रंजन, बोध यांसारख्या कलाबाह्य हेतूंनी प्रेरित होऊन लिहिल्याचे दिसते. एक आव्हानात्मक साहित्यप्रकार म्हणून श्रेष्ठ साहित्यिकांनी गंभीर, कलापूर्ण निर्मितीसाठी कथेची सातत्याने निवड केलेली आहे. कथा-लघुकथा-नवकथा अशा नवनव्या रुपांत कथा आकारत आहे. कथेच्या संकल्पनेचा नव्याने विचार करायला लावणारी अशी आजची कथा आहे. आणि यातच कथा या साहित्यप्रकाराचे श्रेष्ठत्व, सामर्थ्य, वेगळेपण व सौंदर्य साठवलेले आहे.

## १.७ सारांश

कथा हा साहित्य प्रकार वाचकासाठी लोकप्रिय ठरलेला साहित्य प्रकार आहे. कथा ह्या साहित्य प्रकाराची सुरूवात प्राचीन  काळापासून झाली आहे.मात्र त्याचे स्वरूप वेगळे होते. बदलत्या समाजजीवनाबरोबर कथाही बदललेली दिसते कथानक, कथाबीज, पात्र वातावरण, निवेदन, भाषा शैली हे कथा साहित्य प्रकाराचे घटक आहे. १९६० नंतर मराठी कथेमध्ये मोठ्या प्रमाणात बदल झालेले दिसतात.साहित्याच्या प्रवाहानुसार कथा हा वाड्मय प्रकार बहराला आलेला दिसतो.

## १.८ प्रश्नावली

१. कथा या साहित्य प्रकाराच्या घटकांची चर्चा करा.

२. साहित्य प्रकारांमध्ये कथा या प्रकाराचे वेगळेपण स्पष्ट करा.

३ ‘कथेतील निवेदन शैली’ या विषयी चर्चा करा.

४. कथा साहित्य या प्रकाराचे वेगळेपण स्पष्ट करा.

## १.९ संदर्भ ग्रंथ सुची

१. पांटील गंगाधर -  कथनमीमांसा

❖ ❖ ❖

# २

# मराठी कथेची वाटचाल

**घटक रचना**

२.० प्रस्तावना
२.१ मराठी कथेचा प्रारंभ
२.२ परभृत मराठी कथा (१८०६-१८५७)
२.३ १८३४ ते १९२० या काळातील मराठी कथा
२.४ १९२० ते १९६० या काळातील मराठी कथा
२.५ १९४५ नंतरची कथा नवकथा
२.६ १९६० नंतरची मराठी कथा
२.७ सारांश
२.८ प्रश्नावली
२.९ संर्दभ ग्रंथ सुची

## २.० प्रस्तावना

मराठा कथा टप्याने कशी बदलत गेली हे मराठी कथेचा अभ्यास करताना दिसून येते. बदलते मराठी जीवन चित्रण मराठी कथेतून झालेले दिसून येते. मराठी कथेची वाटचाल पाहिल्यानंतर मराठी कथा समृध्द झाल्याचे दिसून येते.

## २.१ मराठी कथेचा प्रारंभ

आधुनिक मराठी कथेचा प्रारंभ इ.स. १८०६ सालच्या 'बाळबोध-मुक्तावली' या इसापनीच्या भाषांतराने झाला. तंजावर येथील सक्खन पंडिताने हे भाषांतर केले. यानंतर वैजनाथ पंडितांनी सिंहासनबत्तिशी (१९२४), पंचतंत्र (१९१५), हितोपदेश (१८१५), राजा प्रतापादित्याचे चरित्र (१९१६) इत्यादी भाषांतरीत ग्रंथांत उपदेशप्रधान गोष्टी वा कथा कथन केल्या.

इ.स. १८६१-६५ या काळात कृष्णशास्त्री चिपळूणकरांनी 'अरबी भाषेतील सुरस व चमत्कारिक गोष्टी' मराठीत आणल्या. कृष्णराव रामराव यांचा 'हातिमताईचे चरित्र' हा कथा-ग्रंथ १९५५ ला तयार झाला. या काळात कहाणी, गोष्ट, कथा यात फारसे अंतर नव्हते.

## २.२ परभृत मराठी कथा (१८०६-१८५७)

मराठी भाषेत देवनागरी लिपीमध्ये लिहिलेले पहिले मराठी कथेचे पुस्तक बंगालमध्ये प्रसिद्ध केले गेले. (बालबोध मुक्तावली). भारतात मुद्रणकलेचा जसजसा विकास होत गेला, तसतशी मराठी कथाही लिहिली गेली. एकीकडे मुद्रण कलेचा विकास होत असताना दूसरीकडे स्वसंस्कृतीच्या प्रचारार्थ इंग्रजांनी हिंदूस्थानाच राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक सुधारणेचे सत्र सुरु केले. त्याचा परिणाम होऊन समाजसुधारकांनी शैक्षणिक धोरण आखताना मुलांवर

संस्कार होऊन नीती व व्यवहाज्ञान प्राप्त व्हावे या हेतूने कथालेखकांनी कथालेखनास प्रारंभ केला. बापुछत्रे, बाळशास्त्री जांभेकर, विष्णुशास्त्री बापट, कृष्णाशास्त्री चिपळुणकर, डॉ. रामजी गणोजी यांनी मुलांसाठी, वाचकांसाठी भाषांतरित कथेची पुस्तके लिहिली. बाळबोध मुक्तावली, पंचतंत्र (१८१५) सक्कत पंडित (१८०६), सिंहासन बत्तीशी (वैजनाथ पंडित १८२४) हितोपदेश, नीतिदर्पण (विष्णुशास्त्री बापट १८३७) इसापकथा (बापू छत्रे) (नीतीकथा) बाळशास्त्री जांभेकर १८३१, इत्यादी कथालेखकांनी मराठी कथा लिहिली.

**मराठी भाषांतरित, रूपांतरित कथा (१८५७-१८८९)**

मराठी भाषेमध्ये देवनागरीत लिपीत लिहिल्या गेलेल्या कथेचे पहिले पुस्तक बंगालमध्ये प्रसिद्ध केले गेले. त्यानंतर भारतात मुद्रणकलेचा जसा विकास होत गेला तशी मराठी कथा लिहिली गेली. मुद्रण कलेचा विकास होत असतानाच दुसरीकडे स्वसंस्कृतीच्या प्रचारार्थ इंग्रजांनी भारतात राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक सुधारणेचे सत्र सुरु केले. त्याचा परिणाम होऊन जांभेकर-पद्मनजी, चिपळूणकर, आगरकर यांनी. साहित्य, समाज, शिक्षण क्षेत्रात मोलाचे कार्य केले. शैक्षणिक धोरण आखताना मुलांवर योग्य सुसंस्कार व्हावेत त्यांना व्यवहारज्ञान प्राप्त व्हावे या हेतूने सक्कन पंडित, बापू छत्रे, बाळाशास्त्री जांभेकर, विष्णुशास्त्री बापट, कृष्णशास्त्री चिपळूणकर, नवलकर, डॉ. रामजी गणोजी प्रभृती अनेक लेखकांनी शालेय शिक्षण घेणाऱ्या मुलांसाठी तसेच त्यावेळच्या मराठी वाचकांसाठी त्यांनी बाळबोध मुक्तावली, पंचतंत्र (१८१५), सक्कन पंडित १८०६. सिंहासन बत्तीशी, वैजनाथ पंडित १८२४ हितोपदेश, नीतिदर्पण विष्णुशास्त्री बापट १८३७, इसाप कथा (बापू छत्रे १८३०) नीतीकथा, (बाळशास्त्री जांभेकर १८३१) नारो आप्पाजी गोडबोले भाग-१ ते ८. १९६७-८९ मध्ये कथा पुस्तके प्रसिद्ध झाली. या कथाचा इंग्रजी राजवटीमध्ये पहिले पाठ्यपुस्तक पंचतंत्र या कथाचा समावेश केला होता. त्यानंतर सिंहासन बत्तीशी इसापकथा, वेताळकथा इत्यादी पाठ्यपुस्तके प्रसिद्ध करण्यात आली होती.

## २.३ १८३४ ते १९२० या काळातील मराठी कथा

**ह.ना. आपटे -**

करमणूक (१८९०) या साप्ताहिकाद्वारे त्यांनी मराठीमनाची अभिरुची उन्नत करण्यास फार मोठे साहाय्य केले. मराठी लघुकथेच्या विकासात हरिभाऊंची 'स्फुट गोष्ट' हा विकासाचा पहिला टप्पा मानावा लागतो. १८९० पासून १९१७ पर्यंत हरिभाऊंनी 'करमणूक' मधून तील ते पस्तीस स्फुट कथा ही त्यांनी लिहिल्या त्यांच्या कथा पाल्हाळिक वाटतात तरी त्यातील प्रत्ययकारिकत्वामुळे आजही वाचनीय आहेत. आधुनिक मराठी कथेचा निर्मितीचा मानही करमणूकला जातो. करमणूक व स्फुट गोष्टी भाग १ ते ४ (१९१७) मधून त्यांच्या कथा संग्रहित केल्या आहेत. त्यापैकी एकवीस गोष्टी आज उपलब्ध आहेत. होते ते असेच, भेट, खरी की खोटी, भुताटकीचे घर, पुरी हौस फिटली, थोड्या चुकीचा घोर परिणाम, उपकाराची फेड उपकारानीच, काळ तर मोठा कठीण आला, कसे दिवस गेले इत्यादी गोष्टी हरिभाऊंनी लिहिल्या. मनोरंजन, निबंधचंद्रिका या नियतकालिकातूनही त्यांच्या कथा लहान गोष्ट, मोठी गोष्ट म्हणून प्रसिद्ध झाल्या. हरिभाऊ आपटे यांनी सामाजिक, विनोदी, प्रदीर्घ, ऐतिहासिक, अद्भुत, भयानक, कौटुंबिक, अशा विविध विषयांवरील कथा लिहिल्या. हरिभाऊंची गोष्ट उपदेशप्रधान, प्रसंगनिष्ठ, सानंदबोध देणारी, घटनाप्रधान अशी आहे.

**वि.सी. गुर्जर -**

वि.सी. गुर्जर यांनी १९०८ पासून १९६४ पर्यंत सुमारे सातशे कथा लिहिल्या. 'द्राक्षांचे बोल' हा त्यांचा एकच कथासंग्रह असून इतर कथा मनोरंजन, यशवंत, सत्यकथा इ. मासिकांतून विखुरलेल्या आहेत. मनोरंजन हा त्यांच्या कथांचा मुख्य हेतू होता. त्यांच्या कथा लघुकथेपेक्षा दीर्घकथा किंवा संपूर्ण गोष्ट म्हणता येतीत अशा आहेत. हरिभाऊंच्या 'स्फुट गोष्टी' एवढीच गुर्जरांची 'संपूर्ण गोष्ट' ऐसपैस होती. टीकाकार, हरवलेली अंगठी, दिपोटी, पुरुषाची जात, बायकांची जात प्रेमाची खूण नाटक, घातवार इ. अनेक कथा वैशिष्ट्यपूर्ण आहेत.

**कृ.के. गोखले -**

'खूप केलीत सूनबाई' हा त्यांचा कथासंग्रह १९११ ला प्रसिद्ध झाला. कृ. के. गोखले यांनी ५० ते ६० कथा लिहिल्या. त्यांच्या बहुसंख्य कथांचे मूळ इंग्रजी कथांमध्ये आढळते.

**सहकारी कृष्ण-**

सहकारी कृष्ण यांच्या कथेचा मुख्य हेतू समाजाला बोध करण्याचा होता. त्यांच्या गोष्टींतून गरीब, मध्यमवर्गीय, सुखदुःखांचे व त्यांच्या सुधारणांचे थोडक्यात वर्णन होते. संसार की नरकवास, कजाग सासू, माझी कहाणी, चहागृहे इ. उल्लेखनीय कथा त्यांन लिहिल्या.

**काशीबाई कानिटकर -**

हरिभाऊंच्या समकालीन व निकटवर्ती लेखिका म्हणून काशीताई कानिटकर यांना ओळखले जाते. त्यांच्या कथा पूर्णपणे वेगळ्या आहेत. त्यांच्या 'चांदण्यातील गप्पा' या संग्रहावर 'डीकेमेरॉन'चा प्रभाव दिसतो. काशीताई या मराठीतील पहिल्या कथालेखिका होत. शिळोप्याच्या गोष्टी हा त्यांचा दुसरा कथासंग्रह आहे.

**लक्ष्मीतनया**

हरिभाऊंपासून स्फूर्ती घेऊन करमणुकीतून लेखन करणाऱ्या लक्ष्मीतनया यांच्या कथेवर हरिभाऊंचा प्रभाव आहे. 'सद्यस्थिती' हा त्यांचा संग्रह. हे चित्र पाहा आणि ते चित्र पाहा, प्रौढविवाह की बालविवाह, लीलाताईंची फॅशन इ. त्यांच्या कथा सरल, वास्तव व कलात्मक आहेत.

याच दरम्यान श्री.बा. रानडे, ना.के.बेहेरे, वा.के. आपटे, वामनसुता इत्यादींचे कथालेखन सुरु होते.

**नारायण हरी आपटे**

ना.ह. आपटे यांचा 'बनारशी बोरे' हा संग्रह १९१५ ला प्रसिद्ध झाला. आनंद देणे व उपदेश करणे हे त्यांच्या कथांचे हेतू आहेत. कुरुपतेचे भाग्य, माळावरचा म्हसोबा, सुमती, नाव नसलेली गोष्ट, देवदूत व यमदूत इ. त्यांच्या कथा उल्लेखनीय आहेत. आरामविराम, हसा किंवा रुसा, कोंडाकणी, पाणी व शेवाळ इ. कथासंग्रह त्यांच्या नावावर आहेत.

वा.म. जोशी, गिरिजाबाई केळकर, वामनसुता, आनंदीबाई शिर्के, वा.ना. देशपांडे, कॅ. गो.गं. लिमये, वि.वा. भिडे, शि.म. परांजपे, न.चिं. केळकर, सी.के. दामले इ. कथालेखकांनी

कथालेखन केले. या काळात हरिभाऊंच्या स्फुट गोष्टीला गुर्जरांनी संपूर्ण गोष्ट बनविले. स्वतंत्र साहित्यप्रकार म्हणून कथेला व कथाकाराला याच काळात प्रतिष्ठा मिळाली.

## २.४ १९२० ते १९६० या काळातील कथा

१९२०–२२ मध्ये गांधी युगाची सुरुवात झाली. त्याबरोबरच मार्क्सवादाची ही सुरुवात झाली. कलेसाठी कला व जीवनासाठी कला हे दोन वाद मराठी साहित्यात आहेत. या अनुशंगाने कथेच्या आशयात परिवर्तन करणे. पाश्यात्यांच्या कथा लेखनाचे मराठी कथेवर परिणाम झाले. कथेचे तंत्र ना. सी. फडके यांनी सांगितले. नव्या कथेचे शिल्पकार ना. सी. फडके आणि तंत्रशोधक, रेखीवपणा, डौलदारपणा, गाठ, निरगाठ, उकलगाठ तंत्र यामुळे ना.सि.फडके यांनी लघुकथेच्या विकासात मोलाची भर घातली.

वि.स. खांडेकर यांनी पंचवीस पेक्षा अधिक संग्रह प्रसिद्ध केले. त्यात अद्‌भुतपणा, कल्पना, नाटयमयता, या दृष्टीने मराठी कथा मांडली. गांधीवादाचा पुरस्कार त्यांनी केला. विषयाचे नावीण्य, आशयाला प्राधान्य, जीवन सन्मुखता, नवीन-नवीन तंत्रे यामुळे खांडेकरांनी मराठी कथेचा विकास केला. मनोरंजनकालीन कथांपेक्षा एक वेगळे परिमाण प्राप्त करुन दिले.

मध्यम वर्गीय जीवन य.गो.जोशी यांनी मांडले. त्यांच्या सुपारी, शेवग्याच्या शेंगा, वहिनीच्या बांगड्या यासारख्या कथा संग्राहातून प्रेम भावनांची चित्रे आढळतात. कुटुंबसंस्था व त्यातील नातेसंबंध य. गो. जोशींनी रेखाटले आहेत. वि.वि.बोकील यांनी २०० कथा लिहिलेल्या आहेत. अनंत कानिटकर यांनी दलित कामगार, वेश्या, पोस्टमन यांच्या जीवनाचे चित्रण केले आहे. मानवी जीवनातील विसंगती व उपरोध त्यांनी अचुकपणे पकडला आहे.

कुसुमावती देशपांडे, कमलाबाई टिळक, कृष्णाबाई, विभावरी शिरुरकर, मालतीबाई दांडेकर, शमादेवी राव, वसुंधरा पटवर्धन, सरिता पदकी, इंदिरा संत, कमला फडके, सरोजिनी बाबर, स्नेहलता दसनूरकर, शांता शेळके, शिरीष पै आणि दुर्गा भागवत इ. स्त्रीकथालेखिकांनी या काळात चांगले कथालेखन केले आहे.

र.वा. दिघे, ग.ल. ठोकळ, रघुवीर सामंत, शशिकांत पुनर्वसु, वामनराव चोरघडे हे १९४५ पूर्वीचे महत्त्वाचे कथाकार होत.

द. र. कवठेकर, र.वा. दिघे, ग. ल. ठोकळ यांच्या कथा या काळात वाचकांचे लक्ष वेधित होते. मराठी कथा १९३० – १९३५ च्या काळातील नागर जीवनाचे चित्रण करीत होते. बी.रघुनाथ यांनी प्रादेशिक जीवनाचे चित्रण केले. शोषित व सामान्य लोकांना त्यांनी चित्रणाचे विषय सांगितले. मानवी मनातील विसंगती व भोग यांचे चित्रण त्यांनी केले. गोव्याच्या लक्ष्मणदास सरदेसाई यांनी प्रादेशिक कथांचे काव्य समृद्ध केले. गोमंतकालीन संस्कृती, देवदासी, दैत्य, तारुण्य यावर त्यांनी प्रकाश टाकला. विभावरी शिरुरकर यांच्या १९३३ साली प्रकाशित झालेल्या 'कळ्यांचे निश्वास' या कथा संग्रहामध्ये स्त्रियांच्या मानसिक प्रश्नांची बाजु समोर आली. कुमारीकांचे प्रश्न, कुरुप मुलींच्या लग्नांचे प्रश्न, हुंडा इत्यादी पैलुंचा मार्मिकपणे वेध घेण्यात आला. या काळात शांताबाई नाशिककर , कुमुदिनी रांगणेकर, मालतीबाई दांडेकर, कमलाबाई टिळक, गीता साने, कुसुमावती देशपांडे, क्षमा बाईत यांसारख्या कथा लेखकांनी कथा लिहिल्या होत्या. या काळातून लेखकांनी सामाजिक व आर्थिकरित्या स्वातंत्र्य असलेले स्त्री जीवनातील नव्या समस्यांचे चित्रण केले.

श्रीपाद कोल्हटकरांनी नंतर विनोदी कथेत चि.वी.जोशी आणि प्र.के.अत्रे यांचे कथालेखन आहेत. सर्वसामान्यांच्या जीवनातील विसंगतीवर आधारीत त्यांचा विनोद आहे. एकूण पंधरा कथासंग्रह नावावर आहेत. चिमणराव आणि गुंड्याभाऊ या त्यांच्या मानसपुत्रांनी मराठी विश्वातून धमाल उडवून दिली आहे. आचार्य अत्रे, व्यंकटेश माडगुळकर, पु.भा. भावे हे कथाकार एकमेकांच्या आगेमागे लिहू लागले. नवकथेच्या अग्रपुजेच्या मान गाडगीळांना दिला जातो. प्रयोगशिलता विविध पातळीवरुन अनुभव देण्याची पद्धत, अतिशयोक्ती, वेगळे तंत्र, अनुभवाची समृद्धता ,माणसांचे स्वभाव, सृष्ट, दृष्टपणा, तऱ्हेवाईक, बरेवाईटपणा, समृद्धी, अलौकिक कथा, या सर्वांचे दर्शन कथेतून दिसून येते. अरविंद गोखले यांच्या 'मंजुळा' या कथा संग्राहातून मध्यम वर्गीयांची सुखःदुखः दिसतात. भावनांची उत्कटता, तीव्रता, प्रचंड आवेश, कणखरपणा व कसदारपणा ही पु. भा. भावे यांच्या कथालेखनाची वैशिष्टये आहेत. त्यांच्या कथा आत्मनिष्ठ आहेत. 'सतरावे वर्ष' ही भाव्यांची मनोविश्लेषणात्मक कथा अनेक पदरी मांडली जाते. व्यंकटेश माडगुळकर यांची माणदेशी माणसं, गावकडच्या गोष्टी, हस्ताचा पाऊस, उंबरठा या संग्रहातील कथांमधुन ग्रामीण परिसरातील माणसे त्यांचा भोळेपणा, अंधश्रद्धा, त्यांच्या वाटयाला आलेले भोग, व ते भोगताना त्यातून त्यांच्या जीवनाचा व्यापक पट माडगुळकर आपल्या कथेत उभा करतात. दिघे, चोरघडे यांची ग्रामीण कथा कशी सांकेतिक स्वरुपाची लिहली आहे. माडगुळांनी माणदेशाच्या मातीच्या पिंडावरती पोसलेली अस्सल ग्रामीण कथा ,जुन्या नव्याचे सन्मवय साधणारी कथा शांताराम, के.ज. पुरोहित, दि. बा. मोकाशी, श्री. र. जोशी, वसुंधरा पटवर्धन यांसारख्या लेखक लिहत होते. जी.ए.कुळकर्णी, ज्ञानेश्वर नाडक र्णी, महादेव शास्त्री जोशी, अनिल बर्वे, द.मा. मिरासदार, हे लेखक कथा नवकथेनंतरच्या कथेचा विस्तार वाढवण्यासाठी महत्वाचे ठरले आहेत. १९४५ ते ६० च्या कालखंडात नव्या जाणीवेनी लिहिणाऱ्या नवकथेचा विकास होत गेला. के. ज. पुरोहित यांनी अंतर्मुख करणारी कथा , दि.बा. मोकाशी यांनी हळूवार चपळ, अवखळ, उपरोधाच्या कथा लिहिल्या प्रसंगनिष्ठ व चमत्कृती यामुळे त्या लक्षणीय ठरल्या. ना. धो. ताम्हणकर, गो.ग. लिमये, शामराव ओक, ह.वि. वाडेकर, हे लेखक महत्त्वपूर्ण गणले जातात.

दत्तु बांधेकर अशा आणखी काही लेखकांनी विनोदी कथा लिहिलेल्या दिसतात. अत्र्यांनंतर पु.ल.देशपांडेचा विनोद मराठी कथेतून येतो. मराठी कथेने १९३०-३५ च्या काळात शब्दचित्रे आणि व्यक्तीचित्रे अत्यंत सुचक शब्दात रेखाटली आहेत. कथानकांचे स्थान गौण ठरुन बाह्यांग व अंतरंग चित्रणाला प्राधान्य दिले. रघुनाथ सामंत यांनी हृदय या संग्रहात खेड्यापासून शहरापर्यंत कनिष्ट व दलित स्तरांतील व्यक्तींच्या जीवनातील कारुण्य सहहृदयतेने व्यक्त केले आहे. वि. द. घाटे यांनी काही म्हातारे व एक ...आणि पांढरे केस या संग्राहातून सर्व व्यक्ती चित्रणे संस्मरणीय उतरली आहेत. त्यांच्या कथांमधून ध्येयनिष्ठ लेखाचित्र दिसतात. वामन चोरधडे यांनी आपल्या कथांनी विषयाची विविधता, स्वभावचित्रे रेखाटली. सात कथा संग्रहामधून मानवी जीवनाच्या अनेक छटा साकारल्या आहेत. काव्यात्मक कथा त्यात चिंतनशिलता या विविध गुणांमुळे त्यांच्या कथा वेगळया ठरल्या. नवकथेमध्ये अनुभवाचा प्रामाणिकपणा, उत्कटपणा, माणसामाणसात विविधता आली. कथा लेखनाचे जुने संकेत मोडित निघाले . नवकथेने बोली भाषेचा यशस्वी उपयोग केला आहे. फ्लॅशबॅक पध्दत, स्वप्ने, मानवी जीवनातील नियतिचे स्थान या गोष्टी नवकथेने प्रथमच मराठी साहित्यात आणल्या अनेक नैतिक प्रश्नांची गुंतागुंत झाली त्या त्या पातळीवरुन सोडवण्याचा प्रयत्न नवकथेने केला. एकंदरीत नवकथा सतत नवनवे शोध लावत होती व वाचकांना आपल्याकडे आकृष्ट करत

होती. नवकथेचे शिल्पकार म्हणजे गंगाधर गाडगीळ , अरविंद गोखले,नाजुक नाट्यमय कथा लिहिली. शन्ना नवरे, आनंद साधले, वसुंदरा पटवर्धन , इंदिरा संत, सरीता पत्की, स्नेहलता दसनूर या लेखकांनी मध्यमवर्गीय स्त्रीजीवन रेखाटले.

शंकर पाटील, द.मा. मिरासदार, गिरीजा किर, व.पु. काळे यांच्या कथाकथनाच्या कार्यक्रमांनी मराठी कथेमध्ये एक वेगळे दालन उघडले. दुसऱ्या महायुद्धानंतर कलेचे क्षेत्र व्यापक व सखोल झाले.

चित्रे, खानोलकर , कमल देसाई, भाऊ पाद्ये यांच्या लेखनात हे नवे भान आल्याचे दिसते. विद्याधर पुडलिक यांच्या कथेने मानवी मनाच्या गुंतागुंतीचा वेध घेतला. श्री.दा. पानवलकर यांनी बेरकी माणसाच्या कथा लिहिल्या. १९६० नंतरच्या कथेमध्ये जीवनातील सुख समस्यांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न शरदचंद्र चिरमुले यांनी केला. त्यांचा 'श्री शिल्लक' हा कथासंग्रह आहे. ज्ञानेश्वर नाडकर्णी यांनी मराठी कथेला आधुनिक जगाची ओळख करुन दिली. भावनाशील कलावंतांच्या पिंड असलेल्या जयवंत दळवी मानवी जीवनातील सुखःदुखः विषयी आस्थापुर्वक लेखन केले आहे. अनाथ, वेडसर, भटक्या, बेवारशी माणसांबद्दल त्यांच्या लेखनात विलक्षण करुणा आहे. मधुमंगेश कर्णिक यांच्या 'कोकणी वस्ती' हा पहिला संग्रह प्रसिद्ध झाला. कर्णिकांच्या कथा काव्यात्मक आहेत, विविधता रेखीव व नेटकी आहेत.

आनंद जातेगावकरांच्या कथेत मध्यम वर्गीय माणूस तो एकाकी पडत असल्याची जाणीव व्यक्त होते. मुखवटे हा त्यांचा कथासंग्रह आहे. आध्यात्मिक विषयांचा कथेसाठी कलात्मक रीतीने उपयोग करुन प्रयोग साधण्याची आवड श्री. निवास विनायक कुलकर्णी यांना आहे. जीवनातील विसंगती व हास्यास्पदता व्यंगपूर्ण रितीने चित्रित करणारी श्याम मनोहरांची कथा अस्तित्ववादी आहे. मानवी मनातील हिंस्रकार, वासना, स्वार्थीपणा, ढोंगीपणा यांचे वस्त्रहरण करणारे विजय तेंडुलकरांची कथा, उपरोध आणि कारुण्य यांचा अविष्कार करणारी कथा ही खळबळजनक आहे. आर्थिक समस्या, लैंगिक प्रवृत्ती यांचे गुंतागुंतीचे चित्रण करणारे जोशींच्या कथांनी मध्यम वर्गीय नितीकल्पनांची चिडफाड करणारे लिहिले आहे. सत्यकथा हा १९५० ते ६५ या काळात मराठी कथेचा मानदंड मानला होता. मराठी हे वृत्तपत्रांना समाजाच्या चौफेर आवड घेतलेले आघाडीचे कथालेखन होते. नवीन औद्योगिक व राजकीय यांच्यातील संघर्ष, मालक चाकर ,शोषक शोषित यांच्यातील ताणतणाव तसेच जुनी सरंजामशाहीतील व्यवस्था व औद्योगिक मुल्य व्यवस्था यातील स्फोटकतेतील प्रत्यकारी चित्रण मराठे यांनी केले आहे. गुढ कथांचे व भय कथांचे मराठी मधील वेगळे दालन रत्नाकर मतकरी, नारायण वारप यांनी संपन्न केले. मतकरींच्या सुमारे सव्वाशे गुढकथा आहेत. खेकडा, निजधाम, रंगांधळा इत्यादी कथासंग्रहातुन प्रसिद्ध झाले आहेत. भय, गुढता, रहस्यमयता, विक्षिप्तपणा, कारुण्य यांचे उत्कट वर्णन चित्र रत्नाकर मतकरी यांनी केले आहे.

## २.५ १९४५ नंतरची नवकथा -

गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, पु.भा. भावे आणि व्यंकटेश माडगूळकर यांनी नवकथा लिहिली. पाचवे नवकथाकार म्हणून काही समीक्षक शांताराम यांचे नाव घेतात. वास्तवता, व्यक्तित्वाबद्दलची बदललेली कल्पना, बदललेली तंत्रविषयक कल्पना, प्रतिमा ही नवकथेची भाषा बनणे आणि जाणीव-नेणीवेतील वास्तवाला प्रमुख स्थान नवकथेत मिळाले.

मानसचित्रे, कडू आणि गोड, नव्या वाटा, स्वप्नभूमी इ. कथासंग्रह गाडगीलांच्या नावावर आहेत. केवळ कथालेखनच करणाऱ्या अरविंद गोखले यांच्या नावावर तनुजा, जागरण, कळण, कालखेळ, मंजुळा इ. ४० कथासंग्रह आहेत. पहिला पाऊस, सतरावे वर्ष, सावळ्या, स्वप्न मुक्ती, फुलवा इ. कथासंग्रह लिहिणारे पु.भा.भावे हे बहुरंगी बहुअंगी कथा लिहिताना दिसतात.

व्यंकटेश माडगूळकरांना ग्रामीण/प्रादेशिक नवकथाकार म्हणता येईल. माणदेशी माणसे, गावाकडच्या गोष्टी, हस्ताचा पाऊस, उंबरठा इ. कथासंग्रह त्यांनी लिहिले.

शांताराम यांच्या नावावर संत्र्याचा बाग, शिररवा, छळ, लाटा, चंद्र माझा सखा इ. १५ कथासंग्रह आहेत.

दि.बा. मोकाशी, सदानंद रेगे. श्री.ग. जोशी, महादेवशास्त्री जोशी इ. कथाकारांनी या दरम्यान कथालेखन केले.

शंकर पाटील, द.मा. मिरासदार, उद्धव शेळके आणि आनंद यादव हे १९६० च्या दरम्यानचे ग्रामीण कथाकार होत.

## २.६ १९६० नंतरची मराठी कथा

१९६० नंतर मराठी कथेत विविध वाङ्मय प्रवाह निर्माण झाले. कथा केवळ लघुकथा, नवकथा राहिली नाही. ती दलित, ग्रामीण, नागर/महानगरीय, स्त्रीवादी, ग्रामीण, प्रादेशिक, आदिवासी, विज्ञानकथा झाली.

**महानगरीय/नागर कथा -**

भाऊ पाध्ये, दिलीप चित्रे, विलास सारंग, श्याम मनोहर, रंगनाथ पठारे इ. कथाकारांनी महानगरीय/नागर जीवनाचे दर्शन घडविणारे कथालेखन केले. अस्तित्ववादाशी जोडलेली परात्मतेची जाणीव हे या कथेचे आशयसूत्र आहे.

**ग्रामीण कथा**

स्वातंत्र्योत्तर काळात उद्धव शेळके, मनोहर तल्हार, आण्णाभाऊ साठे, रा.र. बोराडे, रणजित देसाई , चारुता सागर, महादेव मोरे, चंद्रकुमार नलगे, द. ता. भोसले, रंगराव पाटील रंगनाथ, पठारे, अनंत पाटील, वासुदेव मुलाटे, भास्कर चंदनशिवे, अ.ना. पेडणेकर , आदी लेखकांनी भुक, दारिद्र्य आणि अज्ञान या तीन कारणांमुळे चोळा, मोळा झालेल्या ग्रामीण जीवनातील संस्कृतीची दृष्ये सकसपणे साकार केलेली दिसतात. ललित जीवनांची चित्रे सीमा भाटे, बंधु माधव, केशव मेश्राम, बाबुराव बागुल, इत्यादी लेखकांनी लिहिली. जयंत नारळीकर यांनी मराठी कथेला वास्तवादी वैज्ञानिक दृष्टी दिली. लक्ष्मण लोंढे यांचा दृष्टीकोन मराठी कथेला दिशा देणारा ठरला. आजही राजन गवस, प्रतिमा इंगोले, नागनाथ कोतापल्ले , संजय बोरुडे मराठीतील कथाकार लेखन करताना दिसतात.

प्रतिमा इंगोले, श्रीराम दुर्गे, रा.रं.बोराडे, आनंद यादव, सखा कलाक, बा.भ. पाटील. आनंद पाटील, मोहन पाटील, बाबा पाटील, चारुता सागर, महादेव मोरे इत्यादींनी ग्रामीण जीवनाचे दर्शन घडविणाऱ्या ग्रामीण कथांचे लेखन केले.

**दलित कथा -**

दलित कथेची परंपरा बंधु माधव यांच्यापासून सुरु होते. अण्णा भाऊ साठे, बाबुराव बागुल, अर्जुन डांगळे, योगीराज वाघमारे, केशव मेश्राम, भास्कर चंदनशीव, वामन होवाळ, अमिताभ, योगेंद्र मेश्राम इत्यादींनी दलित्वाच्या धगधगत्या जाणीवेतून निर्माण झालेली दलित कथा लिहिली.

**स्त्रीवादी कथा -**

नारायण धारप हे अति मानवी विश्वाच्या नुसत्याच गुढ आकर्षणापोटी कथा लिहित नाही तर त्यांना या विश्वाचे अस्तित्वच उद्घोषित करायचे आहे. स्त्रीचे दुख् ,व्यथा, यांसारख्या भावबंधाकडे खुप मोकळेपणाने पाहणारी विजया राजाध्यक्ष यांची कथा अनुभव संपन्न आहे. बदलत्या काळानुसार लेखिकाने व्यक्तीमधील संबंध, मानसिक ताणतणाव , परंपरागत रुढी, स्त्रीची जगण्याची धडपड कथांमधून आली. काटेकोर नियमानुसार जगण्याची बंदिस्त चौकट ज्यांनी नाकारली अशा लेखिका मध्ये तारा बनारसे, गौरी बनारसे, गौरी देशपांडे, प्रिया तेंडुलकर, अंबिका सरकार, आशाबगे, सानिया, अनुराधा पाटील, सानिया आगाशे, निलम गोरे, यांच्या कथा प्रकर्षाने दिसतात. सांजवा हा कथा संग्रह लिहणारे सुमेद वडावाला. वनवास व शारदा संगीत लिहीणारे प्रकाश संत महत्वाचे आहे. सती या संग्राहाने विख्यात असलेले प्रवीण पाटकर या संतांच्या कथा वाचताना जाणवते. संतांच्या कथा म्हणजे उत्कृष्ठ अंगाचे ललित लेख आहेत. सुभाष भेंडे यांनी विनोदी कथालेखन केले आहे. वि.आ.बुवा, वसंत सबनिस, रमेश मंत्री, कमलाकर सोनटक्के , प्रभाकर ताम्हणे, बाळ गाडगीळ, मुकुंद टाकसाळे यांनी विनोदी कथा साहित्य लिहिले.

कमल देसाई, सानिया, गौरी देशपांडे, प्रिया तेंडुलकर, मेघना पेठे, कविता महाजन, तारा वनारसे, विजया राजाध्यक्ष, मोहिनी वर्दे, वसुधा माने, छाया दातार, अजिता काळे इत्यादी स्त्रीलेखिकांनी स्त्री जीवनाचे व जाणीवांचे दर्शन घडविणारे स्त्रीवादी कथालेखन केले.

## २.७ सारांश

मराठी कथेच्या वाटचाली विचार केल्यास मराठी कथा काळानुसार बदलत गेलेली आहे. बदलती समान व्यवस्था जागतीकीकरण खाजगीकरण यांचा प्रभाव वाङ्मय प्रकारावर झालेला दिसून येतो. दलित कथा, ग्रामिणकथा, स्त्रीवादी कथा आणि महानगरीय कथा, विज्ञानकथा या प्रवाहातील कथांचे स्वरुप काळानुसार बदललेले दिसुन येते.

## २.८ प्रश्नावली

१. १९६० नंतरच्या कथेचे स्वरुप स्पष्ट करा.

२. १९२० ते १९४५ प्रयत्नच्या कथेचे स्वरुप स्पष्ट करा.

३. परभृत मराठी कथा आणि मराठी भाषारहीत कथा या विषयी चर्चा करा.

४. १९६० नंतरच्या कथेतून वास्तव जीवनाचे चित्रण होते ते स्पष्ट करा.

## २.९ संदर्भ ग्रंथ सुची

१. शेवडे इंदुमती, मराठी कथा उगम आणि विकास, मुंबई सोमैया पब्लिकेशन प्रा.लि.

२. जोशी डॉ. प्र.न., मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास, पुणे, प्रसाद प्रकाशन.

३. भागवत श्री.पु. व. इतर, साहित्य अध्यापन आणि प्रकार, मौज प्रकाशन व पॉप्युलर प्रकाशन मुंबई.

४. जोशी सुधा, कथा : संकल्पना आणि समीक्षा, मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ व मौज प्रकाशन गृह, मुंबई.

५. प्रा. जाधव मधू, डॉ. गुरव धनाजी, डॉ. शेकडे वसंत, प्रा. डोंगरदिवे राजेंद्र - कथाविविधा, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, जून २००९.

६. जोशी लक्ष्मणशास्त्री, प्रमुख संपादक, मराठी विश्वकोश, खंड ३, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई. पुनर्मुद्रण २०००.

❖ ❖ ❖

# ३

# निवडक मराठी कथा (संपादित कथासंग्रह)

**घटक रचना**

३.० प्रस्तावना
३.१ मराठी निवडक कथा मधील कथा
    ३.१.१ मरीआईचा गाडा
    ३.१.२ मृणालीनीचे लावण्य
    ३.१.३ बाबांचा संसार माझा कसा होणार ?
    ३.१.४ तलावातील चांदणे
    ३.१.५ वळीव
    ३.१.६ भुताचा जन्म
    ३.१.७ लग्न संपल्यावर
    ३.१.८ सर्व्हिस मोटार
    ३.१.९ जेव्हा मी जात चोरली होती
३.२ सारांश
३.३ प्रश्नावली
३.४ संर्दभ ग्रंथ सुची

## ३.० प्रस्तावना

निवडक मराठी कथा हा मुंबई विद्यापिठाचा प्रतिनिधिक स्वरुपात संपादित केलेला कथासंग्रह आहे. यात मध्यम वर्गीय स्त्रीवादी, दलित, ग्रामीण विनादी, विज्ञानवादी कथांचा समावेश आहे. यामधील कथामध्ये दिवाकर कृष्ण यांची मृणालीनीचे लावण्य. विभावरी शिरुरकर यांची बाबांचा संसार माझा कसा होणार? वामन चोरघडे यांची संस्कार, आण्णाभाऊ साठे मरीआईचा गाडा, गंगाधर गाडगीळ यांची तलावातले चांदणे, व्यंकटेश माडगुळकर यांची सर्विस मोटार , श्री.दा.पानवळकर यांची वासरु, शंकर पाटील यांची वळीव द.मा. मिरासदार यांची भुताचा जन्म, बाबुराव बागुल यांची जेव्हा मी जात चोरली होती, जयंत नारळीकर यांची कृष्णविवर, भास्कर चंदनशिव यांची कावळा, प्रिया तेंडुलकर यांची लग्न संपल्यावर या कथांचा समावेश आहे.

## ३.१ मराठी निवडक कथा मधील कथा

### ३.१.१ मरीआईचा गाडा

आण्णाभाऊ साठे हे मार्क्सवादी विचारांचे लेखन करणारे लेखन आहेत. त्यांच्या फकीरा वारणेचा वाघ, माकडीचा माळ यांसारख्या कांदबऱ्या गाजलेल्या आहेत. त्यांच्या कथांमधून दलित, शोषित, पिडीत, कामगार, श्रमजीवी, अज्ञानी माणसांचे चित्रण येते. मरीआईचा गाडा ही कथा ग्रामीण भागातील अंधश्रद्धेचे दर्शन घडविते. त्या बरोबरच ग्रामीण भागात असणारी वैचारिक पात्रता दाखवते.

एकापेक्षा एक माणसे आपल्या बुद्धी चातुर्याने एकमेकांवर कशी मात करतात याचे चित्रण या कथेत येते. अस्सल ग्रामीण माणसांचे रंगढंग आण्णा भाऊ रेखाटतात. "गावात मरीआई शिरली होती त्याचा विचार करण्यासाठी गाव जमला होता. आग ओकीने दहा माणसे आजारी पडली होती. त्यांच काय होणार , आणखी कोणावर ती भयंकर पाळी येणार ? याचा ते विचार करीत होते. गावातील चार शहाणे म्हातारे पारावर विचार करत बसले होते. ते निर्विकार चेहरा करुन आपसांत कुजबुजत होते. परंतु ते गावातील मरीआईचा विचार करत नव्हते तर त्या चौघा म्हाताऱ्यांना नाना मरीआई पेक्षा ही भयंकर वाटत होते." या वर्णनातुन आण्णाभाऊ साठे यांनी गावाचे चित्र उभे केले आहे. नाना तरुणांचे नेतृत्व करत होता. तो त्यांचा आदर्श होता. शिक्षणचा पुरस्कार करणारा आणि नवे काही आणु पाहणारा नाना चार म्हाताऱ्यांचा विरोधक होता. या चार म्हाताऱ्यांमध्ये श्रीमंत सटवाजी, बडबड्या केरु, भाऊ बाबाजी वायमेडि म्हातारा असे हे चौघे संपूर्ण गावाच्या कुचेष्ठा करत असतात. गावात साथीचे रोग येतात त्यात मरीआई शिरते. गावात मरीआईचा गाडा शिरला आहे, तेव्हा तीन शुक्रवार पाळायला पाहिजेत तीन आठवडे गावात व शिवारातुन चाक बंद कराचये पण गावाचे सगळे व्यवहार बंद होणार म्हणुन कुजबुज सुरु होती. नाना नव्या विचारांच आहे. आजारी माणसांवर डॉक्टरी इलाज करावा असे सुचवतो शेवटी गावकरी दोघांचेही ऐकायचे ठरवतात. तिसऱ्या शुक्रवारी मरीआईचा गाडा गावाबाहेर घालवायचे ठरवतो. संपूर्ण गाव नाना स्वच्छ करतो. औषध आणण्यासाठी बैलगाडी नेण्याच ठरवतो. सटवाजी आणि त्याचा वाद होतो.गावच्या शिवारातुन दररोज ...घाडी जाते. तेव्हा सटवाजीने ही गाडी अडवावी असे ठरते. त्यामुळे ती त्यातुन अंग काढुन घेते. गावात डॉक्टर येतो आणि गाव रोगमुक्त होते. म्हातारे लोक याचे श्रेय आपणांसच घेतात. मरीआईचा गाडा गावाबाहेर नेण्यासाठी सर्वजण गर्दी करत असतात. त्यावेळेस नानाच्या अंगात येते. परटाची म्हातारी घुमु लागते, गाडा निघतो. त्यावेळेस नानाच्या कल्पकतेने तो गाडा थांबला जातो.

### ३.१.२ मृणालीनीचे लावण्य

दिवाकर कृष्ण केळकर हे सुप्रसिध्द मराठी कथाकार दिवाकर कृष्ण या नावाने ओळखले जातात . त्यांची पहिली कथा 'अंगणातील पोपट' मासिक मनोरंजनच्या अंकात प्रसिध्द झाली. त्यांचे समाधी आणि सहा गोष्टी, रुपगर्विता आणि सहा गोष्टी, महाराणी आणि इतर गोष्टी हे तीन कथासंग्रह पसिध्द आहेत. ते मराठी लघुकथेचे शिल्पकार ठरले. त्यांच्या कथेनेच मराठी गोष्टीचे लघुकथेत रुपांतर केले. स्वतंत्र्य वाङ;मय प्रकार म्हणून लघू कथेत वैशिष्ट्य पूर्ण स्थान मिळवून देण्यात दिवाकर कृष्णांची कथा सहाय्यरुप ठरली. त्यांच्या कथेत मनोदर्शनाला महत्व मिळाले. त्यांनी किशीरीचे हृदय, विद्या , आणि वारुनी या कादंबऱ्या लिहिल्या तसेच १९५४ मध्ये लातूर येथे भरलेल्या मराठवाडा साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले. मृणालीनीचे लावण्य या कथेची नायिका मृणालीनी आहे तिच या कथेचे निवेदिका आहे. तिला तिच्या आयुष्यातील सगळ्या गोष्टींची स्पष्ट आठवण आहे. लहान पणीच्या आठवणीने ती व्याकुळ होते. ती १५ वर्षाची असताना त्यावेळच्या आठवणी तिला आठवतात. घरातील सर्वात मोठी तिच, अशोक हा तिचा मामेभाऊ होता ती नेहमी चार चार दिवस येऊन राहत असे. तिचा स्वभाव भित्रा आहे. म्हणून तिला सगळ्याजणी चिडवत असत. पावसाची भिती वाटल्या नंतर ती अशोकच्या जवळ जाते. आपण आपल्या जीवनाविषयी लिहावं असे तिला वाटले. वयाच्या विसाव्या वर्षी तिच्या मनात आलेल्या निराशेच्या विचारांचे दर्शन घडविते. अशोकच्या जन्माचं मातेर करण्यात आपणच जबाबदार आहोत असे तिला वाटते. डॉक्टरांनी तिला क्षय झाल्याचे सांगितले आहे. तेव्हा पासून ती मनातल्या मनात झुरते आहे. तिच्या झुरण्याविषयी लोक काय

म्हणत याचा विचार ती करत असे. दुःख झाल्यावर हुदका येणारच असे ती म्हणते. अशोकचे वडिल पुण्याच्या खाजगी शाळेत मास्तर होते. मृणालीनीचे वडील रेल्वेच्या ऑफीसमध्ये खडकीला नोकर होते. दोघांच्या पगारामध्ये फरक होता. दोघांनाही बुद्धिबळाचा नाद होता त्यात त्यांना जेवणाचे भान ही रहात नसे. मास्तर घरच्या परिस्थितीमुळे पुढे शिक्षण घेऊ शकले नाहीत. अशोक हा मास्तरांचा एकुलता एक मुलगा होता, परंतु त्याने आपल्या पडिलांचे नाव काढण्याऐवजी तो अनितीला धरुन कवडीमोल अरुतीचा होऊन फरारी झाला आहे. मास्तरांना सुधारक म्हणून त्यांना जुने लोक निंदीत आणि जुने म्हणून सुधारक नावे ठेवित. परंतु दोन्ही समाजामध्ये त्यांना चांगलाच मान होता. बुद्धिमत्ता व सुशिलपणा या बाबतीत लोक अशोकचेच नाव काढत. ओळखीच्या माणसांना तोंड दाखविण्याची लाज वाटू लागल्यामुळे आई-बाबांना दुखवून नाहिसा झाला आहे.  अशोक बरोबरच्या लहानपणीच्या आठवणी तिच्या मनात घर करुन राहिल्या आहेत. अशोक बद्दल तिच्या मनात प्रेम आहे. तिच्या मनात अशोक पुन्हा भेटेल का आणि पुन्हा त्याच्याशी टक्का-पाणी खेळता येईल का ? ती आता विवाहीत आहे म्हणुन तिने असा ध्यास धरणे चुकीचे आहे. प्रेम करणे सोपे आहे पण ते लपविणे कठीण आहे. याच दंवव्दांत ती अडकली आहे. शिकलेले मुलींचे प्रेम वेगळे असते असे काही बायकांना वाटते. बकुळीच्या फुलांचा वास त्याच्या मनात असतो. मृणालीनीचे लग्न झाल्यानंतर त्याला बऱ्याचशा मुली सांगून आल्या परंतु त्याने त्यांना नकार दिला आपण अविवाहीत राहण्याचे सांगितले. अशोकच्या शाळेचे मित्रमंडळ होते त्यांच्या तो मृणालीनीशिवाय दुसऱ्या कुठल्याही मुलीशी लग्न करणार नाही असे सांगून शाळेमध्ये तो थट्टेचा विषय झाला होता. मृणालीनीचे लग्न लहानपणीच झाले लग्ना नंतर  ती वेगळे वागू लागली. अशोक म्हैसूरमध्ये होता. तिच्या लग्नाच्या आधी तो ८ दिवस आला. लग्नाच्या  दिवशी तो आपले लहानपणीचे दिवस विसरलेला नव्हता. त्या दिवशी त्याला भरपूर दुःख होत होते. तिचे लग्न श्रीमंत घराण्यात होते. तिच्या सासरी सगळे हिशोबीच आले. लग्नाच्या नंतर ३ वर्षांनी तिला अनुभव येतात. माणसे ओळखता येतात. संसारात खऱ्या सुखाची अपेक्षा धरु नये असे तिला वाटते . जेव्हा - जेव्हा  अशोक भेटे तेव्हा - तेव्हा तो लग्नाचा विषय टाळत असे. तिचा नवरा तिची भरपूर स्तुती करत असे. सौदर्यामुळेच तिची निवड केली होती. या सौदर्या मुळेच अशोक वनवासी झाला असे तिचे मन तिला बोलत राहते. एकेदिवशी अशोक काय करत असेल यामुळे विषयी कल्पना ती करत असे. मृणालीनीला तिच्या सासऱ्यांच्या वाईट अनुभव येई पाणी घेण्याच्या निमित्ताने ते हात लावतात आणि शारिरीक सुखाची मागणी करतात या वेळी तीला भिती वाटते. ही भिती माणसातील राक्षसाची असते. सगळेच पुरुष सारखेच नसतात असेही ती म्हणते. शेवटी ती आपल्या माहेरी निघून जाते. पुढेच शिक्षण घेऊ लागते. त्याच वेळेस अशोक बरोबर तिचा काळ सुखात जातो. अशोकचे संबंध घरगुती स्वरुपाचे असतात.  एके रात्री तिला अशोकच्या स्पर्शाची जाणीव होते. आणि ती भितीने किंचाळुन उठते. अशोकला अपमानीत होऊन घरातून निघून जावे लागते. मास्तरांच्या घरी ही गोष्ट कळते. तेव्हा अशोक घर सोडून निघून जातो. नंतर खूप दिवसानी अशोक तिच्या घरी येतो. त्याची अवस्था भिकाऱ्या प्रमाणे होते. त्याचे सांतवण ती करते. तो मनाने स्वच्छ आहे. आपण अपराधी नाही याची जाणीव त्याला असते. तो निघून जातो. अशोक कुठे असेल ? काय करत असेल ? असे अनेक प्रश्न तिच्या मनात येतात. मामींचे रडणे तिच्या लक्षातून जात नाही. मृणालीनीच्या लावण्याने अशोकचा नाश केला. असे सगळेजण म्हणतात. आपण अभागी आहोत अशी भावना अशोकची आणि निवेदकाची होताना दिसते. अशा पध्दतीने नायक आणि नायिका यांच्यामनातील तान कथेत व्यक्त झाला आहे.

### ३.१.३ बाबांचा संसार माझा कसा होणार ?

‘ कळयांचे निःश्वास ’ या कथासंग्रहातील ही कथा आहे. या कथेत विभावरी शिरुरकर यांनी नोकरी करणाऱ्या स्त्रीची मनोव्यथा मांडलेली आहे. कुटुंबामध्ये असणारे नाते संबंध हे खरच प्रेमळ असतात का ? त्यांना स्वार्थाची दुसरी बाजू असते का ? हे तिचे प्रश्न आहे. या कथेतील नायिका आपल्या आई - वडिलांशी सहमत नाही. जन्म देणारे आई - वडिल अगदी निस्वार्थीपणे आपल्या मुलीवर प्रेम करतातच असे नाही त्यांचा काहीना काही स्वार्थ त्यामागे असतो. नायिकेची कौटुंबिक परिस्थिती सर्वसाधारण आहे. गरीब घराण्यातील आहे. तिच्या वडिलांना सत्तर रु. पगार मिळतो. एकूण सहा मुले तिच्या वडिलांना , घरातील सगळया भावंडांमध्ये नायिका मोठी आहे. त्यामुळे तिच्यावर जबाबदारी मोठी आहे. आई वडिलांच्या स्वभावा इच्छेप्रमाणे तिचे लग्न करावे असे त्यांच्या मनात आहे. पहिला भाऊ झाल्यानंतर तिला ग्रॅज्युऐट करण्याचे ठरले. त्याचे कारण वेळ प्रसंगी पोरापूर्ती मिळविण्याची ताकद आल्याशिवाय संसारात ढकलणे योग्य नाही. दुसरे कारण मुलगी शिकली तर काही दिवस आपल्या संसारात हातभार लागेल. या दोन्ही ही इच्छा चुकीच्या नव्हत्या. नायिका कॉलेजात जावून शिक्षण घेते. तिच्यावर जास्त खर्च होत होता, तिच्या आईच्या दृष्टीने हा सगळा गृहीत खर्च होता. तिचे शिक्षण पूर्ण होते. आणि ती नोकरीला लागते. तिच्या नोकरीची सात वर्षे झाली आहेत. आपले विचार आई वडिलांजवळ बोलून दाखवते. बचतीचे महत्व तिला कळालेले असते त्यासाठी ती दरमहा पंचवीस रुपये मागे टाकण्याचे ठरवते. तिच्या त्या विचाराने वडिल व्यथित होतात. नायिका आपल्या कुटुंबाला विसरेल,अस त्यांना वाटते. प्रत्येक दिवस व्यवस्थित घालविणे अशा विचारांचे तिचे वडिल आहेत. नायिकेला आपल्या लग्नासाठी पैसे शिल्लक नसल्याची खंत आहे. लग्नाच्या दृष्टीने ती अपात्र ठरते. स्त्री कितीही सुशिक्षित ,अविवाहीत असली तरि समाज कान टवकारतो. जिथे प्रेमविवाह असेल तिथे हा प्रश्न निर्माण होणार नाही. नायिका लोक अपवादाच्या भितीने लोकांमध्ये मिसळत नाही. ती स्वाभिमानी आहे. त्यामुळे तिचे लग्न नाही. वरपक्षाने दोन्हीं कडील खर्च करावा असे तिला वाटणार नाही. तिच्या वडिलांची इच्छा वेगळी असते. नायिका तिशीत आहे . तिच्या पेक्षा जास्त वयाच्या मुली अजून अविवाहीत आहेत. मुली सुशिक्षित असल्या की त्यांना कसली ही भिती नाही हे तिच्या वडिलांचे विचार तिला पटत नाही. मुलीला स्वतःच्या भावना आहेत ही गोष्ट पुरुष मान्य करत नाहीत. तिच्या वडिलांच्या मतानुसार बायकांची मने खंबीर असतात. संसार हे क्षणिक सुख आहे. गरिबांनी या भांडगडीत पडू नये. नायिकेचे वडिल तिला स्पष्टपणे सांगतात तिला एव्हढ्यात लग्न करता येणार नाही. संसार हा वाईट आहे. हे माहित असून सुध्दा लोक संसार करतच असतात. तिच्या बाबांनी सुध्दा इच्छा नसताना संसार वाढवलाच प्रत्येक जण स्वार्थाने वागायला जातो. तर संसार चालणार नाही. नायिका विचारी आहे तिला स्वतःचे मन, भावना आहेत. त्यामुळे ति आपले स्वतःचे अस्तित्त्व निर्माण करु पाहते. आपले आई वडिल कसे ही बोलले तरी त्यांच्या मनात प्रेम आहे हे ती विसरु शकत नाही. दारिद्र्यामुळे त्यांचे बोल कठीण झाले आहे याची तिला जाणीव आहे. तिची आई तिला मायेने वागवलेल्या माहेरची आठवण करुन देते. कठोर शब्द विसरुन जाण्यास सांगते. नायिकेच्या मनात एक कोडे आहे. ते तिला उकलत नाही. तिच्या बाबांचा संसार तिचा कसा होणार त्यातील आपपर भाव कसा नष्ट होणार, तिचा संसार तिला दुसऱ्याच्या घरी जाऊन करायचा आहे. तिची सुख दुःखे वेगळी आहेत. तिला आपल्या वडिलांच्या विचारांचे आश्चर्य वाटते. गरिबीमुळे, निराशेमुळे, भितीच्या दडपणामुळे त्यांच्या तोंडून उद्‌गार....निघाले असावेत. ते कधीतरी तरुण होतेच ना ? तिला असे वाटते की आई - बाबांचे प्रेम व्यापारी

असते. मुलांकडून मोबदला मिळाला नाही तर ते खणखणीत वाजत नाही. मोबदल्याचा विचार केला की माणसाचे मन थोडे तरी विकृत होईल. तिच्या भवितव्याचा विचार ती करु लागली की, बाबा तीला स्वार्थी म्हणतात. तिच्या भावना लक्षात न घेणारे बाबा दोषी नाहीत का ? या जगात निस्वार्थी काहीच नसते. सगळा असतो तो स्वार्थ . मुले चांगली असावित असे आई वडिलांना का वाटते ? कारण त्यांच्या स्वतःच्या अंतःकरणात जे दुःख असते ते कमी व्हावे म्हणून स्वार्थ त्यात एखादा पुरुष तरि का करतो ? कारण त्याला सुख हवे असते. स्वार्थ त्यात स्वतःच्या सुखासाठी केलेले एक ढोंग असते. नायिकेला आई बद्दलचे मत पटत नाही. आई मुलाला स्तनपान करते ,ते तिच्या अंगाच्या कळा कमी व्हाव्यात म्हणून . हे तिला पटत नाही. कुटुंबात माझे माझे म्हणून जे असते ते स्वार्थाचेच असते. चांगले वाईट असे त्या प्रेमात असते. प्रत्येक जण आपल्या सुखाचा विचार करत असतो. स्वार्थाची व्याप्ती फार मोठी असते. आपले सुख ते कुटुंबाचे सुख. कुटुंबाची उन्नती ही आपली उन्नती असेच सर्वांना वाटत असते. कुटुंबातील सगळया व्यक्तींसाठी माणसे झटत असतात कारण त्यांना सुख हवे असते. आई वडिलांच्या दुःखाची अनेक कारणे असतात व त्यात मुलांनी आंतरजातीय विवाह केला तर हेही एक दुःखाचे कारण होते. स्वकुल, स्वजाती , स्वधर्म यांना धक्का लागला की आई – वडिल दुःखी होतात. आई वडिलांच्या स्वार्थाला प्रेम असे नाव आपण देतो. मुलाच्या कुल, जाती, धर्म या बद्दल काही वाटत नाही. केवळ स्वताः बद्दल वाटते. म्हणून त्याला स्वार्थी म्हणायचे. स्वार्थ आणि निस्वार्थ हा शब्द व्याप्तीवर आधारित असतो. नायिकेला वाटत की ती स्वार्थी आहे. तिचे आई वडिलांवर प्रेम कुठपर्यंत जो पर्यंत तिच्या स्वार्थाच्या आड येत नाहीत. खरे तर आई वडिल जे बोलतात ते त्यांना भेडसावणाऱ्या परिस्थितीमुळे तिच्या ऐवजी मुलगा जर झाला असता तर त्याने पित्याचे ऋण फेडले असते. उतार वयामध्ये त्यांना आधार मिळाला असता. एका परिस्थितीच्या कचाट्यात सापडलेल्या तिच्या वडिलांनी केलेला विचार हा तिला योग्य वाटत नाही. आई वडिलांच्या नंतर तिने कुणाकडे पाहिचे, या जगाशी टक्कर देणे तिला अवघड जाणार नाही का ? याच विचाराने ती आपल्या भवितव्याचा विचार करते. तिच्या आई वडिलांच्या मागे चार लहान भावंडांना जवळजवळ माझा संसार मानण्याचे धैर्य गंभीरपणा तिच्यात नाही. तिचा दुबळेपणा तिला मान्य आहे. लग्न न करता तसेच रहायचे म्हटले तर तिच्या आई वडिलांची सांपत्तिक संस्कृती फार चांगली नाही. उशीरा लग्न केल्यानंतर पहिल्या मुलाचे शिक्षण करता येईल का ? ती खुप लांब विचार करते. तिला याची जाणीव आहे. देशात ओढवलेल्या दारिद्र्यामुळे कुटुंब संस्थेचे पाय हल्लेले आहेत. नायिकेला यातून अविवाहीत स्त्रीचे प्रश्न, प्रौढ स्त्रियांचे प्रश्न सांगायचे आहेत. प्रौढ झालेल्या मुली आणि तीचे शिक्षण समाजाला पचणारे नाही. वडिलांची विचार सरणी आणि मुलीचे प्रश्न या पेचात नायिका सापडलेली आहे.

### ३.१.४ तलावातील चांदणे

'तलावातले चांदणे' हे कथेचे शिर्षक सूचक आहे. तलावाच्या चांदण्यामध्ये पडलेले प्रतिबिंबामुळे सौदर्याची फुलावळ अधिकच वाढत जाते. तलाव आणि चांदणे एक जीव झालेले आहेत. प्रेमसंबंधामध्ये एकजीव झालेल्या तरुण – तरुणीच्या मनाच्या स्थितीचे चित्रण या कथेत येते. निसर्गाच्या वर्णनातून त्या दोघांमधील असणारा सहज प्रेमभाव व्यक्त होत आहे. "जाताना तू आपल्या हाताने जी भूल केलीस ती जास्वंदीच्या सडसडीत पाकदार फांदी मात्र अजून हलत आहे. टोकाला असलेल्या लालभडक फुला सकट हळुवार पणे डुलत आहे. त्या फांदीकडे पाहत मी रेलून पडलो आहे. पाऊस कुरवाळीत ... हातावर टेकलेल्या पंजाकडे पाहत आणि तुझी स्मृती त्या सडसडीत बाकदार फांदीसारखीच माझ्या मनात डुलत आहे." नायकाच्या

मनामध्ये नायिके विषयीचे प्रेम भरलेले आहे. आपल्या मनातील गुज गोष्टी तो तिला सांगू इच्छितो. कॉलेजच्या जीवनापासूनच ती त्याला आवडायला लागली. तिचे सौदर्य त्याच्या मनामध्ये भरले आहे. ती हवी असल्याची अनिवार्य इच्छा त्याच्या मनामध्ये येते. तिच्या बाबतीत मोकळेपणा येताच तिने त्याला आकर्षित केले तो मनाने हे स्वीकारायला तयार नाही. त्याच्या आवडीशी ती जुळून घ्यायला लागली. तो तिला त्याच्या मनाप्रमाणे वागवत होता. तिच्याविषयी संशय घेत होता. त्याची प्रेम करण्याची रीत वेगळी होती. आठवणीच्या हिंडोळ्यावर ते झुलत असायचे. समुद्र किनारा सूर्याचे प्रतिबिंब पाहत असायचे. प्रेमातील रुसवे, फुगवे, याचाही अर्थ तो लावत आहे. भांडणामुळे त्याच्या आयुष्यातील  काही क्षण सुखाचे निर्माण होत होते. त्याच्या वृत्तीतील वृक्षपणा निघून जात होता. आनंदी असल्याचा अनुभव तो घेत होता.  पुढे त्या दोघांचा विवाह होतो. नववधुचे जसे स्वागत करायला पाहिजे तसे त्याला काही करता आले नाही. लग्नानंतर ही त्याच्या प्रितीचे स्वप्न व्यवहार साकार होते. लग्नानंतर ती स्वतः बदलली आणि त्याला ही बदलवली. मनाचा मोठेपणा तिच्या जवळ आला होता. तिच्यामुळे तो सुखी झाला. आपल्या घराच्या स्वप्नामध्ये ती रंगुन जाते. एकमेकांचे गोड कौतुके ते सतत करत राहतात. व्यवहाराच्या बाबतीत ती हुशार असते. ती रागवली तरी त्याला आवडत नाही. तो तिचे सर्व काही ऐकतो. ती नजरेने स्थिर वृत्तीने हळवी व गंभीर झालेली आहे. त्या दोघांमध्ये तिसरा येणार त्या पाहुण्याच्या स्वागतासाठी दोघे ही आनंदांने सामोरे जातात. हळुवार भावनांचे चित्रण करणारी ही कथा आहे.

### ३.१.५ वळीव

ग्रामीण जीवनाचा व माणसांचा  वेध घेणारा कथाकार म्हणून शंकर पाटील यांची ओळख आहे. त्यांनी आपल्या कथा जीवनात विविध प्रयोग केले आहे. त्यांचे पुढील कथा संग्रह प्रसिध्द झाले. व लोकप्रिय ठरले. वळीव, भेटीगाठी, आभाळ, धिंड, ऊन, सावली, वावरीशेंग, खुळ्यांची चावडी , पाहुणी, खेळ खंडोबा, ताजमहाल मध्ये सरपंच इ. कथासंग्रहातून त्यांनी मानवी समुहाचे विविध बदल उलगडून दाखवले. शंकर पाटील यांची १९६४ मध्ये

'टारफुला' ही कादंबरी प्रसिध्द झाली. अनेक मराठी चित्रपटात त्यांनी कथा, पटकथा संवादलेखन केलेले आहे. त्यातील पुढील चित्रपट महत्वाचे ठरले.  भोळीबाबडी, चोरीचा मामला, पिंजरा, केला इशारा जाता जाता, एक गाव बारा भानगडी, डोंगरची मैना इ. सर्व चित्रपट मराठी मनावर आपला ठसा उमटवणारे आहेत.  त्यांनी वगनाट्य ही लिहिली. आपल्या कथांसाठी ग्रामीण भागाची , खेड्याची पार्श्वभूमी निवडली. कथेत विनोद, कारुण्य, नाट्य व निसर्गाचा वापर केला. १९८५ मध्ये नांदेड येथे झालेल्या अखिल भारतीय साहित्य ,मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांना मिळाले. वळीव ही कथा 'वळीव' या कथासंग्रहातून प्रातिनिधीक स्वरुपाची कथा आहे. मानवी नाते संबंधातील प्रेम हा घटक वळीवाच्या पावसाच्या निमित्ताने व्यक्त झालेला आहे. तात्या देसाई आणि त्याची म्हातारी यांची मने घट्टपणे बांधलेली आहेत. त्याचे प्रत्ययकारी चित्रण या कथेत दिले आहे.  वळीव हे कथेचे शिर्षक सूचक आहे. वळीव हा पावसाआधीचा पाऊस असतो. तात्या देसाई आणि त्याची म्हातारी यांच्या मनामध्ये पावसाआधीच्या आठवणी आहेत. वादळवाऱ्यासह होणारा पाऊस म्हणजे वळीव. मानसाच्या मनातच वादळे निर्माण होतात आणि क्षमतात. या कथेत ग्रामीण जीवनाचे वर्णन येते. ते अत्यंत वास्तवादी दिसून येते. सारी भूमिच जणू धगधगत होती. गार सावलीला बसूनही अंग भिजत होते.  हवेत एक तऱ्हेचा विचित्र उकाडा होता. वाराच बंद झाला होता. पेवात कोंडलेल्या धान्यागत माणसाची अवस्था झाली होती. तात्या देसाईचे वय झालेले आहे.  त्याचे हात पाय

थरथर कापत आहेत. वळवाच्या उकाड्याने तो त्रस्त झाला होता. त्याला लागलेली तहान तो क्षमवीत होता. त्या रानामध्ये त्याला सोबत करण्यासाठी कोणीही नसते. नंतर माळयाचा सखोबा त्याच्याशी गप्पा मारण्यासाठी येत आसतो तो सासर वाडीला गेलेला असतो. त्याचा सासरा तात्या मरण पावलेला असतो. तात्यांच्या मनात चलबिचल सुरु झालेले होते. एकंदरीतच माणसाचे जगणे आणि मरणे परमेश्वराच्याच हातात आहे. याची जाणीव त्याला होते. अचानकपणे वळीवाच्या पावसाचे चित्रण त्याला होते. जोराचा सोसाट्याचा वारा सुटला. आपले छप्पर उडून जाईल काय? अशी त्याला भीती वाटते. वाऱ्यापासून संरक्षण करण्यासाठी तो धडपडू लागला. झाडे वाऱ्यांनी हलू लागली. निसर्गातील बदलाचे चित्रण चित्रदर्शी शैलीतून शंकर पाटील करतात. “मावळतीकडून लाल धूळीचे लोट चाल करुन येत होते. गावच्या गाव आगीत भस्मसात झाली होती. लालधूळ गगनाला जाऊन मिळाली. सैरावैरा धावणारा हे वाऱ्याच घोडदळ वेगाने जवळ येत होत. बघता - बघता वीज चमकू लागली आणि पाण्याने भरलेले काळे ढग जवळ येऊ लागले. या सगळ्या वातावरणामध्ये तात्याने सगळी तयारी केली. पैरण घातली, रुमाल डोक्याला बांधला कान गच्च झाकून घेतले . पोरांची व गडिमाणसांची तो वाट पाहू लागले.” तात्याचे वय झाले होते. हे प्रतिकात्मकरित्या लेखक सुचवत आहे. पाळा-पाचोळा, चिंचेच्या झाडावरील वाकोड्या तुटून पडल्या आहेत. यातून तो सुचीत होत आहे. “पावसाचे थेंब पडू लागले, सारे कृषी संस्कृती उल्लासीत झाली. वीज चमकून गेली. म्हातारा मायाळू असतो त्यामुळे त्याच्या जवळील कुऱ्हाड तो अंगणात टाकतो. वाऱ्याने सगळीकडे हाहाकार माजवलेला असतो. झाडं जमिनीला टेकलेली असतात. तात्यांच्या झोपडी जवळ सगळे जमलेले असतात. जोरात वीज कडाडते. तसा मनातून घाबरतो. हाताच्या बोटातील अंगठे चाचपतो. अंगठी नाही म्हणून तो घाबरतो ती अंगठी तो पायाळू आहे म्हणून बोटात अडकवलेली असते. वारा जोराचा वाढू लागतो. तात्याला म्हातारीची काळजी वाटू लागते. ती काय करत असेल याची चर्चा तो करतो. पावसाविषयी सगळ्यांमध्ये चर्चा होत. यातून मनातील भावना व्यक्त झाल्या आहेत. सखुचा सासरा गेल्याची हकिगत तात्या सांगतो. कुंभाऱ्याची म्हातारी अशीच गेली होती. तात्याच्या मनात चिंता असते, काळजी असते. त्याला म्हातारीचे काय झाले असेल याच विचारात तो घराकडे जायला निघतो. शिवरामला लिंबाचे झाड तोडायला सांगतो. लिंबावर वीज पडते असा त्याचा समज आहे. तेवढ्यात त्याचा पुतण्या धावतपळत येताना दिसतो. म्हातारीने त्याला अंगठी पाठवलेली असते. ग्रामीण भागातील लोकमानस यातून डोकावते.

### ३.१.६ भुताचा जन्म

द.मा. मिराजदार हे नाव मराठी कथा विश्वात , साहित्यात कथाकार म्हणून सुपरिचित आहे. त्यांनी विपुल कथा लेखन केले. त्यांचे पुढील कथा संग्रह प्रसिध्द आहेत. ‘माझ्या बापाची पेंड’, विरंगुळा, भूताचा जन्म, हुबेहुब, मिरासदारी, गप्पागोष्टी, चुटक्याच्या गोष्टी, हसणावळ, माकड विवाह, चकात्या, गुगुदल्या, भोजन भाऊ, भोकरवाडीच्या गोष्टी , गंमत गोष्टी, फुकट, गोष्टीच गोष्टी इ. त्यांच्या कथा विनोदी हास्यप्रधान आहेत.

त्यांच्या कथेतील निवेदनचातुर्य अजोड आहे. त्यांनी विनोदी लेखन केलेले आहे. सरमिसळ, बेंडबाजा, खडे आणि बोरखडे, या पुस्तकांव्दारे त्यांनी लेखन केले आहे. यांशिवाय एकांकिका, प्रवास वर्णन, कादंबरी, कथालेखन इ. त्यांचे साहित्यविश्व आहे. १९४५ मध्ये परळी वैजनाथ येथे संपन्न झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी बिनाविरोध निवडून आले. ‘भूताचा जन्म’ या कथेत ग्रामीण भागामध्ये लोकांमध्ये भूतांविषयीच्या अंधश्रध्दा कशा पसरतात आणि त्या कशा दृढ होतात. याचे विनोदी अंगाने वर्णन केले आहे.

सहजतेपणे कथा वाचकाच्या मनात ठाव घेते. एखाद्या प्रसंगाचे वर्णन करताना त्याला उपहासाची जोड दिलेली दिसते. त्या बरोबरच अतिशयोक्तपूर्ण विनोद हे त्यांच्या विनोदांचे वैशिष्ट्य आहे. "गुंडगुळ्याचा माळ हे ठिकाण भुतांच्या दृष्टीने अगदी गैरसोयीचे होते. ना तिथे एखादी पडकी विहिर ,ना पडका वाडा, पिंपळ, पड, किंवा प्रचंड झाडे ही त्याठिकाणी अजिबात नव्हती. काही ठिकाणी उगीच आपल्या दोन – चार बाभळी होत्या पण बाभळी सारख्या काटेरी झाडांवर बसण्या इतपत इतकी भूते काही मागासलेली नव्हती. विहिर आडतर सोडाच पण भूतांचा बाजार म्हणून प्रसिध्द असलेल्या मसनवटीचा भागही तेथे कुठे आसपास नव्हता. म्हणजे भूताचा जन्म व्हायला ती जागा अगदी निरुपयोगी होती". गुंडगुळाच्या माळाचे वर्णन एवढे विस्तृतपणे लेखकाने केले आहे. त्याचे कारण तो माळ भकास आणि रुक्ष आहे. परंतु अशा ही ठिकाणी भूताची ही एक कथा जन्माला आली याचे ही एक नवलच आहे. कथेचा नायक पैलवान तुकाराम लांडगे आहे. तुकाराम म्हणजे देशमुखांनी पाळलेला. त्याची शरीरयष्टी वैशिष्ट्यपूर्ण होती. त्याचा स्वभाव भित्रा होता. देवधर्म, भूतपिशाच्च, जादूटोणा, मंततंत्र, अशा सगळ्या गोष्टींना तो दचकत होता. एकेदिवशी तो रात्रीचा माळावरुन येत होता. त्यावेळी त्याला मनात भिती होती. भूत भेटले तर त्याची माफी मागायची असे तो ठरवतो. अशा प्रकारचे भयंकर विचार त्याच्या मनात थैमान घालत असतात. एकेदिवशी रात्री चालताना रात्रीच्या अंधारात त्याच्या मनात भिती भरली होती. रस्त्याने चालताना एका माणसाची साथ संगत त्याला होते. तो माणूस विडी ओढत असतो,यावरुन तो माणूसच आहे याची खात्री पटते. त्याचा चेहरा दिसत नसतो. तुकारामच्या मनात भिती असते. तो त्याच्या बरोबरील माणसाजवळ व्यक्त करतो. त्या माणसाची भुताशी दोन हात करण्याची तयारी असते. तुकारातला मात्र अधिकच भिती वाटते. तो माणूस भूताची गोष्ट सांगायला तयार होतो. पण ती ऐकण्याची तयारी तुकारामाची नसते. पुढे तुकारामच भूताची गोष्ट सांगू लागतो. सोनाराने एका भुताशी मैत्री केली. तापवलेल्या सोन्यानंतर होणारा जो चुर्र्र आवाज भुताला खुप आवडायचा आणि त्याला तो त्याला सोने आणून देऊन तापवायला सांगायचा. भूत सोन कुठून आणायचा हे मात्र तुकारामला सांगता येत नाही. भूताच्या त्रासाला कंटाळून सोनाराने भूतालाच चटका दिला ही गोष्ट ऐकून त्या पाहुण्याला भिती वाटेल अशी तुकारामची कल्पना होती तो स्वतःच मनातून घाबरला होता. एवढी भयानक कथा सांगूनही तो पाहुणा हसत होता. मिरासदाराच्या कथेत चमत्कृती दिसते. उपहास दिसतो. त्याला तुकारामने धमकी दिली त्याच्या मित्रांची गोष्ट सांगायला सुरुवात केली. चोऱ्या करणारे मित्र, एकदा चोऱ्या करुन जातात. ते पैसे मोजत राहतात. तो पर्यंत भूत त्यांच्या भाकऱ्या खावून टाकते. भूत ढेकर देत त्यांनी लावलेली चिमणी भूत विझविते. रात्रभर भूत झाडावर चढायचे आणि विहिरीत उड्या मारायचे त्यामुळे सर्व घाबरतात. तेव्हापासून रात्रीचेते कधीही फिरकले नाहीत. ही दुसरी कथा सांगितल्या नंतर पाहुणा घाबरलेला असेल असे त्याला वाटले पण तो घाबरलेला नसतो. भूते कुठे असतात ? असा उलट प्रश्न त्याने विचारला. निर्जन ठिकाणी भूताची वस्ती असते. पिंपरीचे झाड जवळ येत चाललेले होते. तेव्हा पिंपरीच्या झाडा खाली दोघे विडी ओडण्यासाठी दोघे थांबतात. पाहुणा भूत पाहण्याच्या ईर्षेवर येतो. पुढे तुकारामला भूत विडी सुध्दा ओडते हे माहित पडते, असे आश्चर्य वाटते. यात मुंजा, हाडळ हे सुध्दा विड्या ओडतात ही माहिती मिळते. तुकारामच्या मनात भिती येते. पिंपरणीच्या झाडाखाली दोघेही थांबतात. पिंपरणीच्या झाडावर भूते असतात, असा समज तुकारामचा असतो. त्यामुळे तो जास्त वेळ तेथे थांबू शकत नाही. तो पाहुणा निर्भिड असतो भूत समोर आले तर त्याला विडी ओडायला देऊ अस तो म्हणतो. हाडळ सुध्दा सिगारेट ओडते ही माहिती त्याला कळते. त्याला एकएक माहिती नवीनच कळत असते. मनातून तो घाबरलेला होता.

एकट्याने तो पुढे जाऊ शकत नव्हता त्यामुळे तो पाहुण्याबरोबर थांबला होता. ते दोघे ही अंतर ठेवून झाड्याच्या बुंध्याला टेकून बसले दोघांच्या संवादातून कथा पुढे जाते. रात्र आपल्या पध्दतीने जात होती. सगळीकडे शांत आणि उदास होते. तुकारामला तंबाखू खाण्याची सवय होती. बराचवेळ गेल्यानंतर त्याच्या मनातील भिती अधिकच वाढत गेली. त्याच्या बरोबरील पाहूना विडी ओढण्यासाठी झाडाच्या मागच्या बाजूला गेलेला होता. तो तिथे बसला होता ती जागा रिकामीच होती. त्या ओसाड, भयान माळावर त्या पिंपरणीच्या दाट सावली खाली तुकाराम एकटाच होता. त्याला मनात भिती वाटू लागली. एकाएकी त्याच्या पायात गती आली तो पळाला. गावाच्या दिशेने पळाला गावात पोहोचला तेव्हा त्याला लोकांनी विचारले कशाला भिलास तेव्हा त्याने सावध होऊन आपण पाहिलेली हकिगत सांगितली, आणि बेशुध्द पडला. इकडे तो पाहुणा विडी ओडण्यासाठी झाडाच्या मागच्या बाजूला गेला विडीचे चार दोन धुरके त्याने ओडले. आपल्या सोबत्याचे त्याला हसू येत होते. भूताने घाबरणारा त्याचा सोबती त्याला दिसत होता. अशा विचारामध्ये त्याची काही मिनिटे गेली. आपल्या सोबत्याचा आवाज येत नाही म्हणून पाहुना मनातून चमकला. तो अलिकडच्या बाजूला आला पण तिथे कोणीच नव्हते. पहिलवान बसला ती जागा रिकामीच होती. त्या ओसाड माळावर दाट सावलीच्या पिंपरीखाली तो अगदी एकटाच होता. कथे मधील गुढता वाढत जाते. रात्र अमावशेची होती थोड्या वेळेने त्याच्या लक्षात आले झालेला प्रकार काय होता. तेथून तो पळाला. पळताना त्याने एकदाही मागे पळून पाहिले नाही. भितीने तो चिंब चिंब झाला. कुठल्यातरी वस्तीला तो येऊन पडला. अशा रितीने पिंपरणीच्या वरचा भूताने दोन माणसांना धक्का दिला. पुडे ते भूत लवकरच मोठे झाले. त्याची वंशावळ वाढली. लोकांनी त्याच्या विषयीच्या कथा वाचायला सुरुवात केली. एकंदरीत लोकांना कळून चुकले. ती वाट बंद झाली. गावातले धाडसी लोक अमावस्येच्या दिवशी जातात. रात्रीच्या वेळी तिकडे कोणी फिरकत नाही. अमावस्येच्या रात्री काही धाडसी लोक भूताच्या पंक्तीला बसून जेवण करुन माघारी येतात. तुकाराम लांडगे मात्र नेहमी गुंडगुळ्याच्या माळावर भूताशी आपण कशी कुस्ती केली याच्या गप्पा मारत राहतो. अशा पध्दतीने या कथेत ग्रामीण लोकमानस चित्रित झाले आहे.

### ३.१.७ लग्न संपल्यावर

मराठीतील एक गुणी,समंजस्य अभिनेत्री असा प्रिया तेंडुलकर यांचा परिचय दिला जातो. त्यांनी साहित्य प्रांतातही आपला ठसा उमटवला आहे. त्यांची साहित्य सेवा पुढील प्रमाणे आहे. पंचतारांकित, ज्याचा त्याचा प्रश्न, जावे तिच्या वंशा, जन्मलेल्या प्रत्येकाला, फस्टपरसन, असही इ. लेखनातुन उच्च, मध्यमर्गीय समाज जीवन विशेषताः, स्त्री जीवनाचे प्रतिबिंब पडलेले दिसते. प्रिया तेंडुलकर यांनी गिधाडे, ही फुलराणी, एक हट्टी मुलगी या नाटकातून अभिनय केला. अंकुर हा त्यांचा पहिला चित्रपट. एकुण सोळा चित्रपटांतून त्यांनी भूमिका केली. लग्न संपल्यावर यात स्त्रीवादी जाणीव स्पष्ट झालेली. लग्न संपल्यावर हे शिर्षक प्रश्नार्थक आहे. प्रत्येक स्त्रीच्या आयुष्यात काही टप्पे असतात. त्यातील बालपण, शिक्षण, नोकरी असे टप्पे असतात. यातील नायिका आयुष्याच्या एका टप्प्यावर अशी उभी आहे. तिच्या पुढे काही प्रश्न आहेत त्या प्रश्नांची उत्तरे शोधताना ती थकून गेलेली असते. तिला काही अक्ष दिसत नाही. सासर, माहेर आणि स्त्री या एकाच नाण्याच्या बाजू तिला वाटू लागतात. प्रत्येक स्त्री लहानाची मोठी होते. शिक्षणाचा एक टप्पा ती ओलांडते. तेव्हा तिच्या पुढे नोकरीचा टप्पा असतो. त्यानंतर विवाहाच्या असतो. लग्नानंतर घटस्फोट होतो. पुढे काय करायचे हा तिच्या पुन्हा प्रश्नच आहे. म्हणून कथेचे शिर्षक लग्न संपल्यावर असे आहे. नायिकेचा

नवऱ्याबरोबर घटस्पोट झालेला आहे. त्यानंतर ती आपल्या आई वडिलांकडे राहण्यासाठी जाते. रेल्वेमध्ये तिच्या मनात असंख्य प्रकारचे विचार असतात. तिच्या समोरील बाई नवरा मेल्यानंतर तिची झालेली अवस्था वर्णन करुन सांगते. “हो जाऐगी आदत हमे देखोना मरद मर गया जब २४ साल की थी ,एक दिन भी नही रह सकती थी उसके बिगर तब लगा था अब क्या होगा ? मेरा मर जानेका जी करता था। साथ में ३ बच्चा रो रोके आँख भर गई लेकिन हो गई आदत। हो जाती हैं। दुनिया सब सिखाती है।” प्रत्येक स्त्रीची एक कहानी असते. नवऱ्याला घटस्पोट दिल्या नंतर पुढच आयुष्य कस काढायचे हा तिचा प्रश्न आहे. तीची तहान भुक निघून जाते. जवळचे पैसे खर्च करताना ती तीनदा विचार करते. तिच्या मनात त्याचे वाक्य घोळत आहेत. बायको म्हणून ती आवडत नाही. याचा ती सतत विचार करत राहते. मनाला वाटेल तसे ती जगण्याचे ठरवते. तिचा नवरा अजित याने संपर्क करुन तिला विचारलेले असते. तिच्या भावाच्या मते घटस्फोटाच्या फॉर्मवर तिने सही करायला नको हवी होती. आपले घर सोडायला नको होते. तिने आपण घेतलेल्या निर्णयावर विचार केला, आपण घटस्फोटावर सही जरी नसती केली. तरी सुध्दा त्याने आपल्याला बाहेर काढले असते. ३ वर्ष तिने संसार केला . तिच्या घटस्फोटाची बातमी सगळीकडे झाली होती. पुढे तिने काय करायचे हे तिच्या भावाने ठरविले आहे. तिच्या साठी तो एक टायपरायटरची नोकरी आणतो. तिच्या मनात प्रश्न निर्माण होतो आपल घर कुठल ? घरातील वहीनी तिचं स्थान पक्क करु पाहते आहे. तिला नायिकेच्या दागिन्यांची काळजी आहे. आई तिला मामाने दिलेला डबा परत आणला का हे विचार ते नवरा जसे म्हणेल तसे ती वागत गेली. वर्षभरानंतर घटस्फोटाचा निर्णय निघालाच. फॉर्मवर सही केल्यानंतर तो तिच्याशी माणसासारखे वागायला लागला. तिला ही वाटले उगीचच कायद्याच्या कचाट्यात त्याला कशाला कडवून ठेवायचे . ती पुढे काय करणार असा प्रश्न आहे. ती पोटगी मिळणार स्वतःचे निर्णय स्वतःच घेणार. तिच्या वडिलांनी वाटते तिने दुसरे लग्न करावे. दुसरा नवरा शोधने इतक सोप नाही असे तिला वाटत. आईचा आधार फक्त कथा कादंबऱ्यात असतो. प्रत्यक्षातील आईला आपल्या डब्याची काळजी असते. तिला बऱ्यापैकी रुप नाही, हातात कोणतीही कला नाही, नोकरीचा अनुभव नाही. अनुभव एकच आहे, तो ही अयशस्वी संसाराचा. नोकरी मध्ये एक जमली नाही म्हणून दुसरी पत्करतो. पण लग्नामध्ये तसे जमत नाही. तिला वाटते आपल्या आईची माया आपल्याला मिळेल. नवऱ्याबरोबर दिवस तिला आठवतात. आपण हक्काने नवऱ्याचे घर आपले समजत आहे परंतु ते घर आपलेच नव्हते. आपल्या समस्येचे मुळ काय याचा विचार ती करते. आपण भारतीय संस्कृतीत वाढलेले. मुले आणि पालक यांच्यात अंतर राहणारच. ती म्हणते, “ किती चुकीची समजुत करुन घेतली होती लग्नाबद्दल. लग्न म्हणजे नवऱ्याला चांगल चुंगल करुन घालन . त्याच्या माणसांना सांभाळण, सासरी जाताना आई म्हणाली नवऱ्याची काळजी घे त्याला सुखी ठेव. बिछान्यात त्याला सुखी ठेव. हे त्याच वेळी आईने मला सर्व काही का शिकवल नाही. हे उपजतच सर्वांना माहित असते असा नवरा म्हणायचा. पण मलाच का माहित नव्हते.”

मी ही शिकायचा प्रयत्न केला. नवऱ्याने ही शिकवण्याचा प्रयत्न केला. शरीर संबंधाबद्दल असलेली अनाभिज्ञता नायिकेच्या घटस्फोटाचे कारण ठरते. तो तिच्यावर चिडायचा. डॉक्टरांकडे तपासणी ही झाली तिच्या मनात भिती होती, अज्ञान होते, लाज होती त्याला वाटले ती आता बदलणार नाही. भारतीय समाज जीवनात पत्रिका जुळतात, गोत्र जुळते, वय शिक्षण याचा विचार होतो. पण हे मॅचिंग जुळत का नाही ? याचा विचार कोणीही करत नाही. नवरा सुध्दा लग्ना पूर्वी आपल्या आवडी विषयी स्पष्टपणे बोलत नाही. तिला वाटते हे सर्व बदलले पाहिजे.

लग्न संपल्यानंतर काय करायचे हा तिच्या पुढचा प्रश्नच आहे.

### ३.१.८ सर्व्हिस मोटार

व्यंकटेश मांडगुळकर कथाकार, कादंबरीकार ,नाटककार म्हणून मराठी वाचकांना परिचित आहे. त्यांच्या पुढील कादंबऱ्या मराठी वाङ्मयात महत्वपूर्ण ठरल्या . वाळूचा किल्ला, बनगरवाडी, सत्तांतर, करुणाष्टक, चित्रमती, वावटळ, कोवळे दिवस, पुढचे पाऊल इ. मांडगुळकरांची कथा मानवी जीवनाचा विविध अंगाने वेध घेणारी आहे. मायदेशी माणंस, गावाकडच्या गोष्टी, हस्ताचा पाऊस, कार्यालये, पांढऱ्यावर काळे, जांभळाचे दिवस, वारी, सिताराम एकनाथ, उंबरठा, घरदार, वाघाच्या मागावर ,पारितोषिक इ. कथासंग्रहानी मांडगुळकरांचे कथा विषयक समावलेले आहे. माडगुळकरांनी पती गेले कोठे, वाडी, तू वेडा कुंभार, बीन-बीयाचे झाड, कोणाला कोणाचा मेळ नाही. इ. नाटकांचे लेखन केले. ललित लेखनात त्यांच्या लेखनीने संचार केला आहे. पांढऱ्यावर काळे , पांढरी मेंढरे हिरवी कुरणे, सिंहाच्या देशा, नागाझिरा इ. ललित लेखन केले आहे. त्याच्या बरगडवाडी या कादंबरीवर आधारीत त्याच नावाचा चित्रपट खूप गाजला. १९८३ मध्ये संपन्न झालेला आंबे जोगाई येथील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले आहे. सर्व्हिस मोटार या कथेतून व्यंकटेश मांडगुळकर यांनी खेड्यामध्ये वस्तू विनिमय पध्दत जाऊन पैशाचा विनिमय वाढल्याने खेड्यात होणारा बदल रेखाटला आहे. त्याबरोबरच ग्रामीण जीवनातील परंपरागत संस्थेतील वर्णन नवीन यंत्रसंस्कृतीने आघात केल्या नंतर खेड्याचा बदललेला चेहरा चित्रित केला आहे. कथेचे शिर्षक सर्व्हिस मोटार म्हणजे एक गावावरुन दुसऱ्या गावापर्यंत माणसांची वाहतूक करणारी गाडी असा आहे. कथेत तीन पात्रे आहेत. इजा कुंभार त्याचा मुलगा भोजा आणि सून हे तिघेही त्यांच्या स्वतंत्र स्वभावामुळे कथेत उठून दिसणारे आहेत. इजा शरीराने बलवंत तर त्याचा मुलगा हाडकुळा, इजा पुरुषाची लक्षणे असलेला तर भोजा कुठेही मर्दपणाची, पौरुषाची लक्षणे नसलेला. इजाबाजी सुन गोरी, हुषार, साधी सरळ प्रपंच करणारी . भोजा आपल्या बापाच्या कामात मदत करणारा. संपूर्ण गावाला कुंभाराचे साहित्य या कुटुंबाकडूनच पुरविले जात असे. इजाच्या कुटुंबाच्या गावाकडून पुरविल्या जायच्या म्हणजे हे गाव स्वयंभू चालत होते. तिथला गाव व्यवस्थित चाललेला होता. या गावात काही उणीवा होत्या. हेवेदावे, दारिद्र्य, मारामाऱ्या यांचे प्रमाण अत्यंत होते. हे गाव सुधारणांपासून दूर होते. एकमेकांना मदत करणारी माणसे येथे होती. दुकाने, शाळा, सरकारी कचेऱ्या, विटांची घरे, कंदील नसूनही हे खेडे सुखी होते. अशा खेड्यांमध्ये तालुक्याच्या गावावरुन येणारी खडकाळ गाडीवाट दुरुस्त व्हावी. ही दुरुस्ती इजाच्या घरापर्यंत आली. ही काय भांनगड आहे याची तो माहिती घेऊ लागतो. त्यात त्याला मोटार सुरु होणार असल्याचे समजते. आतापर्यंत त्याने कधीच रेल्वे किंवा मोटारीत पाय ठेवलेला नसतो. ही गाडी माणसांची ने-आण करीत असते. ही सेवा का सुरु झाली तर गोर गरिबांकडून पैसे उकलण्यासाठी. मोटारीच्या मालकाचा स्वतःचा स्वार्थ त्यामागे असतो. त्याच्या दृष्टीने मोटार म्हणजे माकड वाल्याचा खेळच असतो. गावामध्ये सर्व्हिस मोटार येतात. त्यामुळे इजा कुंभाराचा मुलगा भोजा याला आनंद होतो. गाडी येते, माणसांना घेऊन जाते. गाडी या ठिकाणी उभी करु नये असे त्याला वाटते. बापलेकांचे वाद विवाद होतात. शेवटी एकुलता एक मुलगा आहे असे समजून तो गप्प बसतो. आपण आज आहोत उद्या नाही. आपल्या नंतर हे सर्व मुलाचेच आहे. त्यामुळे तो गप्प बसतो. गावात जेजे वाईट होईल ते मोटारी मुळेच म्हणून तो आपल्या मुलाला समजावून सांगतो. त्यानंतर त्या मोटारी च्या संदर्भात एक शब्दही बोलत नाही. इतर वाहनासारखी मोटारही त्यांना परिचित झाली. व्यवहारासाठी

उपयोगी ठरु लागली. आपल्या वस्तू बाजारात विकूण त्याच्यापासून पैसे मिळू लागले. तेव्हा गावातल्या मनोवृत्तीत मात्र बदल झाला. मोठे शेतकरी चिक्कू झाले. अडीअडचणीला मदत करणे त्यांनी थांबवले. खोटे बोलण्याची त्यांना सवय लागली त्यामुळे न्हावी, सुतार, लोहार या गावाची सेवा करुन पोट भरणाऱ्या लोकांनी सुध्दा शेतकऱ्यांचे हात आखडले. कामात ते चुकारपणा करु लागले. त्यांच्या ठिकाणी शुद्रता, स्वार्थ, हेवेदावे, अशा गोष्टी आपोआपच आल्या. गाडीमुळे नवे विक्रेते गावात आले. त्यात कपडे, दागिने, तमासगिर, नाटक वाले, असे सगळे आले. त्यामुळे गावात बदल झाला. गाव नासले गेले. माणसे बिघडली. इजाबाच्या मनात मोटारीचे गाव बिघडलेच हेच मनात होते. गावातली वाहतूक वाढली तशी इजा कुंभाराच्या घराची वाट लागली. भोजाची मैत्री सख्या ड्रायवरशी होते. तो कावेबाज असतो. भोजाला घोड्यावर चढवून हॉटेल काढण्यास तो प्रवृत्त करतो यामुळे कुंभाराच्या लिंबाखाली उभे असणारे लोक हळूहळू इजाप्पाच्या चूलीपर्यंत पोहोचले. आपला विडीचा धंदा सोडून अशा प्रकारचे काम भोजाने करावे हे इजाप्पाला पटणारे नव्हते. वेगवेगळ्या वस्तूची विक्री भोजाच्या हॉटेलात होवू लागली. इजाबाची सून सुरुवातीस लाजरी, घरंदाज, सहज कोणासमोर नयेणारी होती. परंतु नंतर तिला लोकांच्या गर्दीचा सराव झाला . परंतु तिला लोकांच्या गर्दीचा सराव झाला. तिने लाज सोडली. निर्भिडता, कोडगेपणा, मोकळेपणा आणि किंचीत फाजीलपणा हे दूर्गुण तिच्यात आले. कुंभाराचे घर म्हणजे फाजील लोकांच्या बसण्याचे ठिकाण झाले. धंद्यासाठी लागणारे कौशल्य भोज्याकडे नव्हते त्यामुळे त्याची इतरांवर व इतरांची त्याच्यावर वसुली थकली. या सर्व बदलांमध्ये इजाबा कुंभार गप्प होता. गाव बिघडत राहिले. इजाबा कुंभाराची सूनही बदलत राहिली. परपुरुषाचा स्पर्श आणि शब्द याचे तीला काहीच वाटेनासे झाले. सख्या ड्रायवरने तिला भेटवस्तू देऊन तिच्याशी केलेली लगट तिला आवडु लागली. एक दिवस इजा आणि भोजा दोघेही कामानिमित्त बाहेर गेलेले असतात. इजापाजी सुन चहा तयार करत बसते. गाडीची वाट पाहत असते. अशा वेळी सख्या ड्रायवर उतरतो. घरात कोणी नाही या संधीचा फायदा घेऊन तिच्याशी शारीरिक लगट करण्याचा प्रयत्न करतो. त्या क्षणी इजा कुंभार त्याला पकडतो. चिखल ओडायच्या खोऱ्याने त्याला मारतो. त्याला जीव जायी पर्यंत तो मारतो. एवढेच करुन तो थांबत नाही तो मोटारीकडे धावतो. गावाचे ,घरादाराचे, लेका सुनेचे वाटोळे करणाऱ्या गाडीवर तो हल्ला करतो. हातातले खोरे मोडते तेव्हा जवळचे मोठे उगड उचलून तो गाडीवर फेकतो. भोजा कुंभाराचे हॉटेल मोडले गेले आहे. मोटार वाहतूक मात्र नेहमीच चालू राहिली आहे. भोजा कुंभार सख्या ड्रायवरचा जीव घेतल्यामुळे फासावर गेला आहे. परंपरा आणि आधुनिकता संबंध ही कथा व्यक्त करते.

### ३.१.९ जेव्हा मी जात चोरली होती.

बाबुराव बागुल हे कथा कादंबरीकार आहेत. त्यांचे जेव्हा मी जात चोरली, आणि मरण स्वस्त होत आहे. हे दोन कथा संग्रह खुप गाजले व लोकप्रिय ही ठरले. त्यांच्या कथात वाङ्मयी गुण असल्याने त्यांच्या कथांना मराठी कथेत महत्वाचे स्थान आहे. त्यांनी अघोरी, कोंडी, सूड, सरदार, पावशा, भूमीहीन, मुकनायक, अपूर्वा या कादंबऱ्यांचे लेखन केले. त्यांची सूड ही दिर्घकथा अनेक वाङ्मय गुणांनी व आशयाने संपन्न आहे. वेदा आधि तू होतास हा त्यांचा कविता संग्रह प्रसिध्द आहे. दलित साहित्य, आजचे क्रांतीविज्ञान हा ग्रंथ दलित साहित्याचे तत्वज्ञान विशद करणारा आहे. त्यांनी चरित्र वाङ्मयाचे दोन खंड लिहिले असून त्यांना आंबेडकरी भारत १ व २ अशी नावे दिली आहेत. आम्ही या नियतकालिकाचे संपादन ही त्यांनी केले आहे. आंबेडकरी विचारांचा भाष्यकार अशी त्यांची ओळख आहे. दलितांच्या

चळवळीतही त्यांचा सहभाग होता. डॉ.बाबासाहेब आंबेडकर , कार्लमार्क्स व आण्णाभाऊ साठे यांचा विशेष प्रभाव होता.  या कथेचा नायक ठाकूर हा आहे. तो उधना स्टेशनवर रेल्वे मध्ये नोकरीला आहे. नोकरीला लागल्यामुळे तो आनंदी आहे. त्याच्या मनात कोणतीही चिंता, काळजी नाही. त्याने जी नोकरी मिळविली आहे ती जात चोरुन मिळविली आहे. आपली जात त्याने लपवून ठेवली आहे. खरी कागदपत्रे नोकरीच्या ठिकाणी त्याने सादर केलेली नाहीत. जात चोरीमुळे त्याच्यावर आपत्ती आली आहे. त्याला असे वाटते, या देशात माणसाने दलित जातीत जन्म घेऊ नये. तसा घेतल्यास त्याला दुःख ,अपमान सहन करावा लागतो. मरणापेक्षा ही वाईट स्थिती त्याच्यावर येते. मानसिक आणि बौध्दिक यातना सहन कराव्या लागतात. नायक शुध्द आणि सफाईदार, गुजराती बोलतो आहे. त्याचा वेश, कोट, टोपी, धोतर, कोल्हापूरी चप्पल असा आहे. मायको वस्कीच्या कवितांचे वाचन तो करतो आहे. दलित नाही असे समजून बॉयलर फिटर रनछोड त्याला खोली भाड्याने दिली. ती देत असताना त्याची जात विचारतो त्यामुळे तो वरवरचे स्वरुपाच उत्तर देतो. मी मराठी माणूस आहे. माणसिंग याची जात शोधण्याचा प्रयत्न करतो. त्याने दिलेल्या साडेतोड उत्तरामुळे त्यामुळे सगळे निरुत्तर होतात. या देशात कोणतीही जात नाही असे तो ठामपणे सांगतो. नायक जेथे काम करतो आहे तिथे रनछोड तिवारी हे दोघे सवर्ण आहेत. काशिनाथ सकपाळ हा मुंबई काळाचौकीत राहणारा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर बद्दल अभिमान असलेला. कोणत्याही प्रसंगाला खंबीरपणे सामोरे जाणारा. कँटिंगमध्ये सर्वजण त्याला मारायला धावतात, तेव्हा तो आव्हान देतो. सगळ्यांना नोकरीवरुन काढून टाकण्याची धमकी देतो. महार या शब्दाबद्दल सगळ्यांना घृणा व तिरस्कार असतो. तिवारीचा भाऊ कोरमन क्लार्क असल्यामुळे सगळ्यांना दिलासा वाटतो. आपण लपवून ठेवलेल्या जातीबद्दल मनातील घुमसट नायकाची होत असते. काशिनाथ हा आक्रमक आहे. तो चाकू घेऊन सवर्णावर हल्ला करतो. नायक नोकरी सोडण्याचे ठरवतो. रनछोडला निर्भिडपणे उत्तर देतो. सगळी पंचमहाभूते अछुत आहेत. या देशाचा तो नागरिक आहे. त्याचे हात भारताच्या प्रगतीचे रथ आहे. मानवतेसाठी लढणारा सार्वत्रिक सुखाचा तो शिल्पकार आहे. त्याचे काव्य ऐकून रामशरण हा त्याचा भक्त होतो. माता प्रसाद मात्र संशयी असतो, नायकाची सटिफिकीट विचारल्यानंतर मात्र त्याची गडबड होते. दलितांमधील दरी ही शिक्षणामुळेच आहे असे सर्वणांचे मत असते. रामशरण त्याला गुरु माणतो. आपल्या घरी घेण्याची त्याला विनंती करतो. काशिनाथ हा निर्भिड आहे. त्याला भिंतीची कोड झाडून काढायला सांगितली जाते. माता प्रसाद हुकुमाप्रमाणे वागत होता. काशिनाथ उत्तेजित होऊन मुकादमाच्या अंगावर जात असतो. या प्रसंगी काशीनाथची बाजू नायक घेतो. काशिनाथच्या जीवनाची नासाडी होऊ नये म्हणून त्याला वेळोवेळी समजावून सांगतो. रामचरण नायकाची बाजू घेऊन आपल्या भावाला शिव्या देतो. खूप दिवस आपले जात प्रकरण लपवून ठेवणे नायकाला सहन झाले नाही. त्यासाठी तो नोकरी सोडण्याचा विचार करतो. घरच्या परिस्थितीमुळे नोकरी सोडू नये असे त्याला सतत वाटायचे. एखाद्या वेळी त्याला असे वाटायचे की काशिनाथला सगळे सांगावे. आपणही तुमच्यापैकी आहोत. पण त्याच वेळी रनछोडने दिलेली धमकी त्याला आठवते. काशिनाथला  ही असे वाटते की आपण रनछोड आणि रामचरण या दोघांपैकी एकाचा खुन केला असता त्यानंतर आपल्या आई बापाचे व बायकोचे काय झाले असते. लहानपणापासुन तो गुंडांमध्ये वाढलेला असतो. पुढे तो वकील होण्याचे ठरवितो. कामगारांचे जिणे जगण्याचे तो सोडून देतो. जाती भेदाचा वणवा सगळीकडे लागलेला होता. रामचरण व रणछोड यांच्यामध्ये जाती वरुन भांडण लागते. त्याला नायकाला आपल्या घरी पाहुणचारासाठी न्यायचे असते. रामचरणची बायको साधी,घरणदाज स्त्री असते. आपल्या नवऱ्याच्या बरोबरीने ती त्याला साथ

देत असते.  गुरु म्हणून रामचरण त्याची सेवा करतो. पण त्याच वेळेस रामचरणाला नायक अस्पृश्य आहे हे समजल्यानंतर सवर्णांच्या मारण्याच्या गर्दी मध्ये सामील होतो. त्याच्या  पत्नीने जी सेवा केलेली होती त्याचा राग व्यक्त होत होता.  नायकाला मार पडलेला असतो. त्याचा पराभव मनुने केलेला असतो. जातीय संघर्षाचे चित्रण ही कथा वास्तववादी रितीने रेखाटत राहते.

## ३.२ सारांश

'मराठी निवडक कथा' संग्रह या कथासंग्रहात विविध साहित्यप्रवाहातील कथांचा समावेश करण्यात आला आहे. १९६०नंतर मराठी कथेचे बदलते स्वरूप समाजवास्तव या कथासंग्रहातून प्रामुख्याने व्यक्त होते. दलित कथा, ग्रामीण कथा, स्त्रीवादी कथा, महानगरीय कथा अशा विविध प्रवाहातील कथांचा समावेश या कथा संग्रहात केला आहे.

## ३.३ प्रश्नावली

१. निवडक मराठी कथा या कथासंग्रहाची वैशिष्ट्ये सांगा.

२. निवडक मराठी कथा या कथासंग्रहातील दलित जाणिवाच्या कथांचा परामर्श द्या.

३. ग्रामीण जीवनाचे समाजवास्तव निवडक कथासंग्रहातील कथांमधून कसे घडते ते सांगा.

४. स्त्रीवादी जाणिवा निवडक मराठी कथांतील कथांमधून कशा व्यक्त होतात ते लिहा.

## ३.४ संदर्भ ग्रंथ सुची

१. निवडक मराठी कथा संपादित कथासंग्रह.

❖ ❖ ❖

# ४

# निवडक मराठी कथा संग्रहाची वैशिष्ट्ये

**घटक रचना**

४.० प्रस्तावना
४.१ कथांमधील पात्रे
४.२ कथासंग्रहाची वाङ्मयीन वैशिष्ट्ये
४.३ संर्दभ ग्रंथ सुची

## ४.० प्रस्तावना

१) निवडक मराठी कथा या कथा संग्रहामध्ये प्रतिनिधीक स्वरुपाच्या विविध कथांचा समावेश आहे. विविध वाङ्मयी प्रवाहांचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या या कथा आहेत. हा कथासंग्रह संपादीत स्वरुपाचा आहे. जवळ जवळ १०० वर्षांच्या कालखंडातील निवडक कराठी कथा यात आहेत. त्यामुळे यातील कथा निवडीमागे वैविध्य आहे.

२) दिवाकर कृष्ण यांची 'मृणालीनीचे लावण्य' ही कथा स्त्रीप्रधान आहे. विभावरी शिरुरकर यांची 'बाबांचा संसार माझा कसा होणार?' ही कथा स्त्रीवादी आहे. वामन चोरघडे यांची 'संस्कार' ही कथा मध्यमवर्गीय जीवनाचे दर्शन घडविते. आण्णाभाऊ साठे यांची 'मरीआईचा गाडा' ही कथा ग्रामीण आहे. बाबुराव बागुल यांची 'जेव्हा मी जात चोरली होती' ही दलित कथा आहे. जयंत नारळीकर यांची 'कृष्णविवर' ही विज्ञानवादी कथा आहे. भास्करचंदनशिव यांची कावळा ही ग्रामीण कथा आहे.

३) निवडक मराठी कथा या कथासंग्रहातील कथांच्या विषयांमध्ये वैविध्य दिसते. अण्णाभाऊ साठे यांनी ग्रामीण भागातील रुढी परंपरा यात अडकलेला समाज व त्याची परंपरीक मनोवृत्ती, नव्याने शिक्षित झालेला विज्ञाननिष्ठ दृष्टीकोन असलेला नवा प्रवाह त्यांच्यामधले द्वंद, व अंधश्रध्देमुळे आणि सरंजामशाही, मनोवृत्तीमुळे रसतळाला जात असलेला समाज हा नेमका कथेचा विषय आहे. दिवाकर कृष्णा यांनी स्त्री-पुरुषांमधील मैत्री, प्रेम, हळुवारपणा, व्याकुळता, आशानिराशा, हुरहुर, स्त्री-सुलभ भावना, विवाह विषयक संकल्पना,स्पर्शाची जाणीव, स्त्री-पुरुषांमधील आकर्षण हा विषय आपल्या कथेमधून रेखाटले आहे. विभावरी शिरुरकर यांनी स्त्रीची मनोव्यथा, कुटुंबसंस्थेतील ,नाते संबधातील स्थान स्वार्थ व परमार्थ, नोकरी करणाऱ्या स्त्रीयांचे प्रश्न, स्त्रीयांचे शिक्षण, वैचारिकता, प्रौढ सुशिक्षित मुलींचे प्रश्न, स्त्रीयांच्या सासर व माहेरविषयीच्या कल्पना, लिंगभाव, आंतरजातीय विवाह, आर्थिक विंवचना, यासारखे विषय यांच्या कथेमध्ये आहेत. गंगाधर गाडगीळ यांच्या कथेत प्रतिकात्मकता आहे. स्त्रीपुरुषांच्या मनाच्या स्थितीचे चित्रण, त्यातील सहज प्रेमभाव, निसर्गातून व्यक्त होणारे प्रेम, आठवणीतून व्यक्त होणारे प्रेम, रुसवे-फुगवे, प्रेमविवाह, संसार स्वप्ने हे विषय यांच्या कथेत आलेले आहेत. शंकर पाटील यांच्या कथेत ग्रामीण जीवनातील माणसाचे रंगढंग,

अंधश्रध्दा, वृद्ध -स्त्री पुरुषांमधील प्रेम, निसर्ग आणि माणुस यांच्यातील आंतरक्रिया माणसाच्या मनातील वादळे, माणसाचे जगणे आणि मरणे, निसर्गातील बदलाचे चित्रण, मानवी मनातील चिंता, काळजी, अपेक्षा, कथांचा विषय झालेला आहे. द.मा.मिरासदार यांनी ग्रामीण भागात भूतांविषयीच्या पसरणाऱ्या अंधश्रद्धांचा त्यातून निर्माण होणारा विरोध, मानवी मनातील भिती, भूतपिशाच्छा विषयीच्या कल्पना, डळमळणारा विश्वास, मानवी स्वभावातील विसंगती, निर्माण होणाऱ्या रुढी परंपरा हा त्यांच्या कथांचा विषय आहे. प्रिया तेंडुलकर यांच्या कथेचा विषय प्रश्नार्थक आहे. स्त्री जीवनातील बालपण, शिक्षण, नोकरी असे टप्पे माहेर सासर व त्यातील नाते संबंध, घटस्फोटीत स्त्रीचे प्रश्न, स्त्रियांकडे समाजाचा पाहण्याचा दृष्टीकोन, स्त्री-पुरुषांचे शारिरीक संबंध, कायदा आणि स्त्रिया, स्त्रियांची मानसिकता, संसार चित्रे, स्त्री-पुरुष संबंधातील आकलन हे विषय त्यांच्या कथेमधुन आले आहेत. व्यंकटेश माडगुळकर यांनी खेड्यातील वस्तुविनीमय पद्धत जाऊन पैशाचा विनीमय वाढल्याने खेड्यात होणारा बदल रेखाटला आहे. त्याबरोबरच ग्रामीण भागातील गाव गाड्यावर नवीन संस्कृती केलेली आहे. त्यामुळे मोडकळीस आलेली संस्कृती व परंपरागत माणसाची मनोवृत्ती, स्त्रीपुरुषांची बदलणारी मनोवृत्ती त्यांच्या कथेचा विषय आहे. ग्रामीण खेड्यात होणारे बदल वैशिष्ट्यपूर्ण रितीने त्यांनी टिपले आहे. बाबुराव बागुल यांनी भारतीय संस्कृतीमध्ये जातीयतेचे वाढलेले स्तोम आणि त्यामुळे दलितांची होणारी मानसिक व बौद्धिक कुचंबना त्यांच्या कथेमधून येते. व्यक्ती विकासाच्या आड येणारी जातीसंस्था, जाती जोडोन तत्वज्ञान, जातीविषयक चळवळी, राखीव जागांचा प्रश्न यासारखे विषय या कथेमध्ये आलेले आहेत. श्री.दा.पानवलकर यांनी 'वासरु' मध्ये ग्रामीण भागातील प्राणी जीवन आणि माणूस यांच्यात होणारी आंतरक्रिया आली आहे. ग्रामीण भागात निसर्गाची असलेली ओढ, अनामिकता, हुरहुर यातून व्यक्त होते. वामन चोरघडे यांच्या 'संस्कार' या कथेतील बालमनांचे भावविश्व, आतुरता, ओढ, प्रेम व्यक्त झाले आहे. आंतरजातीय विवाह विषयीचा दृष्टीकोन आला आहे. जयंत नारळीकर यांच्या 'कृष्णविवर' या कथेमध्ये नवीन तंत्रज्ञान व्यक्त झाले आहे. आवकाशातील जगात घडणाऱ्या घडामोडी निर्माण होणारे प्रश्न त्यातुन होणारी सुटका हा विषय आला आहे. भास्करचंदन शीव यांच्या 'कावड' कथेत ग्रामीण भागातील जातीयता मांडलेली आहे. पाण्यामुळे निर्माण झालेला प्रश्न, भुकेमुळे निर्माण झालेला प्रश्न या कथेत आहे.

## ४.१ कथांमधील पात्रे

निवडक मराठी कथा यातील १३ कथांमध्ये वैशिष्ट्यपूर्ण अशी स्त्री व पुरुष पात्रे आहेत. मृणालीनीचे लावण्य मध्ये अशोक हा आशानिराशेच्या हिंदोळ्यावर राहणारा तरुण आहे. मृणालीनीमुळे तो निराश होऊन फरारी होतो. बालपणीच्या आठवणीमध्ये रममाण होणारा आहे. यातील मृणालीनी हे पात्र विचारी, संवेदनशील, हळवे, प्रेमळ आहे. बाबांचा संसार माझा कसा होणार? मधील नायिका सुशिक्षित नोकरी करणारी स्वतंत्र्य विचारांची विद्रोही स्वभावाची आहे. नायिकेचे वडिल व भाऊ पारंपरिक मनोवृत्तीचे आहेत. मरीआईचा गाडा मध्ये नाना सुशिक्षित पुढारी, नवविचाराचा आहे. गावातील चांडाळ चौकटीमध्ये सटवाजी ,केरु नलावडा, बाबाजी ,म्हातारबा हे चौघे आहेत. नव्या पुरोगामी विचारांना विरोध करत रहायचे हा त्यांचा स्वभाव आहे. तलावातील चांदणे मधील नायक मध्यमवर्गीय, सुस्वभावी सरळ मार्गी आहे. यातील

नायिका ही प्रेमळ, प्रेमभावाची आहे. वळीव मधील म्हातारी साधी, भोळी ,भाबडी नवऱ्यावर प्रेम असणारी आहे. यातील तात्या मनात चलबिचल असलेला, मनात भिती असलेला, बायकोविषयी प्रेम असलेला, भूताच्या जन्म मधील कथेचा नायक तुकाराम लांडगे आहे. मनाने भित्रा, शरीराने धष्ट पुष्ट देवधर्म, भूतपिशाच्छ , जादूटोना, मंत्रतंत्र अशा गोष्टींना घाबरणारा आहे. यातील दुसरा माणूस तोही त्याच्या सारख्याच स्वभावाचा आहे. लग्न संपल्यावर मधील नायिका आयुष्याच्या वेगळ्या टप्प्यावर येऊन पोचलेली आहे. तिला घटस्फोटानंतर काय असा प्रश्न पडलेला आहे. ती समंजस आहे. विचारी आहे. पुरुषाशिवाय आयुष्य कसे काढायचे याचा विचार न करता घटस्फोटावर सही करणारी स्त्री पुरुषांच्या संबधामध्ये असलेले अज्ञान तीला जाणवत राहिले. तिच्या मनात असणारी ही लज्जा याबाबत ती विचार करत रहाते. तिच्या पुढील प्रश्नांची मालिका संपत नाही. सर्व्हिस मोटार मध्ये इजा कुंभार हा रागीट स्वभावाचा विद्रोही प्रवृत्तीचा आहे. परंपरागत विचारसरणीमुळे तो नव्या बदलाला सामोरे जाऊ शकत नाही. शरीराने बलदंड, पौरुषाची लक्षणे असलेला इजा गावगड्यातील एक घटक आहे. तो विचारी दूरदृष्टीचा आहे. तसेच आपल्या कुटुंबाप्रती प्रेमळ आहे. त्याचा मुलगा भोजा शरीराने हडकुळा मर्दपणाची लक्षणे नसलेला, दूरदृष्टी नसलेला अव्यवहारी आहे. इजाची सून गोरी, हूशार,साधा सरळ प्रपंच करणारी बदललेल्या काळानुसार बदलणारी आहे. व्यवहारी माणसांच्या बळी पडणारी ती आहे. जेव्हा मी जात चोरली यातील नायक ठाकुर आपली जात लपवून नोकरी मिळविणारा आहे. जात चोरीमुळे आलेल्या आपत्तीला तो खंबीरपणे सामोरे जाणारा आहे. त्याचे वाचन अफाट आहे. त्याचा वेश भारदस्त आहे. कोणालाही  निरुत्तर करण्याइतपत वादविवाद कर्तृत्व त्याच्याकडे आहे. मानवतेच्या लढाईचे चित्र त्याच्या समोर आले आहे. असा हा काशीनाथ निर्भीड स्वभावाचा आहे. दलित चळवळीत तो काम करणारा आहे. रणछोड तिवारी हे दोघे सवर्ण आहे. महार या शब्दाबद्दल त्यांना तिरस्कार आहे. जात लपवून नोकरी करणे रणछोडला खपणारे नाही. रामशरण हा काशीनाथच्या विचारामुळे झालेला भक्त आहे. दलित आणि सवर्ण यांच्यातील दरीचा विचार येथे येतो आहे. माता प्रसाद हूकुमाप्रमाणे वागणारा आहे. रामशरणची बायको साध्यासरळ स्वभावाची आहे. काशीनाथ निर्भीड वृत्तीचा आहे. त्याला वकील व्हायचे असते. शेवटी आपल्यावर आलेल्या संकटाला तो निर्भीडपणे सामोरा जातो. संस्कार या कथेतील पाटलाची मुलगी, मृदू गुलाब कलीके सारखी आहे. तीचे नाव सलमा ही निरागस मैत्रीसाठी होती. ती वयात आल्यानंतर तीचे वर्णन लेखकाने केले आहे. ती थोडी भांडखोर स्वभावाची आहे. मनापासून नायकाच्या प्रेमात पडणारी आहे.  यातील नायक निरागस आहे. वासरु मधील भागिर्थी निर्भीड स्वभावाची आहे. बाजीराव हा मुलगा शाळेत जाण्यासाठी आळस करणारा आहे. बाजाचा बाप स्वभावाने रागीट तंबाखू खाणारा आहे. भागिर्थी देखील मुलाच्या शिक्षणाविषयी तळमळ असलेली आहे.

## ४.२ कथासंग्रहाची वाङ्मयीन वैशिष्ट्ये

निवडक मराठी कथांमध्ये मृणालीनीचे लावण्य, बाबांचा संसार माझा कसा होणार ? तलावातील चांदणे, वासरु, जेव्हा मी जात चोरली होती., कावड या कथा प्रथम पुरुषी निवेदनाच्या आहेत. त्यामुळे आत्मनिवेदन कथाकथनात्मक कथा स्वानुभवनिवेदन यात आलेले आहे.  या निवेदनामुळे कथा वाचनिय व मनावर खोलवर परिणाम करणारी ठरली आहे. मरीआईचा गाडा, सर्व्हिस मोटार, वळीव, भूताचा जन्म, कृष्णविवर या कथांचे निवेदन तृतीय पुरुषी आहे. यामुळे लेखकांना पात्रांवर भाष्य करणे वातावरण निर्मिती, घटना प्रसंगातील संघर्ष

रेखाटणे सोपे झाले आहे. निवेदनामुळे वेगळे सौदर्य प्राप्त झाले आहे. या कथा संग्रहातील कथांची भाषाशैली प्रत्येक कथालेखकानुसार स्वतंत्र्य आहे. दिवाकर कृष्ण संथ तरल संवादी भाषेमध्ये कथालेखक आहेत विभावरी शिरुरकर यांच्या कथेतील भाषाशैली वैचारिक आवेशपूर्ण प्रश्नार्थक आहे, “मी मनात म्हटले खरं आहे त्यांची पस्तीशी उलटली आहे न माझी सारी तिशीच उलटते आहे. तेव्हा ती का काळजी करायची ? तिशी भरली तरी मी”

संस्कार या कथेची वातावरण निर्मिती प्रभावी आहे. आत्मनिवेदनामुळे कथा वाचनिय ठरते. भाषा संवादी आहे. “प्रायमरी मराठी शाळेत मी जात असे. शाळा म्हणजे एक मोठ्या उंच पडलेल्या किल्ल्याच्या खिंडारातील एक खोली व त्यासमोरच पडवी आणि बाहेर खूप विस्तीर्ण मैदान आणि आवार . त्यात दुध मोगऱ्याची पांढरी स्वच्छ फुले फुलली. पहाटे तोडली तर त्यांचा मादक मंद गंध मनाला भुरळ घालुन जाईल”. मरीआईचा गाडा या कथेची भाषाशैली अस्सल ग्रामीण आहे. म्हणी, वाक्यप्रचार ग्रामीण शब्दकला यामुळे कथा मनावर बिंबते. वास्तववादी वर्णनाची शैली अण्णाभाऊ साठे यांची आहे. “पाऊस पडून खडवं पडल होत. आकाश अगदी चांदीच्या भांड्यासारख लकलकीत दिसत होत. ढगाचा एकही डाग त्याच्या पाठीवर नव्हता. गावात उदास वाटत होत. गल्ल्या उगीचच लोळत होत्या. सर्व घर भकास होऊन बसली होती. गावाच्या मध्यभागी असलेला पार खिन्नपणे उभा होता”. या कथेत ग्रामीण भाषेमध्ये वेगळा भास आणलेला दिसतो. तलावातील चांदणे या कथेची भाषा तपशीलवार वर्णनाची आहे. ती प्रमाण भाषा आहे. चिकित्सा भावनाशीलता त्यातुन दिसते. थोडीशी निबंधवजा ही भाषा होते. यातुन आठवणी व संवाद व्यक्त झाला आहे. सर्व्हिस मोटार या कथेची भाषा चित्रमय आहे. कथेतून एक खेडे उभे राहते. इजा कुंभाराच्या घराचे केलेले वर्णन लक्षणीय आहे. “खेड्याच्या दुसऱ्या कडेला लागून इजा कुंभाराचे घर होते. घराच्या मागल्या बाजूलाच गावाचा ओढा होता. समोरुन गेलेली पायवाट ही दगडीवरुन घसरत पाणवठ्याशी जाई. घर आपले साधेच होते. ....भिंती आणि वर काडाचे छप्पर, समोर बसण्या उठण्यासाठी जागा मागे परस त्यात पाण्याचा छोटासा आड, शेवगा, लिंब, चिंच असली झाडे घराच्या समोर गाढवे बांधण्यासाठी निवारा आणि रस्त्याच्या कडेलाच एक छोटेसे लिंबाचे झाड त्या झाडाखाली कट्टा होता. तो नेहमी सारवून सुरुवून चक्क ठेवलेला असे. त्या कट्ट्याला लागूनच इजाप्पा मडकी घडवीत बसायचा.” या कथेतील व्यक्ती वर्णने वातावरण निर्मिती वैशिष्ट्यपूर्ण आहे. वासरु या कथेची भाषाशैली संपूर्ण ग्रामीण आहे. अस्सल शब्द कलेमुळे यातील संवाद जीवंत वाटतात. “मला येरवाळीच का नाय उठिवला ? लैयं झालं. उठ आता त्वांड धुऊ आन् जा पळ साळला.” “किती वाजल्या?” “आभाळ आलंय टाईम कळंना.” वळीव या कथेची भाषाशैली कोल्हापुरी आहे. या कथासंग्रहातील महाराष्ट्रातल्या वेगवेगळ्या बोलीभाषेची वैशिष्ट्ये दिसून येतात. शंकर पाटलांच्या कथेत अस्सल ग्रामीण जीवन उभे राहते. वातावरण निर्मिती आकर्षक आहे. भाषा प्रवाही आहे. जिवंतपणाचा अनुभव यातून येत राहतो. “उन्हाची लाही कोसळली होती. वारा अजीबात थांबला होता. आकाश ढगाळून येऊन सारख गलमदत होते. बसल्या जागी अंग घामान भिजत होत. सावलीला म्हणून कोपीत बसलो तरी बाहेरच्या झळा आत येत होत्या. उष्माच भयंकर वाढला होता.” निसर्गाचे वर्णन अगदी अचूक शब्दामध्ये आलेले दिसते. वळीवाच्या पावसाच्या आधी असलेल्या वातावरणाचे वर्णन कथेला जिवंतपणा आणणारे आहे. ‘जोराचा वारा सुटुन गार झुळका अंगाला झोंबू लागला. पालापाचोळा उडू लागला. हाहाम्हणता वादळी वार वाजत आलं आणि समोर धाबेवर उभ असलेल चिंचेच जुन झाड एकसारख कुरकुरु लागल. झाडावर असलेला वाघोट्याचा वेल वाऱ्याने झेप घेऊ लागला. पिकलेली वाघाट्याची फळे देठ तुटुन खाली पडू लागली. समोर दिसणार गाव धुळीन वेडगटुन गेल.’ भुताचा जन्म या कथेची भाषा विनोदी, अतिशयोक्तीपूर्ण, उपहासात्मक आहे. प्रमाण भाषा आणि बोली भाषा यांचे मिश्रण कथेत आहे. ‘जेव्हा मी जात चोरली’ या कथेची भाषा विद्रोही आहे. जिवंत व्यक्तींच्या विचारांचा पट

नाट्यमय प्रसंगातून आपल्या डोळ्यासमोरुन जातो. एका मागोमाग एक घटना कथेमध्ये घडत जातात. कृष्णविवर कथा भाषेच्या दृष्टीने सरळ अर्थ व्यक्त करत जाते. कावड या कथेची भाषा ग्रामीण आहे. तर लग्न संपल्यावर या कथेची भाषा संवादी आहे.

## ४.३ संदर्भ ग्रंथ सुची


१) व्यावहारिक मराठी - प्रा. डॉ. सयाजीराजे मोकाशी

२) व्यावहारिक मराठी - डॉ. लिला गोविलकर, डॉ. जयश्री पाटणकर, स्नेहवर्धन पब्लिकेशन हाऊस पुणे.

३) व्यावहारिक मराठी -डॉ. कल्याण काळे, निराला प्रकाशन पुणे

४) व्यावहारिक मराठी -ल.रा. नसिराबादकर, फडके बुक हाऊस, कोल्हापूर

५) व्यावहारिक मराठी - भाग-२ संपादक डॉ. साहेब खंदारे, निर्मल प्रकाशन नांदेड

६) व्यावहारिक मराठी -संपा. स्नेहल तावरे, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.

१) सुबोध मराठी व्याकरण लेखन व वृत्तालंकार — प्रा. चंद्रहास जोशी

२) मराठी शुद्धलेखन प्रदिप - मो. रा. वाळंबे.


❖ ❖ ❖

# ५

# कविता एक वाङ्.मय प्रकार

**घटक रचना**

५.० प्रस्तावना
५.१ कवितेचे स्वरुप
५.२ पाश्चात्य परंपरेतील कवितेच्या व्याख्या पुढीलप्रमाणे
५.३ विविध पद्यप्रकार आणि काव्यप्रकार
५.४ संदर्भ ग्रंथ सुची

## ५.० प्रस्तावना

कविता हा प्राचीन काळापासून समाजात रुढ असलेला लेखनप्रकार आहे. आदिगीतातून कवितेचा जन्म झाला असे मानण्यात येते. हे आदिगीत नृत्यापासून वेगळे झाले. या गीतापासून माणूस आपले विविधस्वरुपी भावविश्व प्रकट करु लागला. साहजिकच गीत म्हणजेच कविता असा संकेत दृढ झाला. भावकविता म्हणून गीतरचनेकडे पाहिले जाऊ लागले. पुढे गीतरचना आणि गेयतेहून अलग झालेली कविता असे दोन काव्यप्रवाह स्वतंत्रपणे विकसित होत गेले. एकुणच कवितेचा आजवरचा इतिहास पाहता काळाच्या अनेक टप्प्यावर कवितेच्या आशयरुपात विविध प्रकारची परिवर्तने होत गेली.

## ५.१ कवितेचे स्वरुप

कविता म्हणजे नेमके काय ? नेमकी कोणत्या प्रकारची रचना ? कविता कोणकोणत्या घटकांनी आकाराला येते ? कथा, कादंबरी, नाटक इत्यादी वाङ्.मयप्रकाराहून कवितेचे वेगळेपण कोणत्या घटकात आहे ? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे कवितेचे स्वरुप तपासताना शोधावी लागतात. कवितेच्या विविध व्याख्या करण्याचे प्रयत्न अनेकांनी केलेले दिसतात. प्राचीन काळापासून भारतीय साहित्याशास्त्रात काव्याच्या व्याख्या अनेक साहित्य मीमांसकांनी केलेल्या दिसतात, त्यातील काही निवडक व्याख्या पुढीलप्रमाणे –

१) शब्दार्थौ सहितौ काव्यम् - भामह
२) ननू शब्दार्थौ काव्यम् - रुद्रट
३) शब्दार्थौ सहितौ वक्रकविव्यापारशालिनी बन्धे व्यवस्थितौ काव्यं...
४) तद्दोषौ शब्दार्थौ सगुणौ अनंलकृती पुनःक्वापि - मम्मट
५) वाक्यं रसात्मकं काव्यम् – विश्वनाथ
६) रीतीरात्मा काव्यस्य, विशिष्टा पदरचना रीतीः विशेषो गुणात्मा - वामन

वरील काव्याच्या व्याख्या करणारे सारे भारतीय साहित्यातील संस्कृत मीमांसक आहेत. यातील बहुतांश मीमांसक केवळ वाक्यातील शब्द आणि अर्थ यांच्या एकात्मतेला महत्त्व देताना दिसतात. कुंतलाने काव्यातील सूचक अर्थ महत्त्वाचा मानला तर विश्वनाथ यांनी रसपूर्ण म्हणजेच भावपूर्णवाक्य म्हणजे काव्य असे मानले आहे. मम्मटाने निर्दोष, गुणयुक्त आणि अलंकाररहित रचना म्हणजे काव्य मानले. वामन आपल्या काव्यव्याख्येत गुणयुक्त, रीतीपूर्ण विशिष्ट अशा पदरचनेला काव्य असे मानतो, मात्र हे सारे प्रयत्न समाधानकारक असलेले

दिसत नाहीत. पाश्चात्य साहित्य परंपरेतही काव्याच्या व्याख्या करण्याचे प्रयत्न झालेले दिसतात. त्यांचा थोडक्यात परामर्ष घेणे आवश्यक ठरावे.

## ५.२ पाश्चात्य परंपरेतील काव्याव्याख्या पुढीलप्रमाणे

1) Poetry is the spontaneous overflow of powerful feelings..Emotion recollected in tranquility - वर्डस्वर्थ
2) The rhythmic creation of beauty एडगर ॲलन पो
3) The best words in best order. कोलरिज
4) Poetry is the antithesis of science अर्नोल्ड
5) The most delightful and perfect form of utterance that human words can reach. कार्लाइल

वरील काव्यव्याख्या कवीमनातून उत्स्फुर्तपणे प्रकट झालेल्या भावना म्हणजे काव्य, भावनांची लयबद्धनिर्मिती, संगीतमय निर्मिती आणि विचारविरोधी कृती म्हणजे कविता असे सांगण्यावर या समीक्षकांचा अधिक भर असलेला दिसतो. कोलरिजने उत्तम प्रकारच्या रचनेबरोबर बुद्धीवादी विचारांपेक्षा भावनाशील कृतीला कवितेत महत्त्वाचे मानले. अर्नोल्ड यांनी वृत्तछंदाला कवितेत प्राधान्य दिले. तरीही या काव्यव्याख्या आजवरच्या काव्यलेखनाकडे पाहिल्यास परिपूर्ण आहेत, समग्र काव्याच्या स्वरुपाच्या शक्यतांच्या विचार मांडणा-या आहेत असे म्हणता येत नाही.

हे सर्व संकेत ओलांडून काव्य प्रकट होऊ शकते. म्हणून काव्याच्या स्वरुपाचा विचारही व्यापक पातळीवरुन करावा लागतो.

यावरुन कवितेच्या स्वरुपामूळे कोणतीही एक समर्पक व्याख्या करता येणे शक्य नाही असे लक्षात येते. त्यामूळे कविता म्हणजे काय ? या प्रश्नाचे उत्तर शोधताना अनेक शक्यता गृहित धराव्या लागतात. सातशे वर्षाच्या मराठी काव्यपरंपरेतील काव्यलेखनाच्या आधारे वसंत आबाजी डहाके यांनी कविता या लेखनप्रकारचे स्वरुप सांगताना असे म्हटले आहे की, कवितेत शब्द असतात, त्याची मांडणी काहीएक क्रमानूसार केलेली असते. अशा ओळी गद्य वाक्यांप्रमाणे कर्ता, कर्म, क्रियापद अशा नसतात. कधी कर्ता, कर्म तर कधी क्रियापद अध्याह्रद असते. कवितेत शब्दांच्या नादाला अधोरेखीत केलेले असते. ओळीमध्ये लय असते. ओळीमध्ये लय असते. एकापुढे एक ठेवलेल्या शब्दांच्या अनुक्रमातून लय उत्पन्न होते. कविता छंदात, वृत्तात मुक्तशैलीत असते. कवितेतून एखादी कथा सांगितलेली असते. विचार सांगितलेला असतो. भाव व्यक्त झालेला असतो. भावनांची अभिव्यक्ती झालेली असते, स्थितीचे चित्रण केलेले असते, प्रसंग मूर्त केलेला असतो. घटनाप्रसंगावरचे भाष्य असते. श्रोत्यांना किंवा वाचकांना आवाहन असते. कवितेत अलंकार, प्रतिमा, प्रतीके असतात. प्रत्येक कवितेतून कवीचा निवेदकाचा सूर ऐकू येत असतो, कवितेतून कवीची जीवनदृष्टी व्यक्त होत असते. कवितेचे आकारमान एका ओळीपासून असंख्य ओळीपर्यंत असू शकते. म्हणजे एका ओळीची कविता असते, पंधरा हजार ओळींची कविता असते. ओळींची संख्येवरुनही. मात्र कविता एका ओळीची असणे शक्य आहे तसे कथा कादंबरी नाटक या बाबतीत म्हणता येत नाही... कवितेत संगीत नाट्य आणि चित्र या कलांमधून आलेले गुणविशेष आढळतात. (वसंत आबाजी डहाके, कवितेविषयी, स्वरुप प्रकाशन औरंगाबाद पृ ०१३) डहाके यांनी सांगितलेले कवितेचे स्वरुप म्हणजे कवितेच्या अनेक शक्यता आहेत.

कवितेचे स्वरुप विचारात घेताना कवितेची विविध वैशिष्ट्ये विचारात घ्यावी लागतात. यातूनच कवितेच्या शक्यतांसह अन्य साहित्यप्रकाराहून कविता कोणकोणत्या बाबतीत भिन्न आहे याचाही उलगडा होत जातो.

**१) कवितेची दृश्य मांडणी**

कविता हा वाङ्.मयप्रकार अन्य वाङ्.मयप्रकाराहून वेगळा ठरतो त्याच बरेचसे श्रेय तिच्या दृश्य मांडणीत सामावलेले असते. तोडलेल्या ओळी, कडवी किंवा वाक्यांचे खंड अशी विविष्ट दृश्य मांडणी असल्यास तिला

सर्वसाधारण कविता असे समजण्यात येते.

सकाळपासून रात्रीपर्यंत
तेच ते ! तेच ते !
माकडछाप दंतमंजन;
तोच चहा, तेच रंजन
तीच गाणी, तेच तराणे;
तेच मूर्ख, तेच शहाणे;
सकाळपासून रात्रीपर्यंत
तेच ते ! तेच ते ! (विंदा करंदीकर)

किंवा

करितो आदरे । सद्‌गुरुस्तवन
ज्यांनी सत्यज्ञान । वाढविले (विंदा करंदीकर)

अशा मांडणीच्याही विविध शक्यता असतात. काहीवेळा परिच्छेदासारखी रचना करुन कवितेची मांडणी केली जाते. वसंत गुर्जर यांची आम्ही माणूस म्हणून जन्माला आलो ही कविता किंवा प्रवीण बांदेकरांच्या खेळखंडोबाच्या नावानं या काव्यसंग्रहात अनेक

काव्यखंड परिच्छेद वजा असलेले दिसतात. त्यामूळे दृश्य मांडणी हेच कवितेचे एकमेव लक्ष्य मांडता येत नाही. भावकविता आणि शाहिरी कविता आणि अभंगकविता, मुक्तछंदातील कविता अशा वेगवेगळ्या काव्यप्रकारात दृश्य मांडणीला महत्त्व असते. या दृश्य मांडणीमूळे कविता,कथा, ललित निबंध अशा लेखनाहून वेगळी ठरत असते. दृश्यात्मकतेबरोबर लय हा घटक कवितेच्या संहितेला खूप प्रभावित करीत असतो.

**२) लयबद्धता किंवा नादमयता**

कविता लयबद्ध असते. नादमयता हा काव्याचा एक महत्त्वाचा विशेष मानला जातो. वृत्तछंदाच्या वापरामुळे आणि यमक रचनेमूळे कवितेत लय निर्माण होते. गद्यभाषेत लयबद्धता नसते. त्यामूळे कविता गद्यातून भिन्न ठरते. कवितेतील लय तिच्यातील वेगवेगळ्या घटकातून आविष्कृत होते. कवितेतील लय तिच्यासाठी निवडलेल्यावृत्तछंदातून जशी आविष्कृत होते तशीच ती तीच्यातील शब्द, नाद, नादशब्द, यमके, अंतर्यमके, अनुप्रास, प्रतिमा, प्रतीके, शब्दांची किंवा ओळींची पुनरावृत्ती इत्यादी घटकातूनही आविष्कृत होत असते. ती या वेगवेगळ्या घटकांच्या परस्पर प्रक्रियेतूनही सिद्ध होत असते. (पाटणकर, वसंत. कवितेचा शोध, पृ० ७६, मौज प्रकाशनगृह.) कवितेतील लय अनुभवाशी एकात्म झालेली असते.

या माझ्या पंखांनी
उडण्याचे वेड दिले
पण माझ्या हातांनी
घरटे हे निर्मियले (मंगेश पाडगावकर)

कवितेच्या वरील कडव्यामध्ये लयबद्धता आली ती पंखांनी-हातांनी, वेड दिले- निर्मियले अशा यमक रचनेमूळे आली आहे. शिवाय उडण्याचे वेड पण घरटयाची निर्मिती यातून गतीशीलता आणि स्थितीशीलता असा आशयातील विरोधी ताणही व्यक्त होतो.

कवितेतील लय मात्रावृत्ते, अक्षरगणवृत्ते यातूनही आणली जाते. मध्ययुगीन कालखंडातील पंडिती काव्यातून अशी कविता विपूल प्रमाणात लिहिली गेली आहे. पूढे केशवसूत, ते रविकीरणमंडळाची कविता इथपर्यंत वृत्तछंदाचे अनेक प्रयोग केले गेले. मर्ढेकरांनीही ओवी अभंग या छंदाचा वापर  आधुनिक आशय व्यक्त करण्यासाठी केलेला दिसतो. अलीकडे मुक्तशैलीतील कविता मोठ्या प्रमाणात लिहिली जाते. या प्रकारच्या कवितेत वर्णांच्या पुनरुक्तीतून, अनुस्वारयुक्त वर्णांच्या वापरातून, शब्दबंध किंवा शब्दबंधाच्या पुनरावृत्तीतून लय निर्माण केली जाते. उदा.

पुष्कळ अंग तुझं, पुष्कळ पुष्कळ मन;
पुष्कळातली पुष्कळ तू
पुष्कळ पुष्कळ माझ्यासाठी. (पु. शि. रेगे)

या कवितेत रेग्यांनी पुष्कळ या शब्दाच्या पुनरावृत्तीतून विशिष्ठ नादमयता निर्माण केलेली दिसते.

वृत्तछंदात्मक कवितेत लयीच्या प्रभावामूळे भावनांची उत्कटता आणि एका विशिष्ठ भारलेपणाचा प्रत्यय येतो असे म्हटले जाते यासाठी पुढील उदा. पाहता येईल.

भरले ताम्हण तरली गंगा हात शुभंकर झाले
तीर्थाआधी स्वरगंगेचे पाणी डोळा आले
मिटले लोचन उरात भरली दिशातील पुण्याई
कविते आई तुला भेटलो म्हण आता अंगाई
(वसंत सावंत)

अशा शब्द योजनेमुळे कवितेची मंत्रात्मकता वाढताना दिसते. मात्र असे भारलेपण मुक्तशैलीतील कवितेतही प्रत्ययाला येते. उदा. भालचंद्र नेमाडे यांची कशा रांगोळ्या घालता तूम्ही घरंदाज व्यथांनो... किंवा करंदीकरांची यंत्रावतार या कविता अशा भारलेपणाचा प्रत्यय देतात. मुक्तशैलीतील कवितेत आंतरिक लय असते असे मानले जाते. वर म्हटल्याप्रमाणे शब्दांची, वर्णांची
पुनरावृत्ती, विरामचिन्हांचा वापर यातून ही लय प्रकट होते. लयीची बदललेली कल्पना आज पुढे आलेली दिसते.

**३) वाच्यार्था पलीकडील अर्थ**

कवितेत वाच्यार्था पलीकडे जाणारा एक अर्थ असावा अशी अपेक्षा केली जाते. लक्षार्थ आणि ध्वन्यर्थ यामूळे कवितेचा आशय वाच्यार्थापलीकडे जात असतो. काव्याच्या पहिल्या अर्थापेक्षा तिचा दुसरा, तिसरा अर्थ महत्त्वाचा असतो. गद्यभाषा ज्ञानभाषा म्हणून कार्य करीत असते. त्यामूळे तीमधून वाच्यार्थाहून अलग अर्थ प्रकट झाल्यास कल्पना, विचारात गोंधळ निर्माण होण्याची शक्यता असते. तसेच गद्यभाषा व्याकरणाच्या नियमांना आधार ठेवून रचावी लागते. व्याकरणिक संकेताची मोडतोड केल्यास नेमका अर्थ तयार होण्यास अडथळा निर्माण होतो. म्हणून ज्ञानभाषा ही एकच एक अर्थ व्यक्त करणारी असावी लागते. मात्र कवितेच्या बाबतीत नेमके उलट असते. जेव्हा कविता एकाहून एक अधिक अर्थ व्यक्त करते तेव्हा तिचे मूल्यही वाढत जाणारे असते.

कुसूमाग्रजांची अहिनकूल ही कविता केवळ साप किंवा मुंगस यांच्यातील संघर्ष रेखाटते, इतक्या वाच्यार्थाच्या पातळीवर न राहता राक्षसी शक्तींचा प्रतिकार करुन त्यांना नामोहर करणा-या, जिंकून घेणा-या संघर्षशील प्रवृत्तीचे रुपक उभे करते. दया पवार यांच्या पाणी, धरण इत्यादी कविता वाच्यार्थाच्या सीमा ओलांडून शोषितांच्या कारुण्यमय, अभावग्रस्त जीवनाचे सूत्र रेखाटताना दिसतात.

लक्षार्थ आणि ध्वन्यर्थ यातून कवितेत एकाहून अधिक भाववृत्तींचे दर्शन घडवण्याची क्षमता असते. प्रतीक, प्रतिमा, रुपक यांच्या योजनेमूळेही काव्यात सुचितार्थ प्रकट होत असतो. हा सुचितार्थ गुंतागुंतीचा असतो तेव्हा कवितेला विशेष प्रकारची मूल्यवत्ता लाभते. काव्यार्थाचे प्रतीकात्मक पातळीवरुन व्यक्त होणे, कविता आणि अर्थ यांचे अभिन्नत्व निर्माण होणे या प्रक्रिया सुचितार्थामूळे घडतात. अर्थात काव्यातील विविध भाववृत्ती किंवा सुचितार्थ वाचकांना आस्वादाच्या सहसर्जक प्रक्रियेत जाणवत असतात. म्हणून काव्याचे वाचन सर्जनशील असावे लागते.

असे असले तरी सा-याच कविता वाच्यार्थाच्या पलीकडे जाऊन अर्थ व्यक्त करतात असे नाही. यामूळे त्या कविता निकृष्ठ असतात असे नाही. विषमतापूर्ण सामाजिक संकेतांवर प्रहार करणा-या अनेक कविता वाच्यार्थाच्या पलीकडे न जाताही महत्त्वाच्या ठरताना दिसतात. इतकेच की सुचितार्थ महत्त्वाचा मानल्यास या कविता सामान्य ठरतात.

**४) कवितेची अनेकार्थता**

अनेकार्थता हा काव्याला उच्च पातळीवर घेऊन जाणारा एक विशेष मानला जातो. पाश्चात्य समीक्षा विचारात विल्यम एम्पसन यांने काव्यातील अनेकार्थतेचे तत्त्व मांडले. कवितेच्या भाषेत एकाचवेळी अनेक अर्थ व्यक्त करण्याचे सामर्थ्य असले पाहिजे जे शास्त्रीय भाषेत नसते कवी कमीतकमी शब्दातून जास्तीत जास्त अर्थ व्यक्त करीत असतो. कवीच्या भाषेत जास्तीत जास्त अर्थ व्यक्त करण्याची क्षमता असते त्यालाच एम्पसनने अनेकार्थता असे म्हटले आहे. मराठीत कवी बी यांची चाफा बालकवींची औंदुंबर, मर्ढेकरांची पिपांत मेले ओल्या उंदीर, कवी वसंत सावंत यांची बैल अशा अनेक कविता अनेकार्थता या तत्त्वाने संघटित झालेल्या दिसतात.

**५) कवितेची अन्य वैशिष्ठ्ये**

**अ) भाषिक अवकाश**

स्फुटता किंवा भाषिक अवकाशाचे लघुत्त्व हे कवितेचे एक रुपवैशिष्ट्य मानले जाते. मात्र केवळ भावकवितेच्या बाबतीत हे गृहित धरता येते. भावकविता अल्पाक्षरत्त्व या विशेषाने युक्त असु शकते. संतांचे अनेक अभंग भाषिक अवकाशाच्या बाबतीत कमीतकमी शब्दात असले तरी त्यांची अर्थ व्यक्त करण्याची क्षमता मात्र अधिक असलेली दिसते. आधुनिक मराठी कवितेत पु. शि. रेगे यांच्या अनेक कविता अल्पाक्षर असूनही व्यापक आशय व्यक्त करताना दिसतात.

ज्ञानेश्वरी, दासबोध हेही काव्यग्रंथच आहेत. या ग्रंथाच्या बाबतीत हे तत्त्व लागू पडणारे नाही. किंबहूना आजही खंडकाव्यसदृश्य कविता लिहिली जाते. तिलाही हा निकष लावता येणार नाही.

**ब) आशयाची संवेद्यता**

आशयाची संवेद्यता म्हणजे कवितेतून जाणवणारी भावप्रतीती होय. जेव्हा कविता वाचता वाचता वाचकाला त्यातील शब्दांच्या माध्यमातून जी अनुभवाची प्रतीती येते, तिलाच संवेद्यता असे म्हटले जाते. कवितेने भावप्रतीती द्यावी अशी अपेक्षा धरली जाते. लयीचा, नादमयतेचा वापर, विशिष्ट प्रकारची शब्दकळा, रुपके इत्यादी घटकांच्या आधारे कवितेत संवेद्यता प्रकट होत असते.

**क) निवेदक**

कवितेत कथा आणि कादंबरी प्रमाणे एक निवेदक असतो. मात्र हा निवेदक कथा कादंबरीतल्या निवेदकाहून भिन्न असलेला दिसतो. कविता हा आत्मनिष्ठ वाड्.मयप्रकार असल्यामूळे कवितेतील निवेदक अधिकाधिक प्रत्यक्ष जीवनानुभवाकडे जात असतो. मात्र हा निवेदक स्वचे भावविश्व किंवा विचारविश्व अभिव्यक्त करीत असताना तो स्वतःला व्यापक अशा समाजमनाशी जोडून घेत असतो. सौंदर्यवादी कवितेतील निवेदक आणि प्रत्यक्ष कवी यात

एकात्मताच असते. काही कवितात मात्र तटस्थ निवेदक असतो. तो काव्यात अनुभव आत्मनिष्ठ पातळीवर न व्यक्त करता वस्तूनिष्ठ पातळीवरुन व्यक्त करतो. उदा. पंडिती कवितेतील निवेदक. संतांच्या कवितेतील निवेदक व्यापकपणे कोणत्याही भक्ताच्या रुपात अभिव्यक्त होताना दिसतो.

**ड) प्रतीमा, प्रतीक, रुपक, मिथके**

कवितेच्या भाषेत प्रतीमा, प्रतीक, रुपक आणि मिथकथा यांचा वापर केल्यामूळे कवितेच्या भाषेला विशेषप्रकारचे अर्थसौंदर्य लाभते. कवितेत अनेकार्थता प्रकटते म्हणून त्यांचे स्वरुप थोडक्यात पाहणे आवश्यक ठरावे.

**प्रतीमा**

कवितेत अनेकप्रकारच्या प्रतिमांचा वापर केला जातो. कवीला जो जीवनानुभव आलेला असतो तो व्यक्त करण्यासाठी त्याने योजलेला वाचक शब्द म्हणजे प्रतिमा होय. अशा शब्दाद्वारे कवी आपल्या जाणीवा, संवेदना व्यक्त करण्याचा प्रयत्न करीत असतो. ऐंद्रिय संवेदना प्रतिमेतून व्यक्त होत असतात. वाचकांच्या मनातही अशाच अर्थाची प्रतिमा निर्माण होत असते.

उदा.

सर्वत्र नांग्या असलेली स्तब्धता
ओठ मुरडलेली दारं
उद्‌ध्वस्त दगडी पाय-यांवर
एक जुनंपुराणं तंतूवाद्य
राहून गेलंय घाबरल्यासारखं
मला तिथवर पोचायचं आहे (वसंत आबाजी डहाके)

मनातील भयाचे भाव, सभोवती पसरुन राहिलेली दहशत व्यक्त करण्यासाठी कवीने या काव्यखंडात वापरलेल्या विविध प्रतीमा वैशिष्ठ्यपूर्ण असलेल्या दिसतात.

प्रतीमांमधून कवीच्या अंतर्मनाचे दर्शन घडू शकते. व्यक्तीच्या अबोध मनात अनेक जाणिवा संवेदना दडलेल्या असतात. काव्यनिर्मितीच्या क्षणी या संवेदना मूर्त अशा प्रतिमांचे रुप धारण करून काव्यातून प्रकट होत असतात. या प्रतिमांना कवी नवे अर्थ देत असतात. त्यामूळे समकालीनता, ताजेपणा अर्थवाहीपणा, उत्कटता असे अनेक गुण प्रतिमेला प्राप्त होत असतात. गंध, स्पर्श, दृश्य, श्रवण या संदर्भातील प्रतिमा काव्यात प्रकटतात. तसेच आदितकाळापासून मानवी मनात वसत असलेल्या आदिबंधात्मक प्रतिमा, सामाजिक प्रतिमा, निसर्ग प्रतिमा, असे प्रतिमांचे विविध प्रकार सांगितले जातात.

**प्रतीक**

प्रतीक म्हणजे अर्थाची खूण किंवा चिन्ह होय. कोणताही शब्द जेव्हा विशिष्ट अर्थाचा निर्देश करतो तेव्हा त्याला प्रतीक म्हटले जाते. सांस्कृतिक जीवनात माणसे अनेक प्रकारच्या चिन्हांचा वा खूणांचा वापर करुन अर्थ व्यक्त करीत असतात. उदा. राजकीय पक्षांची चिन्हे, क्रुस, कळस, कुंकू, चुडा किंवा देवादिकांच्या मूर्त्या ही सूद्धा सांस्कृतिक अर्थव्यक्त करणारी चिन्हेच आहेत. जीवनाच्या विविध क्षेत्रात अर्थ व्यक्त करण्यासाठी अशा प्रतीकांचा वापर केला जातो. प्रतीके ही सामूहिक जीवनातून प्राप्त झालेली असतात.

भाषासृष्टीत कवी आपल्या काव्यात व्यक्तिनिष्ठ पातळीवरुन प्रतीकांचा वापर करीत असतात आणि त्यांना सार्वत्रिक आशय देण्याचा प्रयत्न करतात. मर्ढेकरांनी मुंगी, ओल्या पिपात मेलेले उंदीर ही प्रतीके तर कुसूमाग्रजांनी अहिनकुल, आगगाडी आणि जमीन, बालकवींचे पारवा, करंदीकरांनी निळा पक्षी, वसंत सावंत यांनी बैल अशी प्रतीके वापरलेली दिसतात. चंद्र, सुर्य, अग्नी, नंदीबैल, वटवृक्ष अशी अनेक प्रतीके काव्यात वारंवार वापरली जातात.

**रुपक**

काव्याची भाषा रुपकात्मक असते. अर्थ व्यक्त करण्याची विशिष्ठ पद्धत म्हणजे रुपक होय. एखाद्या शब्दातून दूस-या गोष्टीतील साम्य, सरुपता, किंवा सरुपकता व्यक्त करण्याचा प्रकार म्हणजे रुपक होय. एखादी कल्पना विचारभावना यातील साम्य रुपकातून व्यक्त केले जाते. लाक्षणिक प्रयोगातही रुपकात्मकता असते. उदा. तो सिंव्हासारखा आहे. खुर्चीचे पाय, टेबलाची पाठ, छंदाचे चरण इत्यादी शब्दप्रयोगातही रुपकभाव असलेला दिसतो.

संत एकनाथांनी आपल्या भारुड रचनेत अनेक प्रकारची रुपके वापरलेली दिसतात. त्यांच्या भारुडात विंचू, एडका, रोडगा, भोळी ही रुपके आध्यात्मिक अर्थ व्यक्त करण्यासाठी येतात. रोडगा या भारुडात सासरा, सासू, नणंद, दीर, जाऊ, नवरा ही रुपके षडरिपूंचे अर्थ व्यक्त करतात. आधूनिक काव्यातही अनेक कवींनी रुपकांचा वापर काव्यासाठी केलेला दिसतो. उदा.

पिवळ्या डागासारखा दिसे निस्तेज चंद्र
पितळी जाड घांटेसारखा उंच तरुस लोंबणारा
वाटे अभद्र !! (शरदचंद्र मुक्तिबोध)
किंवा
दगडातही परी असतात...
काही असतात नुकतेच दगड
काही विठ्ठल रुक्मिणीसारखे परखड
काही कोडगे ... काही घनचक्कर
असलाच तर एखादा रोंदाचा थिंकर (सदानंद रेगे)

अशा रुपकातून नवनिर्मिती होत असते. लेखक आपली जीवनदृष्टी व्यक्त करण्यासाठी समान अर्थाचे बंध सातत्याने शोधत असतो. विविध स्थळे, काळ, आणि समाज जीवनातील विविध घटना यांचे चित्रण रुपकात्मकतेने केले जाते. इंदिरा संत यांनी आपल्या *मृदगंध* या ललितलेख संग्रहात नद्यांना धरित्रीच्या कविता असे म्हटले आहे. हा ही रुपकभाव होय.

**मिथके**

मिथके म्हणजे पुराणातील कथा, दिव्यकथा किंवा पारंपारिक रीतीने चालत आलेल्या लोककथा होत. प्राचीनकाळापासून मानवी जीवनात अनेक कथा दंतकथा पुराणकथा आणि लोकजीवनातून चालत आलेल्या असतात. त्यांना त्यांचे असे मूळचे अर्थ असतात. मात्र लेखक या दंतकथांना आपल्या कल्पनाविलासाने आणि प्रतीभेने नवे अर्थ बहाल करीत असतात. मिथकातून मानवी जीवनाचा त्यातील आदिमत्वाचा शोध घेतलेला असतो. निसर्ग आणि मानवी नातेसंबंध, अमानवी किंवा ईश्वरी संकेत व मानवी जीवन यांचा संबंध शोधण्याचा प्रयत्न मिथकांच्या आधारे केला जातो. चिरंतन मानवी भावनांचा अर्थ लावण्यासाठी मिथके उपयुक्त असतात.

पु. शि. रेगे यांनी आपल्या कवितेत राधाकृष्ण, अहिल्या, शहनाज, अशी मिथके योजलेली दिसतात. तर सदानंद रेगे यांनी इराकस, सिसिपस अशा ग्रीक कथाविश्वातील मिथकांचा वापर केलेला दिसतो. वसंत आबाजी डहाके यांच्या शुनःशेप या काव्यसंग्रहाच्या प्रारंभी पुराणातील शुनःशेपाची कथा समकालीन काव्यार्थ व्यक्त करण्यासाठी प्रातिनिधिक स्वरुपात वापरलेली दिसते.

मिथकामूळे काव्यभाषेला समृद्धता लाभते. आशय अधिक व्यामिश्र आणि गुंतागूतीचा बनविता येतो. मानवी जीवनाची संगती लावण्याचे किंवा शोधण्याचे कार्य मिथकांच्या माध्यमातून करता येणे शक्य असते. या दृष्टीने मिथके ही समूहनिष्ठ असतात.

साहित्याच्या भाषेची ही वैशिष्ठ्ये कवितेच्या भाषेत मोठ्याप्रमाणात दिसतात. अर्थात अशी कोणतीही वैशिष्ठ्ये नसतानाही कविता संभवू शकते. कारण कविता ही एक स्वयंपूर्ण रचना असते. कविता आणि इतर भाषिक रचनाप्रकारातला मुख्य फरक म्हणजे कमीतकमी शब्दात उत्कटतेने आपले म्हणणे मांडणे आणि ज्या शब्दांच्या साहाय्याने मांडलेले आहे. त्या शब्दांना अनेक अर्थ व्यक्त करता येतील अशा क्षमतेने मांडणे. मग ते छंदात, वृत्तात बांधलेले असो की मुक्तशैलीत सांगितलेले असो ती कविताच असते. (वसंत आबाजी डहाके, कवितेविषयी, स्वरुप प्रकाशन औरंगाबाद पृ. २६) अशाप्रकारे कवितेच्या रुपाच्या अनेक शक्यता असतात. तिच्या एकाच एका रुपाला कविता मानणे हे कवितेची संकल्पना संकुचित करण्यासारखे आहे. कवितेचा विचार करताना अशा तिच्या सर्वंकष शक्यता विचारात घ्याव्या लागतात. यानंतर आपण कवितेच्या विविध प्रकारांचा विचार करु.

## ५.३ विविध पद्यप्रकार आणि काव्यप्रकार

काव्याचे विविध प्रकार पाडले जातात. हे प्रकार कोणत्यातरी तत्त्वाने केले जातात. मराठी काव्याचे प्रकार सांगण्याचे प्रयत्न अनेकांनी केलेले दिसतात. कविता आणि प्रतिमा या ग्रंथात सुधीर रसाळ यांनी भावकविता, चिंतनगर्भ कविता, कथाकविता, नाट्यकविता आणि गीत असे पाच प्रकार केले आहेत. वसंत आबाजी डहाके यांनी सातशे वर्षाच्या मराठी परंपरेत लिहिल्या गेलेल्या कवितेला समोर ठेवून आपल्या कवितेविषयी या ग्रंथात भावकविता, कथाकविता, नाट्यकविता आणि भाष्यकविता असे चार ठळक प्रकार केले आहेत. चिंतनपर दीर्घ काव्याचा समावेश त्यांनी भाष्यकविता या प्रकारात केला आहे. ओवी, अभंग, गीत, पद, आरती, धावा, धवळे, विराणी, स्तोत्र, पाळणा, भूपाळी, लावणी, सुनीत, गझल, हायकू, रुबाई इत्यादी प्रकार भावकवितेत घातले आहेत. तर आख्यानकविता, कटाव, पोवाडा, ,खंडकाव्य, स्वयंवरकाव्य, महाकाव्य, कथनपर दीर्घ कविता ही कथाकविता आहे. पोवाडे, भारुडे, रुपके इत्यादी नाट्यकविता आणि ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, यथार्थदीपीका या भाष्यकविता होत असे त्यांनी म्हटले आहे.

वरील वर्गीकरणापेक्षा वसंत पाटणकरांनी आपल्या कविता संकल्पना, निर्मिती आणि समीक्षा या ग्रंथात काव्यप्रकारांचे काटेकोर तत्त्वांनी वर्गीकरण करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या मते – काही काव्यप्रकार आशयात्मक तत्त्वांनी, काही संरचनात्मक तत्त्वांनी तर काही प्रस्तूतीकरणात्मक किंवा सादरीकरणात्मक तत्त्वांनी सिद्ध होतात. हीच काव्याच्या वर्गीकरणाची व्यापक तत्त्वे म्हणता येतील. (वसंत पाटणकर, कविता संकल्पना, निर्मिती आणि समीक्षा, पृ०२८) अशी वर्गीकरणाची तत्त्वे सांगून त्यांनी आशय या तत्त्वानुसार विलापिका, जानपदगीत, निसर्गकाव्य, प्रेमकाव्य, गुढगुंजनपर कविता, ग्रामीण कविता, दलित कविता, महानगरी कविता असे प्रकार मानता येतील असे म्हटले आहे. तर रचनातत्त्वाच्या अंगाने केले जाणारे प्रकार म्हणून भावकाव्य, नाट्यकाव्य, कथाकाव्य, सुनीत, रुबाई, हायकू,गझल इत्यादी. सादरीकरणाच्या अंगाने केले जाणारे प्रकार म्हणजे धवळे, गौळण, विराणी, पदे, भारुडे, लावणी हे होत. ओवी, अभंग, आर्या श्लोक साकी, दिंडी, कटाव हे काव्यप्रकार नसून ते पद्यप्रकार आहेत. रचनाप्रकार आहेत. असे असले तरी अनेक काव्यप्रकार आणि पद्यप्रकार एकमेकांत मिसळून गेलेले दिसतात. वरील तीन अंगांनी केल्या जाणा-या वर्गीकरणाचा विचार विस्ताराने पाहू.

**आशयानुसार वर्गीकरण**

आशयानुसार काव्याचे गीत, विलापिका, निसर्गकाव्य, गुढगुंजनपर कविता, दलित ग्रामीणइत्यादी. प्रकार मानता येतील. गीतकाव्य हा काव्याचा खूपच व्यापक असून याचे आशयानुसार अनेक प्रकार सांगता येतील. भक्तिगीते, गोपगीते, उत्सवगीते, जानपदगीते,

बडबडगीते, कोळीगीते, स्त्रीगीते, अंगाईगीते इत्यादी प्रकार गीत या एकाच प्रकारात सामावलेले दिसतात. भक्तिगीते ही भावगीतेच असतात. भक्तीभाव कधी ओवी

अभंगरुपात व्यक्त होतो तर कधी आरती, स्तोत्र अशा रुपातही प्रकट होत असतो. गोपजीवनाचे चित्रण करणा-या गीतांना गोपगीते म्हणता येईल. विविध उत्सवाप्रसंगी गायिल्या जाणा-या गीतांचा समावेश उत्सवगीतांमध्ये होतो. अंगाई गीत हे प्रामूख्याने स्त्रीगीतच असते. मुलाला निजवताना अपत्याविषयी वाटणारा प्रेमभाव, वात्सल्य आणि निद्रासुखाची आराधना हे मूख्य भाव या गीतात असतात. कोळीगीत हा लोकगीताचा प्रकार असला तरी आधुनिक काळात खूप लोकप्रिय झालेला काव्यप्रकार आहे. कोळीसमाजाची जीवनपद्धती, त्यातील लोक विशिष्ठ भावना, संकेत आणि कोळी समाजाची वैशिष्ठ्यपूर्ण भाषा यातून कोळीगीत साकारत असते.

विलापिका हा एक स्वतंत्र गीतप्रकार म्हणून मान्यता पावलेला दिसतो. प्रिय व्यक्तीचा वियोग किंवा मृत्यू, नैसर्गिक आघात यामूळे जीवन शोकात्म झाल्याची भावना विलापिकेतून व्यक्त केली जाते. विलापिकेतील दुःखभाव दैनंदिन, सामान्यप्रकारच्या दुःखभावाहून तीव्र असतो. अशा शोकभावाबरोबर विलापिकेतून चिंतनही प्रकट होत असते.

जानपदगीत हे प्रायः ग्रामीण जीवनाचे चित्र रेखाटणारे असते. मात्र त्यांचा अधिक जवळचा संबंध लोकजीवनाशी आणि लोकगीतांशी असतो. कृषिसंस्कृती, मेंढपाळ यांच्या संस्कृतीशी हृ  गीते निगडित असतात. ग्रामीण जीवनातील शांतता, निसर्गसौंदर्य, आनंदमयता, आणि खेड्यामधील लोभस सौंदर्य हे या गीतांचे

प्रमूख विषय असतात. मात्र आजची ग्रामीण कविता ज्या भकास वास्तवाचा आणि ग्रामीणतेवर होणा-या अनेकांगी आक्रमणाचा विचार मांडते या कवितेहून जानपदगीते भिन्न असलेली दिसतात. जानपदगीते ही ग्रामीण जीवनाचे रंजनात्मक वर्णन करणारी ठरतात.

गीत या प्रकारात येणारी बालगीते आणि बडबडगीते प्राधान्याने बालभावनांच्या अभिव्यक्तीसाठी आणि बालकांच्या

रंजनासाठी लिहिली जातात. यांचे स्वरुप खेळकर असते. विशिष्ठ्य नाट्यभाव या गीत या गीतामध्ये असतो. विविध चमत्कारिक कल्पना, बालविश्वाचे, बालमनोभावाचे दर्शन ही गीते घडवितात.

**संरचनेनुसार वर्गीकरण**

विशिष्ट प्रकारच्या रचनातत्त्वाला प्राधान्य देऊन केल्या जाणा-या काव्यप्रकारांचा समावेश या विभागात करता येईल. अन्य भाषांतून मराठीत आलेले आणि केवळ मराठीत निर्माण झालेले काही काव्यप्रकार येथे देता येतील. सुनीत, रुबाई, हायकू, कणिका, उद्देशिका तसेच ओवी अभंग हे रचनात्मक अंगाने महत्त्वाचे ठरणारे काव्यप्रकार आहेत. सुनीत हा काव्यप्रकार केशवसूतांच्या कवितेपासून मराठीत रुढ झालेला दिसतो. इंग्रजी काव्यपरंपरेतून जी काही कविता भाषांतरीत झाली त्यातून सुनीत हा काव्यप्रकार मराठी कवींनी स्वीकारलेला दिसतो. भावना आणि चिंतनात्मकता ही प्रमुख आशयसूत्रे सुनीतामध्ये दिसतात. एकुण चौदा ओळी असलेली सुनीत रचना दोन प्रकारची असते. मिल्टॉनिक आणि शेक्सपीअरन असे दोन प्रकार या रचनेत दिसतात. मिल्टनप्रणित सुनीत रचनेत ओळींची विभागणी आठ ओळी सहा ओळी अशी दोन कडव्यात केली जाते. ती शेक्सपीअरनप्रणित सुनितरचनेत चार ओळींची तीन कडवी आणि शेवटचे दोन ओळींचे कडवे अशा चौदा ओळी असतात. मराठी काव्यरचनेत  सुनितरचनेसाठी शार्दुलविक्रिडित हे वृत्त प्रामूख्याने वापरले गेले. यमकरचनेचे साचेही या रचनाप्रकारात निश्चित केलेले दिसतात. या रचनाप्रकाराची मोडतोड करीत मराठीत विंदा करंदीकरांनी मुक्तसुनिते लिहिली ती विलास सारंग यांनी प्रतिसुनिते लिहिलेली दिसतात.

रुबाई हा काव्यप्रकार उर्दु काव्यातून मराठी आला असून माधव ज्यलियन यांनी उमरखय्यामाच्या रुबायावरुन मराठी रुबाया रचल्या आहेत. ही चार ओळींची रचना असून पहिल्या तिस-या व चौथ्या ओळीत यमक साधलेले दिसते. भूपति किंवा लीलीरति हे

जातीप्रकार रुबायाच्या रचनेसाठी वापरले गेलेले दिसतात. एखादा चमत्कृतीपूर्ण अनुभव रुबायातून व्यक्त केला जातो. याच प्रकारे अलीकडे चारोळी हा काव्यप्रकार पुढे आलेला दिसतो.

जपानी काव्यरचनेचा प्रकार म्हणून मराठीत शिरीष पै यांनी हायकू हा काव्यप्रकार रुढ केला. एखादा भावकण, निसर्गदृश्य केवळ सतरा अक्षरात मांडणे अशी हायकूंची सर्वसाधारण रचना असते.

अभंग हा काव्यप्रकार मानल्यास अभंगाची रचना समरचनी असलेली दिसते. यात किमान तीन चरण आणि सहा ओळी आवश्यक असतात. भक्तिभावनेपासून आधुनिक जाणिवेतील कोणताही भाव अभंगातून मांडता येतो. प्रत्येक चरणाच्या शेवटी यमक साधलेले असते.

**सादरीकरणाच्या तत्त्वाने वर्गीकरण**

सादरीकरणाच्या अंगाने केले जाणारे प्रकार म्हणजे धवळे, गौळण, विराणी, पदे, भारुडे, लावणी हे होत. हे प्रकार विशिष्ठ उद्देशने सादर केले जाणे काव्यप्रकार आहेत म्हणून यांचा विचार सादरीकरणाच्या अंगाने करणे अधिक सयुक्तिक आहे. धवळे म्हणजे लग्नात गायिली जाणारी वरविषयक गीते होत. लग्नात ज्या स्त्रीया गातात त्यांना धवलेरी म्हणतात. ही स्त्रीगीतेच असतात. या गीतातून वरविषयक विविध भावभावना व्यक्त होताना दिसतात. गौळणी आणि विराण्या ही ईश्वर विषयक गीते अंतिमः स्त्रीगीतेच असतात. कारण यातील निवेदकाची भूमिका स्त्रीकडे असते. परमेश्वर किंवा कृष्ण, विठ्ठल या देवतेला केंद्रस्थानी ठेवून ही गीतरचना झालेला दिसते. मराठी वारकरी परंपरेत या काव्यप्रकारांना प्रतिष्ठा लाभलेली दिसते. गेयते बरोबरच विशिष्ठ पद्धतीने यांचे सादरीकरण केले जावे अशी अपेक्षा असते. गौळणी आणि विराण्यामधून प्रेमभाव, कामभाव, शृंगार या भावभावनांचे चित्रण केले जाते. मात्र यातील प्रमिक हा ईश्वर असतो. त्यामूळे निवेदक भक्ताच्या रूपाने सिद्ध होत असतो.

भारुढ हा लोकप्रिय काव्यप्रकार  सादरीकरणानेच प्रभावित झालेला दिसतो. रुपककाव्याचा हा एक उत्कृष्ट नमूना आहे. मानवी जीवनाला उपकारक ठरणारा बोध देणे हा भारुडांचा प्रमूख उद्देश आहे. संत एकनाथांनी अनेक प्रकारच्या भारुडांचे लेखन केले आहे. विंचू, ऐडका, भोळी, जोशी, वासुदेव अशी अनेक भारुडे विनोदाच्या आणि उपहासाच्या अंगाने बोध देताना दिसतात.

लावणी हा शाहिरी काव्याचा प्रकार खूपच लोकप्रिय काव्यप्रकार असलेला दिसतो. ध्रुपद आणि चार चरणांची कडवी अशी लावणींची रचना असते. नृत्ययुक्त गीत असे लावणीचे स्वरुप आहे. ढोलकी आणि तुणतूण्याच्या तालावर लावणीचे सादरीकरण होत असते. भृंगावर्तनी किंवा पद्यावर्तनी लावणी अशी लावणीची रचना असते. लावणीप्रमाणे पोवाडा हा गीतप्रकार शाहिरी काव्यात येतो. वीरसयुक्त अशी रचना पोवाड्याची होते.

गझल हा काव्यप्रकार मुस्लीम काव्यपरंपरेतून मराठीत स्थिरावलेला दिसतो. गझलेत दोन ओळींचे चरण असतात. त्यांना शेर म्हणतात. प्रत्येक शेर स्वतंत्र असतो तरी त्यांचे कोणत्यातरी एका आशयसूत्राशी नाते प्रस्थापित करण्याचा प्रयत्न गझलकार करीत असतो. प्रेम, भक्ती, दुःख, वियोग हे भाव गझलेतून व्यक्त केले जातात.

सादरीकरणाच्या या प्रकारात भूपाळ्या, स्तोत्रे, मंगलाष्टके, पाळणी श्लोक,आरत्या यांचा समावेश करता येईल.

अशाप्रकारे कविता हा अनेककेंद्री आशय आणि अनेक रचनतत्त्वे असलेला वाड्.मयप्रकार आहे. आधूनिक कविता मुक्तशैलीतील कविता आहे. काळाप्रमाणे बदलणा-या जीवनाचा वेध घेण्याचा प्रयत्न नवी कविता करताना दिसते. असे असले तरीही आजवर कवितेत वापरले गेलेले अनेक रचनाप्रकार आजच्या कवितेतही दिसतात

## ५.४ संदर्भ ग्रंथ सुची


१) व्यावहारिक मराठी - प्रा. डॉ. सयाजीराजे मोकाशी

२) व्यावहारिक मराठी - डॉ. लिला गोविलकर, डॉ. जयश्री पाटणकर, स्नेहवर्धन पब्लिकेशन हाऊस पुणे.

३) व्यावहारिक मराठी -डॉ. कल्याण काळे, निराला प्रकाशन पुणे

४) व्यावहारिक मराठी -ल.रा. नसिराबादकर, फडके बुक हाऊस, कोल्हापूर

५) व्यावहारिक मराठी - भाग-२ संपादक डॉ. साहेब खंदारे, निर्मल प्रकाशन नांदेड

६) व्यावहारिक मराठी -संपा. स्नेहल तावरे, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.

३) सुबोध मराठी व्याकरण लेखन व वृत्तालंकार — प्रा. चंद्रहास जोशी

४) मराठी शुद्धलेखन प्रदिप - मो. रा. वाळंबे.


❖ ❖ ❖

# ६

# कविता शतकांची मधील कविता

## १. 'नवा शिपाई'

केशवसुत

केशवसुत (कृष्णाजी केशव दामले : १८६६-१९०५)

शिक्षण : मॅट्रिकपर्यंत

व्यवसाय - प्रारंभी निरनिराळ्या नोकया, त्यानंतर दुय्यम शिक्षक व हेडमास्तर म्हणून काम

लेखन - केशवसुतांची कविता (संपा.) १९२१ काही इंग्रजी कविता

नवा शिपाई

'कविता शतकाची' हा एक आधुनिक मराठी कवितेचे काव्यसंग्रह आहे. आधुनिक मराठी कविता ही संत, तंत, पंत या तिन्ही परंपरांनी कमी अधिक प्रमाणात संस्कारीत झालेली आहे. एकोणिसाव्या शतकात ब्रिटशांची सत्ता येथे स्थिरावल्यावर आपल्या जीवनात काही पायाभूत बदल झाले. युरोपीय जीवनात निर्माण झालेल्या प्रबोधनाचा विचारव्यूहांचा संस्कार येथील नवशिक्षितांच्या जीवनावर झाला. ही नवी जीवनदृष्टी होती. ही नवी जीवनदृष्टीही आधुनिक मराठी कवितेला लाभली.

केशवसुतांनी मराठी कवितेला नवी ओळख दिली. केशवसुतांपासून मराठी कविता ही मानवकेंद्री झाली. आधुनिक मराठी कविता मानवकेंद्री झाल्यामुळे या कवितेचे आशयाचे क्षेत्र कितीतरी विस्तारले.

''शतकभरातील कवितेत विविध स्वरूपाच्या मानवतावादी जाणिवांचा व विविध रचनातंत्रांचा आविष्कार या संग्रहात पाहायला मिळतो.''

केशवसुतांच्या 'नवा शिपाई'या कवितेत प्रबोधनाच्या मानवतावादी जाणिवा दिसून येतात. केशवसुतांच्या कवितेतील शिपाई हा स्वतःला 'नव्या मनूतील नव्या दमाचा शूर शिपाई' म्हणवून घेतो. हा नवा शिपाई जात, धर्म यांच्यापलिकडे जाण्याचा प्रयत्न करतो. त्यांचा नवा शिपाई म्हणतो-

ब्राह्मण नाही, हिंदूह नाही, न मी एक पंथाचा,<br>
तेच पतित क जे आखंडिती प्रदेश साकल्यां !<br>
मळ्यास माझ्या कुंपण पडणे अगदी न मला साहे!

हा शिपाई नव्या युगाकडे असल्याने त्याला संकुचितपणा, मानवनिर्मित कोणतेच भेदभाव मान्य नाहीत, हे मळ्याला कुंपण पडणे या प्रतिमेतून सांगितले जाते.

हा शिपाई जिकडे जातो तिकडे तो सर्वांना आपल्या भावंडांच्या रूपात पाहतो. सावलीतील गोजिरी मुले त्याला उन्हात गोड फुले दिसतात. त्यावेळेस ती माझी, मी त्यांचा असं म्हणून तो सर्वांना सोबत घेऊन जाताना दिसतो. या शिपाईला सर्वत्र एकसारखेपणा अर्थात समानता निर्माण करायची आहे. लोकांमध्येच विश्व पाहून तो त्या विश्वाला पूजतो आहे.

या नव्या दमाचा शूर शिपाई स्वातंत्र्य, समता, बंधुता या नव्या मूल्यांचा पुरस्कार करताना तो म्हणतो.

लहान मोठे मन न कळे

साधु-अधम हे ह्र्यहि गळे

सर्वच मोठे साधु-जवळ, त्या सकली म भरूनी राहे!

अश्या या नव्या शिपायाला समाजातील सर्व प्रकारचा कलह दूर करून शांतीचे साम्राज्य प्रस्थापित करायचे आहे. जेणेकरून ते संपूर्ण मानवजातीच्या हितासाठी असेल.

## २. सागरास - वि.दा. सावरकर

वि.दा. सावरकर - (१८८३-१९६६)

व्यवसाय - देशसेवा व त्यामुळे बंदिवास. स्वातंत्र्यलढ्यात सहभाग

लेखन - गोमान्तक - संकल्पित महाकाव्याचे पहिले दोन खंड (१९२४), कमला (१९३४), महासागर, विरहोच्छ्वास ही खंडकाव्ये, रानफुले - दीर्घकवितासंग्रह (१९३४) सावरकरांची कविता - संपा.वा.गो.मायदेव. (१९४३)याखेरीज आत्मचरित्र, चरित्रे, इतिहास, नाटके इत्यादी प्रकारांत विपुल लेखन.

**सागरास**

वि.दा. सावरकर ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक, स्वातंत्र्यवीर स्वातंत्र्यलढ्यात सहभाग. सावरकरांनी 'कमला', 'महासागर', 'विरहोच्छ्वास' यासारखी खंडकाव्ये, 'रानफुले' हा दीर्घकवितासंग्रह याचबरोबरीने आत्मचरित्र, चरित्रे, इतिहास, नाटके इ. प्रकारात विपुल लेखन

मानवतावाद आणि रोमँटिसिझममधील एक महत्त्वाचे आशयसूत्र स्वातंत्र्य हे आहे. मानवतावादाने स्वातंत्र्य, समता, बंधुभाव या मूल्यांचा पुरस्कार केला, व्यक्तीच्या स्वातंत्र्याचा पुरस्कार केला तसाच तो राष्ट्राच्या स्वातंत्र्याचाही केला आहे. विदा. सावरकर यांच्या 'सागरास' या कवितेत आपले राष्ट्र, आपली मातृभूमी ब्रिटिशांच्या पारतंत्र्यात आहे. ही वेदना, तिला गुलामगिरीतून बाहेर काढण्याची तळमळ यातून कवीला मातृभूमीविषयी वाटणारी अपार ओढ, प्रेम, आत्मीयता उत्कटपणे व्यक्त होताना दिसते. सागराचे चेतनीकरण या कवितेत करण्यात आले आहे. परदेशी असलेला कवी त्या सागराला उद्देशऊ विनवणी करतो-

ने मजसी ने परत मातृभूमीला।

सागरा प्राण तळमळला।

कवीला पारतंत्र्यात अडकून पडलेल्या मातृभूमीला स्वतंत्र करावयाचे आहे. तिचा उद्धार करावयाचा आहे. म्हणूनच उच्चविद्या पाप्त करण्यासाठी सावरकर परदेशात आलेले असताना हा सागरच आपल्याला परदेशात घेऊन आला आहे असे कवी म्हणतो. परंतु का सागर आपल्याला पुन्हा मायदेशी परत घेऊन जाणार आहे आणि याच वचनाचा सागराला विसर पडला आहे. त्यामुळे कवी हा परदेशात अडकून राहिलेला आहे. मातृभूमीच्या उद्धारासाठी प्राप्त केलेली विद्या व्यर्थ जाईल की काय असेच त्याला वाटते, त्याचा जीव कळवळतो मग अशावेळेस कवी म्हणतो,

गुण-सुमने मी वेचियली या भावे।

की तिने सुगंध घ्यावे।

जरि उद्धरणई व्यय न तिच्या हो साचा

हा व्यर्थ भार विद्येचा

म्हणून हा कवी सतत सागराला आवाहन करतो. 'ने मजसी ने परत मातृभूमीला' पण सागर मात्र ऐकत नाही. तेव्हा हा सागर आंग्लभूमीला घाबरतो' असा आरोपही कव सागरावर करतो. हा सागर माझ्या मातृभूमीला अबला समजून फसवतोय. म्हणून कवी म्हणतो 'अबला न माझिही माता रे' अशावेळेस कवी म्हणतो, 'एक आचमनात सागराला पिऊन टाकणाया अगस्ती

ऋषीकडे तुझी तक्रार करीन.

या कवितेत मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी तळमळणाया, तिच्या भेटीसाठी व्याकूळ होणाया कवीची राष्ट्रनिष्ठा, देशभक्ती प्रत्ययाला येते.

नभात भरपूर नक्षत्रे आहेत परंतु मला माझा भारतभूमीचा तारा अत्यंत प्रिय आहे असे कवी म्हणतो.

## ३. प्रेम आणि मरण

- गोविंदाग्रज (राम गणेश गडकरी)

गोविंदाग्रज - (रामगणेश गडकरी ः १८८५-१९१९)

शिक्षण - महाविद्यालयीन पदवी शिक्षण अपूर्ण

व्यवसाय - किर्लोस्कर नाटक मंडळीत शिक्षकाची नोकरी

लेखन - कविता - वाग्वैजयंती (१९२१). याखेरीज राम गणेश गडकरी या मूळ नावाने नाट्यलेखन व बाळकराम या नावाने विनोदी लेखन.

**प्रेम आणि मरण**

राम गणेश गडकरी प्रसिद्ध नाटककार तर गोविंदाग्रज या नावाने काव्यलेखन, बाळकराम या नावाने विनोदी लेखन. वाग्वैजयंती हा कवितासंग्रह.

आधुनिक मराठी कवितेने व्यक्तिनिष्ठेला, आत्मनिष्ठेला महत्त्व दिले. कवीचे आंतरिक जीवन, त्याच्या भावभावना, कल्पना, विचार या गोष्टी महत्त्वाया ठरल्या. कवितेत रोमँटिक प्रेमानुभवाच्या विविध छटा व्यक्त (अविष्कृत) झालेल्या आहेत.

गोविंदाग्रज यांच्या 'प्रेम आणि मरण' या कवितेतही रोमँटिक वळणाची उत्कट प्रेमभावना 'वृक्ष' आणि 'वीज' या प्रतीकांमधून अविष्कृत झाली आहे. या वृक्षाचे विजेशी मिलन होताच तो कोसळतो खरा, परंतु प्रेमाच्या त्या साक्षात्कारात त्याचे जीवन कृतार्थ होते. कवी त्या स्थितीचे पुढील शब्दात चित्रण करतो,

हर्षाच्या येऊनि लहरी
फडफडूनी पाने सारी-हासली
त्या कळ्या सर्वही फुलल्या,
फुलल्या त्या कायम खुलल्या-अजुनिही

मोकळ्या मैदानात पसरलेला महाकाय वृक्ष, ज्याच्या प्रेमात मातीत पसरलेल्या कितीतरी वेली झुरत आहेत. तळमळत आहेत. पण वृक्ष त्याँी दादही घेत नाही. पण एक दिवस अचानक,

कोणत्या मुहूर्तावरती
मेघांत वीज लखलखती-नाचली!
गोड तरि जहरी! प्रीतीच्या नवथर लहरी न कळता
तो ठसा मनावर ठसला
तो घाव जिव्हारी बसला- प्रीतिचा
वेड पुरे लावी त्याला
गगनातिल चंचल बाला - त्यावरी

तो एका चंचल बालेच्या प्रेमात पडला पण ही चंचल बाला म्हणजे आकाशात लखलखणारी वीज.

जगात पतंग आणि ज्योती यांची प्रीत खरी असे म्हटले जाते. ज्योती आणि पतंगाच्या मिलनाने खरे तर पतंगाला आपले प्राण गमवावे लागतात. पण तरीही तो तिच्याभोवतीच घिरट्या घालतो, मृत्युची तमा बाळगत नाही. कारण मृत्युपेक्षाही तत्पूर्वी ज्योतीशी होणारे प्रणयमिलन त्याला अधिक सुखद वाटते. हाच उदात्त अनुभव वृक्ष आणि वीज यांच्या प्रेमाच्या कल्पनेतून कवी मांडतो आहे.

वृक्षही वीजेच्या प्रेमात असा काही गुंग झाला आहे की, सर्व जगाचा विसर पडून तिच्या मिलनासाठी व्याकूळ झाला आहे. त्याच्या या अश्या वागण्याची कुणी निंदा करते, कुणी त्याला हसतं पण त्याला पर्वा नाही. उलट तिचे प्रेम मिळविण्यासाठी तो तपश्चर्या करतो. प्रसन्न तपोदेवताही त्याला समजावण्याचा प्रयत्न करते.

ही भलती आशआ बा रे
सोडि तू वेड हे सारे-घातकी
स्पर्शासह मरणहि आणि
ती तुझ्या जीवाची राणी - त्या क्षणी....
क्षण एक पुरे प्रेमाचा
वर्षाव पडो मरणाचा मग पुढे....

वृक्षाचा हा निग्रह पाहून अखेर देवता त्याच्या प्रेयसीला चंचल बाला, लखलखत्या वीजेला त्याला भेटायला धाडतात.

धावली उताविळ होत
प्रीतीची जळती ज्योत--- त्याकडे...
तो योग खरा हठयोग; प्रीतिचा रोग
लागता ज्याला, लाभते मरणही त्याला - हे असे

वृक्षाचे विजेशी मिलन होताच तो कोसळतो खरा, परंतु प्रेमाच्या त्या साक्षात्कारात त्याचे जीवन कृतार्थ होते. या कवितेवर शाहिरी प्रेमकल्पनेचाही प्रभाव पडलेला दिसून येतो.

---

## ४. सारेच दीप कसे मंदावले आता

---

कवी अनिल

अनिल - (आत्माराम रावजी देशपांडे १९०१-१९८२)

शिक्षण - बी.ए.एल.एल.बी.

व्यवसाय - न्यायाधीश. काही वर्षे समाजशिक्षण विभाग, नागपूर येथे संचालक.

त्यानंतर दिल्ली येथील नॅशनल फंडामेंटल एज्युकेशन सेंटरचे संचालक.

लेखन- फुलवात (१९३२), प्रेम आणि जीवन (१९३५), भग्नमूर्ती (१९४०), निर्वासित चिनी मुलास (१९४३), पेर्तेव्हा (१९४७), सांगाती (१९६१), चिरयौवन (१९७१), दशपदी (१९७६)

### सारेच दीप कसे मंदावले आता

आत्माराम रावजी देशपांडे 'अनिल' या टीपण नावाने काव्यलेखन, फुलवात, प्रेम आणि जीवन, भग्नमूर्ती, निर्वासित चिनी मुलास, पेर्तेव्हा, सांगाती, चिरयौवन, दशपदी यासारखे लेखन

आधुनिक काळातील प्रबोधनामुळे माणूस हा सुखी होईल असा विश्वास होता परंतु वाढते औद्योगिकीकरण, भांडवलशाही व्यवस्था यांची चांगली फळे मूठभर लोकांनीच चाखली परंतु

सर्वसामान्य माणसाच्या वाट्याला दुःख व दारिद्र्य आले, निराशा आली. या निराशेचा परिणाम मराठी कवितेवर जाणवू लागला.

कवी अनिल यांची 'सारेच दीप कसे मंदावले आता' ही कविता निराशावादी आहे. या कवीतेत हताशता बघायला मिळते.

कवीला आपल्या भोवतालच्या जीवनात कोणतेही तेज, कोणताही चेव, जोम दिसत नाही. कोठेही पोटतिडकीने, धमकेने धडकेने काही चालल्याचे दिसत नाही. संघर्ष, बंड, झुंज, आव्हान, रणसंग्राम नाही.

सारेच दीप कसे मंदावले आता
ज्योती विझू विझू झाल्या
की झड घालून प्राण द्यावा पतंगाने
असे कुठेच तेज नाही!

सर्वच क्षेत्रामध्ये सर्वच आघाड्यांवर त्याला सामसूम, लाचारी, तडजोड प्रत्ययाला येते. संगीत असो, साहित्य असो, तारुण्य असो वा प्रेम त्याला कशातच काहीही जाणवत नाही. समाजात जिकडे तिकडे अनाचार माजला आहे. चांगुलपणा या समाजात शिल्लक नाही, सदाचार उरलेला नाही, जिकडेतिकडे भोगवादी प्रवृत्ती आढळून येत आहे. अशा परिस्थितीत सामान्य माणूस मात्र लाचार होऊन तडजोड करीत जगत आहे. या अमानवी परिस्थितीविरुद्ध संघर्ष करण्याचे बळ सामान्य माणसात नाही. कवीच्या दृष्टीने येथे 'सारा हिशेबी व्यवहार आहे.' आपल्या समाजातील हा अनाचार पाहून कवी अस्वस्थ होताना दिसतो.

'सारा हिशेबी व्यवहार आहे!
जो तो जागा धरून आहे

हे सारेच दीप मंदावले असून या ज्योतिही विझत चालल्या आहेत. ही वेदना पुढील ओळीतून व्यक्त होते.

शील आपले मोल मागे
सौंदर्याची विक्री चाले
कागदांच्या कपट्यांवर!
सारी स्वरुपे कुरुप झाली
हुरूप कशाचा नाही चित्ता!
सारेच दीप कसे मंदावले आता!!

## ५. रानगीत

- अनंत काणेकर

अनंत काणेकर (१९०५-१९८२)

शिक्षण - बी.ए.एल.एल.बी.

व्यवसाय - काही काळ वकिली, नंतर पत्रकारिता आणि त्यानंतर अध्यापन.

लेखन - चांदरात व इतर काही कविता (१९३३), चौकोनी आकाश संपा. रमेश तेंडुलकर (१९७४) यांखेरीज नाटक, एकांकिका, लघुनिबंध, कथा, वैचारिक व राजकीय स्वरूपाचे लेख असे विपुल लेखन प्रसिद्ध.

**रानगीत**

प्रसिद्ध लेखक अनंत काणेकर 'चांदरात' व इतर काही कविता यांखेरीज नाटक, एकांकिका, लघुनिबंध, कथा, वैचारिक व राजकीय स्वरूपाचे लेख असे विपुल लेखन प्रसिद्ध.

आधुनिक मराठी काव्यावर संत, पंत व तंत या तिन्ही परंपराचा कमी-अधिक प्रमाणात प्रभाव जाणवतो. अनंत काणेकर यांची रानगीत ही कविता यातील तिसया परंपरेला म्हणजेच शाहिरी काव्याला धरून आहे. शाहिरांनी आपल्या काव्यातून जो श्रृंगार मांडला त्याचाच परिणाम मराठी कवितेवरही झाला. स्त्री-पुरुष प्रेमाच्या विविध छटा कवींनी अविष्कृत केलेल्या आहेत.

अनंत काणेकरांच्या 'रानगीत' या कवितेत रोमँटिक प्रेमातील उत्फुल्लता, त्यातील हुरहुर वेगवेगळ्या निसर्गप्रतिमांमधून अविष्कृत झाली आहे. आपल्या सजणीचे दोघांमधील प्रेमभावाचे रोमँटिक चित्र येथे उभे केले आहे.

कवितेतील साजन आपल्या सजनीला म्हणतो,

चल ग सजणे रानामध्ये
चाफ्याचं फुल तुझ्या कानामध्ये!
उठे चंद्रमा झाडिंतुनी,
बावरशी का तू सजणी?
रानवटी हिरवी झाडी,
डोंगरमाथी ही उघडी
चल फिरूं घालूनि गळा गळे
रोमाच्यांचे फुलवुं मळे!

कवितेत साजण सजणीला अनेक निसर्ग प्रतिमांमधून आपला प्रेमभाव व्यक्त करताना दिसतो. पण सबंध कवितेत सजणीला सतत असे वाटत असेत की, प्रेम करताना आपल्याला कुणीतरी पाहत आहे म्हणून ती म्हणते

हूं हूं करुनिया चावट हा
कानोसा कुणी घेत पहा!

झाडीचे रान, जाळीतील चंद्र पुष्करिणी, जळातून हलणारा कवडसा असे खास रोमँटिक वातावरण या कवितेत कवीने केलेले आहे.

## ६. अंधाया जगाची हिच रीतभात

- बा.सी. मर्ढेकर

शिक्षण - एम.ए.

व्यवसाय - काही काळ अध्यापन. नंतर भारतीय आकाशवाणीत वरिष्ठ अधिकारी म्हणून काम.

लेखन - शिशिरागम (१९३८), काही कविता (१९४७), आणखी काही कविता (१९५१). या बरोबरीनेच कादंबया, नाटक, सौंदर्यशास्त्रीय तसेच तात्त्विक समीक्षालेखन प्रसिद्ध.

मराठी कवितेत आधुनिकवादी जाणिवा मर्ढेकरांच्या कवितेपासून अविष्कृत होताना दिसतात. त्यांची 'अंधाया जगाची ही कविता आधुनिकवादी जाणिवांचा प्रभावी अविष्कार करताना दिसते.

अंधाया जगाची। हीच रीतभात।

काजळाची वात। काळोखाला।

काळ्या हवेतून। काळेच विमान।

घेतसे उड्डाण। अंधारा।।

अंधाराच्या, काळोखाच्या काळेपणाच्या वेगवेगळ्या प्रतिमा योजून मर्ढेकर मानवी जीवनातील अर्थशून्यता, दिशाहीनता, संवादशून्यता अविष्कृत करू पाहतात. काळ्या हवेतून काळे विमान हे उजेडाकडे न जाता अंधाराकडे उड्डाण घेते ही फार मोठी निराशता, हताशता या कवितेत कवी मांडू पाहतो.

या कवितेत काही उफराटे अनुभव व्यक्त होतात. येथे दिव्याची वात नसून काजळाची वात आहे, आणि तीही काळोखाला लावलेली. येथे काळे विमान ज्यावेळी काळ्या हवेतून अंधारात उड्डाण घेते, या अंधारात जीवनाला मार्गदर्शन करणारे, दिशा दाखविणारे कोणतेही सिग्नल्स कवीला दिसत नाही. म्हणूनच कवी म्हणतो.

नाहीत सिग्नल। हिरवे वा लाल

कैंची दिशाभूल। अदृश्यांत।।

आपले सर्व जीवनच असे चाचपडत, दिशाहीन, असंबद्ध अवस्थेत चालले आहे. येथे तुकारामांना लाभलेल्या देवाच्या संगतीसारखी संगती कवीला लाभत नाही. हा कवीचा एकाकी व संवादशून्य प्रवास आहे. या संवादशून्य प्रवासाचा अनुभव कवी पुढील शब्दांत मांडतो.

जेथे जातो तेथे। मी माझा सांगाती।

डोळ्यांच्याच भिंती। झाल्या ऐशा।।

## ७. कोलंबसाचे गर्वगीत

- कुसुमाग्रज

शिक्षण - बी.ए.

व्यवसाय - काही वर्षे वृत्तपत्र व्यवसाय. नंतर केवळ लेखन

लेखन - कविता - जीवनलहरी (१९३३), विशाखा (१९४२), समिधा (१९४७), किनारा (१९५२), मेघदूत (१९५६), मराठी माती (१९६०), स्वगत (१९६२), हिमरेषा (१९६४), वादळवेल (१९६७), छंदोमयी (१९८२), मुक्तायन (१९८४), पाथेय (१९८९), महावृक्ष (१९९४), चाफा (१९९८), मारवा (१९९९) या बरोबरीने काही बालगीते, ललित लेखन, कादंबर व अनेक नाटके प्रसिद्ध.

### कोलंबसाचे गर्वगीत

मातवतावादाचा व रोमँटिसिझमचा प्रभाव कुसुमाग्रजाच्या कवितेवर जाणवतो. कुसुमाग्रजांच्या 'कोलंबसाचे गर्वगीत' या कवितेत मानवतावादी परंपरेतील मानवी कर्तुत्वावरच उदंड विश्वास, आशावाद, मानसाच्या ठिकाणची दुर्दम्य इच्छाशक्ती, तीव्र महत्त्वाकांक्षा व्यक्त होताना दिसतो.

नव्या क्षितिजांचा शोध हा नाविक घेत असतो. हा शोध घेताना अफाट समुद्रावरील अनेक प्रकारच्या संकटाना कसा तोंड देतो, धैर्याने कसा संघर्ष करतो, समुद्राचे रौद्रभीषण रूप कसे असते, याचे अनेक प्रतिमांनी युक्त असे अतिशय प्रत्ययकारी चित्रण कुसुमाग्रजांनी या कवितेत केले आहे.

पदच्युता, तव भीषण नर्तन असेच चालू दे
फुटु दे नभ माथ्यावरती
आणि तुटु दे अखंड उल्का वर्षावत अग्नी
नाविका ना कुठली भीती!

या कवितेतील नाविक आपल्या सोबतच्या सहकार्यांना ही हा संग्राम अखंड झुंझायला सांगतो. झुंजताना आपण खलाशी आहोत याची आपल्याला खंत वाटता कामा नये. आपल्याला मागे वळून न बघता आपुला बाणा टिकवायचा आहे. वेळ पडल्यास आपण सागरात समाधी घेण्यासही डगमगू नये. या जगात अनेक जिवाणू जगतात, मरतात. परंतु आपण नाविक आहोत आपल्याला कशाचीही पर्वा न करता नवी क्षितिजे निर्माण करायची आहेत, असे हा कवी (नाविक) म्हणतो.

हा नाविक जणू नव्या युगातील नव्या वाटांच्या, नव्या विचारांच्या दिशने वाटचाल करणारा आहे. आणि जे नवे विचार, मानवतेचे निशाण त्याला सर्वत्र फडकवायचे आहे. त्यासाठी न डगमगता तो संघर्ष करताना म्हणतो,

मार्ग आमुचा रोधू शक्ती ना धन, ना शरा
घराची वा वितभर कारा
मानवतेचे निशाण मिरवू महासागरात
जिंकूनी खंड खंड सारा!

प्रबोधनातील हा माणूस मानवतेचे निशाण मिरवणारा असून, त्याच्या कर्तृत्वाला कोणत्याही सीमा नाहीत. तिचाच अविष्कार पुढील शब्दांतून व्यक्त झाला आहे.

चला उभारा शुभ्र शिडे ती गर्वाने वरती
कथआ या खुळ्या सागराला
''अनंत अमुची ध्येयासक्ती अनंत अन् आशा
किनारा तुला पामरला''

अफाट अशा समुद्राला किनारा असतो, माणसाच्या ध्येयासक्तीला आशेला मात्र असा कोणताच किनारा नाही, ही जाणीव येथे उत्कटपणे व्यक्त झालेली आहे.

## ८. माझ्या मना बन दगड

-विंदा करंदीकर (गोविंद विनायक करंदीकर ः १९१८-२०१०) ज्ञानपीठ पुरस्काराने सन्मानित

शिक्षण - एम.ए.-

व्यवसाय - अध्यापन

लेखन - कविता - स्वेदगंगा (१९४९), मृद्‌गंध (१९५४), ध्रुपद (१९५९), जातक (१९६८), संहिता (१९७५), विरूपिका (१९८१), आदिमाया (१९९०), अष्टदर्शने (२००२) याखेरीज वैशिष्ट्यपूर्ण बालगीतसंग्रह, अनुवाद, अर्वाचीनीकरण, ललितलेखन, समीक्षा असे लेखन प्रसिद्ध.

### माझ्या मना बन दगड

रोमँटिसिझमपासून दूर जाऊन आधुनिक मानवी जीवनातील दुःखाचा अविष्कार करणारी कविता म्हणून विंदा करंदीकरांच्या 'माझ्या मना बन दगड' या कवितेकडे लक्ष वेधले जाते. ही कविता मार्क्सवादाची जोड लाभलेल्या मानवतावादी परंपरेतील आहे. ती वास्तवाचा कणखर प्रत्यय देणारी आहे. अवतीभोवतीच्या जगण्यातील अन्याय, विसंगती, सर्वसामान्य माणसांचे अभावग्रस्त जगणे पाहत असताना कवीच्या संवेदनशील मनाला होणाया यातनांचा अविष्कार ही कविता करते.

हा रस्ता अटळ आहे!
अन्नाशिवाय, कपड्याशिवाय
ज्ञानाशिवाय, मानाशिवाय
कुडकुडणारे हे जीव
पाहू नको! डोळे शीव!
नको पाहू जिणे भकास.....

कवी ठिकठिकाणी स्वतःच्या संवेदनशील मनाला सांगू पाहतोय 'माझ्या मना बन दगड' कवी म्हणतो इथला अत्याचाराचा आक्रोश ऐकू नको, कानावरती हात धर तरीसुद्धा तुला आवाज हा आक्रोश ऐकू येत असेल तर शिसे ओत. शेवटी रडणायाने किती रडावे, झुरणायाने किती झुरावे व पिचणाऱ्याने किती पिचावे, इथली व्यवस्था व या व्यवस्थेचे दाहक वास्तव चटके हे सामान्य माणसाला झुकायला भाग पाडतात. म्हणूनच आता आपलं मन दगडासारखे कणखर बनवायला हवे, त्याचा खेद हा आपल्याला होता कामा नये.

आपली आसवे म्हणजे आपल्या गालावरच खारं पाणई पण ते पिऊन कोणीही जगणार नाही. म्हणूनच मना विचार कर आणि दगडासारखा निढर हो.

कवी स्वतःच्याच मनाला भोवतालचे हे भीषण, भसूर वास्तव समजावून सांगत आहे. या कवितेत अखेरीस आशावादही आहे. लाल धुळीमागून येणारा स्वार (साम्यवाद) येथे क्रांती घडवणार आहे. असा विश्वासही कवी येथे व्यक्त करतो.

हा रस्ता अटळ आहे
अटळ आहे घाण सारी
अटळ आहे ही शिसारी
एक वेळ अशी येईल
घाणींचेच खत होईल?
अन्यायाची सारी शिते
उठतिल पुन्हा; होतील भुते....
इतके यश तुला रगड
माझ्या मना बन दगड!

---

## ९. जोगिया

---

-ग.दि. माडगूळकर

ग.दि. माडगूळकर - (१९१९-१९७७)

शिक्षण - मॅट्रिकपर्यंत (परीक्षा अनुत्तीर्ण)

व्यवसाय - लेखन, गीतकार, पटकथाकार, संवादलेखन (चित्रपटव्यवसायाशी संबंधित)

लेखन - सुगंधवीणा (१९४९), जोगिया (१९५६), चार संगीतिका (१९५६), गीतरामायण (१९५७), चैत्रबन (१९६१), काव्यकथा (१९६२), गीतगोपाल (१९६७),

गीतसौभद्र (१९६८), पुरिया (१९९२), वैशाखी (१९९३) याखेरीज कथा, कादंबरी व आत्मचरित्रपर लेखन प्रसिद्ध.

**जोगिया**

ग.दि. माडगूळकरांची 'जोगिया' की कविता देखील एका कंचनीच्या प्रेमाचा अनुभव कथारूपात व्यक्त करू पाहते. हा निराशेचा अनुभव आहे.

झुंबरी निळ्या दिपात ताठली वीज
कां तुला कंचनी, अजुनी नाही नीज?
थांबले रसिकजन होते ज्याच्यासाठी
तू डावलुनी तू दार दडपिले पाठी

या कंचनीला आपले प्रेम ओळखता आले नाही.ती सल तिच्या मनात आहे . त्या दिवशी ती रसिकांना रिझवण्याचा आपला व्यवसाय करत नाही. त्यातूनच सर्वसामान्य असणाया या कंचनीच्या निष्ठा व्यक्त होतात.

'मी देह विकुनियां मागुन घेत मोल
जगविते प्राण हे ओपुनिया 'अनमोल'
रक्तांत रुजविल्या भांगेच्या मी बागा
ना पवित्र देहीं तिळाएवढी जागा

या कवितेतील निवेदक कंचनीची निराश, आर्तव्याकूळ स्थिती अनेक तपशीलांमधून आपल्यासमोर ठेवतो.

'झुंबरी निळ्या दीपांत ताठली वीज', 'स्वरवेल थरथरे', 'फूल उमलते ओठी', 'पाण्यात तरंगे अभंग वेडी गाथा' इ. प्रतिमांमधून कंचनीची प्रेमकथआ आकाराला येते. कंचनीला खंत वाटते की ती आपल प्रेम ओळखू शकले नाही.

राहिले चुन्याचे बोट थांबला हात,
जाणिली नाहिं मी थोर तयाची प्रीत,
पुनःपुन्हा धुंडितें अंतर आतां त्याला
तो कशास येईल भलत्या व्यापाराला

## १०. सत्य

- नारायण सुर्वे - (१९२६-१९९०)

शिक्षण - इयत्ता सातवीपर्यंत

व्यवसाय - अनेक वर्षे गिरणीकामगार, नंतर शिक्षक म्हणून नोकरी. त्यानंतर लोकवाङ्मयगृह या प्रकाशनसंस्थेचे सल्लागार.

लेखन - ऐसा गा मी ब्रह्म (१९६२), माझे विद्यापीठ (१९६६), जाहीरनामा (१९७५), सनद (१९८२), नव्या माणसाचे आगमन (१९९५), कविता श्रमाची (संपा. नारायण सुर्वे), गाणी चळवळीची (संपा. नारायण सुर्वे). या बरोबरीनेच काही अनुवादित, काही वैचारिक व व्यकितचित्रणात्मक लेखन प्रसिद्ध.

**सत्य**

नारायण सुर्वे यांच्या कवितेत एका कामगाराचे भावविश्व चित्रित झालेले आहे. चाळीमध्ये अपुया जागेत राहणाया ओढग्रस्तीने, दारिद्र्यात कसाबसा संसार चालवणारा हा कामगार आहे. वास्तव, जिवंत प्रत्ययकारी प्रसंगामधून हे जगणे कवीने वाचकांपुढए ठेवलेले आहे.

तुझे गरम ओठ ओठावर टेकलेस तेवअआष
तेव्हाही रात्र अशीच होती; घुमी
पलिकडे खडखडणारे कारखाने
खोल्यांखोल्यांतून अंथरले बिछाने
मुल्लाचा अखेरचा अल्लासाठी गजर
काटे ओलांडीत चालले प्रहर
भावंडांसह कोनाडा जवळ केला आईने
धुमसत, बिछान्यासह फुटपाथ गाठली बापाने

या कामगाराला जगण्यासाठी त्याच्या पत्नीचाच आधार आहे. परंतु त्याच्याही जीवनात काही आनंदाचे, प्रेमभावनेचे उत्कट क्षण आहेत. पत्नीच्या गरोदर असण्याचा आनंद आहे. प्रणयाचा आनंद आहे. परंतु उदरनिर्वाह ही त्यांच्यासमोरची मुख्य समस्या आहे. एकाच्या पगारात भागत नसल्यामुळे नाईलाजाने पत्नीलाही नोकरी करणे भाग पडते.

एकंदर काय तर वाढत्या औद्योगिकीकरण शहरीकरण यामुळे माणसातील दरी वाढत गेली. बेरोजगारी माणसापर्यंत पोहोचली. दुःख, दारिद्य याचे पाढे माणसाला वाचायला येऊ लागले. समाजातलं हे विदारक वास्तव हळूहळू कवितेत व्यक्त होऊ लागलं.

हा कामगार या परिस्थितीतही एकमेकांवरील प्रेमामुळे त्याचे जीव् सुंदर करण्याचा प्रयत्न करीत असतो.

कवई म्हणतो–
पंखाखाली बसलीस चार पिले ठेवून
कोनाडा हळहळला - कळवळला
'नारायणा' - गदगदला.
'शिंक्यावरची भाकर घे' पुटपुटला.
'उद्यापासून तिलाही काम बघ बाबा'
गांगरलो, भोवंडून स्थीर झालो.

सामान्य माणसाच्या वाट्याला आलेली प्रतिकूल परिस्थिती, दुःख त्याला सामोरे जाताना याची होणारी घुसमट, आणि वाट्याला येणारी निराशा, हतबलता याचेही दर्शन या कवितेत घडल्याशिवाय राहत नाही.

## ११. हासायचे आहे मला

- आरती प्रभू

(चिं.त्र्यं.खानोलकर १९३०-१९७६)

शिक्षण - मॅट्रिक

व्यवसाय - अनेक नोकया. नंतर पूर्णवेळ लेखन

लेखन - जोगवा (१९५९), दिवेलागण (१९६२), नक्षत्रांचे देणे (१९७५) या बरोबरीने काही नाटके, एकांकिका, स्फुटलेखन, बालवाङ्मय, अनुवाद असे लेखन प्रसिद्ध

हासायचे आहे मला

आरती प्रभू यीं 'हासायचे आहे मला' ही कविता मुख्यतः रोमँटिक परंपरेतील अनाम दुःखचा अविष्कार करणारी असली तरी त्यातून कमी अधिक प्रमाणात आधुनिकवादी जाणिवांचाही आविष्कार होतो.

या कवितेत कवीने मानवी जीवनातील दुःखाची अतर्क्यता आणि सर्वव्यापकत्व अगदी मोजक्या शब्दांमधून परंतु तीव्रपणे अविष्कृत केले जाते.

कवी म्हणतो,

कसे? कसें? हासायचे?

हासायचे आहे मला

हासतच वेड्या जीवा थोपटीत थोपटीत

फुंकायचा आहे दिवा

या कवितेत 'इथे भोळ्या कळ्यांनाही। आसवांचा येतो वास...' या ठिकाणी वस या प्रतिमेमधूनच दुःख सूचित केले असून हे दुःख मानवी जीवनाला लहानपणापासूनच कसे वेढून ठेवत असते ते कवी या ठिकाणी व्यक्त करतो. त्यामुळे येथील हसणे ह निरागस, आनंदमय स्वरूपाचे नाही तर ते औपरोधिक स्वरूपाचे आहे. त्यामुळेच की काय येथे हसण्याला नाही कसे, कुठे, केव्हा कुणापास असे प्रश्न विचारले जातात. हे हसणे एक प्रकारची व्यर्थता आहे असेच वाटते. कवीच्या जगण्यात एक प्रकारची अर्थशून्यता, निरागसता आढळते. अशा या अर्थशून्यतेमुळे कवीला हे जीवन संपवावेसे वाटते.

आरती प्रभू हे मुळातच रोमँटिक परंपरेतील कवी असले तरी त्यांच्या कवितांवर आधुनिकवादी जाणिवांचाही कम-जास्त प्रमाणात प्रभाव जाणवत राहतो. त्यामुळेच त्यांच्या कवितेतून एक पकारचा हताशतेचा सूर हा नेहमी उमटत आहे.

## १२. मायबोली

- सुरेश भट (१९३२-२००३)

शिक्षण - बी.ए.

व्यवसाय - पत्रकारिता

लेखन - रूपगंधा (१९६१), रंग माझा वेगळा (१९७४), एल्गार (१९८३), झंझावात (१९९४), सुरेश भट यांची निवडक कविता (१९९७). याखेरीज गझलांचे संपादन व पत्रांचे संकलन प्रसिद्ध

**मायबोली**

सुरेश भट यांची 'मायबोली' ही कविता व्यापक अर्थाने रोमँटिक परंपरेतीलच म्हणायला हवी. कारण भटांच्या कवितेत मुख्यतः स्वभाषप्रेमाला आवाहन आहे. हे आवाहन अत्यंत वक्तृत्वपूर्ण शब्दांत, नाट्यमय रीतीने केलेले आहे. सुरेश भटांनी मराठी भाषेच्या आजच्या स्थितीवर निर्देश करत शेवटी ही मराठी भाषा 'शेवटी मदांध तख्त फोडते' हा आशावाद ही व्यक्त केला जातो. या कवितेत स्वभाषेबद्दलचे, आपल्या मातृभाषेबद्दलचे प्रेम, मराठी भूमी व मराठी संस्कृती यांचा गौरव करण्यात आला आहे.

मराठी भाषेवर अनेक प्रेम करणारे आहेत. मराठी भाषा किती रसाळ आहे त्याचे वर्णनही अनेक मोठमोठ्या कवींनी केलेले आहे.

सुरेश भट मात्र 'मायबोली' या आपल्या कवितेत सुंदररित्या मराठीवर स्तुतीसुमने उधळत आहे. सर्वप्रथम कवी स्वतःला धन्य समजतो की त्याला मराठी बोलण्याचे भाग्य लाभलेले आहे. हा कवी संपूर्ण जगात आपली एकच माय मानतो ती म्हणजे मायमराठी. ही मराठी भाषा धर्म, पंथ, जात मानत नाही. कवीच्या स्पंदनात फक्त मराठीच आहे. म्हणून कवी म्हणतो-

आमुच्या मनामनात दंगते मराठी

आमुच्या रगारगात रंगते मराठी

आमुच्या उराउरात स्पंदते मराठी

आमुच्या नसानसात नाचते मराठी

या मातीत ही मराठी खेळते, वाढते आहे. फुलाफुलात, प्रत्येक दिशेला, प्रत्येक कुळात ही मराठी गर्जते. येथल्या दरीदरीत, वनावनात, कळीकळीत, झाडेवेली या सर्वांमध्ये ही

मराठी हिंडते, अगदी लाजतेसुद्धा. या धरतीवरच्या नद्या, पिके, या नभात ही मराठी मोठ्या अभिमानाने डोलतेय.

मराठी ही आपल मातृभाषा अगदी सर्वगुणसंपन्न अनेकांना या मराठीने जवळ केले, त्यांना प्रेम दिले, इतरांसाठी झिजली मात्र याच मराठीला आज असंख्य समस्यांना सामोरे जावे लागतेय. आफल्याच माणसांनी तिला पारखं केलेले आहे. तिला वाईट दिवस आलेले आहेत. परंतु हीच मराठी कवीला आणि कवी मराठीला ठामपणे सांगू पाहतात.

पाहुणे जरी असंख्य पोसते मराठी...
आपुल्या घरात हाल सोसते मराठी
हे असे कितीक 'खेळ' पाहते मराठी
शेवटी मदांध तख्त फोडते मराठी

## १३. एक दिवस मी परमेश्वराला

- केशव मेश्राम (१९३७-२००७)

शिक्षण - एम.ए.

व्यवसाय - अध्यापन. मराठीचे प्राध्यापक

लेखन - उत्खनन (१९७७), जुगलबंदी (१९८२), अकस्मात (१९८४), चरित (१९८९). या बरोबरीने कादंबया, कथासंग्रह, ललितनिबंधसंग्रह, काही संपादने, तसेच वैचारिक लेखन प्रसिद्ध.

### एक दिवस मी परमेश्वराला

भारतात जन्मआधारित जातिव्यवस्था प्रचलित आहे त्यामुळे समाजात जातीव्यवस्थेनुसार गट निर्माण झाले. एक गट हा सुरक्षितता, सत्ता, संपत्ती, स्वार्थ साधू पाहतो तर दुसरा गट हा असहाय्यता, असुरक्षितता, अधोगती, अत्याचार, अनाचार याने पछाडलेला होता. यामुळे जातीने शूद्र असलेला दलित समाज हा सर्वच व्यवस्थेतून बाहेर जाणूनबुजून ठेवला जाऊ लागला. हा समाज दुर्लक्षित राहिला. उपेक्षितांचे जगणे त्यांच्या वाट्याला आले. माणूस म्हणून त्यांचे जगण्याचे अधिकार हिरावून घेण्यात आले. हजारो वर्षे अन्याय सहन करीत हा दलित समाज गुलामगिरीचे जगणे निमूटपणे जगत आला. पण फुले-आंबेडकरांचे नेतृत्व लाभल्यावर या समाजाचे जगणे सुधारले. शिक्षणाने आमूलाग्र बदल झाला. प्रस्थापित समाजव्यवस्थेविरुद्ध लढण्याचे बळ त्यांच्यात आले. विद्रोह पुकारला. आंबेडकरांच्याच प्रेरणेने दलित समाज लिहिण्यास उद्युक्त झाला व दलित साहित्य निर्माण झाले. ज्यातून दलित समाजाची वेदना व विद्रोह प्रभावीपणे व्यक्त होत राहिला.

कवी केशव मेश्राम यांची 'एक दिवस मी परमेश्वराला' ही कविता याच अन्यायाविरुद्ध उठवलेला आवाज आहे. त्यांनी भोगलेले चटके शब्दरूपाने अवतरलेले आहेत. कवी केशव मेश्रामांच्या कवितेत एक प्रतीकात्मक घटित निर्माण करून प्रचलित व्यवस्था नाकारण्याचा प्रयत्न केला आहे. या कवितेत कवी परमेश्वराला उद्देशून आईवरून शिवी देतो, त्याची ही कृती परंपरेला नकार देणारी आहे. विद्यापीठातील विद्वानांनाही या कृतीचे प्रश्न पडतात.

पुन्हा एकदा मी कचकून शिवी दिली
विद्यापीठाची इमारत कमरेपर्यंत खचली
माणसाला राग येतो या विषयावर
आता ते का संशोधन सुरु आहे,

दलितांचे वास्तव किती दाहक, यातनामय आहे याची जाणीव येथे परमेश्वराला विचारलेल्या प्रश्नांच्या स्वरूपात करून दिली आहे. कवी म्हणतो-

'साल्या! तुकडाभर भाकरीसाठी
गाडीभर लाकडं फोडशील काय?
चिंधुक नेसल्या आईच्या पटकुराने
घामेजले हाडके शरीर पुसशील काय?
बापाच्या बिडीकाडीसाठी
भावाबहिणींची हाडके झिजवशील?

दलितांच्या स्थितीबद्दलचा संताप, चीड आणि परंपरेबद्दलचा तीव्र उपरोध या कवितेतून व्यक्त झालेला आहे.

## १४. करमत नाही

- वसंत आबाजी डहाके (१९४२)

शिक्षण - एम.ए

व्यवसाय - अध्यापन. मराठीचे प्राध्यापक

लेखन - योगभ्रष्ट (१९७२), शुभवर्तमान (१९७८), शुनःलेप (१९९६), चित्रलिपी (२००६). याखेरीज काही कादंबया, संपादने, समीक्षाग्रंथ, ललितलेखन विविध कोशग्रंथ प्रसिद्ध.

कवी वसंत आबाजी डहाके यांना पूर्णपणे आधुनिकवादी परंपरेतील कवी म्हणता येत नसले तरी त्यांच्या कवितेवर आधुनिकवादाचा प्रभाव मोठ्या प्रमाणात पडलेला आहे. आधुनिकवादी वास्तव त्यांच्या कवितेत कमी-अधिक प्रमाणात जाणवत असते. डहाकेंच्या 'करमत नाही' या कवितेत जुन्या काळातील गॉथिक शैलीतील इमारत शतकाचा अंधार साठवणारी आहे. म्हणूनच कवी म्हणतो.

करमत नाही या गॉथिक इमारतीत
एका शतकाचा अंधार साठवलेल्या

उंच आढ्यांवर घुमणाया कबुतराच्या लांबच लांब पसरलेल्या मृतप्राय प्राण्यांसारखा टेबलाच्या काठाशी ओठंगणाया चेहयांच्या

कवीला या गॉथिक इमारतीत शतकांचा अंधार जाणवतो. कारण, तेथील लांबच लांब पसरलेले टेबलही मृतप्राय प्राण्यांसारखे आहे. त्यामुळे कवी एक प्रकारची अनाहूत हुरहुर घेऊन इमारतीच्या बाहेर निघतो खरा पण बाहेरही त्याला करमत नाही. परंतु महानगरातील रस्त्यांवरील टॅक्सींच्या, बसेसच्या आणि बसची वाट पाहणाया थांब्यावरील घोळक्यांच्या गर्दीत तो पुन्हा एकदा हरवतो. तेथेही त्याला थकल्याचा, भोवंडून गेल्याचा, एकाकीपणाचा, संवादशून्यतेचा, अमानवीकरणाचा अनुभव सदैव येत असतो. एकप्रकारे हा कवी त्या शतकातला अंधार दूर करण्याचा प्रयत्न करत असतानाही इथली व्यवस्था त्याचा ठाव लागू देत नाही. आणि मग त्याला आलेल्या एकाकीपणाचा, गदगदल्याचा, संवादशून्यतेचा अनुभव कवी पुढील शब्दांत व्यक्त करतो.

डोळ्यांतल्या डोळ्यांत वाटा फिरतात,
सरळ होतात, दूरदूर सरतात,
पोटातल्या हाका
ओठातच बुडून जातात.

महानगरातील अत्यंत साध्या सोप्या वाटणाया तपशीलामधून हा अनुभव कवी व्यक्त करत असतो.

## १५. कालचा पाऊस

- यशवंत मनोहर (१९४३)

शिक्षण - एम.ए. पीएच.डी.

व्यवसाय - अध्यापन. मराठीचे प्राध्यापक

लेखन - उत्थानगुंफा (१९७७), डॉ. आंबेडकर : एक चिंतन काव्य (१९८२), मूर्तिभंजन (१९९५), जीवनायन (२००१). याखेरीज काही समीक्षाग्रंथ, कादंबरी, प्रवासवर्णन, व वैचारिक लेखन प्रसिद्ध

यशवंत मनोहर यांची 'कालचा पाऊस' ही छोटीशी कविता दलितांच्या वेदनांचा उत्कट परंतु संयत अविष्कार करणारी आहे. ही कविता प्रतीकात्मक स्वरूपाची आहे. वेदना-विद्रोह-नकार यामुळे दलित साहित्य डोलाने उभे राहिले कारण त्यात समाजातील वास्तव मांडण्यात दलित वर्ग यशस्वी झाला. मनोहर यांच्या 'कालचा पाऊस' या कवितेतही दलितांवरील अन्यायाचा उपरोधिक स्वर बघायला मिळतो.

पाऊस हे येथे समृद्धीचे, सुखासमाधानाचे, आनंदाचे प्रतीक आहे. त्या परंपरेत म्हणजेच भूतकाळात दलितांच्या वाट्याला असे सुंदर, संपन्न जीवन कधीच आले नाही. वाट्याला दुःख, असहाय्यता हे दुःखमय जीवन कशा प्रकारचे होते ते कवी पुढील प्रतिमांमधून व्यक्त करतो.

कालचा पाऊस आमच्या गावात आलाच नाही.
सदरहू पीक आम्ही आसवांवर काढले आहे
कालपर्यन्त पावलांनी रस्त्यापाशी तक्रारी मांडल्या नाहीत
झाडे करपले, माथी हरपली
नदीच्या काठाने मरण शोधित फिरलो
आयुष्याच्या काठाने सरण नेसून भिरभिरलो

इतके दुःख वाट्याला येऊनही त्यांनी कोणाजवळ तक्रारी केल्या नाहीत. त्याच्यासाठी त्यांच्या जीवनातील हिरवीगार झाडे कधीच करपली होती; कारण अनाचार, अत्याचाराला हा वर्ग बळी पडला, त्याचे शोषण होत राहिले. ज्या नदीच्या काठाने पाणी शोधायचे तेथे ते मरण शोधू लागले. आयुष्याच्या काठाने सरण नेसून भिरभिरण्याचे दुर्दैव दलितांच्या वाट्याला या परंपरेत आले आहे. ही वेदना त्यांच्या कवितेत ठळकपणे जाणवत राहते.

## १६. मला नको आहे

- अनुराधा पाटील (१९५४)

शिक्षण - मॅट्रिक

व्यवसाय लेखन

लेखन - दिगंत (१९८१), तरीही (१९८५), दिवसेंदिवस (१९९२), वाळूच्या पात्रात मांडलेला खेळ (२००५)

अनुराधा पाटील यांची कविता मूलतः रोमँटिक परंपरेतील असली तरी 'मला नको आहे' ही कविता मात्र परंपरेच्या सीमारेषा ओलांडून येथील ग्रामीण वास्तवालाही भिडू पाहते. येथेही दुःखाचा अनुभव आहे. परंतु तो अनाम स्वरूपाचा नाही. या कवितेतील निवेदक म्हणजे मी परमेश्वराला, विठ्ठलाला उद्देशून काही मागत आहे हे मागण मागत असताना मात्र कवी विठअठलाला मला काय नको आहे ते सांगताना म्हणते,

मला नको आए
तुझं अबीरबुक्क्याचं पंढरपूर
नको आहे
जन्मोजन्मी पडणारा
मुक्तीचा श्रीरंगचकवा
पंढरपूर कितीक दूर
म्हणता म्हणता

तिला काय नको आहे हे सांगतानाच कवी खेड्यापाड्यातील सर्वसामान्यांसाठी मागणे मागते. स्त्रियांची अपत्याशिवायची घरं  दुडदुडत' धावावीत, जेणेकरून त्यांची घरं उजाड होणार नाहीत. पाणवठ्यावर नदीकाठी तर कधी दिवा लावताना पोरींनी पाहिलेली स्वप्न खरी होऊ देत. सुखाच्या क्षणांनीच त्यांच्या शिणलेल्या जगण्याला खरा अर्थ प्राप्त होणार आहे.

कवयित्री  म्हणते ऊन वारा ज्या हातांनी, देहाने सोसलेला आहे. ज्यांनी आजवर आपले उभे आयुष्य झिजवले ते फक्त कष्टांनी त्या पिकल्या पानांना म्हणजेच थकलेल्या म्हाताऱ्या देहांना त्यांच्या थकलेल्या आयुष्याचे अभंग खिन्नमनाने म्हणता येऊ देत.

फिरू दे
ऊन वारा सोसलेले हात
तोंडावर केसांवर
काठी टेकत घराच्या काळोख्या
कोपया कोपयावर
म्हणू दे दूरवर डोळे लावून पिकल्या पानांना
थकलेल्या आयुष्याचे खिन्न अभंग
पडक्या ओसरीओसरीवर

गावाकडच्या ओसाड भूमीवर मृगाची पावलं वाजू देत जेणेकरून तू जन्मापासून त्यांच्या जगण्याला जी थोडीशी रखरख दिली आहे ती मिटून जाईल. आणि मग पुन्हा एकदा नव्याने त्यांच्याबरोबरच माझ्याही विरत चाललेल्या आयुष्याला रानावनाचा, पावसा-पाण्याचा, पुन्हा पुन्हा टाके धालून शिवलेल्या लुगड्याचा वास येईल. इतके साधे मागणे कवयित्री मागते.

'मला नको आहे' या कवितेत दुःखाचा उत्कट, अतिशय नितळ, साध्यासरळ अशा भाषेत आविष्कार केला आहे. आणि म्हणूनच की काय या कवितेला एक वेगळी उंची आपोआपच कवयित्रीकडून प्राप्त करून दिली जाते.

## १७. माझ्यातून - भुजंग मेश्राम

कवी भुजंग मेश्राम यांचा गुलगुलान (१९९१) हा काव्यसंग्रह प्रसिद्ध. काही नियतकालिकामधून आदिवासी बोलीतूनही कविता व संशोधनपर लेख प्रसिद्ध

माझ्यातून दलित कवितेतील परिवर्तनाचा, वेदना-विद्रोह-नकार यांचा वारसा घेऊनच आदिवासी कविता अस्तित्वात आलेली आहे. जे दुःख, शोषणाला दलित बांधवांना सामोरे जावे लागले त्याचप्रकारचे शोषण आदिवासींचेही झाले.

भुजंग मेश्राम यांच्या 'माझ्यातून' या कवितेत आदिवासींच्या शोषणाचे वास्तव उलगडत जाते. इंद्रावती नदीच्या खोऱ्यातील आदिवासींच्या जीवनाचा संदर्भ इथे आहे. ही इंद्रावती संथपणे वाहते आहे. तिच्या या संथ वाहण्याला कवी उपरोधाने म्हणतो,

कुठलाही दिमाख नाही, ना कुठली चाल
अगर नाही समुद्राला भिडण्याचा अट्टाहास
ती संथ वाहते म्हणजे केवळ
अवकाळी तिला येत नाही पूर
वाहून जात नाही काळ, ना होते जमिनीची धूप
कुठेही हल्लागुल्ला नाही, बॉंब नाही
तिचं काम कसं सराईतासारखं गुपचूप....

याचे कारण येथील शोषणाचे, लुटमारीचे विश्व बाहेरच्या जगाला अपरिचित आहे. हे शोषण करणारे अनेक तऱ्हेचे लोक आहेत. या शोषण करणाऱ्यांनी इंद्रावतीला व तिच्या खोऱ्यात राहणाऱ्या आदिवासींना जणू काही बाजारात आणून त्यांचा थाट मांडला आहे. म्हणूनच ही इंद्रावती झोपत नाही, प्रौढ विधवेसारखी ती तिची उष्ण कूस बदलत असते.

येथे रेंजर, दरोगा यांसारखे सरकारी अधिकारी आहेत. हातभट्टीवाला, ठेकेदार, व्यापारी असे अनेक प्रकारचे लोक आहेत. त्यांच्या पिळवणुकीसंबंधी कवी म्हणतो

पाणोठ्यावर दबकत यावेत श्वापदांचे कळप
तसे ते येतात, परत जातात
वाहत्या पाण्यात नेहमीच धुता येत नाहीत हात....
कुणालाच तिचा येत नाही संशय किंवा प्रत्यय
तिच्या प्रवाहातून वाहते केवळ रक्त

इंद्रावतीच्या खोऱ्यातील हे आदिवासींचे शोषण कवी तिचे चेतनीकरण करून आणखीही अनेक प्रकारे व्यक्त करतो.

आदिवासींच्या लढ्यात वरिष्ठ अधिकारी इथली व्यवस्था नाकारत असतात. आदिवासी त्यांच्या हक्कांसाठी लढतात आणि मग याच इंद्रावतीच्या खोऱ्यात रक्ताचा पाऊस पाडला जातो. अभयारण्ये नष्ट करून त्या जागेवर मोठमोठे प्रोजेक्ट उभारले जातायेत. कवी म्हणतो एकात्मता साधली जात नाही ती साधायची म्हटल्यावर कितीतरी नद्यांचा अनौरस जन्म होईल हा प्रश्न कवीलाच पडतो. अशाप्रकारे आदिवासींचे शोषण याठिकाणी मोठ्या प्रमाणावर होत आहे. सर्व व्यवस्था त्यांना नाकारली जात आहे. शेवटी कवी म्हणतो

चंबळ नावाची वेश्या थकली झोपून झोपून
ती खुणावतेय, लावते माया गदळ
ती जाहीर करते तिच्या वारसाची दलाली!
इंद्रावती बोलत नाही बोली,
ती सहजपणे वळते जागद्दलकडे अेकटी...
माझ्यातून आता संथ पाहते आहे इंद्रावती.....

❖ ❖ ❖

# ७

# ‘कविता शतकांची’ या कवितासंग्रहाची वैशिष्ट्ये

**घटक रचना**

७.० प्रस्तावना

७.१ कविता शतकाची मधील प्रबोधनवादी व मानवतावादी कविता

७.२ कविता शतकांची मधील दलित जाणिवेच्या कविता

७.३ कविता शतकाची मधील प्रेमविषयक कविता

७.४ . कविता शतकाची मधील रोमँटिक जाणिवेच्या कविता

## ७.० प्रस्तावना?

कविता शतकांची हा काव्य संग्रह मुंबई विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाच्यावतीने अभ्यासासाठी लावण्यात आला आहे.या काव्य संग्रहात सत्तावीस कवितांचा समावेश करण्यात आला आहे. केशवसुता पासून ते ङुजंग मेश्राम त्यांच्या पर्यंतच्या कवियच्या कविचा समावेश करण्यात आला आहे. या काव्य संग्रहातील मानवतावादी, कविता, दलित, ग्रामीण, प्रेम विषयक, रोमॅठिक जाणिवेच्या कविताचा समावेश केला आहे.

## ७.१ कविता शतकाची मधील प्रबोधनवादी व मानवतावादी कविता

१८ व्या शतकातील प्रबोधनवादी एन्लायमेंट ही विचारधारा युरोपमधील जवळपास पंधराव्या शतकापासून चालत आलेल्या प्रक्रियेत एक अपरिहार्य भाग आहे. १४व्या १५व्या शतकात रेने साँ प्रक्रियेत मध्ययुगीन युरोपमध्ये ग्रीक विद्या आणि कला यांचे पुनरूज्जीवन झाले. त्यामूळे युरोपमध्ये अहिक आशा-आकांक्षा ग्रीकांच्या जीवनात धर्मांना फारसे महत्त्व नव्हते. त्यांचा भर अहिक, लौकिक जीवनावर होता. त्यानंतर झालेल्या धर्मसुधारणांच्या चळवळीमूळे ऐहिकतेला पोषक असे वातावरण निर्माण झाले.

प्रबोधनाच्या विचारव्यूहात बुद्धी व बंद्धीप्रणीत विज्ञान यांना केंद्रवर्ती स्थान आहे. विज्ञानामूळे माणसाला स्वत:चे आणि निसर्गाचे विश्वाचे ज्ञान झाले की, आपोआपच माणसाला स्वतःचे विश्वाचे ज्ञान होईल. मानवी जीवनाला गारुणाथा अनेक व्याधी उपऱ्याधी समस्या यांच्यावर मात करता येणे शक्य होईल. विज्ञानाच्या साह्याने निर्माण होणा-या तंत्रज्ञानामुळे साधनसामग्रीचे कमतरता राहणार नाही. मानवी जीवनात जे दुःख निर्माण होतात त्याचे एक महत्त्वाचे कारण सामग्रीचा अभाव आहे.

उदा. विज्ञानाच्या ज्ञानामूळे आपल्याला अधिकाअधिक उत्पादन करणारी यंत्रे निर्माण करता येतील. युरोपातील औद्योगिक क्रांती विज्ञानातील प्रबोधनाचेच अपत्य आहे.

आधुनिक कवितेचे जनक केशवसूत यांनी अध्यात्मपर आणि धर्मपर असलेली मध्ययुगीन कवितेचे स्वरुप बदलून तिचे रुप जीवनकल्पनांशी सुसंगत बनविले. कवितेला नव्या जीवनकल्पनांशी सुसंगत बनविले. कवितेला नवी जीवनदृष्टी दिली. केशवसूतांपासून कविता मानवकेंद्री बनली. केशवसुतांच्या डोळया-समोर मुख्यतः ब्रिटिश रोमँटिक कवितेचे आदर्श होते. व्यक्तीचे स्वातंत्र्य इथे महत्त्वाचे ठरते. पहिल्या टप्प्यावर केशवसूत आणि त्यांच्या संप्रदायातील टिळक, बालकवी, गोविंदाग्रज, ए. पा. रेवाळकर, भा.रा. तांबे यांचा समावेश होतो.

फ्रेंच राज्यक्रांतीचा प्रभाव या कवींवर पडलेला होता. या क्रांतीने जगाला स्वातंत्र्य समता, बंधुता या तत्कार्याची देणगी दिली. त्यामूळे या मूल्यांना बाधक ठरणा-या सर्वच गोष्टी मानवतावादी नाकारले.

केशवसुतांच्या 'नवा शिपाई' या कवितेमध्ये प्रबोधनाच्या मानवतावादी मूल्यांचा स्पष्ट आणि उत्कट अविष्कार झालेला आहे. हा नवा शिपाई जात, धर्म यांच्या पलिकडे जाण्याचा प्रयत्न करतो त्याचा नवा शिपाई म्हणतो-

ब्राम्हण नाही, हिंदूही नाही, न मी एक पंथाचा,
तेच पवित्र की जे अखंडिती संदेश.........

केशवसूतांचा हा शिपाई नव्या युगाचा, मनूचा शिपाई आहे. त्याला संकुचितपणा, मानवनिर्मित कोणतेच भेदभाव मानत नाहीत. आपला विश्वबंधूत्त्वाचा विचार व्यक्त करताना त्यांनी

जिकडे जावे तिकडे माझी भावंडे आहेत,
सर्वच खुणा माझ्या घरच्या मजला दिसताहेत
कोठेही जा, पायाखाली तृणावता भू दिसते
कोठेही जा, डोईवरती दिसते नीलांबर ते

बंधूभाव स्वातंत्र्य समता या नव्या मूल्यांचा पुररस्कार केशवसूत करताना दिसतात.

मानवतावाद आणि रोमँटिसिझममधील एक महत्त्वाचे आशयसूत स्वातंत्र्य हे आहे. मानवतावादाने व्यक्तीच्या स्वातंत्र्याचा जसा पुरस्कार केला

आहे तसाच राष्ट्राच्या स्वातंत्र्याचाही केला आहे. हे वि.दा.सावरकर यांच्या 'सागरास' या कवितेत आले आहे. राष्ट्र आपली मातृभूमी पारतंत्र्यात आहे ही वेदना या कवितेतून आली आहे त्याचबरोबर आपल्या मातृभूमीविषयीची अपार ओढ, प्रेम उत्कटपणे व्यक्त होताना दिसते. या कवितेत सागराचे चेतनीकरण करण्यात आले आहे परदेशी असलेला कवी त्या सागरास उद्देशून विनवणी करीत त्याला तऱ्हे तऱ्हेने आवाहन करतो.

उदा.

ने मजसी ने परत मातृभूमीला । सागरा प्राण तळमळला
भू मातेच्या चरणतलातून धुता । मी नित्य पाहिला होता.
मज वदलासी अन्य देशी चल जाऊ । सृष्टीची विविधता पाहू
तई जननीऱ्हद विरहशंकितही झाले । परि तूवा वचन तिज दिधले
मार्गज्ञ स्वयें मीच पृष्टि वाहीन । त्वरीत या परत आणीन

कुसूमाग्रजांच्या 'कोलंबसाचे गर्वगीत' या कवितेत मानवतावादी परंपरेतील मानवी कर्तृत्त्वावरचा उदंड विश्वास आशावाद व्यक्त होताना दिसतो. नव्या क्षितिजाचा शोध घेत जाणारा नाविक अफाट समूद्रावरील अनेक प्रकारच्या संकटांना कसा तोंड देता, धैर्याने कसा संघर्ष करतो. समूद्राचे रौद्रभीषण रुप कसे असते याचे अनेक प्रतिभांनी युक्त चित्रण केशवसूतांनी केले आहे हे "अनंत आमूची ध्येयसक्ती अनंत अन् आशा किनारा तुला पामराला"

या कवितेतून अफाट अशा समूद्राला किनारा असतो. माणसाच्या ध्येयसक्तीला, आशेला मात्र असा कोणता किनारा नाही. ही जाणीव येथे उत्कटपणे व्यक्त झाली आहे.

कवी अनिलांच्या 'सारेच दीप कसे मंदावले आत'

या कवितेत मानववादातील आशेचे चित्र पाहावयास मिळत नाही. येथे निराशा आहे. हताशता आहे. कवीला सर्वच आघाडीवर लाचारी, तडजोड दिसत आहे. कवीच्या दृष्टीने येथे 'सारा हिशेबी व्यवहार आहे'

आपल्या सामाजिक जीवनातील हा अनाचार, थंडपणा पाहून कवी अस्वस्थ होताना दिसतो. हे

सारेच दीप मंदावले आहेत, एवढेच नव्हे तर ज्योतीही विझत चालल्या आहेत. ही वेदना या कवितेत व्यक्त झाली आहे. ही मानवतावादी भूमिकेतील वेदना आहे.

उदा.

सारेच दीप कसे मंदावले आता
ज्योती विझू विझू झाल्या
की झड घालून प्राण द्यावा पतंगाने
असे कुठेच तेज नाही !
भिजले कसे आवाज सारे ?
खडबडून करील पडसाद जागे
अशी कुणाची साद नाही ?

किंवा

भावनांना चेव नाही
यौवना आव्हान नाही
संघर्ष नाही झुंज नाही
जावे ज्यामागे बेधडक
असा झुंजार वीर नाही
कामी आला देह जिथे
असा रणसंग्राम नाही !

किंवा

वरती खाली सामसूम
इकडे तिकडे सामसूम
आजूबाजूस सामसूम
जनमनातही सामसूम
ह्दयामध्येही सामसूम

माझ्या मना बन दगड ही कविता मार्क्सवादाची जोड लाभलेल्या मानवतावादी पंरपरेतील आहे. ती वास्तवांचा कणखर प्रत्यय देणारी कविता आहे. अवतीभवतीच्या जगण्यातील विसंगती, सर्वसामान्य माणसाचे अभावग्रस्त जगणे पहात असताना कवीच्या संवेदनशील मनाला होणाऱ्या यातनांचा अविष्कार ही कविता वक्तृत्वपूर्ण शैलीत करते. येथे कवी स्वतःच्याच मनाला भोवतालचे भीषण, भेखूर वास्तव समजावून सांगत आहे. या कवितेत अखेर आशावादी आहे. लालधुळीमागून येणारा स्वार येथे क्रांती घडविणार आहे, असा विश्वास व्यक्त केला आहे.

उदा.

हा रस्ता अरळ आहे !
अन्नाशिवाय, कपडयाशिवाय
ज्ञानाशिवाय, मानाशिवाय
कुडकूडणारे हे जीव
पाहू नको ! डोळे गीत !
नको पाहू जिण भकास

किंवा

ऐका टापा ! ऐका आवाज !
लाल धूळ उडते आज
याच्यामागून येईल स्वार
या दगडावर लावील धार !
इतके यश तूला रगड
माझ्या मना बन दगड !

## ७.२ कविता शतकांची मधील दलित जाणिवेच्या कविता

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दलित साहित्याचे प्रेरणास्थान आहेत. आधुनिक राष्ट्र म्हणून भारताच्या होत असलेल्या घडणीतील बाबासाहेब आंबेडकर हे एक रोमहर्षक पर्व आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने मानवी अस्मितेसाठी आणि सामाजिक समतेसाठी जे आंदोलन दलित जनतेने उभारले आहे व अजूनही चालूच आहे आणि समता व सामाजिक न्यायावर आधारलेली समाजव्यवस्था भारतात दृढ होईपर्यंत हे चालूच राहील.

डॉ. बाबासाहेब हे विधायक दृष्टी असलेले कृतीप्रसंग असे राजकारणी व समाजशास्त्रज्ञ होते. ज्ञानविज्ञानापासून जे फायदे मिळतात, जी नवी दृष्टी मिळते ती दलित समाजाला लाभावी अशी त्यांची धारणा होती आणि म्हणूनच त्यांनी पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. आणि तिच्या मार्फत सिद्धार्थ कॉलेज, मिलिंद कॉलेज चालविले. याशिवाय त्यांनी अनेक आंदोलने व चळवळी केल्या.

दलित साहित्यामध्ये वेदना, विद्रोह आणि नकार आहे. दलित समाज गावकुसाबाहेरचा समाज आहे तो शतकानुशतके बहिष्कृत राहिला. त्याच्या वेदना या साहित्यात आल्या आहेत. बाबुराव बागुल 'अहिंदू होतो'या कवितेत म्हणतातः-

माझे मनी सतत असते
इथे जन्मलो नसतो तर बरे झाले असते
शुद्र, अतिशूद्र झालो नसतो
अनंत अपमान सहन करावे लागले नसते
आणि सभोवार दुःख दैन्य दुदैव
दृष्टीस पडले नसते
व्यथा वेदनांचे वारुळ
माझे मन आणि शरीर झाले नसते
किंवा
कशाला झाली अक्षरांची ओळख
बरा होतो ओहोळाचा गोळा गोठा
असल्या इंगळ्या डसल्या नसत्या.

ह्या पवारांच्या कोंडवाडा या कविता संग्रहामध्ये हे विचार आले आहेत. या देशातील देव, धर्म आणि संस्कृतीने दगड धोंडयातले शेंदरी देव अतिशय भक्तीभावाने पुजले. कुत्र्या मांजरात गाई बैलात देव शोधला पण गावकुसाबाहेरचा माणूस मात्र त्यांना दिसला नाही या व्यवस्थेला दलित साहित्य विरोध करते आणि मानवाचे मोठेपण त्यांच्याठिकाणी असणारी वैचारिकता बुद्धिवाद आणि विचारीपणा यांना महत्त्व देतो. मानवतेचे पोवाडे गातो. आणि ही प्रस्थपित व्यवस्था समूळ नष्ट करण्याचा प्रयत्न करतो त्यासाठी विद्रोहाचा मार्गही प्रसंगी स्वीकारण्यास तो तयार होतो.

उदा.

ज्याने चूक केली येथे जन्म घेण्याची

त्यानेच ति सुधारली पाहिजे

देशांतर करुन ... भीषण युद्ध करुन !

या विद्रोहाला करुणेची झालर आहे.

अरे ती माझी बंदुक तरी द्या

नाहीतरी ती तुक्याची वीणा तरी द्या

गावी जाईन म्हणतो....

या वीणेवर क्रांतीचे गीत गाईन म्हणतो

कविता शतकाची या कवितेच्या ग्रंथामध्ये नारायण सुर्वे यांची सत्य, नामदेव ढसाळ यांची ज्ञानोबा, भुजंग मेश्राम यांची माझ्यातून, यशवंत मनोहर यांची कालचा पाऊस, केशव मेश्राम यांची एक दिवस मी परमेश्वराला इत्यादी कवितांमधून दलित जाणीवा व्यक्त झाल्या आहेत त्यांचा आशय खालीलप्रमाणेः-

नारायण सुर्वे यांच्या सत्य या कवितेत एका कामगाराचे भावविश्व आविष्कृत झाले आहे. चाळीमध्ये राहणा-या, ओढगस्तीने, दारिद्र्यात कसा बसा संसार चालवणारा हा कामगार आहे. वास्तव, जीवंत, प्रत्ययकारी प्रसंगामधून हे जगणे इथे वाचकांसमोर ठेवले जाते. या काळातल्या जगण्याला त्याची पत्नी हा आधार आहे परंतू त्याकाही जीवनात काही आनंदाचे, प्रेमभावाचे उत्कट क्षण आहेत. पत्नीच्या गरोदर असण्याचा आनंद आहे, प्रणयाचा आनंद आहे परंतू उदरनिर्वाह ही त्याच्या समोरची मुख्य समस्या आहे. एकाच्या पगारामूळे भागत नसल्यामूळे शेवटी नाईलाजाने पत्नीलाही

उदा. तुझे गरम ओठ, अधिकच पेटत गेले तेव्हा

तेव्हाही अशीच एक रात्र आली नकार घेऊन

कोनाडा हळहळला - कळवळला

नारायणा गदगदला

'शिंक्यावरची भाकर घे' - पुरपूरला

'उद्यापासून .... काम बघ मला बाबा

गांगरला, भोवडून स्थीर झालो

तिच्या ओठावर ओठ टेकवून

बिछान्यासह बाहेर पडला, त्या रात्री

तिचे ओठ अधिकच रसाळ वाटले. अधिकच....

कवी मेश्राम यांच्या 'एक दिवस परमेश्वराला' या कवितेत प्रतिकात्मक घटित निर्माण करुन प्रचलित व्यवस्था नाकारण्याचा प्रयत्न करते या कवितेतील कवी परमेश्वराला उद्देशून आईवरुन शिवी देतो. ही त्याची कृती परंपरेला नकार देणारी आहे. ही त्याची कृती न रुचणारा पांढरपेशा बोरुबहाद्दर आहे. विद्यापीठातील विद्वानांनाही या कृतीने प्रश्न पडतात यावरुन दलिताचे वास्तव जीवन किती दाहक, यातनामय आहे याची जाणीव येथे परमेश्वराला विचारलेल्या स्वरुपात करुन दिली आहे.

उदा.

शिवी दिली, शिव्या दिल्या साटांसारखे

शब्दांचे फटकारे मारत मी म्हटले

साल्या ! तुकडाभर भाकरीसाठी

गाडीभर लाकड फोडशील काय ?

चिंधूक नेसला आईच्या परकुराने

घामेजले हाडके शरीर पुसशील काय ?

बापाच्या बिडीकाडीसाठी

भावाबहिणीचे हाडके झिजवशील ?

बाप्पा रे, देवबाप्पा रे ! तुला रे जमणारच नाही,

त्यासाठी पाहिजे अपमानित

मातीत राबणारी

प्रेम करणारी मायमाऊली....

एक दिवस मी परमेश्वराला आईवरुन शिवी दिली.

नामदेव ढसाळ यांच्या 'ज्ञानोबा' या कवितेत ज्ञानेश्वरांना उद्देशून कवी आपली वेदना अशी व्यक्त करतो तसेच तो ज्ञानेश्वरांनी निर्माण केलेल्या परंपरेला विरोधही करतो येथे ज्ञानेश्वरांना विरोध करणे नकार देणे म्हणजे हिंदू परंपरेला नकार देणे आहे. ज्ञानंश्वरांच्या मर्यादा दाखवतांना कवी म्हणतोः

जात वर्ण धर्माचे नद्या डोंगर ओलांडून ज्ञानोबांना

अमृतानुभवाकडे जाता आले नाही

तारी लावून जसे पहिल्यांदा रुसून बसलात ते रुसणे

कायमच राहिले

कवी ज्ञानेश्वरांना पुन्हापुन्हा आवाहन करतो की, 'ज्ञानोबा आता तरी तारी उघडा' ज्ञानेश्वरांनी प्रस्थापित व्यवस्थेचीच कायम पाठराखण केली  ही कवीची तक्रार आहे ती त्यांनी परंपरेतील वेगवेगळया दार्शनिक संदर्भ देत आख्यायिका सांगत .... या कवितेत मांडली आहे.

उदा.

किती झटकन विसरलात आई-बापांचा भावंडांचा

स्वतःचाही झालेला हक्क

पाठ तुमची फोडली त्यांनी रेड्याच्या पाठीवर वळ

ज्या प्रस्थापित व्यवस्थेने असे तुमचे हालहाल केले

त्या प्रस्थापितांची मान्यता मिळवून ज्ञानोबा

काय मिळवलेत ? सर्व ब्रहत कळल्यावर

हे असे भान तुकविणे बरं का ?

धृतराष्ट्राच्या हतराष्ट्राच्या

लावणे तुम्हाला शोभते का ?

ज्ञानोबा या कवितेत दलित संवेदनशीलतेतील वेदना विद्रोह यांचा एकात्म व उत्कट प्रत्यय देणारी ही कविता आहे.

यशवंत मनोहर यांच्या 'कालचा पाऊस' ही छोटीशी कविता दलितांच्या उत्कट परंतू संयम अविष्कार व्यक्त करण्यात आला आहे. पाऊस हे येथे समृद्धीचे, सुखसमाधानाचे, आनंदाचे प्रतीक आहे. या परंपरागत कालचा म्हणजे भुतकाळात दलितांची वाटचाल असे सुंदर, संपन्न जीवन कधीच आले नाही. त्यांच्या वाटयाला आलेले दुःखाचे जीवन कोणत्या प्रकारचे आहे याचे चित्रण कवीने पुढील प्रतिमांतून व्यक्त केले आहे.

कालचा पाऊस आमच्या गावात आलाच नाही
सदरहू पीक आम्ही आसवांवर काढले आहे
कालपर्यंत पावलांनी रस्त्यापाशी तक्रारी मांडल्या नाहित
झाडे करपली माथी हरपली
नदीच्या काठाने मरण शोधीत फिरलो
आयुष्याच्या काठाने सरण नेसून भिरभिरलो
कालचा पाऊस आमच्या गावात आलाच नाही.

नदीच्या काठाने पाणी शोधायचे तेथे मरण शोधीत फिरण्याचे आयुष्याच्या काठाकाठाने सरण नेसून भिरभिरण्याचे दुदैव दलितांच्या वाटयाला आले. ही वेदना अतिशय सुधारणे या कवितेतून व्यक्त होते.

भुजंग मेश्रामच्या 'माझ्यातून' या कवितेतून दलित कवितेचा परिवर्तनाचा, वेदना-विद्रोह-नकाराचा वारसा या आदिवासी कवितेतून सुद्धा व्यक्त झाला आहे. या कवितेतून आदिवासी समाजाला शोषणाचे वास्तव उलगडत आहे. इंद्रावती नदीच्या खो-यातील आदिवासींच्या जीवनाचा संदर्भ येथे आहे. हि इंद्रावती संथपणे वाहते. तिच्या संथ वाहण्याला कवी उपरोधाने तिच काम सराईता सारख गुपचूप असे करतो.

हे शोषण करणारे अनेक त-हेचे लोक आहेत येथे रेंजर दरोगो यासारखे सरकारी अधिकारी आहेत. तसेच हातभट्टीवाला, ठेकेदार, व्यापारी असे लोक आहेत त्याच्या पिळवणुकी संबंधी कवी म्हणतो-

पाणवठयावर दबकत यावे श्वापदाचे कळप
तसे ते येतात, परत जातात
वहात्या पाण्यात नेहमीच धुता येत नाहीत हात
कुणालाच तिचा येत नाही संशय किंवा प्रत्यय
तिच्या प्रवाहातून वाहते केवळ रक्त
इंदरवल्लीच्या शेतात पडतो रक्ताचा पाऊस

## ७.३ कविता शतकाची मधील प्रेमविषयक कविता

कविता शतकाची या निवडक कविता संग्रहामध्ये रोमँटिक प्रेमानुभवाच्या विविध छटा आविष्कृत झाल्या आहेत त्यात गोविंदाग्रजांच्या प्रेम आणि मरण, अनंत काणेकरांच्या रानगीत, इंदिरासंताच्या मृण्मयी, ग. दि. माडगुळकरांच्या 'जोगिया', आरती प्रभूंच्या हासायचे आहे मला, पद्मा यांच्या चाफ्याच्या झाडा, अनुराधा पाटील यांच्या मला नको आहे इत्यादी कवितांचा समावेश करता येईल.

राम गणेश गडकरी उर्फ गोविंदाग्रज यांच्या प्रेम आणि मरण या कवितेतील उत्कट प्रेमभावना वृक्ष आणि आकाशातील वीज या प्रतिकातून व्यक्त झाला आहे. या वृक्षाचे विजेशी मिलन होताच तो कोसळतो खरा, परंतू प्रेमाच्या त्या साक्षात्कारात त्याचे जीवन कृतार्थ होते.

प्रेमभावनेमध्ये स्वार्थ भावनेला त्यांनी महत्त्व दिले आहे. या कवितेवर शाहिरी प्रेमकवितेचा प्रभाव दिसून येतो.

उदा.

जगी सांगतात प्रीत पतंगाची खरी
झड घालून प्राण देतो दीपकाचे वरी

या काव्यपंक्ती होनाजी बाळा या शाहिराच्या म्हणून प्रारंभीच आल्या आहेत.

वृक्षाची द्विधावस्था व्यक्त करताना
मुसळधार पाऊस पडला
तरी कधी टवटवी त्याला येईना
जरी वारा करी थैमान
तरी हले न याचे पान एकही
कैकया कळ्याही आल्या
नच फुलल्या काही केल्या

अनंत काणेकरांच्या 'रानगीत' या कवितेत रोमँटिक प्रेमातील उत्कटता त्यातील हुरहूर वेगवेगळया निसर्गप्रतिमामधुन आविष्कृत झाली आहे. आपल्या सजणीचे दोघातील प्रेमभावाचे रोमँटिक चित्र या कवितेत उभे केले आहे.

चल ग सखे रानामध्ये
चाफ्याच फुल तुझ्या कानामध्ये !
उठे चंद्रमा झाडीतुनी
बावरशी का तु सजणी ?
चंद्र गं बघतो जाळीतूनी
बावरशी का तु सजणी ?
फुले कवडसा जळातूनी
बावरशी का तु सजणी ?
वायु गं फिरतो तृणातूनी
बावरशी का तु सजणी ?

इंदिरा संत यांच्या 'मृण्मयी' या रोमँटिक परंपरेतील कवितेत उत्कट, आर्त अशा प्रीतीचा, विरहाचा अनुभव आविष्कृत केला आहे. ती मृण्मयी आहे. मातीतून वर येऊन त्याच्यापर्यंत जाण्याच्या ध्यास या कवितेत आहे तिचे मातीशी, निसर्गाशी असलेले नाते वर्षा, शरद, हेमंत, वसंत, ग्रीष्म अशा वेगवेगळ्या ऋतुंच्या प्रतिमांमधून व्यक्त केले जाते.

उदा.

रक्तामध्ये ओढ मातीची
मनास मातीचे ताजेपण
मातीतून मी आले वरती
मातीचे मम अधुरे जीवन
कोसळताना वर्षा अविरत
स्नान समाधीमध्ये डुबावे
दवांत भिजल्या प्राजक्तापरि
ओल्या शरदामधि निथळावे
हेमंताचा ओढून शेला

हळूच ओले अंग टिपावे
वसंतातले फुलाफूलांचे
छापिल उंची पातळ लागे
ग्रीष्माची नाजुक टोपली
उडवावा ..... तिच्यावर
जर्द विजेचा .... केवढा
तिरकस गाळावा वेणीवर
आणिक तुझिया लाख स्मृतीचे
खेळवीत पदरात काजवे
उभे राहूनी असे अंधातरी
तुजला ध्याने, तुजला ध्याने

या कवितेतील 'ती' त्यांच्या स्मृतीचे काजवे खेळवीत अधांतरी उभे राहून त्याच्या ध्यानात मग्न राहू पाहते.

ग. दि. माडगुळकरांच्या 'जोगिया' या कवितेमध्ये एका कंचनीच्या प्रेमाचा अनुभव कथारुपात आला आहे. हा निराशेचा अनुभव आहे. ही कंचनी आपल्या प्रेमात पडलेल्या वेड्या तरुणाची आठवण या विशिष्ठ दिवशी जागवते.

ते प्रेम तिला ओळखता आले नाही, ही सल तिच्या मनात आहे. त्या दिवशी ती रसिकांना रिझवण्याचा आपला व्यवसाय करित नाही. त्यातून सर्वसामान्य असणा-या त्या कंचनीच्या निष्ठा व्यक्त होतात.

तो हाच दिवस हो, हीच तिची ही रात
ही अशीच होत्ये बसले परि ......
वळूनी न पाहत, कापित अंधाराला
तो तारा तुटतो- तसा खालती गेला
हा वीज घडवूनि करिते त्याचे ध्यान
त्या खुल्या प्रितीचा सुळाच हो सन्मान
हि तिची पाळिते व्रतस्थ राहुनि अंगे
वर्षात एकदा असा जोगिया रंगे

आरती प्रभुंच्या 'हासायचे आहे मला' ही कविता देखील रोमँटिक परंपरेतील अनाम दुःखाचा आविष्कार करणारी आहे. या कवितेत मानवी जीवनातील दुःखाची अतर्क्यता आणि सर्वव्यापकत्व अगदी मोजक्या शब्दामधून तीव्रपणे आविष्कृत केले जाते. या कवितेतः-

इथे ओळ्या कळ्यांनाही
आसवांचा येतो वास

या प्रतिमेतून दुःख मानवी जीवनाला लहानपणापासूनच कसे असते, ते सूचित केले जाते. त्यामूळे येथील हसणे हे निरागस, आनंदमय, स्वरुपाचे नाही. ते औपचारिक स्वरुपाचे आहे. येथे या हास्याविषयी कसे, कुठे,केव्हा,कुणाचे पाशी असे प्रश्न विचारले जातात. या प्रश्नांमधून हसण्यातील व्यर्थता व्यक्त होते. अशा अर्थशून्यतेमधून आयुष्य संपवायचे आहे.

उदा.

कसे? कसे हसायचे ?

हासायचे आहे मला,

हासतच वेड्या जिवा

धोपटीत धोपटीत

फुंकायचा आहे दिवा...

हासायचे

कुठे? कुठे आणि केव्हा?

कसे? आणि कुणापास?

इथे भोळ्या कळ्यांनाही

आसवांचा येतो वास....

पद्मा गोळे यांच्या चाफ्याच्या झाडा या कवितेत चाफ्याच्या झाडाचे चेतनीकरण केले जाते. त्याला व्यक्तित्व बहाल केले जाते. रोमँटिसिझममधील निसर्ग व मानव यांच्यातील एकात्म नात्याचा शोध येथे आहे. या चाफ्याच्या झाडाशी तिचे भावबंध केव्हातरी जुळले होते. त्याच्या साक्षीने तिने कधीतरी ह्दयाची गाणी म्हटली आहेत. त्याच्या अळ्यात त्याच्या फांद्यावर ती केव्हातरी खेळलेली आहे. आता ती त्याच्यापासून दूर आहे. ती चाफ्याच्या झाडाशी लहाणपणी असलेले आपले ह्रदय संबंध आठवते आहे. आताचे जीवन हे प्रिय नाही.

चाफ्याच्या पासुनचा दुरावा तिला जसा दुःखाचा अनुभव देतो तसेच दुराव्याचे दुःख चाफ्याच्या मनातही आहे. या गोष्टीत कुठेतरी, काहीतरी चुकते आहे, ही भावना आहे. परंतू हे दुःख ती या नात्यातील उदात्तता राखून रोमँटिकपणे समंजसपणे स्वीकारते.

उदा.

चाफ्याच्या झाडा चाफ्याच्या झाडा

का बरं झालास आज स्वप्नात ?

तेव्हाच तर आपलं नव्हतं का ठरलं ?

दुःखही नाही उरलं आता मनात

पानांचा हिरवा, फुलांचा पांढरा

रंग तुझा रंगतोच माझ्या मनात

केसात राखाडी, पायात फुगडी

मी वेडी भाबडी तुझ्या मनात

चाफ्याच्या झाडा चाफ्याच्या झाडा

नको ना रे पाणी डोळ्यात आणू

ओळखीच्या सुरात, ओळखीच्या तालात

हदग्याची गाणी नको म्हणू

तुझ्याच अळ्यात एक पाय तळ्यात

एक पाय मळ्यात खेळलेच ना?

जसं काही घोड्यावर तुझ्याच फांद्यावर

बसून आभाळात फिरलेच ना ?

चाफ्याच्या झाडा चाफ्याच्या झाडा

पानात मनात खुपतंय ना ?

काहितरी चुकतंय, कुठं तरि दुःखतय
तुलाही कळतंय, कळतंय ना ?
चाफ्याच्या झाडा चाफ्याच्या झाडा
हसून सुनवायचं ठरलंय ना ?
कुठं नाही बोलायचं, मनात ठेवायचं
फुलांनी ओंजळ भरलीच ना?

## ७.४. कविता शतकाची मधील रोमँटिक जाणिवेच्या कविता

युरोपमध्ये अठराव्या शतकाच्या अखेरीस व एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभी कला क्षेत्रात निर्माण झालेला एक वाद (इझम) म्हणजे रोमँटिसिझम होय. हा वाद अभिजातवादातील विशेष नव-अभिजातवादातील निर्बंध, नियम, संकेत यांच्या अतिरेकाला, कर्तुत्त्वपणाला प्रतिकार म्हणून झालेली प्रतिक्रिया होती. या नियमांना, संकेतांना फाजील महत्त्व दिल्यामूळे नव-अभिजातवादातील साहित्यनिर्मिती ही अत्यंत शुष्क, निर्जीव, यांत्रिक व बंदिस्त झालेली होती. त्याला प्रतिक्रिया म्हणून निर्माण झालेला रोमँटिसिझमने सर्व प्रकारच्या स्वातंत्र्याला महत्त्व दिले. व्यक्तीचे स्वातंत्र्य येथे महत्त्वाचे ठरले. रोमँटिसिझमने अभिजातवादातील बुद्धीला (रिझन) नाकारुन भावनात्मकतेला मेंदू ऐवजी ह्रदयाला आणि अंतः प्रेरणेला प्राधान्य दिले.

रोमँटिसिझमने सहज स्वाभाविक स्वरुपाच्या दैनंदिन भाषेला, लोकभाषेला कवितेत महत्त्व दिले. कवीच्या निर्मितीचे मूळ कवीच्या व्यक्तीमत्त्वात असल्यामूळे कवी बाह्य विश्वाचे अनुकरण करतो. ही अभिजातवादी कल्पना बाजुला पडली. कवीचे अंतरिक जीवन त्याच्या भावभावना, कल्पना, विचार या गोष्टी महत्त्वाच्या ठरल्या. कवितेत आत्मनिष्ठ स्वरुपाच्या प्रेम, एकाकीपणा, उदासीनता, हुरहूर, काकुळता, दुःख इत्यादी भावभावना व्यक्त होऊ लागल्या. आत्मविकारामूळे भावकाव्य हा प्रकार साहित्याच्या केंद्रस्थानी आला.

रोमँटिसिझमने निसर्गाकडे पाहण्याचा नवा दृष्टीकोन दिला. निसर्ग हा जड नसून चैतन्यमय आहे. ही कल्पना येथे आहे. त्यामूळे रोमँटिक कवितेमध्ये निसर्गाचे मोठ्या प्रमाणात उदात्तीकरण व चेतनीकरण करण्यात आले आहे. निसर्गाविषयीची ही ओढ अनेक प्रकारे व्यक्त झालेली आहे. त्याबरोबरीने अज्ञाताचे, अदभुताचे आकर्षणही येथे मोठ्या प्रमाणात आहे. त्या अज्ञातापर्यंत आपल्याला पोहचता येत नाही. याची वेदनाही या कवितेत व्यक्त झाली आहे.

उदा.

केशवसुतांच्या झपूर्झा व हरपले श्रेय या सारख्या कविता डोळ्यासमोर ठेवाव्यात.

वृत्तीतील उदासीनता, तिच्यातील वेदना तीव्रपणे व्यक्त होते. या उदासीनतेला कोणतीही विशिष्ट कारणे नाहीत. आणि त्यावर कोणतेही उपाय नाहीत. ह्रदयाच्या अंतह्रदयाला 'मुक्तमनाचे मुके बोल' यासारख्या प्रतिमांमधून कवीची मानसिक घुसमट अधिक प्रकर्षाने प्रत्ययाला येते.

कोठूनि येते मला कळेना
उदासीनता ही ह्रदयाला
काय बोचते ते समजेना
ह्रदयाच्या अंतह्रदयाला
येथे नाही तेथे नाही,
काम पाहिजे मिळवायला ?
कुणीकडे श झुकतो वारा ?
हाका मारी जीव कुणाला ?

मुक्या मनाचे मुके बोल हे
घरे पाडिती पण हृदयाला
तीव्र वेदना करिती परि ती
दिव्य औषधी कसली त्याला !

मंगेश पाडगावकर यांच्या जिप्सी या कवितेतील रोमँटिसिझममधील विमुक्त, स्वच्छंद जगण्याची ओढ जिप्सीच्या प्रतीकातून आविष्कृत होते. आताच्या सुस्थिर झालेल्या प्रौढ कवीला बालवयातील अनेक आठवणी येतात. त्या आठवणींमधुन त्या जीवनातील मुक्तता, वेगवेगळ्या गोष्टींमध्ये रंगुन जाण्याची वृत्ती, बंधने झुगारण्याची वृत्ती, बेहोशी निसर्गाशी एकरुप होण्याची शक्ती या गोष्टी आपल्यासमोर ठेवल्या जातात. कवीला आजही जाणवत राहते की, आपल्या मनामध्ये खोल कुठेतरी एक जिप्सी दडून आहे.

जाचू लागते जिप्सीला ज्ञान विश्वाची चौकट
आणि जाणवते काही गुढ... अंधुक... पुसट !
खेळ मांडिलेला सारा पुन्हा उधळाया सजे
आपणच निर्मिलेले आपणच मोडू धजे
गुढ अज्ञात धुक्यात आणि जातसे बुडून
एक जिप्सी आहे माझा खोल मनात दडून
घर असुनही आता घर उरलेले नाही
चार भिंतींची जिप्सीला ओढ राहिलेली नाही
कुणी सांगावे ? असेल पुर्वजन्मीचा हा ......

कवी ना. धो. महानोर यांच्या 'ह्या नभाने' या कवितेत रोमँटिक परंपरेतील निसर्गाशी, शेतीशी असलेले माणसाचे नाते व्यक्त होते. कवीचे प्राण या निसर्गात शेतात गुंतलेले आहेत तो म्हणतो.

उदा.

या नभाने या भुईला दान द्यावे
आणि या मातीतूनी चैतन्य गावे
कोणती पूण्ये अशी येती फळाला
जोंधळ्याला चांदणे लखडून जावे
ह्या नभाने या भुईला दान द्यावे
आणि माझ्या पापणीला पूर यावे
पाहता ऋतूगंध कांती सांडलेली
पाखरांशी खेळ मी मांडून गावे
गुंतलेले प्राण ह्या रानात माझे
फाटकी ही झोपडी काळीज माझे
मी असा आनंदूनी बेहोष होता शब्दगंधे,
तु मला बाहूत घ्यावे !

नभ आणि माती ही दोन व्यापक अशी प्रतीके कवीने वापरुन निसर्गातील चैतन्यमयता, निर्मितीशीलता व्यक्त केली आहे. निसर्गाच्या या निर्मितीशीलरुपाशी संवादी अशीच कवितेची निर्मिती आहे. हे शब्दगंध तू मला बाहूत घ्यावे ! या ओळींमधून हे सुचित केले आहे. लोकगीतामधील लयी आणि शब्दकला यांमूळे, नैसर्गिकतेशी असलेले नाते अधिकच अधोरेखित होते.

भा.रा. तांबे यांच्या 'रिकामे मधुधर' या कवितेतही कवीची निर्मितीशीलता संपल्याची रोमँटिक स्वरुपाची वेदना रिकाम्या मधुधराच्या रुपकामधून आणि वेगवेगळ्या प्रतिमांमधून समोर येते.

उदा.

मधु मागारी माझ्या सख्या परि
मश्रुघटाचि रिकामे पडति घरी ।। धृ।।
आजवरी कमळाच्या द्रोणी
मधू पाजिला तुला भरोनि
सेवा ही पूर्वीची स्मरोनी
करी रोष न सखसा, दया परी ।।१।।
नैवेद्याची एकच वाटी
अतां दूधाची माझ्या गाठ
देवपूजेस्तव ही कोराण्टी
बाळगी अंगणी कशी तरी ।।२।।
तरुण तरुणींची सलज्ज कुजबूज
वृक्ष- झ-याचे गुढ मधूर गुज,
संसाराचे मर्म हवे तुज
मधू पिळण्या परि रे बळ न करी ।।३।।
ढळला रे ! ढळला दिन सखया !
संध्याछाया भिवभिवी ह्रदया,
आता मधूचे नाव कासया ?
लागले नैन रे पैलतिरी ।।४।।

कमळाचे द्रोण, नैवेद्याच्या दुधाची वाटी, कोराण्टी, संध्याछाया, तरुणतरुणींची सलज्ज कुजबूज, वृक्षझ-याचे गुढ, मधूर गुज, ढळलेला दिन या रुपकामधून ही वेदना व्यक्त होते.

❖ ❖ ❖

# ८

# मराठी लेखनाचे नियम व विरामचिन्हे

**घटक रचना**

८.० प्रस्तावना

८.१ विरामचिन्हांचे प्रकार

८.२ विरामचिन्हाची उदाहरणे

८.३ सरावासाठी

८.४ संर्दभ ग्रंथ सुची

## ८.० प्रस्तावना

मराठी व्याकरणामध्ये विरामचिन्हे महत्त्वाची आहेत. आपण वाचताना किंवा लिहिताना वाचण्याचा किंवा लिहिण्याचा अर्थ नीट लक्षात यावा म्हणून विरामचिन्हाचा वापर केला जातो. आपल्याला शब्द वा वाक्ये यामध्ये कमीअधक वेळ थांबावे लागते. हे थांबणे कोठे व किती असावे हे समजण्यासाठी जी चिन्हे वापरतात. त्यांना 'विरामचिन्हे' म्हणतात.

'विराम' म्हणजे विश्रांती असा त्याचा अर्थ आहे. ही विश्रांती कोठे-किती घ्यावी हे दाखविण्यासाठी जी चिन्हे वापरतात त्यांना विरामचिन्हे असे म्हणतात. अशी विरामचिन्हे दोन प्रकारची आहेत. १) अर्थबोधक २) विरामदर्शक. उदा. पूर्णविराम (.) हे विरामदर्शक आहे तर प्रश्नार्थक (?) हे अर्थबोधक आहे.

## ८.१ विरामचिन्हांचे प्रकार

विरामचिन्हांचे नेमके किती प्रकार पडतात याविषयी तज्ज्ञांत मतभेद दिसत असला तरी सर्वानुमते ते मुख्यतः खालीलप्रमाणे पडताना दिसतात.

(१) **पूर्णविराम** (.) वाक्याच्या शेवटी देतात.

(२) **अर्धविराम** (;) मोठ्या वाक्यात मध्येच वाक्यांश पूर्ण झाला असता देतात.

(३) **स्वल्पविराम** (,) वाक्याच्या मध्ये वा शब्दानंतर थोडेच थांबायचे असल्यास हे देतात.

(४) **प्रश्नार्थक चिन्ह** (?) वाक्यात प्रश्न केला असता हे देतात.

(५) **उद्‌गारवाचक चिन्ह** (!) वाक्यात भावप्रदर्शनासाठी हे देतात.

(६) **अवतरण चिन्हे** ('-') व (''-'') वाक्य लहान असता एख, पण चित्तवेधासाठी दोन देतात.

(७) **कंस (कौंस)** ( ) व ( ) स्पष्टीकरणासाठी एकेरी व वाक्यातील गौणवाक्यासाठी दुहेरी कंस वापरतात.

(८) **अपसारण चिन्ह** (-) मजकुराच्या स्पष्टीकरणासाठी वापरतात.

(९) **विग्रह चिन्ह** (-) सामासिक शब्दातील अवयवांची तोड करण्यासाठी वापरतात.

(१०) **संयोग व समन्वय चिन्ह** (-) तोडलेले शब्द जोडण्यासाठी वापरतात.

(११) **अपूर्ण विराम वा उपपूर्ण विराम चिन्ह** (:) तपशिलासाठी वापरतात.

## ८.२ विरामचिन्हाची उदाहरणे

| क्र. | चिन्ह-नाम | चिन्हरूप | केव्हा देतात? | प्रत्यक्ष उदाहरण |
|---|---|---|---|---|
| १. | **पूर्णविराम** | . | १. वाक्य पूर्ण झाले असता | १. आंबा खाली उडाला. |
| | | | २. संक्षेपार्थाने | २. उदा. वि.सू. (विशेष सूचना) |
| २. | **अर्धविराम** | ; | १. दोन वाक्यांचा संयोग व वियोग दाखविताना | १. ती गेली; व लगेच आली |
| | | | २. उभयान्वयी अव्ययांनी ती जोडली असता | २. ती आली होती; पण लगेच निघून गेली |
| ३. | **स्वल्पविराम** | , | १. अल्पांशाने थांबण्यासाठी | १. तुम्ही जा, पण लवकर या |
| | | | २. दोन शब्द तोडण्यासाठी | २. कासव, मासे, जलचर, किटक पाण्यात राहतात. |
| | | | ३. संबोधनप्रसंगी | ३. शाम, तू जा. |
| ४. | **प्रश्नार्थक चिन्ह** | **?** | प्रश्नार्थक वाक्याअंती | पाऊस पडला काय? |
| ५. | **उद्गारवातक चिन्ह** | ! | | भावना व्यक्त करण्यासाठी |
| ६. | **अवतरण चिन्हे** | ' ' '' '' | | १. संभाषण दर्शविण्यासाठी तसेच उद्गार दर्शविण्यासाठी (एकेरी)<br>२. एखाद्या वाक्यावर जोर देण्यासाठी (दुहेरी)<br>३. ''प्रेमाणे मन जिंकता येते.'' |
| ७. | **कंस (कौंस)** | () | १. स्पष्टीकरणासाठी (एकेरी) | १. मराठी राज्याचा खरा वारस शिवाजी (संभाजी पुत्र) हा त्यावेळी फक्त सहाच वर्षांचा होता. |
| | | | २. एका वाक्यात दुसरे वाक्य असता (दुहेरी.) | २. संत म्हणतात की, 'तुकारामांनी लिहिलेली गाथा (अभंगांची (संग्रहाची) गाथा) इंद्रायणीत बुडविली होती.' |
| ८. | **अपसारण** | - | १. पहिला मजकूर जास्त स्पष्ट करण्यासाठी किंवा | १. रात्र अतिशय शांत व रमणीय होती - ती शरदातील पौर्णिमाच होती. |
| | | | २. मध्येच सुचलेला मजकूर | |

| | | |
|---|---|---|
| | घालण्यासाठी (मोठी रेघ) | |
| ९. **विग्रहचिन्ह** - | सामासिक शब्दातील निरनिराळे अवयव भिन्न करण्यासाठी (लहान रेघ | अमर-अकबर-अँथोनी मित्र होते आपले कोल्हापूर शहर समृद्ध आहे |
| १०. **संयोग वा समन्वय - चिन्ह** | पहिल्या ओळीतील सुटलेला शब्द जोडण्यासाठी | कोकणातील लोक हुशार आहेत. |
| ११. **अपूर्णविरारम वा उपपूर्ण (विरामचिन्ह)** | एखाद्या बाबीचा तपशील देण्यासाठी | तुम्हा याल तेव्हा सोबत सर्व शालेय साहित्य ः खडू, फळा, डस्टर, फूटपट्टी इ. घेऊन या. शाळेतील सर्व इयत्तांची मुले शाळा सोडून गेली ः पहिली, दुसरी, तिसरी व चौथी. |

## ८.३ सरावासाठी

पुढील उताऱ्यामध्ये विरामचिन्हाचा वापर करून शुद्ध करून लिहा.

**उतारा क्रमांक १**

मनुष्य हा समाजप्रिय प्राणी आहे असे शास्त्रज्ञ सांगतात. काही शास्त्रज्ञांच्या मते तर समाज करून राहण्याची वृत्ती ही मानवाच्या उपजत प्रवृत्तीपैकीच एक प्रवृत्ती आहे. मनुष्याला समाज करून राहणे आवडते, इतकाच याचा अर्थ असेल तर या विधानाला हरकत घेण्याचे कारण नाही, पण समाज एकत्र टिकवून धरण्यास जे गुण अंगी लागतात ते मानवाच्या अंगी सहजच असतात, उपजतच ते त्याला प्राप्त झालेले असतात, असा जर शास्त्रज्ञांचा अभिप्राय असेल तर मग मात्र त्यांच्या विधानावर अनेक शंकाकुशंका, अनेक आक्षेप मनात निर्माण होऊन त्याची सत्यता मनाला पटेनाशी होते. आतापर्यंतच्या मानवाच्या चरित्राकडे पाहिले तर स्वार्थ, मत्सर, अहंभाव, संकुचित दृष्टी इत्यादी गुणांमुळे माणसाची स्वभावतः विघटनेकडेच प्रवृत्ती असते आणि संघटना घडविण्यासाठी त्याला अनंत प्रयत्न करावे लागतात. जिवाचा आटापिटा करावा लागतो, आणि इतकेही करून पुष्कळ वेळा अपयशच पदरी येते, असे दिसते. अनेक कारणांमुळे छिन्नभिन्न, विघटित झालेल्या समाजाला संघटित करून त्याला स्वधर्म, स्वदेश यांची सेर करण्यास प्रवृत्त करणारा मनुष्य हा महापुरुष ठरतो, त्याला लोक विभूती समजतात.

युद्धपूर्व काळापेक्षा युद्धोत्तर काळात महाराष्ट्रातल्या नियतकालिकांचे स्वरूप बदलले आहे. आकांक्षा, अभिरुची व ज्ञान या बाबतीत बदलेला वाचकवर्ग लक्षात घेऊन धोरण आखल्यास वृत्तपत्रे यशस्वी होतील गतकाळात पुढाऱ्यांपुढे ब्रिटिश सत्तेशी अन्यायनिवारणार्थ संग्राम करणे, जनजागृती करणे हीच ध्येये होती. याकरिताच त्यांनी वृत्तपत्रांत लेखन केले. गतकाळातला संपादक हा देशभक्त व देशभक्त हा संपादक होता. हालअपेष्टा भोगूनही संपादक जनतेच दुःखे मांडत. वृत्तपत्र व्यवसाय हा धंदा नसून एक धर्म होता, हे जुन्या वृत्तपत्रांवरून कळते. ऐषारामात राहण्यासाठी वृत्तपत्रांचा मार्ग नव्हता. संपादकांचा व्यवसाय निर्धनतेचा व सोशिकतेचा होता. (शब्दसंख्या ७७)

## ८.४ संदर्भ ग्रंथ सुची


१) व्यावहारिक मराठी - प्रा. डॉ. सयाजीराजे मोकाशी

२) व्यावहारिक मराठी - डॉ. लिला गोविलकर, डॉ. जयश्री पाटणकर, स्नेहवर्धन पब्लिकेशन हाऊस पुणे.

३) व्यावहारिक मराठी -डॉ. कल्याण काळे, निराला प्रकाशन पुणे

४) व्यावहारिक मराठी -ल.रा. नसिराबादकर, फडके बुक हाऊस, कोल्हापूर

५) व्यावहारिक मराठी - भाग-२ संपादक डॉ. साहेब खंदारे, निर्मल प्रकाशन नांदेड

६) व्यावहारिक मराठी -संपा. स्नेहल तावरे, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.

७) सुबोध मराठी व्याकरण लेखन व वृत्तालंकार — प्रा. चंद्रहास जोशी

८) मराठी शुद्धलेखन प्रदिप - मो. रा. वाळंबे.


❖ ❖ ❖

# ९

# वर्तमानपत्रासाठी वृत्त आणि वृत्तांत लेखन

**घटक रचना**

९.० प्रस्तावना

९.१ वृत्तलेखन

९.२ 'वृत्त' म्हणजे काय....?

९.३ बातमीविषयी

९.४ आंतरराष्ट्रीय बातमी

९.५ वृत्तांत लेखन (वर्तमानपत्रासाठी)

९.६ संर्दभ ग्रंथ सुची

## ९.० प्रस्तावना

आज इलेक्ट्रॉनिक मिडियाचे युग असले तरी वृत्तपत्राचे महत्व कमी झालेले नाही. वर्तमानपत्राचा वाचक आजही मोठ्या प्रमाणावर आहे. वर्तमानपत्रातील वृतलेखन (बातमीलेखन) याचा परिचय व्हावा यासाठी 'वृत्तलेखन' व 'वृत्तांत लेखन' अभ्यासाला लावण्यात आले आहे. 'वृत्तलेखन' किंवा 'वृत्तांत लेखन' आठ गूणासाठी विचारले जाते. वृत्त म्हणजे काय आणि वृत लेखन कसे करावे यांची माहिती आपल्याला होईल.

## ९.१ वृत्तलेखन

वर्तमानपत्र लोकशाहीचा चौथा स्तंभ मानला जातो. तळागाळातील साक्षर माणसांपासून ते उच्चभू माणसांपर्यंत सगळ्यांना वर्तमानपत्र वाचण्याची आणि बातम्या ऐकण्याची सवय असते. आपल्या आजूबाजूच्या परिसरातील देशातील आणि विदेशातील सर्वप्रकारच्या घडामोडीची माहिती बातम्यामधून प्रसिद्ध होते. वृत्तपत्रातून प्रसिद्ध झालेल्या बातम्या वाचल्याने वाचकाचे ज्ञान वाढते. समाजामध्ये घडणाऱ्या घटनाचा स्वतःच्या समाजजीवनावर कोणता परिणाम होतो काय......? असाही विचार तो करतो. म्हणजे स्वतः आणि स्वतःबरोबर समाजाचा विचार करायला भाग पाडते. म्हणून वर्तमानपत्र लोकशाहीचा चौथा स्तंभ मानला जातो.

## ९.२ 'वृत्त' म्हणजे काय....?

'वृत्त म्हणजे बातमी' आजच्या आधुनिक विज्ञानयुगामध्ये प्रसारमाध्यमांना महत्त्वाचे स्थान आहे. 'वृत्त' लोकांपर्यंत पोचवण्याची वेगवेगळी प्रसारमाध्यमे आहेत. या प्रसारमाध्यमांमध्ये वृत्तपत्रे, नियतकालिके, रेडिओ, दूरदर्शनसंच (टि.व्ही.) ही प्रमुख माध्यमे आहेत. तर आज इंटरनेटच्या माध्यमांतून 'वृत्त' प्रसारीत केले जाते. या सर्व माध्यमाचा विचार केल्यास पहिल्यापासून आजपर्यंत 'वृत्तपत्रे' हे प्रभावी माध्यम बनले आहे.

## ९.३ बातमीविषयी

बातमी मिळवणे हे वार्ताहराचे एक कौशल्ये असते. समाजामध्ये अनेक घटना घडतात. त्यापैकी काही घटना ह्या बातमीचा विषय असतात तर काहींना बातमीचा विषय करावा लागतो. 'निलेश म्हात्रे यांची कोनगावच्या सरपंचपदी बिनविरोध निवड' किंवा 'संजय गायकवाड यांची पनवेल, आरपीआय शहराध्यक्षपदी निवड. 'कल्याणमध्ये घरफोडी' बदलापूरमध्ये गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार' अतिवृष्टीमुळे सांगलीत ओल्या दुष्काळाची भीती, हे बातमीचे विषय होतात.

तर आपल्या आजूबाजूच्या परिसरामध्ये, समाजामध्ये काही घटना घडत असतात. त्या शोधून त्यावर बातमी तयार केली जाते. त्याला 'शोधवार्ता' असे म्हणतात. उदा. आपल्या शारीरिक व्यंगावर मात करून शिक्षण घेण्यासाठी धडपडणारा अपंग विद्यार्थी, सेवाभावीवृत्तीने काम करणारा तरुण, समाजामध्ये विविध क्षेत्रात होणारा भ्रष्टाचार, कृषीक्षेत्रात प्रयोग करून अधिक उत्पादन घेणारा शेतकरी या 'शोधवार्ता' म्हणून ओळखल्या जातात. त्या शोधून काढण्यासाठी जागृत वार्ताहर असावा लागतो.

बातमीविषयी जॉन बोगार्ट यांच्यामते ''जेव्हा कुत्रा माणसाला चावतो, त्यात बातमी नसते. तर माणूस कुत्र्याला चावला ही बातमी होते.'' म्हणजे दैनंदिन घडामोडीपेक्षा वेगळी घटना घडली की तो बातमीचा विषय ठरतो. बातमीदाराला बातमीतले बातमीपण ओळखता आले पाहिजे. बातम्या मिळवण्यासाठी वार्ताहर अथवा बातमीदार जागरूक असतो. बातम्या मिळवण्यासाठी बातमीदारामध्ये स्पर्धा लागली असते.

**बातमी लेखनातील दक्षता**

बातमी लेखन करताना वार्ताहराने खाली नमुद केलेल्या गोष्टी विचारात घ्याव्या लागतात.

१) बातमी कमी शब्दात अधिक माहिती देणारी असावी.

२) बातमीत अश्लीलपणा किंवा ओंगळपणा असू नये.

३) बातमी एखाद्या व्यक्तीची जाणीवपूर्वक बदनामीकारक असू नये.

४) समाजाला वास्तव माहिती देणे हाच उद्देश असावा.

५) वादग्रस्त बातमी असल्यास दोन्ही बाजूची मते व्यक्त करावीत.

वर्तमानपत्रातून बातम्या प्रसिद्ध करताना काही विशेष बातम्यांना अग्रक्रम द्यावा लागतो. कारण अशा बातम्या वाचकांच्या दृष्टीने महत्त्वाच्या असतात. उदा - राजकीय घडामोडी, क्राईम बातम्या, प्रसिद्ध व्यक्तीचे निधन, महत्त्वाच्या आपत्तीकालीन घटना याविषयी बातम्या महत्त्वाच्या असतात.

**बातमी लेखन**

वर्तमानपत्रातील बातमीतून बातमीदार वाचकांशी सुसंवाद साधत असतो. त्यामुळे बातमीची भाषा सर्वसामान्य वाचकालाही कळावी अशी असावी. वर्तमानपत्राची पानाची संख्या फारच कमी असते. त्यामुळे प्रसिद्ध होणारी बातमी ही कमी शब्दात जास्तीतजास्त माहिती देणारी असावी याची दक्षता घेतली जाते. बातमीचे लेखन करताना प्रामुख्याने पुढील सहा गोष्टीकडे लक्ष द्यावे लागते.

१) कुठे, २) केव्हा, ३) कोणी, ४) कशासाठी ५) कोणाला ६) कसे.

बातमी लेखन करताना पुढील काळजी घ्यावी.

१) साध्या सोप्या भाषेत बातमी लेखन असावे.

२) छोटी छोटी वाक्यरचना असावी.

३) बातमी नेमकी, अचूक असावी.

४) बातमी अर्धवट नसावी.

५) बातमी लेखनातून निंदानालस्ती वा बदनामी करण्याचा हेतू बातमीत नसावा.

६) बातमी समाजाच्या भावना दुखावणारी चेतावणी देणारी नसावी.

७) बातमी रूढ संकेताचा भंग किंवा कायद्याचा भंग करणारी नसावी.

**वर्तमानपत्रातील इतर मजकूर**

दररोज प्रसिद्ध होणारे वर्तमानपत्र केवळ बातम्यासाठीच वाचले जात नाही तर बातम्या आणि बातमीपत्राच्या ऐवजी इतर बरीच माहिती वर्तमानपत्रातून प्रसिद्ध केली जाते. वर्तमानपत्रातून संपादकीय, अग्रलेख, स्फुटलेख, सांस्कृतिक इतिवृत्ते, वाचकाचे पत्रव्यवहार स्थानिक कार्यक्रम वैचारिक लेख आकाशवाणी व दूरदर्शनवरील दैनंदिन कार्यक्रमांची माहिती दिनविशेष, बाजारभाव, हवामानाचा अंदाज, अर्थव्यवस्थेतील चढाओढ, क्रीडाविषयक घडामोडी इत्यादी मजकूर प्रसिद्ध केला जातो.

## ९.४ आंतरराष्ट्रीय बातमी - काही नमुने

१) **आशियाई बाजारपेठा संकटात**

**नवी दिल्ली :**

युरोपातील आर्थिक पेचप्रसंगामुळे आशियाई बाजापेठेवर मोठा विपरित परिणाम जाणवत आहे. हा पेचप्रसंग लवकर सुटला नाही तर मोठे संकट कोसळण्याची भीती व्यक्त केली जात आहे. दरम्यान, आर्थिक पेचात सापडलेल्या युरोपीयन राष्ट्रांना मदत करण्यासाठी आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने पुढाकार घेतला आहे. भारतासारख्या उगवत्या बाजारपेठांनीही यासाठी लागणारा निधी उभारण्याची तयारी दर्शवली आहे. गेल्या काही महिन्यांपासून युरोपातील अनेक राष्ट्रे मंदीच्या खाईत लोटली गेली आहेत. युरोपातील आर्थिक पेचप्रसंगाची झळ अन्य मोठ्या राष्ट्रांनाही बसत आहे. आशियाई बाजारपेठाही याला अपवाद नाहीत. या आर्थिक संकटावर लवकरात लवकर तोडग्याची आशियाई बाजारपेठा प्रतिक्षा करीत आहेत.

२) **चीनमध्ये खाणीत स्फोट; २९ ठार**

**बीजिंग/पीटीआय (वृत्तसंस्था)**

चीनमधील मध्यवर्ती हुनान प्रांतात एका सरकारी कोळशाच्या खाणीत शनिवारी झालेल्या भीषण स्फोटात किमान २९ जण ठार झाले आहेत. शनिवारी संध्याकाळी ६ च्या सुमाराला ही दुर्घटना घडली. गेल्या काही महिन्यात झालेल्या भीषण खाण दुर्घटनांमुळे चीन चांगलाच हादरला आहे.

दुर्घटनेच्या वेळी हेंजयांग शहरातील कोळसा खाणीत ३० कामगार होते. त्यापैकी सहाजणांना सुखरूप बाहेर काढण्यात आले. त्यांच्यावर नजीकच्या रुग्णालयात उपचार सुरु असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. दुर्घटनेनंतर तात्काळ बचावकार्याला सुरुवात झाली. सुमारे ४० जण मदतकार्यात गुंतले असून दुर्घटनेमुळे खाणकामगारांच्या कुटुंबियांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

## राष्ट्रीय बातमी

३) **सागरी राज्यांसाठी १५० गस्तीनौका**

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था):**

सागरी क्षेत्रातील टेहळणी आणि सुरक्षाअधिक मजबूत करण्यासाठी केंद्र सरकारने १५० गस्ती नौका खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. सागरी सुरक्षा योजेया दुसऱ्या टप्प्यात या गस्तीनौका खरेदी करण्यात येणार असून या गस्तीनौका महाराष्ट्र तसेच गुजरात, गोवा, कर्नाटक, केरळ, तामिळनाडू, आंध्रप्रदेश, ओरिसा, पश्चिम बंगाल तसेच दमण, दीव, लक्षद्वीप, पाँडेचरी आणि अंदमान-निकोबार या सागरी किनाऱ्यावरील राज्यांना देण्यात येणार आहेत. गस्ती नौकांच्या खरेदीसाठी निविदा काढण्यात आल्या असून यातील ३० नौका पुढील वर्षाच्या मध्याला दाखल होतील अशी आशा केंद्रीय गृहमंत्रालयाच्या अधिकाऱ्याने व्यक्त केले.

४) **शिमला बर्फवृष्टी**

**शिमला (वृत्तसंस्था) :**

भारतातील पर्यटकांचे मुख्य आकर्षण बिंदू असलेले शिमला शहर पर्यटकांच्या गर्दीने अक्षरशः फुलले आहे. नेमका याच क्षणाला बर्फवृष्टीला आरंभ झाल्याने पर्यटकांचा आनंदही द्विगुणित झाला. धरमशाळा, शिमला, सोलन, नन्हा, चांबा आणि मांडी या परिसरामध्ये देखील सौम्य बर्फवृष्टी झाल्याचे वृत्त आहे. मनाली शेजारच्या पर्यटनस्थळांवरील तापमानामध्ये विक्रमी घसरण झाल्याचे दिसून आले.

५) **भारत सेमीफायनलमध्ये**

**चंदीगड (वृत्तसंस्था) :**

विश्वचषक कबड्डी स्पर्धेत सलग पाचवा विजय मिळविताना यजमान भारताने उपांत्य फेरीत प्रवेश मिळविला आहे. भारताने कॅनडाला ५१-२४ अशा गुणफरकाने नमवत बाजी मारली. इंग्लंड आणि जर्मनी संघानीही आपापले सामने जिंकले. इंग्लंडने ऑस्ट्रेलियाला ४५-३२ ने तर जर्मनीने अफगाणिस्तानला ६२-२६ ने पराभूत केले दुसरीकडे सहभागी होण्यासाठी आलेले जर्मनीचे ६ आणि नेपाळचे ५ खेळाडू पतियाळा येथे झालेल्या सामन्यादरम्यान जखमी झाले. प्राथमिक तपासणीनंतर खेळाडूंना भटिंडाच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. जर्मनीच्या तीन आणि नेपाळच्या दोन खेळाडूंना डॉक्टरांनी तीन आठवडे विश्रांती घेण्याचा सल्ला दिला आहे.

## राज्यातील बातमी

६) **अमरावतीत कापूस परिषद**

**अमरावती :**

विदर्भातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्यांना वाचा फोडण्यासाठी १ नोव्हेंबर २०११ रोजी शेतकरी संघटनेतर्फे विदर्भ विभागीय कापूस परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. परिषदेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसाठी विदर्भातील हजारो शेतकऱ्यांकडून न्यायालयाकडे अर्ज भरून देण्यात येणार आहे. अशी माहिती शेतकरी संघटनेचे जगदीश बोंडे, विजय काणेकर, दिलीप परदेशी पत्रकार परिषदेत दिली.

७) **मुंबई नाक्यावर अपघात**

**नाशिकः**

मुंबई नाक्यावर ट्रक-मोटारसायकल यांच्यात झालेल्या अपघातात दोन जण गंभीर जखमी झाले. अपघातामुळे नागरिकांनी संतप्त होऊन रास्ता रोको करण्याचा प्रयत्न केला. दुपारी साडेबाराच्या सुमारास (ट्रक क्र. एम.एच ०९.१३१३) ने समोरून येणाऱ्या मोटरासायकल(चक-०९-८२९२) स्वाराला धडक दिली. या अपघातात सायकलस्वार विजय सावंत (वय ३५) व सन्मान कोरे (वय २८) हे दोघे गंभीर जखमी झाले असून नाशिकच्या शासकीय हॉस्पिटलमध्ये त्याचे उपचार चालू आहेत. ट्रकचालक रामाण्णा पेरजी (वय ४२) यांचे नाका पोलिस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास नाशिक हायवेनाका पोलीस करत आहेत.

८) **रत्नागिरी १३ मे रोजी पोलीस भरती**

रत्नागिरी येथे १३ मे रोजी पोलीस भरती आयोजित केली असून या भरतीतून १२० पोलीस शिपाईची निवड करण्यात येणार आहे. ही भरती सकाळी ८ वाजता रत्नागिरी महाविद्यालयाच्या पटांगणावर होणार असून इच्छुक पात्र उमेदवारांनी शैक्षणिक गुणपत्रक, प्रमाणपत्र रेशनकार्ड झेरॉक्स, सरपंच/पोलीस पाटील यांचा दाखला घेऊन उपस्थित राहणे. शारीरिक पात्रता चाचणीतील पात्र उमेदवारांची लेखी परिक्षा घेऊन निवड करण्यात येणार आहे.

९) **चंदपूर जिल्ह्यात डेंग्यूचे थैमान**

**चंद्रपूर :**

चंद्रपूर जिल्ह्यातील अनेक डेंग्यू, मलेरियाने मोठ्या प्रमाणात थैमान घातलेले असून, त्याला आवर घालण्यासाठी वैद्यकीय सुविधा अपुरी पडू लागली आहे. अचानक उद्‌भवलेल्या या आजारामुळे परिसरात अंधश्रद्धेलाही मोठ्या प्रमाणात उधाण आले आहे. वरोडा येथे मागील पंधरा दिवसांच्या कालावधीत डेंग्यू, मलेरियाने आठ जणांचे बळी घेतले आहेत, तर मारडा येथेही याच आजाराने एकजण दगावला. मागील पंधरा-वीस दिवसांपासून तर या आजाराने कहरच केला आहे.

## प्रादेशिक बातमी/स्थानिक बातमी

१०) **मध्य रेल्वेचा उद्या मेगाब्लॉक**

**मुंबई** : रेल्वे मार्ग दुरुस्तीसाठी मध्य रेल्वेने रविवारी (ता. ६) ठाणे-कल्याण डाऊन जलद मार्गावर व हार्बर मार्गावर वाशी ते बेलापूर दरम्यान अप व डाऊन मार्गावर मेगाब्लॉक घेण्यात येणार आहे.

पश्चिम रेल्वेवर रविवारी 'जंबो ब्लॉक' नाही. त्यामुळे या मार्गावरील प्रवाशांना दिसाला मिळाला आहे. ठाणे-कल्याण दरम्यान सकाळी ११ ते ४ या वेळात 'मेगाब्लॉक' असेल या वेळेत सर्व डाऊन जलद लोकल ठाणे-कल्याणदरम्यान डाऊन धीम्या मार्गावर चालविण्यात येणार आहेत. हार्बर मार्गावर सकाळी १०.४८ ते सायंकाळी ४.१ दरमयान बेलापूर ते वाशी दरम्यान वाहतूक बंद राहील.

११) **दोन मुलींचा बुडून मृत्यू**

**कल्याण : वार्ताहर**

काटेमानवली जवळच्या गावातील एका खदाणीत पडून दोन मुलींचा मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

काटेमानवली गावच्या हद्दीतील खदाणीमध्ये कपडे धुण्यासाठी मनीषा नारायण शिंदे (१५) आणि तिची बहीण चांदणी या दोघी गुरुवारी दुपारी गेल्या होत्या. कपडे धुताना तोल गेल्यामुळे मनीषा खदाणीत पडली. त्याचवेळी खदाणीत हात धुण्यासाठी आलेल्या चंद्री गायकवाड (१०) हिने तिचा हात पकडून बाहेर खेचण्याचा प्रयत्न केला, मात्र तीही खदाणीत पडली आणि दोघींचा बुडून मृत्यू झाला. या प्रकरणाची कोळसेवाडी पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.

१२) **वर्षा मॅरेथॉनमध्ये हजारो विद्यार्थ्यांचा सहभाग**

**बदलापूर : वार्ताहर**

स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून बदलापूरात आयोजित करण्यात आलेल्या वर्षा मॅरेथॉनमध्ये पुरुषाच्या गटात सतिश रकते याने तर महिलांच्या गटात अस्तमी भोईल हिने अव्वल स्थान पटकावले. शिवसेनेचे शहरप्रमुख वामन म्हात्रे यांनी या स्पर्धेचे आयोजन केले होते. एकूण अकरा गटात झालेल्या या स्पर्धेत बदलापुरातील साठ शाळामधील सात हजाराहून अधिक विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाले होते.

सकाळी दहा वाजता कात्रप चौक येथून या स्पर्धेच्या पहिल्या फेरीला सुरुवात झाली. दुपारी चार वाजेपर्यंत विविध अकरा गटात ही स्पर्धा घेण्यात आली. ज्येष्ठ नागरिकांसाठी घेण्यात आलेल्या स्पर्धेत सुर्यकांत भोसले यांनी त्याचे विजेतेपद पटकावले. उर्वरित आठ गटांमध्ये नितेश म्हस्कर, गुलाब म्हस्कर, प्रशांत म्हात्रे, प्रियांका भोपी, हर्षदा म्हात्रे, योगेश सोनावणे आणि राजेश्री म्हात्रे यांनी प्रथम क्रमांक पटकावला. मान्यवरांच्या हस्ते विजयी स्पर्धकांना बक्षीस देण्यात आले.

१३) **शेअर बाजारवर कार्यशाळा**

**ठाणे** - मनियोग टेक्निकल सर्व्हिसेसतर्फे ६ ऑगस्ट रोजी वांदद्र येथील चोप्रा ॲकॅडमी रिझवी चेंबर येथे सकाळी अकरा वाजता, संध्याकाळी सहा वाजता दादर येथील कबुतरखाना डिसिल्व्हा शाळेसमोरी स्नेहलता राणे गर्ल्स स्कूलमध्ये शेअर बाजारावर मोफत कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. योगेश लाटणेकर या वेळी मार्गदर्शन करणार आहेत. ९८९००३९२३२

१४) **शनिवारी माहिती अधिकार कट्टा**

**ठाणे** : स्टेशन रोडवरील मो.ह. विद्यालयात शनिवार ६ ऑगस्ट रोजी संध्याकाळी ५ ते ८ यावेळेत माहिती अधिकार कट्टा आयोजित करण्यात आला आहे. यावेळी कट्ट्यावर लोकपाल विधेयकाविषयी चर्चा होणार आहे. भारतीयांना माहितीचा अधिकार मिळवून देणाऱ्या अण्णा हजारे यांच्या चळवळीला कसा पाठिंबा देता येईल, याविषयीही यावेळी विचार केला जाणार आहे.

१५) **कवितांगणचे ४४ वे कविसंमेलन**

**गोरेगाव** : गोरेगाव येथील मराठा सांस्कृतिक मंडळाच्या 'कवितांगण' व्यासपीठातर्फे ४४ वे कविसंमेलन संपन्न झाले. सुप्रसिद्ध लेखिका ाधवी कुंटे यांनी या कविसंमेलनाचे अध्यक्षपद भूषविले. सदर व्यासपीठ केवळ कवींना त्यांच्या कविता सादर कण्यासाठी व त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी निर्माण करणयात आले आहे. सदर कविसंमेलनात महाराष्ट्राच्या विविध भागातून ४५ कवींनी सहभाग घेतला होता. त्यापैकी मनोहर धुरंधर यांच्या 'माझा चष्मा.... माझी दृष्टी' या कवितेला प्रथम पारितोषिक देण्यात आले. सुरेषचंद्र जोशी यांच्या 'उदेक' या कवितेला द्वितीय पारितोषिक देण्यात आले, तर वीणा देव यांच्या 'निसर्गाची देवता' या कवितेस तृतीय पारितोषिक देण्यात आले आहे. याशिवाय र.अ. वायंगणकर, रवींद्र सोनवणी, मृदुला दामले, डी.एम. भट, नरेंद्र पाटील यांच्या कविता उल्लेखनीय असल्याचे परीक्षकांनी सांगितले. पुढील कविसंमेलन जानेवारी २०१२ च्या पहिल्या आठवड्यात होणार आहे.

१६) **रोजगार मेळाव्यास तरुणांचा प्रतिसाद**

**मुंबई** : रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र व अश्वमेध फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने ११/११/११ या दिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आला. या मेळाव्यास तरुणांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या मेळाव्यात सातवी नापास ते पदवीधर शिक्षणप्राप्त बेरोजगारांसाठी नोकरीची संधी उपलब्ध करून देण्यात आली. रिलायन्स, ओबेरॉय हॉटेल, सैफी हॉस्पिटल आणि अन्य नामांकित कंपन्यांच्या प्रतिनिधींनी १८७८ बेरोजगारांच्या मुलाखती घेतल्या.

१७) **रिक्षा परमिटराज बंद करा** - राजाराम बापू पाटील यांची मागणी

**प्रतिनिधी**

सध्या रिक्षा परवाने वाटपात चाललेला परमिटराज तत्काळ बंद करावा, अशी मागणी रिक्षा चालक मालक सेवा संघाचे अध्यक्ष राजाराम बापू पाटील यांनी केली आहे.

रिक्षा परिमीट वाटपाचा घोळ फक्त शासनाने कागदावरच मिटविलेला आहे. मुख्यमंत्र्यांनी परिवहन खात्याला याबाबत आदेश देऊनही त्याचा काहीही परिणाम दिसून आलेला नाही. नेमकी परमीट कोणाला दिली जात आहेत यावर नियंत्रण नाही. रिक्षा चालकांची राज्यात संख्या किती, किती लोकांना परवाने दिले आहेत. याचा काहीही हिशोब शासनाकडे नाही. मुंबई ठाण्यात तर दलालांनी रिक्षा परवान्यांवर कब्जाच केला आहे. रिक्षा पासिंग वेली लॉक बुक तपासले जायचे ते सुद्धा आत तपासने आरटीओ बंद केले आहे. याचा फायदा स्थानिकांपेक्षा परप्रांतियांनी अधिक उठविला आहे. चेसी नंबर, रिक्षा नंबर, इंजिन नंबर आदींची माहिती स्थानिक पोलिसांच्या दप्तरी असणे गरजेचे आहे, तरच हे परमीटराज कमी होईल, असेही राजाराम पाटील यांनी सांगितले.

## ९.५ वृत्तांत लेखन (वर्तमानपत्रासाठी)

प्रसारमाध्यमांमध्ये 'वृत्तांतलेखन' केले जाते. या मध्ये वेगवेगळ्या प्रकारच्या प्रसारमाध्यमांसाठी वृत्तांतलेखन करण्याची शैली वेगवेगळ्या प्रकारची असते. वर्तमानपत्रासाठी वृत्तांतलेखन संगतवार माहिती देणारे असते. दूरदर्शन हे श्राव्य आणि दृश्य माध्यम असल्याने त्याचे वृत्तांत लेखन वेगळ्या प्रकाराने करावे लागते. रेडियो हे श्राव्य माध्यम असल्याने रेडियोसाठी वृत्तांतलेखन सरिस्तर माहिती देणारे करावे लागते. आपण येथे वर्तमानपत्रासाठी लिहिल्या जाणाऱ्या वृत्तांतलेखनाचा विचार करणार आहोत.

१) वृत्तांत लेखन म्हणजे घटनेची सविस्तर माहिती

वर्तमानपत्रासाठी वृत्तांतलेखन करताना घडलेल्या घटनेची सुसंगतीनुसार माहिती द्यावी लागते. घटनेच्या सुरुवातीपासून शेवटपर्यंत त्या घटनेची माहिती वृत्तांतलेखनातून द्यावी लागते.

वृत्तांतलेखन हा बातमी लेखनाचा एक भाग आहे. बातमी लेखनामध्ये घटनेची ठळक माहिती, महत्त्वाची माहिती दिलेली असते तर वृत्तांत लेखनातून घडलेली माहिती घटनाक्रमानुसार, सविस्तर द्यावी लागते. वृत्तांत लेखनासाठी घटलेल्या घटनेची सविस्तर माहिती असणे महत्त्वाचे असते.

वर्तमानपत्रातील वृत्तांत लेखनातून सभा, संमेलने, परिसंवाद, सांस्कृतिक कार्यक्रम यांची सविस्तर माहिती पसिद्ध केली जाते. तसेच राजकीय परिसंवाद, विधानसभा, विधान परिषदमधील अधिवेशनातील माहिती वृत्तांत लेखनातून प्रसिद्ध केली जाते.

## वृत्तांतलेखनाचे नमुने :

१) **बृहन्मुंबई वृत्तपत्र विक्रेत्यांच्या पाल्यांचा गौरव**

प्रतिनिधी

बृहन्मुंबई वृत्तपत्रविक्रेता परिवर्तन एक बदल सन्मान सोहळा नुकताच माटुंग्याच्या यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात संपन्न झाला.

यावेळी जुने वृत्तपत्र विक्रेते, वृत्तपत्र महिला विक्रेत्या तसेच विविध परीक्षांमध्ये चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झालेल्या वृत्तपत्र विक्रेत्यांच्या मुलांचा सत्कार करण्यात आला. अलिकडेच निधन झालेले विक्रोळीचे वृत्तपत्र विक्रेते लहू जाधव यांच्या पत्नीला विक्रेता संघातर्फे आर्थिक मदत देणयात आली तसेच शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जागतिक दर्जाच्या व्यंगचित्राबद्दल त्यांना जीवनगौरव पुरस्कार जाहीर कवण्यात आला. याप्रसंगी 'दै. पुढारी'सह अनेक वृत्तपत्रांचे संपादक व वितरण व्यवस्थापक उपस्थित होते. सोहळ्यात उद्योनमुख नामवंत गायकांनी गाणी सादर केली, तसेच किशोरी अंबिये व संतोष पवार यांनी विनोदी कार्यक्रम सादर केले. यावेळी वृत्तपत्र विर्केता पदाधिकारी हरी पवार, आवटे, शिवसेना नेते सुभाष देसाई आदी उपस्थित होते.

२) **अंबरनाथच्या शिवमंदिराचा उद्या ९५२ वा वर्धापनदिन**

ठाणे/खास प्रतिनिधी

शिलाहारकालीन शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना असणाऱ्या अंबरनाथ येथील प्राचीन शिवमंदिराचा येत्या रविवारी ७ ऑगस्ट रोजी ९५२ वा वर्धापनदिन आहे. शिलालेखावरील नोंदीनुसार श्रावण शुद्ध नवमीला इ.स. १०६० मध्ये हे मंदिर बांधून पूर्ण झाले. साधारण हजार वर्षांपूर्वी तत्कालीन अपरांत म्हणजे आताच्या उत्तर कोकणात (ठाणे आणि रायगड जिल्हा) शिलाहारांनी उभारलेल्या अनेक अप्रतिम वास्तूंपैकी केवळ हे एकमेव मंदिर साडेनऊ शतकांहून अधिक काळ उन्हाळे-पावसाळे झेलत उभे आहे. ऐतिहासिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाची असणारी ही वास्तू अधिक काळ टिकावी आणि जगभरातील पर्यटकांनी ती पाहावी म्हणून शासनाने निधी मंजूर केला असला तरी पुरातत्व खाते आणि स्थानिकांच्या असहकारामुळे या तीर्थक्षेत्राचा विकास मात्र रखडला आहे. तीर्थक्षेत्र विकास निदीतून शिवमंदिर परिसर विकास आणि सुशोभीकरणासाठी ३ कोटी १८ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. त्यातून वाहनतळ, नाल्याची संरक्षक भिंत, दशक्रिया विधी घाट आणि नाल्यातील कातळ फोडण्याचे काम पूर्ण झाले आहे. मात्र बगिचा, धर्मशाळा, दुकाने आणि समाजमंदिर आदी कामे जागेअभावी रखडली आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे शिवमंदिरालगत असणाऱ्या नाल्यात बंधारा खोदण्याच्या कामास पुरातत्व खात्याकडून अद्याप मंजुरी मिळालेली नाही. मंदिरापासून शंभर मीटरच्या आत कोणतेही बांधकाम करण्यास पुरातत्व खाते परवानगी देत नाही आणि त्यापलीकडे असणारी जागा सुशोभीकरणासाठी देण्यास ग्रामस्थ तयार नाहीत. त्यामुळे इकडे आड तिकडे विहीर अशा कात्रीत या प्राचीन शिवमंदिराचा विकास रखडला आहे. याशिवाय मंदिरालगत बंधारा बांधण्याची योजनाही पुरातत्व खात्याच्या मंजुरीच्या प्रतीक्षेत आहे. सार्वजनिक बांधकाम खात्यातील संबंधित अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार शासनाकडून आलेल्या निधीपैकी ८८ लाख रुपये शिल्लक असूनही परवानगीअभावी मंदिर विकास योजना रखडली आहे. या मंदिराचे ऐतिहासिक आणि कलात्मक महत्त्व अधोरेखित व्हावे, यासाठी गेली काही वर्षे इतिहासप्रेमी अंबरनाथकर या मंदिराचा वर्धापनदिन साजरा करू लागले आहेत.

३) **राज्यस्तरिय अभंग स्पर्धेत मुग्धा सौदागर द्वितीय**

**सावंतवाडी : वार्ताहर**

जगद्‌गुरु श्री संत तुकाराम महाराज राज्यस्तरीय अभंग व भजन स्पर्धेत सावतंवाडीच्या सद्‌गुरु संगीत विद्यालयाची विद्यार्थीनी कु. मुग्धा सौदागर हिने द्वितीय क्रमांक मिळविला. ही भजन स्पर्धा शरद क्रीडा व सांस्कृतिक प्रतिष्ठान, पुणेच्या वतीने आयोजित कतरण्यात आली होती या तिच्या यशाबद्दल सर्वत्र तिचे अभिनंदन होत आहे.

पुणे येथील बाल गंधर्व रंगमंदिरमध्ये पार पडलेल्या या अभंग व भजन स्पर्धेच्या बाल गटात कु. मुग्धा हिने हार्मोनियम स्वतः वाजवून दोन रचना सादर केल्या. तिला कु. सिद्धेश सावंत याने तबला साथ तर कु. संदीप वराडकर याने पखवाज साथ दिली. कोरस व टाळवादन सर्वेश राऊळ, चिन्मय साळगांवकर, शेजल पास्ते, समृद्धी सावंत व मंगेश मेस्त्री यांनी दिल्यामुळे मुग्धा हिला द्वितीय क्रमांक मिळाला.

हा पुरस्कार प्रदान संत साहित्याचे अभ्यासक डॉ. रामचंद्र देखणे यांच्याहस्ते प्रदान करण्यात आला. राजीव खांडेकर, स्पर्धा प्रमुख लक्ष्मीकांत खाबीया उपस्थित होते.

४) **'देऊळ'चा प्रीमियर थाटामाटात**

मुंबई ता. ४ : 'देऊळ' चित्रपटाचा प्रीमियर लोअर परळच्या पीव्हीआर मल्टिप्लेक्समध्ये गुरुवारी (ता.३) तारेतारकांच्या उपस्थितीत झाला. 'मामि'सह अन्य चित्रपट महोत्सवात चित्रपटप्रेमींच्या पसंतीस उतरलेला 'देऊळ'च्या प्रीमियरसाठी नाना पाटेकर, दिलीप प्रभावळकर, मोहन आगाशे, सोनाली कुलकर्णी, गिरीश कुलकर्णी या मुख्य कलाकारांबरोबरच उषा नाडकर्णी, ज्योती सुभाष, अतिशा नाईक, विभावरी देशपांडे, स्मिता तांबे हेदेखील आवर्जून उपस्थित होते. निर्माते अभिजीत घोलप व दिग्दर्शक उमेश कुलकर्णी यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

तगडी स्टारकास्ट व 'वळू'फेम उमेश कुलकर्णी याचे दिग्दर्शन यामुळे निर्मितीपासूनच 'देऊळ' चर्चेत आहे. यावेळी अभिजीत घोलप म्हणाले, 'गेल्या वर्षभरात हा महत्त्वाकांक्षी प्रोजेक्ट पूर्ण केला. याला प्रेक्षकांची पसंती मिळेल याची खात्री आहे. मराठी चित्रपटांनी मोठे व्हावे व मोठा प्रेक्षकवर्ग मिळावा अशी इच्छा आहे. 'देविशा फिल्म्स'च्या या निर्मितीला पडद्यावर काम करणाऱ्या कलाकारांबरोबरच पडद्यामागे काम करणाऱ्या मंडळींनी मदत केली. हा चित्रपट उमेशने सुरेख दिग्दर्शित केला आहे. नितीन वैद्य व समीर जोशी या सर्वांना मी धन्यवाद देतो,'' असे घोलप म्हणाले. उमेशने निर्माते अभिजीत घोलप व ज्यांनी 'देऊळ'ला हातभार लावला त्या सर्वांचा ऋणी असल्याचे सांगितले. या वेळी चित्रपटसृष्टीतील नितीश भारद्वाज, अविनाश-ऐश्वर्या नारकर, कांचन अधिकारी, राजीव पाटील, चंद्रकांत कुलकर्णी, तुषार दळवी, स्वानंद किरकिरे, प्रतीक्षा लोणकर, प्रशांत पाटील, तसेच शिवसेनेच्या भारतीय चित्रपट सेनेचे अध्यक्ष अभिजीत पानसे उपस्थित होते. या सर्वांनी चित्रपटाचे कौतुक केले. ''असा विषय आतापर्यंत आला नाही. दिग्दर्शन व अभिनय असा सगळ्याच पातळीवर हा चित्रपट सरस आहे.'' असे नितीश भारद्वाज म्हणाले.

## ९.६ संदर्भ ग्रंथ सुची


१) व्यावहारिक मराठी - प्रा. डॉ. सयाजीराजे मोकाशी

२) व्यावहारिक मराठी - डॉ. लिला गोविलकर, डॉ. जयश्री पाटणकर, स्नेहवर्धन पब्लिकेशन हाऊस पुणे.

३) व्यावहारिक मराठी -डॉ. कल्याण काळे, निराला प्रकाशन पुणे

४) व्यावहारिक मराठी -ल.रा. नसिराबादकर, फडके बुक हाऊस, कोल्हापूर

५) व्यावहारिक मराठी - भाग-२ संपादक डॉ. साहेब खंदारे, निर्मल प्रकाशन नांदेड

६) व्यावहारिक मराठी -संपा. स्नेहल तावरे, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.

७) सुबोध मराठी व्याकरण लेखन व वृत्तालंकार — प्रा. चंद्रहास जोशी

८) मराठी शुद्धलेखन प्रदिप - मो. रा. वाळंबे.


❖ ❖ ❖

# १०

# भाषांतर

१०.० प्रस्तावना
१०.१ भाषांतर म्हणजे काय?
१०.२ भाषांतर लेखनाची तयारी
१०.३ भाषांतराचे प्रकार
१०.४ भाषांतराचे नमुना
१०.५ संदर्भ सूची

## १०.० प्रस्तावना

भाषांतर प्रक्रियेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. कारण जगात ३ हजारांपेक्षा अधिक भाषा बोलल्या जातात. तशाच त्या लिखित भाषाही आहे. इतर भाषेतील महत्त्वाची साहित्यकृती किंवा एखादा मजकूर दुसऱ्या भाषेत आशयानुसार व्यक्त करणे म्हणजे भाषांतर. इतर भाषेतील श्रेष्ठ साहित्यकृती किंवा मजकूर भाषांतर केल्याने साहित्यकृतीतील विचार किंवा मजकुराचा आशय विचार त्या त्या भाषेतील वाचकांना कळू शकतात. भाषांतर ही एक कला आहे. कारण भाषांतर करत असताना मजकुरामधील आशय भाव न बदलता भाषांतर करणे हे एक कौशल्य ाहे. विद्यार्थ्यांना भाषांतर कलेची ओळख व्हावी आणि महत्त्व कळावे या उद्देशाने आपला अभ्यासक्रमाममध्ये भाषांतराचा समावेश केला आहे.

१८१८ ते १९७४ या कालखंडाला 'भाषांतर-युग' म्हणून ओळखले जाते. इंग्रजीतील बरेच साहित्य मराठी भाषेत भाषांतरीत झाले. म्हणून या कालखंडाला भाषांतर-युग म्हणून परिचित आहे. भाषांतर या शब्दाला इंग्रजीत ढीरपीश्ररींळेप (ट्रान्सलेशन) असा पर्यायी शब्द आहे.

## १०.१ भाषांतर म्हणजे काय?

भाषांतर म्हणजे एका भाषेतील ग्रंथ, वाक्य इ.चा दुसऱ्या भाषेत केलेला अर्थ किंवा तर्जुमा होय. एका भाषेतील लिखाणाचा, भाषणाचा, मजकुराचा दुसऱ्या भाषेत केलेला अनुवाद म्हणजे भाषांतर होय. मात्र भाषांतर, रुपांतर आणि अनुवाद यात भेद आहे.

'अन्य भाषा इति भाषांतरम्' अशी भाषांतराची व्याख्या केली आहे. भाषांतर हे आरशातील प्रतिमेसारखे असावे. याचाच अर्थ भाषांतर केल्यानंतर त्यातील मूळ आशयाला बाधा पोहोचू नये असा आहे. भाषांतर करण्यासाठी भाषांतरकाराला कमीत कमी दोन भाषांचे ज्ञान असणे आवश्यक आहे. दोन भाषांच्या प्रगत ज्ञानाची नितांत गरज असते.

**भाषांतर म्हणजे.....**

१) भाषांतर म्हणजे एका भाषेतील भाव दुसऱ्या भाषेत मांडून दाखवणे.

२) भाषांतर म्हणजे एका भाषेतील भाव दुसऱ्या भाषेत संक्रमित करणे.

३) भाषांतर म्हणजे एका भाषेतील आशय दुसऱ्या भाषेत व्यक्त करणे.

४) भाषांतर म्हणजे एका भाषेतील मजकूर दुसऱ्या भाषेत विशद करणे.

## १०.२ भाषांतर लेखनाची तयारी

भाषांतर कौशल्य आत्मसात करण्यासाठी पुढील भाषिक घटकांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. भाषांतराशी संबंधित भाषांतील शब्दरचना, वाक्यरचना, विशिष्ट शैली आत्मसात करणे गरजेचे आहे. संबंधित भाषांचे व्याकरण, शब्दसंग्रह, म्हणी व वाक्प्रचार या घटकांचे ज्ञान असणे गरजेचे आहे. एका भाषेतून दुसऱ्या भाषेत भाषांतर करणे ही एक कला आहे. कारण प्रत्येक भाषेची प्रकृती वेगळीवेगळी असते. इंग्रजी-मराठी भाषेतील कर्ता-कर्म-क्रियापद यांचे क्रम ठरलेले आहेत. परंतु संस्कृत भाषेत त्याचे थोडे स्वातंत्र्य आहे. भाषेची घटना व प्रकृती कायम ठेवूनच भाषांतर करावे लागते. भाषांतरकाराला दोन्ही भाषेचे ज्ञान आणि भाषांतरावर प्रभुत्व असणे आवश्यक आहे. पत्येक भाषेच्या लकबी वेगळ्या असतात. त्यामुळे जसेच्या तसे भाषांतर करणे अवघड असते. इंग्रजी आणि मराठी या दोनही भाषांचा अभ्यास करताना वेगवेगळे इंग्रजी शब्द तुमच्या परिचयाचे होतात. ते शब्द आत्मसात केल्याने आपला शब्दसंग्रह वाढतो. शब्दसंग्रह जसा वाढत जातो तसे त्या भाषेतील आपले ज्ञान वाढते. त्यामुळे भाषांतर करणे सोपे जाते.

## १०.३ भाषांतराचे प्रकार

**१) मूलनिष्ठ भाषांतर**

**२) लक्ष्यनिष्ठ भाषांतर**

**१) मूलनिष्ठ भाषांतर**

'या भाषांतरप्रकारात ज्या भाषेतून भाषांतर करावयाचे आहे. ती मूलभाषा केंद्रस्थानी ठेवून भाषांतर केले जाते.' मूळ भाषेतील शब्द, वाक्य आणि शैली यांचे हुबेहूब चित्र मूलनिष्ठ भाषांतरात केले जाते.

**२) लक्ष्यनिष्ठ भाषांतर**

लक्ष्यनिष्ठ भाषांतर करताना ज्या भाषेत भाषांतर करावयाचे ती भाषा केंद्रस्थानी ठेवून म्हणजेच महत्त्वाची मानून भाषांतर केले जाते. या भाषांतर पद्धतीतील शब्द, वाक्य, शैली यांच्यात तफावत असते. मूळ भाषेतील अर्थाप्रमाणे भाषांतर केले जाते.

भाषांतर करताना लक्ष्यनिष्ठ भाषांतर करणे योग्य व सोयीचे ठरते. शब्दशः, वाक्यशः आणि मूलनिष्ठ भाषांतरात मूळ भाषेतील आशय लक्ष्य भाषेत तितक्याच परिणामकारकतेने उतरवता येत नाही. स्वैर किंवा लक्ष्यनिष्ठ भाषांतर करताना भाषांतरकाराने मूळ भाषेतील आशय लक्ष्य भाषेत आणताना ते स्वाभाविक, अकृत्रिम असे वाटेल, अशा सहजपणे करायला हवे.

**इंग्रजीचे मराठी भाषांतर :**

आपल्याला परीक्षेसाठी इंग्रजीचे मराठी भाषांतर करा असा प्रश्न असतो. भाषांतरासाठी इंग्रजी आणि मराठी या दोन भाषांमध्ये प्रभुत्व असणे गरजेचे असते. इंग्रजी ही जगातील लिहिता, वाचता, बोलण्यासाठी नि शिकण्यासाठीही सर्वात सोपी भाषा असल्याने आज जगभरात इंग्रजी भाषेचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. इंग्रजी आणि मराठी भाषेचे आपल्याला ज्ञान असावे. आपल्याला इंग्रजी उतारा मराठी भाषेत भाषांतरीत करता यावा या उद्देशाने भाषांतर हा भाषा अभ्यासाला आहे. भाषांतराचा उपयोग कोर्टकचेऱ्या, पत्रव्यवहार, धर्मग्रंथ, शिक्षणक्षेत्र, बँका, विद्यापीठे, साहित्य आणि संस्कृतीमंडळे, वृत्तपत्रे, आकाशवाणी, विविध इलेक्ट्रॉनिक्स प्रसारमाध्यमांतून केला जातो. भाषांतर करण्यासाठी ज्या भाषेतून भाषांतर करावयाचे व ज्या भाषेत करायचे त्या भाषांशी संबंधित पुढील आवश्यक घटकांचे ज्ञान भाषांतरकारास असायला हवे.

१) व्याकरण

२) शब्दसंग्रह

३) वाक्प्रचार

४) सामाजिक संकेत

५) वाङ्मयीन संकेत

६) संबंधित भाषेची वैचारिक पार्श्वभूमी

भाषांतर करत असताना भाषांतरकाराला वरील घटकांची पुरेशी माहिती असणे आवश्यक असते.

परीक्षेच्या वेळी इंग्रजी उताराचे भाषांतर करताना मूळ इंग्रजी उतारा दोन तीन वेळा चांगला वाचावा. त्यातील कठीण वाटणारे शब्द अधोरेखित करावे. सर्व उतारा वाचल्यानंतर मराठीला अनुसरून आपल्याला कशी रचना करता येईल यांचा अंदाज घेता येतो. भाषांतर करताना काही वाक्ये आहेत तशीच भाषांतर करावी लागतात तर काही मोठई वाक्ये लहान लहान मराठी वाक्यांचा आधारे भाषांतर करता येईल. मूळ उताऱ्यात जो आशय सांगावयाचा आहे त्याचा आत्मा बिघडणार नाही याचे भान ठेवून भाषांतर करावे लागते.

भाषांतर नमुना एक

## १०.४ भाषांतर नमुना

### भाषांतर नमुना १

Translation

It is very easy to acquire bad habits, such as eathing too many sweetso too much food or drinking too much fluid of any kind, or smoking. The more we do a thing, the more we tend to like doing it; and if we do not continue to do it we feel unhappy. This is called the force of habit, and the force of habit should be fought against.

**भाषांतर**

जास्त गोड पदार्थ खाणे, खूप जेवणे, कुठलेही पेय जास्त प्रमाणावर घेणे, धूम्रपान करणे यासारख्या वाईट सवयी लावून घेणे फार सोपे आहे. एखादी गोष्ट जितकी जास्त वेळा करू तितकी ती करायला आपल्याला आवडू लागते. जर आपण ती करणे सोडून दिले तर आपण दुःखी होतो. यालाच सवयीचे दडपण म्हणतात. अशा सवयीच्या दडपणाचा प्रतिकार करायला पाहिजे.

### भाषांतर नमुना २

Translation

Gandhiji said that the greatest lessons in life are learnt from children, not from learned men. A child will fearlessly try before giving up. As adults, fearing failure, We give up before we try. A child is inherently curious about the world, about relationship, about wantings to understand how things work.

**भाषांतर**

गांधीजी म्हणत असत की, जीवनातील सर्वात महान पाठ लहान मुलांकडून शिकता येतात. विद्वान माणसांकडून नव्हे? एखादे काम सोडून देण्यापूर्वी एखादे मूल निर्भयपणे प्रयत्न करीत राहते. प्रौढ असून ही आपण अपयशाच्या भीतीने प्रयत्न करण्यापूर्वीच एखादे कार्य सोडून देतो.

लहान मूल जगाविषयी, परस्परांविषयी काही गोष्टी कशा घडतात या विषय जाणून घेण्यापूर्वी, जन्मतःच चौकस असते.

## भाषांतर नमुना ३

Translation

In the spring of 1972, David was winding up four a college with top marks. So far, so good. Ready for the big try, he had applied to ten medical colleges. By ear;u April, eight ahd turned him down. Then on the ofternoon of April 27, a ninth rejection came from a medical college he had counted on the most, and dave was crushed.

**भाषांतर**

१९७२च्या वसंत ऋतूत डेव्हिड कॉलेजची चार वर्षे उत्कृष्ट गुण मिळवत संपवण्याच्या मार्गावर होता. येथपर्यंत पगती छान होती. मोठी झेप घेण्याच्या प्रयत्नात त्याने दहा वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये अर्ज केले होते. एप्रिलच्या प्रारंभीच्या दिवसात आठ महाविद्यालयांनी त्याला प्रवेश नाकारला. नंतर २७ च्या दुपारी दांडगा भरवसा असलेल्या महाविद्यालयातून त्याला नववा नकार आला, तेव्हा डेव्हि पूर्णपणे हताश झाला.

## भाषांतर नमुना ४

Translation

There was a beautiful and frangrant vilotet who lived pacidly amongst her friends, and swayed happily amidst the other flowers in a solitary garden. One morning, as her fron was embillished with beads of dew, she lifted her head and looded about; she saw a tall and handsome rose standing proudly and reaching high into space, like a burning torch an emerald lamp.

**भाषांतर**

एक सुंदर व सुगंधी व्हायोलेटचे फूल आपल्या मित्रांसह शांतपणे राहत होते आणि एका एकाकी बागेत इतर फुलांमध्ये आनंदाने डोलत होते. एका सकाळी त्याचे मस्तक दवाच्या थेंबांनी सुशोभित झाले, तेव्हा त्याने आपले डोके उंचावून आजूबाजूला पाहिले. त्याने एक उंच व देखने गुलाबाचे रोपटे गर्वाने उभे असलेले आणि पाचूच्या दिव्यावर पेटती मशाल असावी असे आकाशात उंच गेलेले पाहिले.

## भाषांतर नमुना ५

Translation

Until she was 80 years of age, mother did morning yoga everyday, swept her own room and washed her own clothes. To me success is about the sense of independence; it is about not seeing the world but seeing the light.

**भाषांतर**

वयाच्या ८० व्या वर्षापर्यंत आई दरवर्षी सकाळी योगसाधना करत असत. स्वतःची खोली झाडून साफ करीत असे आणि तिचे स्वतःचे कपडे धूत असे. माझ्या मते, यश स्वावलंबनाच्या जाणवित असते, ते जग पाहण्यात नसते, तर पकाश पाहण्यात असते.

## भाषांतर नमुना ६

<u>Translation</u>

Pune :

While buoyancy in vehicle sales in India May be heartening fopr the industry and economy, it is also leading to a rise in fatal road accedents across the country. In fact, India witnesses the second highest number of road accedent fatalities globally, with China topping the dubious list. While 90% of road crashes globally were attributed to "human error".

**भाषांतर**

पुणेः

उद्योग व अर्थव्यवस्थेला भारतातील वाहन विक्रीची तेजी उत्साहवर्धक असली, तरी ती देशभरातील रस्त्यावरील प्राणघातक अपघातांचे प्रमाण वाढण्यास कारणीभूत होत आहे. वास्तविक पाहता, रस्त्यांवरील अपघातांच्या सवोच्च मृत्युसंख्येच्या शंकास्पद यादीत संपूर्ण जगात चीननंतर भारताचा दुसरा क्रमांक लागतो. जागतिक आरोग्य संघटनेने (WHO) जगातील ९० रस्त्यावील अपघातांचा संबंध मानवी प्रमादांशी जोडला आहे.

## भाषांतर नमुना ७

<u>Translation</u>

On the terrible Tuesday, the 29th July 2006 the sky suddenly become an ocean and poured turbulent waters on Mumbai to transform all the pylanes into streams : lanes inly the tributaries of the mighty river Brahmaputra kbnows for flash floods of enormous intensity.

**भाषांतर**

२६ जुलै, २००५ च्या त्या भयंकर मंगळवारी आकाश अचानकपणे महासागर बनले. आणि त्याने मुंबईवर बेसुमार पाऊस ओतून गल्लीबोळांचे प्रवाहात व रस्त्याचे नद्यात रुपांतर केले आणि सर्व रस्ते अचानक येणाऱ्या झंझावाती पुराच्या प्रचंड तडाख्याकरता प्रसिद्ध असलेल्या बलाढ्य ब्रह्मपुत्रेच्या उपनद्यांसारखे झाले.

## भाषांतर नमुना ८

<u>Translation</u>

It's high enough to cut across roads, rivers and high tension cables, but not so high that clouds obscure vies. People don't look like ants and one can make out that buses are read in maharashtra and yellow in Tamilnadu. We reaffirmed that India is the msot beautiful place in the world, the most colourful too.

**भाषांतर**

ते उड्डाण रस्ते, नद्या आणि मोठ्या विद्युतदाबाच्या तारा ओलांडून जाण्याएवढे नक्कीच उंच असते. परंतु ढगामुळे दृश्य धूसर (अंधूक) होतील एवढेही ते उंच नसते. माणेस मुंग्यांएवढी लहान दिसत नाहीत आणि महाराष्ट्रातील बस लाल आहेत आणि तामिळनाडूमधील बस पिवळ्या आहेत, हे एखाद्याला सहज समजू शकते. भारत हा जगातील सर्वात सुंदर आणि सर्वात रंगीबेरंगी सुद्धा देश आहे, याचा आम्ही पुनः प्रत्यय घेतला.

## भाषांतर नमुना ९

Translation

A state of laconic disengagement from the everyday routine is vital for creativity, and of course happiness. Now, by no means is the merit of good old 'hard work' being dismissed outright. As anyone who appeared ill-prepared for an examination will testify. Only sweat could effectively replace that uniquely bitter-sweet agony.

**भाषांतर**

दैनंदिन व्यापारातून अल्पकाळ मिळवणारा विसावा सृजनशिलतेकरता आणि अर्थातच आनंदाकरत खूप महत्त्वाचा असतो. म्हणून कोणत्याही परिस्थितीत पुरातन काळापासून मान्यता पावलेले परिश्रमाचे महत्त्व, पूर्णपणे फेटाळून लावता येणार नाही. जसे जो कोणी अपूर्ण तयारी करून परीक्षेला बसेल. त्याला खात्री पटेल की, फक्त घामच त्या विलक्षण प्रकारच्या कडू-गोड व्यथेची जागा घेऊ शकतो.

## भाषांतर नमुना १०

Translation

No so long ago, the dada of mass culture, Marshall McLuhan, said :"We become what we hehold." In the era of wireless, we become what we hold. Flaunt a mobile phone and you become a symbol of the neo-nomadic tribe; speak SMS and you add status to the symbol. You bring grandeur to the gadget.

**भाषांतर**

अलीकडच्या काळात सामान्य जनतेच्या मानसिकतेचे जाणकार (दादा) समजले जाणारे मार्शल मॅकलुहान म्हणाले,''आम्ही जे पाहतो त्यानुसार आम्ही घडत असतो.'' वायरलेसच्या या कालखंडात जे आपण स्वीकारतो तसे आपण होतो. सेलफोनचे प्रदर्शन करता आणि तुम्ही नव्या भटक्या जमातीचे प्रतीक बनता, एसएमएसच्या भाषेत बलता आणि त्या प्रतीकांची प्रतिष्ठा वाढवता. अशा प्रकारे तुम्ही त्या साधनाला महानता (महत्त्व) मिळवून देता.

## भाषांतर नमुना ११

Translation

"55-6 reports that it is presently between the orbits of Earth and Mars and is heading towards us. I will arrange to display the orbit and it parameters on your TV screen," the chairman said while punching a few buttons on his terminal.

**भाषांतर**

यूएसएफने जगातील सर्व देशांच्या अवकाश प्रतिनिधींची परिषद भरवली. परंतु ती अज्ञात उडणारी वस्तू आपण सोडल्याचे सर्वांनी नाकारले. एसएस-६०ने, ती वस्तू सध्या पृथ्वी व मंगळ यांच्या भ्रमणकक्षेत असल्याचे व लवकरच ती पृथ्वीच्या दिशेने येत असल्याचे कळवले. डॉ. सिंग या शास्त्रज्ञाने त्या यानाबद्दल कोणती कारवाई करावी याविषयी आपले मत सांगितले.

## भाषांतर नमुना १२

Translation

And so the Trojan horse was prevented from achieving its objective. The anti-PIONEER-10 was pushed further away from the Earth and destroyed. The gigantic Explosion was visible to the naked eye, even in board daylight. Fortunately there were no repercussions felt on the Earth.

**भाषांतर**

ते वस्तूविरोधक यान पृथ्वीच्या-सर्वनाशाला कारणीभूत होणार होते. त्यातून निर्माण होणाऱ्या उर्जेने विध्वंस व नरसंहार होणार होता. ते ताबडतोब नष्ट करण्याचा निर्णय झाला. त्या यानाला पृथ्वीपासून दूर ढकलून ते नष्ट करण्यात आले. प्रचंड स्फोट झाला. परंतु त्याचे कोणतेही दुष्परिणाम पृथ्वीवर झाले नाहीत.

## भाषांतर नमुना १३

Translation

President Kalam has often proclaimed the goal of becoming a developed country by 2020. This is in itself an ambitious and laudatory goal, but we may want to look even beyond this. These desires of military might and Economic clout are probably reactions to our history of prowerlessness and poverty.

**भाषांतर**

आपले भूतपूर्व राष्ट्रपती अब्दुल कलाम यांनी २०२० सालापर्यंत भारत पूर्ण विकसित होण्याचे राष्ट्र होण्याचे ध्येय वारंवार घोषित केले आहे. हे मूळातच एक महत्त्वाकांक्षी आणि स्तुत्य ध्येय आहे. परंतु आपल्याला याही पलिकडे दृष्टिक्षेप टाकण्याची गरज आहे. लष्करी सामर्थ्य आणि आर्थिक प्रभाव यांची अभिलाषा या बहुधा आपल्या ऐतिहासिक निर्बलता (दुबळेपणा) आणि दारिद्र्याविरुद्ध असलेल्या प्रतिक्रिया आहेत.

## भाषांतर नमुना १४

Translation

India carries a historical boggage of caste discrimination and illiteracy, and more recent ills like communal probles, crime and corruption. For such a society, mere economic development at a micro-level will not be adequate, if anything, it may intensify some of its woes, particularly crime. We, therefore, need a more holistic goal: a definition of development that is very broad and multidimensional, or a vision that goes beyond development.

**भाषांतर**

भारत वर्णभेद आणि निरक्षरतेचे ऐतिहासिक ओझे वाहत आहे आणि त्यात अलिकडच्या जातीय समस्या, गुन्हेगारी आणि भ्रष्टाचार यांसारख्या अनिष्ट गोष्टींची भर पडली आहे. विशाल दृष्टिकोनातून पाहता, अशा समाजाकरता केवळ आर्थिक विकास पुरेसा नाही. तसेच काही घडेल तर त्या समाजातील काही संकटे, विशेषतः गुन्ह्यांचे प्रकार अधिक उग्र रुप धारण करतील. म्हणून आपल्याला अधिक सर्वंकष (व्यापक) ध्येयाची गरज आहे. विकासाच्या उदार, बहुउद्देशिय व्याख्येची किंवा विकासाच्याही पलिकडे पोहचणाऱ्या दूरदृष्टीची गरज आहे.

## भाषांतर नमुना १५

Translation

As a step down from my overnight jonurney on the Mahalaxmi Express, I am at one of the oldest reilway buildings still surviving. And I am to stay at the circuit House, which is a heritage structure too.

**भाषांतर**

महालक्ष्मी एक्स्प्रेसचा रात्रभरचा प्रवास करून खाली उतरले. तेव्हा मी अजून टिकून असलेल्या रेल्वेच्या सर्वात पुरातन इमारतीपैकी एका इमारतीत उभी होते. आणि मला सांस्कृतिक वारसा म्हणून जपलेल्या सर्किट हाऊस या इमारतीतच मुक्काम करायचा होता.

## भाषांतर नमुना १६

Translation

My mother began developing a contaract in her eyes when I was very small. At that time, the eldest among my brothers got a teaching job at the University in Bhubaneshwar and also had to prepare for the civil sevices - exmination. So, it was decided that my mother would move to cook for him. As her appendage, I had to move, too.

**भाषांतर**

मी खूप लहान असताना, माझ्या आईच्या डोळ्यात मोतीबिंदू वाढू लागला. त्यावेळी माझ्या सर्वात मोठ्या भावाला भुवनेश्वर विद्यापीठात शिक्षकाची नोकरी लागली आणि त्याला मुलकी खात्यातील नोकरीसाठी परीक्षेची तयारीसुद्धा करायची होती. त्याचा स्वयंपका करण्याकरता माझ्या आईला तिकडे पाठवण्याचे ठरले. तिचे शेपूट म्हणून मलासुद्धा तिकडे मुक्काम हलवावा लागला.

## भाषांतर नमुना १७

Translation

Sometimes life hits you in the head with a brick. Don't lose faith. The only way to do great work is to love what you do. If you haven't found it yet, Keep looking. Don't settle. And most important have the courage to follow your heart and intuition.

**भाषांतर**

काही वेळा जीवनात बिकट परिस्थिती निर्माण होते (अशावेळी) विश्वास डळमळू देऊ नका. महान कार्य करण्याचा एकच मार्ग आहे. आणि तो म्हणजे तुम्ही जे काही कराल त्यावर प्रेम करा. तुम्हाला तो (मार्ग) सापडला नसेल, तर तो शोधत रहा. विसावू नका. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे स्वतःच्या आणि अंतःपेरणेनुसार वागण्याचे धाडस करा.

## भाषांतर नमुना १८

Translation

School friendships are taken very seriously. For man are social creatures and like to have friends. Our school friends often remain loves and trusted throughout all our life. There is no greater pleasure than to attend a gathering of old pupils of the same school. We remember that James played for the football Eleven, that Bill was our caption at cricket. What a day it was thirty years ago when he made a century against lancing! Our hearts warm still as we think of that exciting match and how we carried him shoulder - high from the field, but in hand.

**भाषांतर**

माणसे ही समाजप्रिय प्राणी असल्यामुळे आणि त्यांना मित्रांची आवड असल्याने शाळेतल्या ओळखी फार जपल्या जातात. आपले शाळासोबती आपल्याला आयुष्यभर प्रिय नि विश्वासू वाटत असतात. एखाद्या शाळेच्या माजी विद्यार्थ्यांया स्नेहसंमेलनास उपस्थित राहण्यासारखा आनंद नसतो. जेम्स आपल्या फुटबॉल संघात खेळल्याचे आणि बिल क्रिकेट संघाचा कप्तान असल्याचे आपल्याला आठवते. त्याने लान्सिंगविरुद्ध शतक झळकावले तो तीस वर्षांपूर्वीचा दिवस किती अविस्मरणीय! तो रोमहर्षक सामना आणि हातातली बॅट उंचावणाऱ्या बिलला खांद्यावर घेऊन आपण मैदानाबाहेर कसे नेले याच्या आठवणीने आजही अंतःकरण उचंबळून येते.

## १०.५ संदर्भ सूची

१) व्यावहारिक मराठी - प्रा. डॉ. सयाजीराजे मोकाशी

२) व्यावहारिक मराठी - डॉ. लिला गोविलकर, डॉ. जयश्री पाटणकर, स्नेहवर्धन पब्लिकेशन हाऊस पुणे.

३) व्यावहारिक मराठी -डॉ. कल्याण काळे, निराला प्रकाशन पुणे

४) व्यावहारिक मराठी -ल.रा. नसिराबादकर, फडके बुक हाऊस, कोल्हापूर

५) व्यावहारिक मराठी - भाग-२ संपादक डॉ. साहेब खंदारे, निर्मल प्रकाशन नांदेड

६) व्यावहारिक मराठी -संपा. स्नेहल तावरे, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.

७) सुबोध मराठी व्याकरण लेखन व वृत्तालंकार – प्रा. चंद्रहास जोशी

८) मराठी शुद्धलेखन प्रदिप - मो. रा. वाळंबे.

❖ ❖ ❖

# ११

# अर्जलेखन

**घटक रचना**

११.० प्रस्तावना

११.१ अर्जलेखन करताना घ्यावयाची काळजी

११.२ अर्ज लेखनाचे नमुने

११.३ संदर्भ सुची

## ११.० प्रस्तावना

अर्जलेखन हा प्रत्येकाच्या दृष्टीने महत्वाचा भाग आहे. कारण विविध कारणांसाठी आपल्याला अर्ज करावा लागतो. विविध मागण्या, विविध कागदपत्र, दाखले, आणि नोकरीसाठी अर्ज करावा जागतो. विविध कारणासाठी अर्ज लेखन करण्याची पध्दती वेगवेगळी आहे. अर्जलेखनाच्या विविध पध्दतीचा परिचय व्हावा यासाठी अर्ज लेखन हा भाग आपल्याला अभ्यासक्रमाला लावण्यात आलेला आहे.

अर्जलेखन हा सर्वांच्याच दृष्टीने महत्वाचा प्रकार आहे. अर्ज हा शब्द उर्दू भाषेतून मराठीमध्ये आला आहे. अर्ज याचा अर्थ विनंती असा आहे. अर्जलेखन करणे म्हणजे एक प्रकारे विनंतीपत्र लिहिणे होय. अशा अर्जलेखनाच्या माध्यमातून अर्ज करणारा त्याला आवश्यक असलेल्या बाबीची विनंती अर्ज लेखनाव्दारे करीत असतो. शाळा-महाविद्यालयात प्रवेश मिळण्यासाठी अर्ज लिहिणे असो की व्यवसाय-धंद्यासाठी कर्ज मिळावे म्हणून अर्ज लिहिणे असो. नोकरीसाठी केले जाणारे अर्ज लेखन महत्वाचे आहेच. इथे आपणांस नोकरीसाठी करावयाचे, केले जाणारे अर्जलेखन प्रामुख्याने अभ्यासावयाचे आहे.

प्रत्येक शिक्षित उमेदवार आपणासाठी योग्य अशा नोकरीसाठी प्रयत्न करतो. तेव्हा त्याला ती नोकरी मिळवून देण्यात अत्यंत महत्वाची भूमिका बजावणारा घटक म्हणजेच त्याने नोकरीसाठी लिहिलेला अर्ज. अर्ज हा देणारा नि घेणारा या दोन घटकांना सांधणारा दुवा आहे, जोडणारा पूल आहे. योग्य नोकरीच्या शोधात असणारा उमेदवार नि योग्य व लायक उमेदवारांच्या शोधात असणारा नोकरी देणारा वर्ग, यांना एकत्र आणण्याचे काम अर्जलेखन करते.

अर्ज लेखनात विविध स्वरुपाची मागणीपत्रे, तक्रारपत्रे, विनंतीपत्रे यांचाही समावेश होतो. व्यवहारात कोणत्याही कारणाने पत्राव्दारे केलेली विनंती, मागणी किंवा तक्रार म्हणजे अर्जलेखनच असते. असे असले तरी व्यावहारीक परिभाषेत अर्ज लिहिणे म्हणजे नोकरी मिळविण्यासाठी अर्ज लेखन असाच अर्थ घेतला जातो. विविध करणांनी अर्जलेखन केले जाते. नोकरीसाठी अर्जलेखन करणारी व्यक्ती नोकरी लागल्यानंतर, रजेसाठी, कर्जासाठी अर्जलेखन करते. सामान्य माणूस शिधापत्रिका, वाहन परवाना मिळावा यासाठी अर्जलेखन करतात.

अर्ज लिहिणाऱ्या व्यक्तीने अर्ज स्वतःच्या हस्ताक्षरात लिहायला हवा अशी अपेक्षा असते. त्यातून अप्रत्यक्षरित्या अर्जदाराच्या व्यक्तिमत्वाची कल्पना येण्यास मदत होते. परंतु संगणकयुगात अर्जलेखनही संगणकीय प्रक्रियेतून जाताना दिसते. अर्जलेखन करताना अर्जदाराने हस्ताक्षर, शुध्दलेखन, नीटनीटकेपणा याकडे लक्ष द्यावे. अर्जात खाडाखोड असू नये. नोकरी मिळण्याच्या प्रक्रियेत अर्ज मोठी भूमिका पार पाडत असतो याचे भान अर्जदाराने ठेवायला हवे.

अर्जाचे अनेक प्रकार आहेत. नोकरीसाठी, रजेसाठी, कर्जासाठी, शिफारसपत्रासाठी अर्जलेखन केले जाते. एखाद्या संस्थेचे, क्लबचे सदस्य होण्यासाठी अर्ज लिहिला जातो. असे अर्ज विनंती, मागणी अशा स्वरुपाचे असतात. शासन व्यवस्थेमध्ये वेगवेगळ्या कारणांनी केल्या

अर्ज लेखनासह वैयक्तिक, शैक्षणिक, अनुभवविषयक माहिती पाठवताना सध्याच्या परिस्थितीत अर्जातील माहितीसह अर्जदार स्वतःच्या जीवनालेख म्हणजेच सी.व्ही. किंवा

जीवनवृत्तांत म्हणजे बायोडाटा पाठविला जातो. बऱ्याचदा असा सी.व्ही./जीवनवृत्तांत संगणकाच्या मदतीने तयार केलेला असतो व तो सतत अद्ययावत केला जातो.

पारंपारिक अर्जासह अधिक माहिती पुरविणारा असा सी.व्ही.देताना अर्जात दिलेल्या माहितीसह इतर उल्लेखनीय बाबी, कामगिरी, उल्लेखनिय यश, पारितोषिके, मान-सन्मान, अपवादात्मक कार्य, विविध उपक्रमांतील सहभाग, उपस्थिती, प्रकाशने इ. माहिती अनुषंगाने द्यावी. अर्ज कुठे, कशासाठी करतो आहोत हे लक्षात घेऊन अर्जदाराने आपल्या सी.व्ही.चा योग्य पध्दतीने उपयोग करावा.

पारंपरिक अर्जलेखन पध्दतीसह अलिकडे अनेक विभाग, शासकिय निमशासकिय कार्यालये, संस्था विहित नमुन्यातील अर्ज पुरवितात. अशावेळी अर्जदाराने आवश्यक तेवढी पुरेशी व समर्पक माहिती अर्जात द्यायला हवी. अशा अर्जासह आवश्यकतेनुसार आपला सी.व्ही./जीवनवृत्तांत द्यायला हरकत नाही. परंतु तसा तो देता येणे शक्य आहे का हे अगोदर पाहावे.

## ११.१ अर्जलेखन करताना घ्यावयाची काळजी

**अर्जदाराने अर्जलेखनात पुढील घटकांची मांडणी करावी.**

१. अर्जदाराचे पूर्ण नांव -

२. अर्जदाराचा पूर्ण पत्ता -

३. फोन नं, मोबाईल नं, इमेल

४. दिनांक

५. अर्ज ज्यांना करावयाचा त्यांचा हुद्दा, नांव, पत्ता

६. अर्जाचा विषय

७. संबोधन : महोदय, महोदया इ.

८. अर्जाचा संदर्भ

९. अर्जातील वैयक्तिक माहिती : पूर्ण नांव, जन्मतारीख

१०. शैक्षणिक पात्रता

११. इतर गुणवत्ता

१२. अनुभव

१३. विशेष उल्लेखनीय कार्य/बाबी

१४. समारोप

१५. समारोपाचा मायना : आपला/आपली विश्वासू

१६. सहपत्रे

अर्ज नोकरीसाठी असेल तर वरील सर्व बाबी थोड्याफार फेरफारासह अर्जामध्ये नमूद करणे आवश्यक ठरेल. अर्जाच्या स्वरुपानुसार अर्जातील माहितीमध्ये बदल होऊ शकतील. सध्याच्या जीवघेण्या स्पर्धेच्या युगात नोकरी मिळविण्याच्या स्पर्धेत सर्वात पुढे रहायला हवे. त्यासाठी व्यक्तिमत्व विकास घडवून स्वतःला काळाच्या गतीबरोबर धावते ठेवायला हवे. नोकरीसह कोणताही अर्ज हा अर्जदाराच्या व्यक्तिमत्वाचे प्रतिबिंब असतो. उमेदवाराच्या शोधातील कुणाही व्यक्तीला अर्जदाराच्या व्यक्तिमत्वाचे पहिले दर्शन अर्जातूनच होत असते. ते चांगलेच घडावे याचे भान ठेवून आपण आपला अर्ज अद्ययावतरित्या वाठवायला हवा. तो तसा होण्यासाठी अर्जलेखनाचाही अभ्यास व सराव आवश्यक आहे. तो पुढील काही नमुना अर्जांच्या मदतीने होऊ शकेल.

## ११.२ अर्ज लेखनाचे नमुने

प्रेषक
निलेश पांडुरंग आदारी
कोकरे, ता. चंदगड
जि. कोल्हापूर पिन ४१६५०९

प्रति,
मा. प्राचार्य,
किर्ती कला वाणिज्य महाविद्यालय,
दादर (प.) मुंबई.

विषय : लिपीक पदाकरता अर्ज

महोदय,

आपल्या महाविद्यालयात दै.लोकसत्ता, पुणे या वर्तमानपत्रात दि.०९/०८/२०१३ रोजी प्रसिध्द झालेल्या जाहिरातीनुसार मी लिपीक पदाकरीता अर्ज करीत आहे.

माझी शैक्षणिक पात्रता व इतर माहिती पुढीलप्रमाणे

पूर्ण नाव - निलेश पांडुरंग आदारी
कायमचा पत्ता - कोकरे, ता.चंदगड, जि. कोल्हापूर
जन्मतारीख - १४ ऑक्टोबर, १९७८
इतर उपक्रम - वक्तृत्व, वादविवाद स्पर्धात सहभाग, कथा-कविता लेखन इ.
अनुभव - दोन वर्ष दोन महिने
शैक्षणिक पात्रता कमला कॉलेज कोल्हापूर येथे कनिष्ठ लिपीक म्हणून अनुभव

| परीक्षेचे नाव | विषय | परिक्षा मंडळ / विद्यापीठ | श्रेणी | गुण | महिना व वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| एस.एस.सी. | सर्व | पुणे | प्रथम | ६५% | जून १९९६ |
| एच.एच.सी. | सर्व | पुणे | प्रथम | ६३% | जून १९९८ |
| बी.ए. | मराठी | पुणे | प्रथम | ६१% | जून २००१ |
| टायपींग | ४० स्पीड | महाराष्ट्र शासन | पास | ६०% | जून २००३ |

माझी माहिती वरीलप्रमाणे सत्य आहे. आपण आपल्या संस्थेत सेवा करण्याची संधी दिल्यास मी ती समर्थपणे व सक्षमपणे पार पाडेन.

सोबत उपरोक्त गुणवत्तेच्या सत्यप्रती जोडलेल्या आहेत.

कळावे,

आपला विश्वासू
सही/-
(नांव )

सत्यप्रती

१. दहावी, बारावी प्रमाणपत्रे.
२. बी.ए., एम.ए.प्रमाणपत्रे.
३. सेट, एम.फिल्.प्रमाणपत्रे.
४. स्पर्धामधील प्रमाणपत्रे.

## अर्जलेखनाचा नमुना २

अर्जदाराचे पूर्ण नाव : विदिशा दौलत कांबळे
पत्ता - डी/३०२, महालक्ष्मी दर्शन
एम.आय.डी.सी.रोड, डोबिवली (पुर्व),
जि. ठाणे.
दिनांक

प्रति,

मा.प्राचार्य

डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय

महाड, जि. रायगड,

विषय : लिपीक पदासाठी अर्ज.

महोदय,

आपल्या संस्थेची/महाविद्यालयाची दै.सकाळ, दि.०९/०९/२००९ मधील लिपीक पदासाठीच्या जाहिरातीला अनुसरुन सदर जागेसाठी अर्ज करीत आहे. माझी वैयक्तिक व शैक्षक पात्रता पुढीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| नांव | विदिशा दौलत कांबळे |
| पत्ता | डी/३०२, महालक्ष्मी दर्शन एम.आय.डी.सी.रोड, डोबिवली (पुर्व), जि. ठाणे. |
| मोबाईल नं. | ९९९६६४४५४६ |
| ईमेल | kamblevidisha@gmail.com |
| जन्मदिनांक | २८-०३-१९९० |
| इतर गुणवत्ता | वक्तृतस्पर्धा, वादविवादस्पर्धा, कन्नड टंकलेखन, |
| शैक्षणिक पात्रता | बी.एस.सी., मराठी ४० स्पीड, इंग्रजी ५० स्पीड, टंक लेखन |
| अनुभव | सेवा सदन कॉलेज, उल्हास नगर येथे २ वर्ष लिपीक म्हणुन कामाचा आनुभव |
| विशेष उल्लेखनीय बाबी | |

माझी माहिती वरीलप्रमाणे असून आपल्या संस्थेतील सदर पदावर काम करण्याची संधी मिळावी हि विनंती.

सोबत उपरोक्त प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती जोडलेल्या आहेत.

कळावे,

आपला/आपली विश्वासू,

सही .
दिनांक
नांव

प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती

१. एस.एस.सी गुणपत्रक/ प्रमाणपत्र व झेरॉक्स
२. एच.एस.सी गुणपत्रक व प्रमाणपत्र
३. बी.एस.सी गुणपत्रक व प्रमाणपत्र
४. मराठी ४० स्पीड टंकलेखन प्रमाणपत्र
५. इंग्रजी ५० स्पीड टंकलेखन प्रमाणपत्र
६. सेवा सदन कॉलेज, उल्हास नगर येथील अनुभव प्रमाणपत्र

**रजेसाठी अर्जलेखन  नमुना**

प्राध्यापकाचे नांव
विषय
दिनांक

प्रति,
मा.प्राचार्य,
महाविद्यालयाचे नांव

विषय :- रजेसाठी अर्ज.

महोदय,

मी,  आपल्या महाविद्यालयात मराठीचे अध्यापन करीत असून मला दिवसांची रजा मिळावी. माझी चालू शैक्षणिक वर्षातील मागील रजा  दिवसांची आहे.

तरी, सदर रजा मंजूर व्हावी, ही विनंती.

कळावे,

आपला/आपली विश्वासू,

**संपादक पदासाठी अर्जलेखन**

श्रीधर विठ्ठल कामत

यशविकास -३

पर्वती, पुणे -२६.

दि. १२ डिसेंबर, २००९

प्रति,

मा.संचालक,

दै. लोकसत्ता,

पुणे.

विषय :- संपादक पदासाठी विनंती अर्ज.

महोदय,

मी, श्रीधर विठ्ठल कामत, पर्वती, पुणे चा रहिवासी आहे. पुणे विद्यापीठाची एम.ए.(समाजशास्त्र) ही पदवी प्रथम वर्गात उत्तीर्ण झालो आहे. मला वृत्तपत्रकारितेची आवड असल्यामुळे मी, वृत्तपत्रकारितेच्या सर्व परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालेलो आहे. तसेच मला प्रवासाचा छंद असून समाजकारणाची, राजकारणाची मला आवड आहे.

माझ्या शालेय व महाविद्यालयीन जीवनात मी, विविध वक्तृत्व, वादविवाद, निबंध स्पर्धेत सहभागी होऊ असे आणि अनेक स्पर्धात चांगले यश मिळविले आहे.

महोदय, आपण, आपल्या दैनिकातील संपादक पदासाठी माझ्या विनंती अर्जाचा सहानुभूतीपूर्वक विचार करावा. सदर पदासाठी माझी निवड झाल्यास मी, माझी जबाबदारी अत्यंत सचोटीने, प्रामाणिकपणे, वृत्तपत्रकारितेवरील निष्ठेने, माझ्या कर्तव्याशी एकनिष्ठ राहून जबाबदारीने पार पाडेन, असा विश्वास आपणास देत आहे.

सोबत, मी माझा बायोडाटा जोडलेला आहे.

आपला विश्वासू,

सही

दिनांक

नांव -

## ११.३ संदर्भ सुची


१) व्यावहारिक मराठी - प्रा. डॉ. सयाजीराजे मोकाशी

२) मराठी शुद्धलेखन प्रदिप - मो. रा. वाळंबे.

३) व्यावहारिक मराठी -डॉ. कल्याण काळे, निराला प्रकाशन पुणे

४) व्यावहारिक मराठी -ल.रा. नसिराबादकर, फडके बुक हाऊस, कोल्हापूर

५) व्यावहारिक मराठी - भाग-२ संपादक डॉ. साहेब खंदारे, निर्मल प्रकाशन नांदेड

६) व्यावहारिक मराठी -संपा. स्नेहल तावरे, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.

९) सुबोध मराठी व्याकरण लेखन व वृत्तालंकार — प्रा. चंद्रहास जोशी

१०) व्यावहारिक मराठी - डॉ. लिला गोविलकर, डॉ. जयश्री पाटणकर, स्नेहवर्धन पब्लिकेशन हाऊस पुणे.


❖ ❖ ❖

# १२

# इतिवृत्तलेखन

**घटक रचना**

१२.० प्रस्तावना

१२.१ इतिवृत्त लेखनाचे दोन प्रकार

१२.१.१ अहवालात्मक इतिवृत

१२.१.२ वृतांत्मक इतिवृत

१२.१.३ अहवालात्मक इतिवृत नमुना

१२.१.४ वृतांत्मक इतिवृत नमुना

१२.२ संदर्भ सुची

## १२.० प्रस्तावना

इतिवृत्त लेखन म्हणजे एखाद्या संस्थेच्या सभेत झालेल्या कामकाजाची, सभेत घेतलेल्या निर्णयाची लिखित स्वरुपातील नोंद. ही नोंद झालेल्या सभेची लिखित स्वरुपातील पुरावा असतो.

सहकारी, औद्योगिक सांस्कृतिक आणि शासकीय संस्थांमध्ये निरनिराळ्या कारणासाठी सभा किंवा संस्थांमधील प्रमुखाची बैठक घेतली जाते. त्या सभेत किंवा बैठकीतील सविस्तर माहिती. इतिवृत्त लेखनात केली जाते. थोडक्यात सभेतील सविस्तर माहिती मुद्देसूद लेखन इ. करणे म्हणजे इतिवृत्त लेखन.

इतिवृत्त नोंद करणाऱ्या संस्था

**१) ग्रामपंचायती**
**२) पंचायत समिती**
**३) जिल्हा परिषद**
**४) विविध कार्यकारी सेवा संस्था**
**५) साखर कारखाने**
**६) सूत गिरणी**
**७) सार्वजनिक मंडळे**
**८) औद्योगिक क्षेत्राकील संस्था**
**९) रोटरी क्लब**
**१०) सार्वजनिक उत्सव मंडळे**
**११) सेवाभावी संस्था**
**१२) सांस्कृतिक संस्था**
**१३) साहित्यिक संस्था**

इतिवृत्त लेखन, शासकीय सहकारी आणि सांस्कृतिक संस्थामध्ये केले जाते. खाली नमूद केलेल्या प्रसंगाच्या निमित्ताने इतिवृत्त लेखन केले जाते.

**१) संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे सादर करण्यासाठी**
**२) संस्थेत निर्माण झालेल्या समस्या दूर करण्यासाठी**
**३) विशिष्ट प्रश्नाच्या संदर्भात नियुक्त केलेल्या चौकशी समितीचे निष्कर्ष मांडण्यासाठी**
**४) नव्याने व्यवसाय, उद्योग वा उपक्रम सुरु करण्यासाठी त्या क्षेत्राच्या प्राथमिक पाहणीच्या निमित्ताने**
**५) संस्थेच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी**
**६) एखादी परिषद वा चर्चासत्र यामध्ये झालेल्या ऊहापोहाचा तपशील सादर करण्यासाठी**
**७) संस्थेचा कामाची प्रगती आणि भविष्यकाळातील प्रगतीचा वेध घेण्यासाठी**

अशा रीतीने विविध कारणांसाठी इतिवृत्ते लिहिली जातात. इतिवृत्त लेखनाचे स्वरूप उद्दिष्टानुसार भिन्न भिन्न प्रकारचे असते.

## १२.१ इतिवृत्त लेखनाचे दोन प्रकार :

**१) अहवालात्मक इतिवृत्त**

**२) वृत्तात्मक इतिवृत्त**

**१) अहवालात्मक इतिवृत्त**

अहवालात्मक इतिवृत्त म्हणजे विशिष्ट हेतूसाठी तज्ज्ञमार्गदर्शकांच्या सल्ल्याने केलेले लेखन म्हणजे अहवालात्मक इतिवृत्त लेखन असे म्हणतात, यामध्ये सुद्धा दोन प्रकार पडतात.

१) वस्तुनिष्ठ किंवा माहितीपर

२) चिकित्सक

माहितीपर इतिवृत्तामध्ये विशिष्ट घटनेच्या संदर्भात किंवा निश्चित केलेल्या उद्दिष्टांच्या संदर्भात संकलित केलेल्या माहितीचे निवेदन असते.

तर चिकित्सक इतिवृत्तामध्ये संकलित माहितीच्या निवेदनाबरोबर त्या माहितीचे विश्लेषण आणि मूल्यमापन करून निष्कर्ष काढलेले असतात. क्वचित त्या निष्कर्षाच्या आधारे काही शिफारशी वा उपाययोजनाही सूचविलेल्या असतात.

**अहवालात्मक इतिवृत्ताचे स्वरुप**

- इतिवृत्तलेखन म्हणजे घटना, सर्वेक्षण, माहिती, निरिक्षण इत्यादींचे केलेले औपचारीक वस्तुनिष्ठ वर्णन ते विशिष्ट पद्धतीने मांडलेले असते.
- इतिवृत्ताचा वाचक हा संबंधित संस्थेचा सभासद, सदस्य, संचालक, कार्यकारी अधिकारी असतो.
- इतिवृत्तलेखनासाठी साधनसामग्री गोळा करावी लागते. ही साधनसामग्री विशिष्ट कार्यालयीन तांत्रिक पद्धतीनेच मिळवावी लागते. मिळविलेल्या सामग्रीचा आणि ती मिळविण्यासाठी योजिलेल्या प्रक्रियेचा निर्देश इतिवृत्तलेखनात असावा लागतो.
- मिळविलेल्या साधनसामुग्रीवरून इतिवृत्त लेखकाने काही काढायचे असतातय
- इतिवृत्त लेखन हे पूर्णतः वस्तुनिष्ठ, काटेकोर पद्धतीने केलेले असते.

➢ **अहवालात्मक इतिवृत्ताचे लेखन करण्याची पद्धत**

१. इतिवृत्ताचे शीर्षक

२. ज्या आदेशानुसार इतिवृत्तलेखन केले जात आहे. त्या आदेशाचा क्रमांक व दिनांक

३. समितीची रचना स्पष्टपणे मांडावी. उदा. सभासदांची नावे, निमंत्रक

४. इतिवृत्त लेखनाची व्यापता व मर्यादा निश्चित करव्यात.

५. मुख्य मजकूर लिहावा.

६. माहितीचे विश्लेषण करावे.

७. शिफारस मांडावी. उदा. तज्ज्ञ व्यक्ती किंवा नेमलेली समिती शिफारस करतात.

८. समारोपांमध्ये संबंधित माहिती संकलन करताना. ज्या व्यक्तीची मदत लाभली आहे. अशा व्यक्तीचे ऋणनिर्देश मानावेत.

९. समारोप

१०. इतिवृत्तलेखकाचे नाव सह्या दिनांक आणि स्थळ नमूद करावे.

११. परिशिष्टमध्ये तक्ते, आलेख, नकाशेष आकृत्या, कागदपत्रे, यांचा उल्लेख करावा.

**अहवालात्मक इतिवृत्त नमुना एक**

**'रुची' लोणचे उत्पादन करणाऱ्या कंपनीने भविष्यात बाजारपेठेत आपल्या उत्पादित मालाला मागणी वाढावी यासाठी नेमलेल्या अभ्यास समितीने सादर केलेला अहवालात्मक इतिवृत्त**

कोल्हापूर

दि. १५ नोव्हेंबर २०११

**अध्यक्ष**

**'रुची' प्रा. लि. कंपनी**

**महाद्वार रोड.**

**कोल्हापूर**

महोदय,

दिनांक १० ऑक्टोबर २०११ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेत भविष्यात आपल्या रुची लोणच्याची मागणी वाढावी यासाठी अभ्यास करण्यासाठी डॉ. शाम यादव, डॉ. विश्वास मोरे, डॉ. प्रकाश जाधव आमच्या तिघांच्या समितीच्यावतीने विविध शहरातील बाजारपेठांचा सर्व्हे करुन नेमलेल्या समितीमधील आम्ही तिघेजण अहवाल पुढीलप्रमाणे सादर करीतआहोत.

१) औरंगाबाद, जळगाव, नागपूर, अमरावती या भागात डिलरची नियुक्ती करावी.

२) 'रुची लोणचे' उत्पादनाची जाहिरात प्रिंट मिडिया आणि इलेक्ट्रॉनिक मिडिया मार्फत करावी.

३) ग्राहकांची गरज लक्षात घेऊन, लोणचे पाकिट कमीत कमी १०० ग्रॅमपासून पाच किलोपर्यंत पॅकिंग तयार करावेत.

४) विक्रेत्यांना जादा कमीशन कसे मिळेल याचा विचार करावा.

५) लोणच्याचे विविध प्रकार तयार करावेत.

आपले विश्र्वासू

दि. ५ नोव्हेंबर २०११

| सही | सही | सही |
|---|---|---|
| डॉ. शाम यादव | डॉ. विश्वास मोरे | डॉ. प्रकाश जाधव |

अहवालात्मक इतिवृत्त नमुना दोन

**अलंकार कपडे धुण्याच्या साबणाची ग्राहकाची मागणी कमी झाल्याची कारणे शोधून त्यावर उपाय शोधण्यासाठी नियुक्त केलेल्या समितीचे अहवालात्मक इतिवृत्त**

ठाणे
२८ मार्च २०११

**व्यवस्थापक,**
**अलंकार साबण उत्पादन,**
**प्रा.लि. कंपनी**
**ठाणे**

महोदय,

आपल्या दि.१४ फेब्रुवारी २०११ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेत झालेल्या ठरावा नुसार आपल्या कंपनीच्या वतीने बाजारपेठेमध्ये निर्मल साबणाची मागणी कमी होण्याची कारणे शोधणे व साबणाची मागणी वाढावी यासाठी सर्व्हेकरुन अहवाल सादर करण्यासाठी श्री. सोमनाथ पवार, श्री. दिगंबर म्हात्रे, आम्हा दोधांची नियुक्त केली होती. दोन जणांच्या समितीचा अहवाल पुढीलप्रमाणे आम्ही नोंदवीत आहोत.

मागील तीन वर्षात निर्मल साबणाची ग्राहकांची मागणी कमी होण्याची कारणे

१) जाहिरातीचा अभाव
२) इतर साबणाचा आकार लक्षात घेऊन आकारात बदल करावा
३) ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी योग्य सूट द्यावी
४) विक्रेत्यांना कमीशन वाढवून द्यावे.
५) आकर्षक पॅकिंग तयार करावे.

कंपनीने वरील प्रमाणे बदल केल्यास भविष्यात बाजार पेठेमध्ये मागणी वाढेल.

ठाणे

| सही | सही |
| --- | --- |
| श्री. सोमनाथ पवार | श्री. दिगंबर म्हात्रे |

## २) वृत्तांतात्मक इतिवृत्ते

या इतिवृत्त प्रकारामध्ये वृत्तांतात्मक इतिवृत्त म्हणजे घडलेल्या घटनेची वा केलल्या कार्याची तपशीलवार जुळवून तयार केलेली माहिती**,** वृत्तांत्मक इतिवृत्त हे संस्थेचे अधिकारी, संस्थेचे सदस्य, संस्थेशी संबंधित व्यक्ती यांच्या कामकाजाची माहिती पुरविण्याच्या दृष्टीकोनाने इतिवृत्त तयार केलेले असते. या इतिवृत्तांतून घटनेची सविस्तर माहिती क्रमशः दिलेली असते.

➢ **वृत्तांतात्मक लेखनाचे विषय**

१) संस्था संचालक मंडळाची सभा

२) विशिष्ट विषयाला अनुसरून अधिकारीवर्गात झालेल्या चर्चेचे वृत्त

३) संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे वृत्त.

४) संस्थेतील एखाद्या घटनेचे वृत्त.

➢ **वृत्तांतात्मक इतिवृत्त लिहिण्याचा उद्देश**

१) संस्थेच्या सभासदांना माहिती देणे.

२) संस्थेच्या अधिकाऱ्यांना कामकाजाची माहिती सादर करणे.

३) संस्थेच्या कार्याची/सभेची नोंद ठेवणे.

४) संस्थेच्या वाटचाली माहिती लिखित स्वरुपात नोंद करणे.

➢ **वृत्तांतात्मक इतिवृत्त लेखन करण्याची पद्धती**

१) संस्थेचे नाव

२) सभेचा प्रकार

३) सभेचे ठिकाण/वेळ/दिनांक

४) सभेच्या अध्यक्ष नियुक्ती/अध्यक्षांचे नाव

५) सभेचे उपस्थित असलेल्या इतर सभासदांची नावे

६) विषयावर निर्णय

७) विविध विषयावर झालेली चर्चा सविस्तर. उदा - विषय कुणी मांडली, अनुमोदन कुणी दिले, एखादा ठराव कसा झाला, याची मुद्देवार माहिती.

८) एखाद्या ठरावासाठी मतदान घेतल्यास सविस्तर माहिती.

९) सभेत घेतलेल्या निर्णयात विषय

१०) शेवी उजव्या बाजूला अध्यक्षाची सही आणि डाव्या बाजूला सचिव/चिटणीस यांची सही तारीख

## वृत्तांत्मक इतिवृत्त 'नमुना-एक

'माऊली युवा प्रतिष्ठान, काजिणे या प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित केलेल्या सर्वसाधारण सभेचा वृत्तांत

सोमवार दि. १२ डिसेंबर २०१० दुपारी २.०० माऊली युवा प्रतिष्ठानची वार्षिक सर्वसाधारण सभा काजिणे येथिल सभागृहात संजय राऊत यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली.

सदस्या नावे

१) अंनत पाटील (अध्यक्ष)
२) लक्ष्मण कांबळे (उपाध्यक्ष)
३) मनोहर कांबळे (सदस्य)
४) संतोष गावडे (सदस्य)
५) राजाराम पारधी (सदस्य)
६) वसंत सुतार (सदस्य)
७) अक्षय कांबळे (सदस्य)
८) विश्वास पारधी (सदस्य)
९) तानाजी गवसेकर (सदस्य)
१०) निवृती कांबळे (सदस्य)
११) कविता कांबळे (सदस्य)

(आणि उपस्थित सभासदांची यादी सोबत जोडली आहे.)

**विषय १ –**

मागील सभेचा वृत्तांत वाचणे आणि कायम करणे

ठराव - मागील सभेचा वृत्तांत वाचून कायम करणयात येत आहे.

**सूचक** - श्री. गौतम कांबळे

**अनुमोदक** - राजाराम पारधी

ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय २ –**

अतिवृष्टीमुळे शेतकऱ्याचे झालेले नुकसान भरपाईसाठी १० लाख रुपये निधी जमा करावा.

**सूचक** : संतोष गावडे

**अनुमोदक** : निवृती कांबळे

ठराव सर्वानुमते मंजूर

**विषय ३ –**

माऊली देवीच्या महोत्सवाचे आयोजन करणे.

**सूचक** : विश्वास पारधी

**अनुमोदक** : तानाजी गवसेकर

ठराव सर्वानुमते मंजूर

प्रतिष्ठानचे सदस्य अक्षय कांबळे यांनी अध्यक्षाचे व उपस्थितांचे आभार मानल्यानंतर सभेचे कामकाज संपले

| | | |
|---|---|---|
| काजिणे | सही/- | सही/- |
| दिनांक | चिटणीस | अध्यक्ष |

''वृतांतात्मक इतिवृत्ती'' नमुना – दोन

**श्री सातेरी दुध संस्था कोकरे, ता. चंदगड, जि. कोल्हापूर या दूधसंस्थाची वार्षिक साधारण सभा संपन्न झाली या सभेचा वृत्तांतात्मक इतिवृत्त पुढीलप्रमाणे.**

'श्री सातेरी दूध संस्था, कोकरे' या संस्थेची वार्षिकसाधारण सभा १० ऑगस्ट २०११ रोजी. सकाळ ११ वाजता सस्थेचा सभागृहात घेण्यात आली. या सभेला संस्थेचे १५१ सभासद उपस्थितीत होते. तर संस्थेचे पुढील सदस्य हजर होते.

१. **गोविंद कांबळे (अध्यक्ष)**
२. **निंगाप्पा दळवी (उपाध्यक्ष)**
३. **किरण गोवेकर (सदस्य)**
४. **रावजी किरमटे (सदस्य)**
५. **गोपाळ दळवी (सदस्य)**
६. **वसंत किरमटे (सदस्य)**
७. **विदिशा कांबळे (सदस्य)**

**ठराव** : १ मागील वृतांत वाचून संमत करण्यात आला

**सूचक** : वसंत किरमटे
**अनुमोदक** : रावजी किरमटे

**ठराव : २** मागील वर्षाच्या जमाखर्चास मंजूरी देण्यात आली

**सूचक** : रवळनाथ कांबळे
**अनुमोदक** : सिताराम सुतार

**ठराव : ३** ऑडिट दुरुस्ती ठराव संमत झाला.

**सूचक** : गोपाळ दळवी
**अनुमोदक** : किरण गोवेकर

**ठराव : ४** संस्थो चालू वर्षातील नफ्यापैकी ४०% नफा उत्पादकांना वाटणे.

**सूचक** : विदिशा कांबळे
**अनुमोदक** : किरण गोवेकर

वरील ठराव होऊन सभेचे कामकाज संपले.

| तारीख | सही | सही |
|---|---|---|
| १०-८-२०११ | सेक्रेटरी | अध्यक्ष |

## १२.२ संदर्भ सुची


१) व्यावहारिक मराठी -ल.रा. नसिराबादकर, फडके बुक हाऊस, कोल्हापूर

२) व्यावहारिक मराठी - भाग-२ संपादक डॉ. साहेब खंदारे, निर्मल प्रकाशन नांदेड

३) व्यावहारिक मराठी -संपा. स्नेहल तावरे, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.

४) सुबोध मराठी व्याकरण लेखन व वृत्तालंकार — प्रा. चंद्रहास जोशी

५) मराठी शुद्धलेखन प्रदिप - मो. रा. वाळंबे.

६) व्यावहारिक मराठी - प्रा. डॉ. सयाजीराजे मोकाशी

७) व्यावहारिक मराठी - डॉ. लिला गोविलकर, डॉ. जयश्री पाटणकर, स्नेहवर्धन ८) पब्लिकेशन हाऊस पुणे.

८) व्यावहारिक मराठी -डॉ. कल्याण काळे, निराला प्रकाशन पुणे


❖ ❖ ❖

# १३

# वर्तमानपत्रासाठी जाहिरात लेखन

**घटक रचना**

१३.० प्रस्तावना
१३.१ जाहिरात म्हणजे काय?
१३.२ जाहिरात करण्याची माध्यमे
१३.३ जाहिरातीचा मसुदा/मजकूर
१३.४ मथळा
१३.५ जाहिरातीचा नमुना
१३.६ वर्तमान पत्रातून प्रसिद्ध झालेले जाहिरातीचे नमुने
१३.७ संदर्भ सुची

## १३.० प्रस्तावना

आपण नेहमी वर्तमानपत्रातून, दूरदर्शन, आकाशवाणी इंटरनेटवरून जाहिराती बघतो. जाहिरात हा आपल्या नेहमीच्या वाचण्यातील, पाहण्यातील आणि ऐकण्यातील विषय आहे. विविध प्रसारमाध्यमाच्या साहाय्याने प्रसिद्ध होणाऱ्या जाहिराती आपल्या परिचयाच्या झाल्या आहेत. सततजाहिरात पाहिल्याने आणि ऐकल्याने त्याचा प्रभाव व्यक्तीवर होतो. सतत जाहिरात पाहून आणि ऐकून लहान मुलांनाही काही जाहिराती पाठ झालेल्या असतात.

जाहिरातीची मांडणी करताना महत्त्वाच्या गोष्टीची दक्षता घ्यावी लागते. जाहिरातीचा मसुदा तयार करणारा एक तज्ज्ञांचा वर्ग अलिकडे अस्तित्वात आला आहे. मोठ्या नामांकित कंपन्या उद्योजक आपल्या मालाची, उत्पादित वस्तूची चांगल्याप्रकारे जाहिरात कशी करता येईल. ग्राहकांवर प्रभाव कसा टाकता येईल. याकडे उत्पादन कंपन्या लक्ष देतात. त्यासाठी विविध कंपन्यांनी स्वतःचा स्वतंत्र विभाग तयार सुरु केला आहे. जाहिरातीचा मसुदा तयार करणाऱ्या तज्ज्ञांची नेमणूक केली जाते. जाहिरातीचा व्यवसाय करणाऱ्या संस्था निर्माण झाल्या आहेत. या जाहिरात करणाऱ्या संस्थांमध्ये जाहिरातीचा मसुदा (मजकुर) तयार करणारा तज्ज्ञ व्यक्तीची निवड केली जाते. मुख्य मसुदा लेखक किंवा जाहिरात लेखक म्हणून त्यांना ओळखले जाते.

## १३.१ जाहिरात म्हणजे काय?

''उत्पादकाने किंवा विक्रेत्याने आपल्या उत्पादित मालाची विक्री व्हावी व मागणी वाढावी यासाठी केलेली प्रसिद्धी म्हणजे जाहिरात असे म्हणता येईल.''

आपण उत्पादित केलेल्या मालाविषयी ग्राहकांच्या मनात आकर्षण निमार्ण करून त्यांना खरेदी करण्यास प्रवृत्त करणे हे जाहिरातीचे प्रमुख उद्दिष्ट आहे. उत्पादित मालाला विक्रिच्या दृष्टिने उत्पादक आणि ग्राहक यामध्ये जोडणारा एक दुवा म्हणजे जाहिरात होय. ग्राहकांच्या मनावर जाहिरातीचा खरेदीचा संदेश पोहोचतो आणि ग्राहक ती वस्तू खरेदी करतो. आजच्या युगामध्ये समाजावर जाहिरातीचा परिणाम होताना दिसतो. सध्याचे युग हे जाहिरातीचे युग

म्हणता येईल. 'बोलणाऱ्याची माती विकली जाते. न बोलणाऱ्याचा गहूसुद्धा विकला जात नाही.' अशी मराठी भाषेत म्हण आहे. जाहिरात ही एक कला असून योग्य जाहिरात करून आपल्या उत्पादित मालाची विक्री करण्यासाठी उत्पादकांमध्ये स्पर्धा लागलेली दिसून येते.

## १३.२ जाहिरात करण्याची माध्यमे

जाहिरात प्रसारित करण्याची वेगवेगळी माध्यमे आहेत. वृत्तपत्रे, साप्ताहिक, मासिक, वार्षिकांक यासारख्या नियतकालिकांतून जाहिरात केली जाते म्हणजे प्रिंट मिडिया आणि इलेक्ट्रॉनिक मिडिया अशा दोन विभागातून जाहिरात होते. इलेक्ट्रॉनिक मीडियामध्ये आकाशवाणी, दूरदर्शन, या व्यतिरिक्त इंटरनेट, मोबाईल यावरूनही जाहीराती केल्या जातात.

## १३.३ जाहिरातीचा मजकूर

जाहिरातीमध्ये लिखित स्वरुपाचा मजकूर आणि त्या जाहिरातील अनुसरून चित्र, कंपनीचा ट्रेडमार्क यांचा समावेश वर्तमानपत्रातील जाहिरातीमध्ये असतो, तर आकाशवाणी म्हणजे रेडियोवरून प्रसारीत होणाऱ्या जाहीराती या श्राव्य स्वरूपाच्या असतात. हे लक्षात घेऊन तसा मजकूर तयार केलेला असतो. जाहिरातीचे स्वरूप श्राव्य दृश्य स्वरूपाचे असते. म्हणून येथे सचित्र चित्र किंवा एखादे दृष्य तयार करून जाहिरात तयार केली जाते. यासाठी तयार केला जाणारा मजकूर वेगळ्या स्वरुपाचा असतो.

वर्तमानपत्र किंवा नियतकालिकात प्रसिध्द होणाऱ्या जाहिरातीच्या मजकूरातील महत्त्वाचे घटक

१) **मथळा (हेडलाईन)**

२) **पूरक मथळा (सब-हेडलाईन)**

३) **संहिता (टेक्स्ट)**

४) **जाहिरातदाराची मुद्रा (सिग्नेचर)**

५) **घोषवाक्य (स्लोगन/बेसलाईन)**

## १३.४ मथळा

मथळा हा जाहिरातीतील महत्त्वाचा भाग असतो. वाचकाचे जाहिरातीकडे लक्ष वेधून घेण्याचे किंवा त्यांच्या मनात कुतूहल निर्माण करण्याचे काम मथळ्याच्या वाक्यरचनेतून करायचे असते. एखादी उत्पादित वस्तू जर वाचकाला हवी असेल तर वाचक जाहिरातीमधील मजकूर वाचतो.

उदा. वॉशिंग मशीनची जाहिरात

तासाचे काम काही मिनिटात. असा मथळा गृहिणींना त्यातील आश्वासनामुळे आकर्षक वाटतो. 'अभ्यास कर.... हे सांगायचे दिवस गेले..! हा मथळा विषयानुसार अभ्यासाची सी.डी., होम रिव्हाईज या कंपनीची आहे. त्यांच्या जाहिरातीमध्ये अभ्यास कर.... हे सांगायचे दिवस गेले. आता मी आवडीने अभ्यास करते. अशी जाहिरात केली आहे.

जाहिरातीमधील मथळा हा कधी पद्यरचनेत तर कधी वाक्यरूपाने दिसेल. तुमचं स्वप्नातील घर... आम्ही साकार करतो.

ही बांधकाम व्यवसाय घर बांधून देणारी कंपनी किंवा डी.एस.के. घराला घरपण देणारी माणसं अशी वाक्यरचना केली जाते. जाहिरातीमधील ही वाक्य प्रश्नात्मक, उद्‌गारात्मक,

विधानात्मक, आदेशात्मक स्वरुपाची असतात.

१) **प्रश्नात्मक** - काय तुम्ही चिंताग्रस्त आहेत..? (ज्योतिष्याची जाहिरात)

२) **उद्‌गारात्मक** - आई, ग वैतागले, मी या केसांना ... (केशवर्धक तेलाची जाहिरात)

३) **विधानात्मक** - तुमच्या बाबतीतही घडू शकते (विमा कंपनीची जाहिरात)

४) **आदेशात्मक** - एक पुस्तक विकत, एक पुस्तक मोफत (ग्रंथ प्रकाशन संस्थेची जाहिरात)

## १३.५ वर्तमान पत्रातून प्रसिद्ध झालेले जाहिरातीचे नमुने

रुची
बिस्कीट

स्वादिष्ट, रुचकर
आणि सत्वयुक्त
रुची बिस्किट

अधिकृत विक्रेते - सदाशिव पेठ,
महाराष्ट्र बँके जवळ, दादर जि.
ठाणे

सेल सेल सेल

विदिशा साडी
सेंटर

५०% दरात सर्व प्रकारच्या साडा उपलब्ध

राजाराम कॉम्प्लेक्स,
रेल्वेस्टेशन जवळ, माटुंगा
पुर्व , मुंबई

सुंगध दाटे चोहीकडे एकमेव
मोगरा अगरबत्ती

सुंगधी अगरबत्ती

उत्पदक – एम. जे.कंपनी. प्रा.लिमिटेड, नाशिक

## १३.६ संदर्भ सुची


१) व्यावहारिक मराठी - प्रा. डॉ. सयाजीराजे मोकाशी

२) व्यावहारिक मराठी - भाग-२ संपादक डॉ. साहेब खंदारे, निर्मल प्रकाशन नांदेड

३) व्यावहारिक मराठी -संपा. स्नेहल तावरे, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.

५) सुबोध मराठी व्याकरण लेखन व वृत्तालंकार – प्रा. चंद्रहास जोशी

६) मराठी शुद्धलेखन प्रदिप - मो. रा. वाळंबे.


❖ ❖ ❖

# १४

# कार्यालयीन टिप्पणी

**घटक रचना**

१४.० प्रस्तावना

१४.१ कार्यालयीन कामकाजाची पध्दती.

१४.२ टिप्पणीलेखनाचा हेतू

१४.३ टिप्पणीचे स्वरुप

१४.४ संदर्भ सुची.

## १४.० प्रस्तावना

**टिप्पणीलेखन**

कार्यालयीन टिप्पणी हा व्यावहारिक मराठीतील महत्वाचा भाग आहे. शासकीय कार्यालयात मराठीचा वापर आता सुरु झाला असून इंग्रजीचा आधार न घेता मराठीतून लेखनव्यवहार रुढ होत आहे. कार्यालयीन पातळीवर वेगवेगळ्या प्रकारची कामे (उदा. टिप्पणीलेखन, इतिवृत्तांचे लेखन, जाहीर निवेदनाचा मसुदा तयार करणे इ.) करावयाची असतात. त्या त्या कामांची कार्यपध्दतीही वेगवेगळी आणि स्वतंत्र्य असते. गरजेनुसार तिच्यात अनेक फेरफारही करावे लागतात. कार्यालयीन कामाच्या स्वरुपानुसार व कार्यपध्दतीनुसार त्यांची लेखनपध्दती व भाषेचे स्वरुपही बदलते. या प्रकरणात टिप्पणीलेखन, इतिवृत्तलेखन आणि जाहिर निवेदन या कार्यालयातील महत्वाच्या लेखनप्रकारांचा विचार करावयाचा आहे. कार्यालयीन कामाचे स्वरुप व त्याचा हेतू स्पष्ट करुन नंतर लेखनप्रकाराची माहिती येथे दिली आहे. कामाचे स्वरुप व हेतू समजावून घेतल्यास लेखनाची विशिष्ट पध्दती का स्वीकारावयाची, आणि भाषेचेही विशिष्ट असे स्वरुप लेखनात का ठेवावयचे, याची स्पष्ट कल्पना येऊ शकते.

## १४.१ कार्यालयीन कामकाजाची पध्दती.

शासकीय किंवा निमशासकीय कार्यालयामध्ये कार्यालयीन टिप्पणी महत्वाची असते. कार्यालयाकडे आलेली सर्व प्रकारची पत्रे प्रथम स्वीकारण्याचे आणि नंतर वेगवेगळया संबंधित विभागांकडे ती पाठविण्याचे काम येथे होते. आलेल्या प्रत्येक पत्रावर ते दाखल झालेल्या तारखेच्या कार्यालयाच्या नावाचा शिक्का मारुन त्यावर आवक क्रमांक घातला जातो, आणि नंतर वर्गवारी करुन ती पत्रे संबंधित विभागांच्या प्रमुखांकडे पाठविली जातात. तार अथवा 'त्वर्य', 'तातडीचे', 'तात्काळ' असा निर्देश असलेली पत्रे बाजूला काढली जाऊन कार्यवाहीच्या बाबतीत त्यांना अग्रक्रम दिला जातो. ही कार्यालयीन कामकाज पध्दत असते.

कार्यालयाकडे आलेले पत्र अशारीतीने संबंधित विभागाच्या साहाय्यकाकडे किंवा लिपिकाकडे येऊन पाहोचते. त्या विभागाचा एक घटक म्हणून आलेल्या पत्राचे प्राथमिक स्वरुपात उत्तर तयार करण्याचे काम त्याच्याकडे असते. अर्थात त्याने तयार केलेले उत्तर मूळ पत्रलेखकास किंवा अर्जदारास थेट, तसेच पाठविले जात नाही. त्यावर कार्यालयीन पातळीवर किती तरी संस्कार होतात. मूळ पत्रात केलेली विनंती किंवा उपस्थित केलेले प्रश्न यावर कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी सल्लामसलत, विचारविनिमय होऊन पत्राचा अंतिम मसुदा तयार होतो. आलेल्या पत्रास अथवा अर्जास केवळ उत्तर, असे या लेखनाचे स्वरुप नसते. त्यात निर्णयही द्यावयाचा असतो. पत्राची कार्यवाही सुलभ, जलद व्हावी, तिच्यात कोणतीही

संदिग्धता आणि कायदेशीर दृष्टीने अपूर्णता राहू नये, याची काळजी घेणे आवश्यक असते. त्याची सुरुवात होते लिपिकाने तयार केलेल्या उत्तरापासून. हे उत्तर टप्प्याटप्प्याने तयार होत जाते. त्यामुळे आलेल्या पत्रातील प्रकरणाचा निर्णय व्यवस्थितपणे देणे किंवा ते निकालात काढणे शक्य होते.

पहिला टप्पा म्हणजे, कार्यवाहीसाठी आलेल्या पत्रातील मजकुराविषयी एक उत्तरवजा टिप्पणी लिपिक तयार करतो. पत्रात विचारलेल्या किंवा उपस्थित केलेल्या प्रश्नांविषयी कोणत्या स्वरुपाची कार्यवाही करावी याविषयी आपले मत या टिप्पणीत त्याने नोंदविलेले असते. पत्रातील प्रकरणासंबंधी लिपिकाचा हा लेखी अभिप्रायच

## १४.२ कार्यालयीन टिप्पणीलेखनाचा हेतू

टिप्पण्यांचे प्रकार समजावून घेण्यापूर्वी टिप्पणीलेखनाचा हेतू व ती लिहिणाऱ्या साहाय्यकाने/लिपिकाने कोणती काळजी घ्यावयाची, हे लक्षात घेणे आवश्यक आहे. टिप्पणीलेखनाचा हेतू पुढीलप्रमाणे असतो.

कार्यालयाकडे आलेले अर्ज, पत्रे किंवा प्रकरणे यांची उत्तरे देऊन कार्यालयाला ती निकालात काढावयाची असतात. ही कार्यवाही जलद व सुलभ व्हावी म्हणून संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्याला त्या अर्जातील प्रकरणाची पार्श्वभूमी माहीत करुन देणे, मूळ पत्रातील मजकूर थोडक्यात, मुद्देसूदपणाने मांडणे, पत्रातील मुद्यासंबंधी अनुकूल वा प्रतिकूल मत नोंदविणे, त्याचप्रमाणे त्या प्रकरणावर आवश्यक, योग्य आणि नियमाना धरुन कारवाई सुचविणे असा टिप्पणी लिहिण्यामागील हेतू असतो.

कार्यालयीन टिप्पण्या अनेक प्रकारच्या असतात. त्यापैकी महत्वाचे प्रकार पुढीलप्रमाणे

१. नियमीत स्वरुपाची टिप्पणी.

२. माहितीपर टिप्पणी.

**१. नियमीत स्वरुपाची टिप्पणी.**

शासकीय किंवा निमशासकीय किंवा सेवासंस्था या कार्यालयात येणारी काही पत्रे व त्यातील प्रकरणे बऱ्याच वेळा सारख्या स्वरुपाची असतात. उदा. कार्यालयाकडे केलेली छापील नमुन्यातील अर्जाची मागणी, कार्यालयीन दप्तरातील कागदपत्रांच्या नकलांची मागणी, दाखला व प्रमाणपत्र यांची मागणी, विशिष्ट प्रश्नांसंबंधीच्या आकडेवारीची मागणी इत्यादी. वेगळ्या स्वरुपाची असते. त्या विभागांचा अधिकारी व सहाय्यक लिपिक अशा प्रकारच्या कार्यवाहीसाठी जवळजवळ कायमची अशी एक पध्दती ठरवून टाकतात. अशावेळी वर उल्लेखिलेल्या मागणीची पूर्तता करणे एवढीच कार्यवाही शिल्लक राहाते. तिच्यात निर्णय देण्याची किंवा मत नोंदविण्याची आवश्यकता नसते. अशा पत्रांवर केवळ ठरावीक पध्दतीची अथवा कार्यालयातील औपचारिक नोंद म्हणून लिहावयाची असते. नित्य कराव्या लागणाऱ्या या औपचारिक नोंदीला नित्याच्या स्वरुपाची टिप्पणी असे म्हणतात. तिचे महत्व तेवढ्या वेळेपुरतेच असल्याने ती जपून ठेवण्याची किंवा फाईल करुन ठेवण्याची किंवा फाईल करुन ठेवण्याची आवश्यकता नसते.

**२. माहितीपर टिप्पणी**

कार्यालयाशी संबंधित माहितीची नोंद ठेवण्यासाठी माहितीपर टिप्पणी लेखन केले जाते. संबंधित कार्यालयाशी महत्वाची असणारी माहितीची नोंद एखाद्या विषयाच्या संदर्भातील आकडेवारी कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्याकडे सादर करावयाची असते. अशावेळी उपलब्ध संदर्भाच्या दप्तरातील कागदपत्रांच्या आधारे माहिती गोळा करुन तिची टिप्पणी तयार करावी लागते. अशा टिप्पणीत एखाद्या प्रकरणाची सारभूत माहिती नोंदवावी लागत असल्याने आधारभूत कागद किंवा महत्वाचा कागद म्हणून तिला कार्यालयाच्या दृष्टीने महत्व प्राप्त होते. म्हणून ती फाईलमध्ये जपून ठेवली जाते. तो एक कार्यालयातील दस्त ऐवज असतो.

## १४.३ टिप्पणीचे स्वरुप

१. ज्यावर कार्यवाही करावयाची आहे त्या पत्रात समाविष्ट असलेल्या वास्तुस्थितीचे थोडक्यात माहिती देणे महत्वाचे असते.

२. पत्रात उपस्थित केलेले प्रश्न महत्वाचे असतात.

३. पत्रामध्ये नियमाविरुध्द कोणतीही गोष्ट अथवा मुद्दा असल्यास त्याचा उल्लेख प्रकरणाशी संबंधित नियम, अधिनियम किंवा संकेत यांची माहिती. पूर्वी अशाच स्वरुपाच्या दुसऱ्या एखाद्या प्रकरणाविषयी काही निर्णय दिला असल्यास त्याची थोडक्यात माहिती.

५. प्रकरण निकालात काढण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेला निष्कर्ष आणि त्यासाठी सुचविलेला निर्णय विचारात ध्यावा लागतो.

**कार्यालयीन टिप्पणी लिहिण्याची पध्दती.**

१. टिप्पणी लिहताना कागदाच्या उजवीकडील कोपऱ्यात आपल्या विभागाचे, उपविभागाचे किंवा शाखेचे नाव लिहावे.

२. टिप्पणी ज्या कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सादर करावयाची त्याचा हुद्दा समासात संक्षेपाने लिहावा.

३. टिप्पणी संक्षिप्त स्वरुपात असावी. मुद्देसूद आणि काटेकोर भाषेत असावी. एखादे प्रकरण प्रदीर्घ असल्यास टिप्पणीही दीर्घ होते. ती साराशं स्वरुपाची असावी.

४. प्रत्येक मुद्याचा स्वतंत्र्य परिच्छेद असावा, आणि त्यास क्रमांक द्यावे.

५. टिप्पणीतील प्रत्येक मुद्याची छाननी स्वतंत्रपणे व तपशीलवार करावी. त्याचप्रमाणे वरिष्ठांकडून प्रत्येक मुद्यासाठी स्वतंत्र्य आदेश आवश्यक असल्यास टिप्पणीतही प्रत्येक मुद्याचा स्वतंत्र्य परिच्छेद करुन त्याची छाननी व चर्चा करावी.

६. टिप्पणीतील लेखनात कागदपत्रांचा उल्लेख टिप्पणीत करावयाचा असल्यास या कागदपत्रांचा योग्यते संदर्भ क्रमांक द्यावा; आणि फाईलमधील त्या कागदावर पताका लावून ठेवावी.

७. टिप्पणी लेखानात वैयक्तिक स्तुती, अकारण समर्थन किंवा दोषदर्शनता नसावी.

८. आपल्याकडे आलेल्या टिप्पणीवरच, काही वेळा, पुन्हा टिप्पणी लिहावी लागते. अशावेळी अगोदरच्या टिप्पणीचा फक्त संदर्भ नोंदवावा आणि आपण ती मधील निर्णयाशी सहमत असल्यास फक्त स्वाक्षरी करावी. सहमत नसल्यास आपला अभिप्राय तेथे नोंदवून स्वाक्षरी करावी.

९. टिप्पणी लेखनाच्या डाव्या बाजूस खाली आद्याक्षरी करावी व तिच्याखाली तारीख घालावी.

**कार्यालयीन टिप्पणी लिहिताना घ्यावयाची काळजी.**

१. टिप्पणी लिहिण्यापूर्वी मूळ पत्र काळजीपूर्वक वाचून त्यात उपस्थित केलेले प्रश्न बारकाईने समजून घेणे आवश्यक आहे.

२. टिप्पणीतील भाषा क्लिष्ट असू नये. ती साधी (अनलंकृत), समजण्यास सोपी आणि सुस्पष्ट असावी. भाषा संदिग्ध असू नये. प्रदीर्घ आणि गुंतागुंतीची वाक्यरचना नसावी. सुटसुटीत शब्दांची योजना आणि छोटी वाक्यरचना यामधून अर्थ नेमका व स्पष्टपणे प्रकट होतो. कार्यालय, कार्यालयीन वातावरण यांची प्रतिष्ठा राखणारी सौम्य, संतुलित, नम्र आणि काटेकोर अशी भाषा असावी.

३. टिप्पणीतील वाक्यरचना छोटी असावी.

### १. माहितीपर टिप्पणी

नमुना क्र. १
माहितीपर टिप्पणी
डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतीगृह उल्हासनगर न.३ येथील
वसतीगृहात राहणाऱ्या
मागासवर्गीय व अन्य विद्यार्थ्यांची माहिती दर्शविणारा तक्ता : सन २०१२-१३
मासागवर्गीय व अन्य जातीच्या विद्यार्थ्यांची संख्या

| शैक्षणिक वर्ग | अनुसूचित जाती | | | अनुसूचित जमाती | | | भटक्या आणि विमुक्त जाती | | | इतर मागासवर्गीय | | | अन्य वर्ग | | | अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांचे शे. प्रमाण | अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांचे शे. प्रमाण | भटक्या व विमुक्त जातीच्या विद्यार्थ्यांी शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | विद्यार्थी | विद्यार्थिनी | एकूण | विद्यार्थी | विद्यार्थिनी | एकूण | विद्यार्थी | विद्यार्थिनी | एकूण | विद्यार्थी | विद्यार्थिनी | एकूण | विद्यार्थी | विद्यार्थिनी | एकूण | | | |
| बी.ए. | २ | ३ | ५ | ५ | ६ | ११ | ८ | ९ | १७ | १ | १ | २ | १ | १ | २ | | | |
| एम.ए.भाग १ | ३ | - | ३ | - | - | - | - | १ | १ | - | - | - | २ | ८ | १ | २१.४२ | - | ७.१४ |
| एम.ए.भाग २ | - | १ | १ | ५ | - | - | - | - | - | १ | - | १ | ५ | - | ५ | ५ | - | - |
| एम.फिल् | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - | २ | ४ | ६ | - | - | |
| पीएच.डी | ३ | - | ३ | १ | १ | २ | १ | - | १ | २ | - | २ | ४ | २ | ६ | १८.१९ | - | ९.०९ |

अधिक्षक
डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय
वसतीगृह उल्हासनगर न.३

आद्याक्षरी :
दिनांक :

### माहितीपर टिप्पणी : नमुना क्र.२

अनुक्रमांक — आस्थापना विभाग

श्री. विनायक रावजी जगदाळे यांच्या रजेसंबंधी विचारलेल्या प्रश्नांची माहिती खालीलप्रमाणे सादर करीत आहे.

१. श्री. जगदाळे यांची दि. १४ डिसेंबर, १९८० पर्यंत ६५ दिवसांची अर्जित रजा शिल्लक होती. दि. १० जानेवारी, ८१ ते १८ फेब्रुवारी, ८१ अखेर त्यांना ४० दिवसांची अर्जित रजा मंजूर करण्यात आली. त्यामुळे त्यांच्या खाती आता २५ दिवसांची रजा शिल्लक आहे.

२. श्री. जगदाळे यांची १८२ दिवसांची अर्धपगारी रजा शिल्लक आहे.

३. कार्यवाहीसाठी वरिष्ठांकडून आदेशाची अपेक्षा करणारी टिप्पणी

पत्रातील ज्या प्रकरणावर कार्यवाही करावयाची असते त्याची सर्व माहिती या टिप्पणीत दिली आहे. पत्रातील प्रकरणात उपस्थित होणारे मुद्दे, त्या प्रकरणासंबंधीचे मागील संदर्भ, मूळ विषयास पूरक अशी माहिती, त्याचप्रमाणे कार्यवाहीस पूरक अशा नियमांची आणि अधिनियमांची माहिती देऊन ती सोबत लिपिकाने आफला अभिप्रायही दिलेला असतो, आणि कार्यवाहीसाठी वरिष्ठांकडून निश्चित आदेश किंवा मार्गदर्शन मागितलेले असते. अशा टिप्पणीस 'कार्यवाहीसाठी वरिष्ठांकडून आदेशाची अपेक्षा करणारी टिप्पणी' असे म्हणतात.

## (ब) कार्यवाहीसाठी वरिष्ठांकडून आदेशाची अपेक्षा करणारी टिप्पणी

सामान्य प्रशासन विभाग

अनुक्रमांक

१. कृपया, श्री. नारायण विनायक देवधर, कार्यालय अधीक्षक, प्रसिध्दी संचालनालय, याचे दि. ४ डिसेंबर, १९८२ चे आवेदन पत्र पाहावे.

२. आपल्या मुलाच्या अमेरिकेतील तंत्रशिक्षणाचा खर्च भागविण्यासाठी सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधीतून रु.१५,०००/- इतकी ना-परतावा (ग़्दृद-ङ्ङ्कढद्वदङ्कङ्ग-ङथ्ङ्क) आगाऊ रक्कम श्री.देवधर यानी मागितली आहे. त्यांच्या भविष्यनिर्वाह निधीचा खाते क्रमांक डी-१२२-३-१८ असा आहे.

**टिप्पणीलेखनाचा नमुना क्र.२**

(अ) मूळ अर्ज

सुशांत केळुसकर
वरिष्ठ लिपिक,
वरिष्ठ संचालनालय,
पुणे.
दि.२० जानेवारी,२०१४

प्रति,

मा. शिक्षण संचालक,
शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य,
फोर्ट, मुंबई

महोदय,

मी डोळ्याच्या विकाराने आजारी असून पाच दिवसांपासून नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. तात्यासाहेब लहानगे यांच्या इस्पितळात दाखल झालो आहे. काही दिवसांपूर्वी माझ्या डोळ्यातील मोतीबिंदूवर शस्त्रक्रिया झाली. पण काही गुंतागुंतीमुळे त्याचे पर्यवसान काचबिंदूत झाले असून येत्या २५ जानेवारी २०१४ रोजी त्यावरील शस्त्रक्रियेचा निर्णय डॉक्टरानी घेतला आहे. डॉक्टरांच्या मतानुसार शस्त्रक्रियेनंतर किमान तीस-बत्तीस दिवस तरी सक्तीची विश्रांती लागेल. तसे त्यानी दिलेले वैद्यकीय प्रमाणपत्र मी या अर्जासोबत जोडले आहे. तरी, कृपया, मला बेचाळीस दिवसांची अर्जित रजा मंजूर करावी, ही विनंती. माझी नव्वद दिवसांची अर्जित रजा शिल्लक आहे. २५ एप्रिलला कामावर हजर राहिन याची कृपया नोंद घेऊन रजा मंजुर करावी.

कळावे,

आपला,
सही/-
(सुशांत केळुसकर)

सोबत :

वैद्यकीय प्रमाणपत्र

**क) कार्यालयीन व्यवहार**

टिप्पणीलेखनाचा नमुना क्र.१

(अ) मूळ अर्ज

किशोर खाडे
कार्यालय अधीक्षक,
प्रसिध्दी संचालनालय,
पुणे
दि. १० फेब्रुवारी २०१४

प्रति,
सचिव,
सामान्य प्रशासन विभाग,
सचिवालय, मुंबई.
महोदय,

माझ्या मुलीला तंत्रशिक्षणासाठी लंडन येथील विद्यापीठात प्रवेश मिळाला आहे. त्याचा तेथील खर्च भागविण्यासाठी सर्वसाधारण भविष्यनिर्वाह निधीतून मला रुपये साठ हजार इतकी ना-परतावा आगाऊ रक्कम मिळावी, ही विनंती. माझ्या भविष्यनिर्वाह निधीचा खाते क्र.डी.जी.के.-१२२०/१४ असा आहे.

कळावे,

आपला,
सही/-
किशोर खाडे
कार्यालय अधीक्षक

**(ब) कार्यवाहीसाठी वरिष्ठांकडून आदेशाची अपेक्षा करणारी टिप्पणी**

आस्थापना विभाग

अनुक्रमांक

श्री. किशोर खाडे, वरिष्ठ लिपिक, शिक्षण संचालनालय यांच्या दि. दि. १० फेब्रुवारी २०१४ च्या अर्जास अनुसरुन सादर

१. श्री. किशोर खाडे यानी आजारपणाच्या कारणास्तव बेचाळीस दिवस अर्जित रजा मिळण्याविषयी आवेदनपत्र दिले आहे. सोबत वैद्यकीय प्रमाणपत्र जोडले आहे.

२. श्री. किशोर खाडे यांच्या नावावर नव्वद दिवस एवढी अर्जित रजा शिल्लक असल्यामुळे त्याना त्यांच्या विनंतीप्रमाणे रजा मंजूर करण्यास हरकत नाही.

३. श्री. किशोर खाडे यानी मागितलेली रजा तीस दिवसांपेक्षा जास्त असल्यामुळे त्यांच्या रजेच्या कालावधीत हंगामी लिपिक नेमून घेण्यास परवानगी मिळावी. यासाठी होणारा खर्च चालू वर्षासाठी मंजूर असलेल्या आर्थिक तरतुदीतून भागविता येईल.

४. श्री. किशोर खाडे यांची रजा मंजूर केल्याचे व त्यांच्या रजेच्या मुदतीत हंगामी लिपिक नेमून घेण्याचे जरुर ते आदेश पाठविण्याविषयी विनंती आहे.

अ.ना.दे.
१-२-८४
शिक्षण उपसंचालक,
शिक्षण संचालक.

**३. अंतर्गत कार्यालयीन टिप्पणी.**

काही मोठ्या कार्यालयांच्या अंतर्गत अनेक विभाग असतात. वेगवेगळ्या प्रकरणांची माहिती मागविणे, काही प्रासंगिक गरजांची/वस्तूंची पूर्तता/करणे अशा कामांसाठी एकमेकात पत्रे न पाठविता त्याऐवजी छोटी टिप्पणी पाठविली जाते. तिला अंतर्गत कार्यालयीन टिप्पणी असे म्हणतात. मोठ्या कार्यालयामधील छोट्या छोट्या विभागात असा अंतर्गत कार्यालयीन टिप्पणीचा व्यवहार नित्य चाललेला असतो.

**अंतर्गत कार्यालयीन टिप्पणीचा नमुना.**

विद्यापिठातील अंतर्गत भांडार कार्यालयीन विभागास मराठी विभाग मुंबई विद्यापीठ यांच्या वतीने कागद मागणीसाठी कार्यालयीन टिप्पनी तयार करा.

मराठी विभाग,
दि. १० फेब्रुवारी २०१४

मा. अधिक्षक
कार्यालयीन भांडार
मुंबई विद्यापीठ, मुंबई

मराठी विभागात सोमवार दि. १५ मार्च, २०१४ रोजी, पदव्युत्तरं पातळीवर मराठी माध्यमाचा उपयोग करताना निर्माण होणाऱ्या समस्या' या विषयावरील चर्चासत्र आयोजित केले आहे. त्यात सहभागी झालेल्या विद्वानांचे निबंध चक्रमुद्रित करण्यासाठी पाच रिमे फुलस्केप कागद पाठवावे.

सही
प्रमुख, मराठी विभाग.
मुंबई विद्यापीठ, मुंबई

## १४.४ संदर्भ सुची


१) व्यावहारिक मराठी - प्रा. डॉ. सयाजीराजे मोकाशी

२) व्यावहारिक मराठी - डॉ. लिला गोविलकर, डॉ. जयश्री पाटणकर, स्नेहवर्धन पब्लिकेशन हाऊस पुणे.

३) व्यावहारिक मराठी -डॉ. कल्याण काळे, निराला प्रकाशन पुणे

४) व्यावहारिक मराठी -ल.रा. नसिराबादकर, फडके बुक हाऊस, कोल्हापूर

५) व्यावहारिक मराठी - भाग-२ संपादक डॉ. साहेब खंदारे, निर्मल प्रकाशन नांदेड

६) व्यावहारिक मराठी -संपा. स्नेहल तावरे, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.

७) सुबोध मराठी व्याकरण लेखन व वृत्तालंकार — प्रा. चंद्रहास जोशी

८) मराठी शुद्धलेखन प्रदिप - मो. रा. वाळंबे.


.

❖ ❖ ❖

# १५

# सारांश लेखन

१५.० प्रस्तावना
१५.१ सारांश लेखन म्हणजे काय ?
१५.२ सारांश लेखनाचे स्वरुप
१५.३ सारांशलेखनाचे भाषातंत्र व रचनाकौशल्य :
१५.४ संदर्भ ग्रंथ सुची

## १५.० प्रस्तावना

आपण जेव्हा एखादे भाषण किंवा चर्चा एकतो तेव्हा सर्व भाग जशाच्या तसा लक्षात ठेवण्याचा प्रयत्न करतो. परंतु तो तसा लक्षात राहत नाही. त्यातील काही भाग लक्षात राहिला तरी प्रमुख मुद्देच विसरुन जाण्याचा संभव अधिक असतो व तो भाग ज्या उद्देशाने लक्षात ठेवण्याचा प्रयत्न केला तो उद्देशच मुळी बाजूला राहतो; तेव्हा असे होऊ नये व त्यातील प्रमुख बाबी तरी लक्षात रहाव्यात म्हणून त्या मजकुरातील प्रमुख मुद्याला धरुन असलेले अंशात्मक सार लक्षात ठेवण्याचा प्रयत्न करण्यात येतो. ते अंशात्मक सारसंकलन म्हणजे सारांशलेखन करणे होय.

## १५.१ सारांश लेखन म्हणजे काय ?

सारांश लेखन एक लेखन कौशल्य आहे. कधीकधी विद्यार्थ्यांना सारांश, संक्षेप, तात्पर्य व आशय या वरवर समानार्थी वाटणाऱ्या शब्दांतील भेद स्पष्ट रीतीने न कळल्यामुळे त्यांचा त्याबाबत गोंधळ होण्याचा संभव असतो.

कोणत्याही साहित्य कृतीतील मग ती गद्यात्मक असो किंवा पद्यात्मक असो, तात्पर्य सांगावयाचे झाल्यास ते एका वाक्यातही सांगता येईल. तसेच त्या कलाकृतीचा संक्षेप करताना त्यातील अनावश्यक विस्तार टाळून तिची थोडक्यात पुनर्गुंफण केली की तो संक्षेप होऊ शकेल. किंवा त्या कलाकृतीतील मध्यवर्ती कल्पना खुलवून फुलवून आपल्या शब्दांत मांडली की तिचा आशय व्यक्त होऊ शकेल; कलाकृतीतील प्रमुख कल्पना किंवा विचारांशी संबंधित अशा मुद्यांचे थोडक्यात पण स्पष्टरीतीने केलेले सारसंकलन म्हणजेच सारांशलेखन होऊ शकते.

साहित्यातील लेखकाचे बहुधा एका वाक्यात एकच मुद्दा मांडतो; परंतु वाचकाला त्या मुद्यातील प्रमुख विचाराचे किंवा कल्पनेचे सुलभ रीतीने आकलन व्हावे म्हणून मुख्य विचाराचे किंवा कल्पनेचे सुलभ रीतीने आकलन व्हावे म्हणून मुख्य विचाराच्या प्रतिपादनासाठी मात्र इतर अनेक पूरक विचारकल्पना, उदाहरणे, प्रमाणे, अलंकार, वाक्यप्रचार, म्हणी इ. देऊन तो चांगल्या प्रकारे फुलवितो, तेव्हा सारांशलेखन करताना विद्यार्थ्यांनी सर्वप्रथम त्या उताऱ्यातील गौण बाबींचे खलीलप्रमाणे वर्गीकरण करुन त्यातील मुख्य विचार लक्षात घेतले पाहिजेत.

## १५.२ सारांश लेखनाचे स्वरुप

सारांशलेखन हा लेखनप्रकार आजच्या धावपळीच्या युगात गरजेचा बनला आहे. फोनवरील संवादापासून वृत्तपत्रांतील बातम्यांपर्यंत थोडक्यात बोलणे/लिहिणे/वाचणे क्रमप्राप्त झाले आहे. एखाद्या ऑफिसात साहेबांना भेटायला गेलात तर तेथेदेखील त्याच्या टेबलावर 'Be Brief' अशी छोटीशी पाटी तुम्हाला दिसेल. कोर्टात न्यायाधीशांपुढे त्या त्या खटल्यातील कामकाजाचे/ तपशीलाचे सार तयार करुन ठेवलेले असते. मोठमोठ्या परिषदांच्या संशोधन पत्रिकांतही त्यांच्याकडे आलेले शोधनिबंध संपूर्ण छापण्याऐवजी त्याचा गोषवारा (abstract) छापलेला दिसतो. कमी शब्दांत नेमका आशय व माहिती सांराश लेखनात दिली जाते.

परीक्षेमध्ये सारांशलेखनासाठी एखादा उतारा दिलेला असतो. त्याचे सार थोडक्यात सांगणे अपेक्षित असते. दिलेल्या मूळ उताऱ्यातील विचार संक्षेपाने आपल्या भाषेत लिहून दाखविणे म्हणजे सारांशलेखन. त्यासाठी मूळ उताऱ्यातील विचार आधी सामग्र्याने समजून घेऊन नंतर ते अगदी मोजक्या शब्दांत आणि तेही स्वतःच्या शब्दांत सांगत येणे, हे सारांशलेखनाचे वैशिष्ट्य. दिलेल्या मूळ उताऱ्यातील शब्दसंख्येच्या, सामान्यतः एक तृतीयांश एवढ्या प्रमाणात, त्याचा सारांश लिहावा, अशी अपेक्षा असते. मूळ उताऱ्यात शंभर शब्द असल्यास त्याचा सारांश स्थलपणे पस्तीस ते चाळीस शब्दांत करावा. अर्थात, हे प्रमाण काटेकोर असे नाही. चार-पाच शब्द कमी वा अधिक चालू शकतात. अर्थात, सारांशात मूळ समग्र उताऱ्याचे सार यायला हवे. तसेच मूळ उताऱ्यातील मुद्यांचे महत्व सारांशात कायम ठेवावे. सारांशलेखानातून त्या उताऱ्याचा आशय व्यक्त केला जातो.

## १५.३ सारांशलेखनाचे भाषातंत्र व रचनाकौशल्य :

सांराश लेखन एक कला आहे. सारांशलेखन विद्यार्थ्याने स्वतःच्याच भाषेत करावयाचे असते तसेच ते सरळ निवेदनात्मक पध्दतीने (Direct Method) न करता परोक्ष निवेदन पध्दती (Indirect Method) नेच केले पाहिजे. त्याचप्रमाणे प्रत्येक वाक्याचा पूर्वापर संबंध व विचारांचा मूळ क्रम यांकडे विद्यार्थ्यांनी लक्ष देणे आवश्यक असते. नाहीतर मूळ उताऱ्यातील वाक्यांचा परस्परांशी संबंध वेगळा, व सारांशलेखनातील वाक्यांचा संबंध वेगळा तसेच मूळ उताऱ्यातील विचारांचा क्रम वेगळा व सारांशलेखनातील विचारांचा क्रम वेगळा ठेवला तर त्या लिखाणात एकप्रकारचा खंडितपणा येऊन ते असंबध्द होईल त्यामुळे मूळ उताऱ्यातील प्रमुख विचाराचे सारसंकलन यथार्थपणे होणार नाही.

सारांशलेखन करताना मूळ विचारांचेच थोडक्यात पण मुद्देसूद सारसंकलन करावयाचे असल्यामुळे ते स्पष्ट व सुबोध होणे आवश्यक असते. सारांश वाचूनच वाचकाला मूळ उताऱ्यातील विचारांचे दर्शन व्हावयास पाहिजे म्हणून सारांशलेखनातील भाषा सोपी, सुबोध व अर्थवाही स्वरुपाची असावी. त्यात वापरलेले शब्द सोपे, सुटसुटीत व अर्थपूर्ण असावेत.

सारांशलेखन हे मूळ उताऱ्यातील विचाराचे सारसंकलन असल्यामुळे सारांशलेखनाच्या सुरुवातीलाच उताऱ्यातील विषयाची कल्पना येईल असे त्याला समर्पक शीर्षक द्यावे. नंतर त्यातील गौण व प्रमुख बाबींचे वर्गीकरण करुन मुख्य विचाराचे दिग्दर्शन करणारे पहिले वाक्य लिहावे व त्यानंतर मुख्य विचाराला पोषक असलेले पूरक विचार मांडावे; परंतु त्यात पाल्हाळीकपणा न आणता त्यातील उपयुक्त ठरेल तेवढाच भाग द्यावा तसेच मुख्य विचाराचे वाक्य व पूरक विचारांची वाक्ये यातील परस्पर संबंध व क्रम कायम ठेवावा; तथापि एखाद्या ठिकाणी जर क्रम बदलल्यामुळे सारांशलेखन स्पष्ट व रेखीव स्वरुपाचे होऊन त्यातील आशय

लक्षात येण्याच्या दृष्टीने बदललेला क्रम उपयुक्त ठरत असेल, तर प्रसंगी विचारांचा क्रम बदलविण्यास हरकत नाही. तसेच मूळ उताऱ्यातील अलंकार, उदाहरणे, म्हणी व प्रमेये इत्यादींच्या अर्थस्पष्टीकरणासाठी उपयोग होऊ शकत असेल, तर तो अल्प प्रमाणात करावा. त्यासाठी जास्त शब्दांचा वापर करणे योग्य ठरणार नाही आणि शेवटी तात्पर्य सांगून सारांशलेखन संपवावे. सांराश लेखन ही कला वाचनाने आणि आकलनाने. समजून येते. त्यासाठी शब्द सामर्थ्याची नितांत गरज असते.

संपूर्ण सारांशलेखन अत्यंत काटेकोर, सुबोध व स्पष्ट शब्दांत असावे तसेच ते मूळ उताऱ्याच्या एक-तृतीयांश इतके असावे.

**सारांशलेखन : नमुना १**

समाजातील प्रत्येक माणसाला केवळ आनंद देणे किंवा मनाचे रंजन करणे हाच कलेचा हेतू आहे, असे म्हणणाऱ्या अडाणी माणसांची कीव करावीशी वाटते. त्यांना निसर्गाच्या उत्क्रांतिमय जीवनाचे रहस्य मुळीच कळलेले नाही, असे म्हणावयाला पाहिजे. सुंदर शिल्पकृती पाहिल्याने, मधुर गायन ऐकल्याने किंवा उत्कृष्ट मूर्ती चित्र पाहिल्याने आपल्याला आनंद तर होतोच होतो. पण त्यामुळे आपली जीवनशक्ती अधिक समृध्द होते. भावनांचा विकास होतो आणि बुध्दीची उत्क्रांती होते. कलेच्या उपभोगाने आपण अधिक सुखी, अधिक तृप्त आणि अधिक उन्नत होतो. म्हणून निसर्गाच्या उत्क्रांतीचे अपरिहार्य कार्य चालू ठेवणे, हेच कलावंताच्या आयुष्याचे ध्येय आहे. म्हणूनच समाजाच्या आनंदासाठी, प्रगतीसाठी आणि उध्दारासाठी कलेची आणि कलावंतांची जरुरी आहे. कलावंतांच्या पावलांनी समाज चालत असतो, कलावंतांच्या डोळ्यांनी समाज पाहात असतो आणि कलावंतांच्या बुध्दीने समाज विचार करीत असतो. हजारो वर्षांच्या काळात मानवजातीने प्रगतीचा आणि संस्कृतीचा जो टप्पा आज गाठलेला आहे, त्याच्या श्रेयाचा मोठा वाटा कलावंतांनाच द्यावयाला पाहिजे. कलावतांची कला ही समाजासाठी आहे; आणि कलावंतांवाचून समाज हा सर्वस्वी असहाय आहे.

**सारांश**

**कला, कलावंत व समाज : यांचे नाते**

प्रत्येकाला आनंद देणे एवढेच कलेचे ध्येय मानणे निसर्गाच्या जीवनचक्राचा अर्थच न कळणे होय. कलेच्या दर्शनाने आनंद तर मिळतोच, पण आपली जीवनशक्ती संपन्न होऊन बुध्दी व भावनाही विकसित होतात. यासाठी समाजाला कला व कलावंत यांची गरज असते. मानवी संस्कृतीच्या विकासात कलावंतांचा वाटा मोठा आहे. कला, कलावंत व समाज यांचे नाते अन्योन्य संबंध असतो.

कला अवतीर्ण झाली म्हणजे तिचे स्वातंत्र्य नष्ट होते व तिच्या सौंदर्यावर पार्थिवतेचे संस्कार घडतात. कलाविकास हेच कलावंताचे साध्य व अवघी चराचर सृष्टी ही त्यांची साधनसंपदा. जगातील सुष्ट-दुष्ट, क्षुद्र-गंभीर, भव्य-भिषण भावांची मातब्बरी त्याला साधनांपेक्षा अधिक नाही. चित्रकार जसा बेगुमानपणे बऱ्यावाईट रंगांचा उपयोग करतो, तसाच त्या भावांचा उपयोग करण्याचा त्यालाही अधिकार आहे. त्याने निर्मिलेली प्रतिसृष्टी सौदर्यपूर्ण असली, म्हणजे कोणत्या साधनांचा विनियोग त्याने कशा रीतीने केला हे पाहण्याचे कारण नाही. खुद्द सृष्टीच जिथे त्रिगुणात्मक आहे, तिथे त्याचीच कृती तेवढी सत्तगुणप्रधान असावी असा आग्रह धरुन कसे चालेल? खरा कलावंत कोणत्याच प्रकारची वाईट कृती निर्माण करु शकत नाही. त्याची सौदर्यनिष्ठा इतकी उज्ज्वल व उदात्त असते. कलेचा उपयोग व्यावहारिक उपयुक्ततेकडे केल्यास तिच्यातील सौंदर्य नष्ट होते. चित्रकार जसा बऱ्यावाईट रंगांचा वापर करुन सौंदर्यपूर्ण

कलाकृती निर्माण करतो. तसाच कलावंतही विविध भावांच्या साह्याने त्रिगुणात्मक प्रतिसृष्टी निर्माण करतो.

**नमुना क्र.२**

''समाजातील विविध मानवी मनाच्या महत्त्वाकांक्षेच्या नौका कोणत्या दिशेने हाकलावयास पाहिजेत, हे दाखविण्यासाठी मासिक पुस्तकांतील लेख म्हणजे जणू काही होकायंत्रच होत, असे म्हटल्यास हरकत नाही. जुन्या व नव्या वाङ्मयाचे परीक्षण याच उद्देशाने मासिक पुस्तकातून करण्यात येते. मासिक पुस्तकावर हे राष्ट्रशरीराची परीक्षा करणारे व त्याला पथ्य सांगणारे धन्वंतरी होत. वाङ्मयाकरिता इतस्ततः पडलेल्या अनेक विद्यासामग्रीतून कोणती मूर्ती निर्माण करणे प्रस्तुत काळाला योग्य आहे हे सांगणारे मार्मिक शिल्पचिकित्सक, मासिक पुस्तककार आहेत. कोणते नाटक करावयाचे हे एकदा सूत्रधाराने ठरवून टाकल्यावर ज्याप्रमाणे कंपनीतील नटवर्ग आपापली भूमिका घेऊन ते नाटक प्रेक्षणीय व रम्य करण्याचा प्रयत्न करीत असतो, तव्दतच लेखकवर्गाची स्थिती होते. मासिक पुस्तककार हे वाङ्मयरुपी नाटकात भिन्नभिन्न भूमिका घेणाऱ्या लेखकवर्गाचे सूत्रधार आहेत, असे म्हणावयास हरकत नाही. हा जो स्वर लावील व जो ताल धरील, त्या स्वरात व त्या तालातच सर्व लेखकवर्ग गाऊ व नाचू लागतो. मासिक पुस्तककार युध्दात उद्युक्त असलेल्या अफाट सैन्यांचे सेनापती आहेत.

**सारांशलेखनः**

मासिकातील लेख म्हणजे समाजातील विविध मानवी मनाच्या महत्त्वकांक्षेला दिशा दाखविणारे होकायंत्र व मासिक पुस्तककार अर्थात संपादक हा राष्ट्रशरीराची परीक्षा करुन पथ्य सांगणारा धन्वंतरी होय. देशकालपरिस्थितीनुरुन सैन्यातील सेनापती यांच्यासारखी मासिक पुस्तककाराची भूमिका असून नाटकातील नट किंवा सैन्यातील सैनिकासारखी लेखकांची भूमिका असते. तो सुचवीला त्या स्वरुपाचे लेखन वर्गाकडून होत असते. लेखक आपल्या लेखातुन विविध मानवी मनोवृतीचे दर्शन घडवित असतो.

**नमुना क्र. ३**

पतिव्रता पतीचे नाव घेत नाही त्याप्रमाणे कर्मयोगी आपल्या मताचा उच्चर टाळतो. पण दोन्ही पक्षी आपण अपवाद कल्पू शकू. क्वचित प्रसंग आपले मत मांडण्यास हरकत नाही. पण आपले मत मांडावे, दुसऱ्याचे खंडन करण्याचा मोह टाळावा. मतप्रतिपादनात आपले मत मांडणे आणि दुसऱ्याचे खोडणे असे दोन भग कल्पिले जातात. पण ते कल्पनेचे आहेत, खरे नाही. दिवा लावणए व अंधार झाडून टाकणे ही जशी दोन कामे तसलेच हे दोन भाग. आधी दोन भागच खोटे, त्यातही पुन्हा आपला भर बहुतेच दुसऱ्याचे मत खोडण्यावरच जास्त असोत. दुसऱ्याचे मत खोडले की तेवढ्याने आपले मत सिद्ध झालेच असे होत नाही आणि आपले मत सरळ मांडले म्हणजे दुसऱ्याचे मत खोडण्याची जरूर राहत नाही. भूमितीमध्ये युक्लिडने कोठेच खाडाखोड न करता थोडक्यात सरळ सिद्धांत मांडले आहेत. त्या सिद्धान्तांची आज दुनियेवर सत्ता चालते. दुसऱ्याचे मत खोडून काढण्यात त्या मताविषयीचे सूक्ष्म प्रेमच असते. भक्तिमागा७त जसा प्रेमाने तसा द्वेषानेही ईश्वर मिळतो असे सांगतात. बिभीषण प्रेमाने तरला तर रावण द्वेषाने तरला अशी भाषा संत बोलतात, त्यातला अर्थ हाच आहे. मिल्टनने 'पॅरडाईज लॉस्ट' मध्ये सैतानाच्या अंगी सात्त्विकतेचा ज्याला मनापासून इतका द्वेष दाखवून त्याच्याविषयी वाचकांची सहानुभूती उत्पन्न केली आहे. सात्त्विकतेचा ज्याला मनापासून इतका द्वेष वाटतो त्याच्या मनात सूक्ष्मरूपाने सात्त्विकता वसत आहे, तसेच तामसपणाचा जोरजोराने निषेध करीत बसणाऱ्या माणसात आतून तामसपणा चिकटलेला आहेच, यात शंका नाही.

**सारांश**

मतप्रदर्शन म्हणत परमतखंडन नव्हे

कर्मयोगी आपल्या मताचा उच्चार करीत नाही. क्वचित अपवादाच्या प्रसंगी तो मतप्रदर्शन करील पण तसे करताना तो परमतखंडन करणार नाही. मतप्रदर्शनात परमतखंडन आवश्यकच असते असे नाही. स्वमत मांडल्यावर परमत खंडनाची आवश्यकताच राहत नाही. युक्लिडने परमतखंडन केलेले नाही. आपण ज्या मताचा विरोध करतो. त्याबद्दल आपल्या मनात सूक्ष्म प्रेमच असते. रावण द्वेषाने तरला. मिल्टनचा सैतान सात्त्विकतेच्या तात्त्विक विरोधाने सहानुभूति मिळवतो. सात्त्विकतेचा द्वेष करणाऱ्याच्या मनात ती सूक्ष्मरूपाने असते त्याप्रमाणे तामसपणाचा निषेध करणाऱ्याला तो आतून चिकटलेला असतो.

**नमुना क्र. ४**

सध्याचा मनू असा आहे की, हा समानत्वाचा घोष ज्याच्या त्याच्या तोंडी चालू रहावा. असे झाल्यामुळे अनेक बिकट प्रश्न उत्पन्न होत आहेत. मागासलेले असणे, दुबळे असणे, कर्तृत्वशून्य असणे हा हक्क बनू पाहत आहे. आपल्या अंगातील सामर्थ्याची वाढ करून घेण्याला संधी पाहिजे, हा घोष तारतम्याने न्याय्य ठरतो, पण आपण कसेही असलो तरी समत्वाच्या मुद्यावर इतरांच्या बरोबरीने जीवितातील सुखसोयी व अधिकार आपल्याला लाभले पाहिजेत, असा हक्क जगातील लोक सांगू लागले आहेत. म्हणजे कर्तृत्त्व एकाचे; शहाणपण, क्लृप्ती, प्रतिभा ही एकाची आणि ज्याच्या अंगी या गोष्टींचा मागमूसही उत्पन्न व्हावयास अजून बराच अवधी आहे तो या समथार्यंया कर्तृत्वातून निष्पन्न होणारे सर्व लाभ आणि भोग त्याच्या बरोबरीने भोगू इच्छितो. समत्त्वाचा हा अर्थ जगात रूढ होऊ पहात आहे आणि त्यातूनच जगात अनेक वाद सध्या चालू होत आहेत.

अमेरिका, आफ्रिका, ऑस्ट्रेलिया आणि काही अंशी आशिया येथील निरनिराळ्या वादांकडे थोडे बारकाईने पहावे, म्हणजे भौतिकशास्त्रांनी सक्रिय बनवलेली भूतदया मनाशी बाळगून, समर्थ लोकांनी आपण होऊन केलेल्या घोषणा त्यांच्या अंगलट येत आहेत असे दिसून येईल. निग्रो लोकांची गुलामगिरीची स्थिती पाहून लिंकनचा त्वेष उत्पन्न व्हावा आणि गुलामगिरीच्या शृंखला तोडून टाकण्यासाठी त्याने स्वकीयांशीसुदधा जोराचा लढा करावा, हे पाहून मन अगदी प्रसन्न होते. लक्षावधी लोक पशुकोटीतून आपल्या मूळ मानवकोटीत येऊन बसलेले पाहून आपल्या अंगातील मानवता खरोखर आनंदित होते. पण सध्या अमेरिकेत चाललेला लढा पाहिला म्हणजे 'गुलामगिरी नष्ट झाली पाहिजे' या घोषणेला 'समत्व आणि बंधुभाव' या घोषणेचे वैभव प्राप्त झाले पाहिजे असा दावा निग्रो लोक सांगत आहे असे दिसेल आणि या दाव्यातूनच अमेरिकन जीविताला कुरतडणारे अनेक जटिल प्रश्न उत्पन्न होत आहेत.

**सारांश**

समानत्वाच्या घोषणेचा जाच

हल्लीच्या समानत्वाच्या घोषणांमुळे अनेक बिकट प्रश्न उत्पन्न होत आहेत. मागासलेपणा हा हक्क समजून त्याच्या भांडवलावर समत्वाच्या मुद्यावर इतरांच्या बरोबरीने सुखसोयी व अधिकारांची मागणी होत आहे. स्वतःचे काहीच कर्तृत्व नसता दुसऱ्यांच्या कर्तृत्वात वाटा मागणे या समत्वाच्या नवीन अर्थामुळे अनेक वाद निर्माण झाले आहेत. भूतदयेच्या पोटी समर्थ लोकांनी स्वतःच केलेल्या घोषणा त्यांच्या अंगलट येत आहेत. हे निरनिराळ्या देशांमधील वादांवरून लक्षात येईल. लिंकनने मानवतेच्या प्रेमापायी गुलामगिरी नष्ट केली. पण आता निग्रोच्या समत्व आणि बंधुभाव यांच्या मागणीने अमेरिकन जीवनात अनेक प्रश्न उत्पन्न होत आहेत.

एका व्यवसायातल्या मंडळींनी एकत्र जमावं, विचारविनिमय करावा ही गोष्ट काही अयोग्य आहे, असं सरकारचं मत नाही. कारण कारखानदार आणि व्यापाऱ्यांच्या महासंघाच्या मेळाव्याला स्वतः पंतप्रधानच अध्यक्ष म्हणून हजर राहतात.

**नमुना क्र.५**

आपल्या राज्यात व्यापारी आणि औद्योगिक क्षेत्रात मराठी भाषेचा वापर मोठ्या प्रमाणात अद्याप का होऊ शकत नाही आणि तो वापर करावयाचा झाल्यास मराठी भाषा ही अर्थव्यवहारात आणि वाणिज्य क्षेत्रात कितपत सुलभतेने वापरता येईल ह्या प्रश्नासंबंधी अजूनही विवेचन करण्याची वेळ आपल्यावर येते. जगात औद्योगिकदृष्ट्या जे समृद्ध आणि प्रगत झालेले देश आहेत त्या देशांमध्ये त्या त्या लोकांची मातृभाषा अभिमानाने आणि सुलभतेने औद्योगिक आणि व्यापारी क्षेत्रात वापरली जाते. आणि त्यामुळे साहजिकच विश्वविद्यालयीन क्षेत्रात वाणिज्य आणि औद्योगिक विद्याशाखांमधून त्या त्या देशातील मातृभाषेचा सुलभतेने आणि आवर्जून वापर केला जातो. पश्चिम जर्मनी आणि जापानमधील औद्योगिक व्यवहाराची पाहणी करण्याकरिता गेलेल्या एका संशोधकाला तेथील अधिकाऱ्यांशी आणि कामगारांशी इंग्रजीतून बोलणए अशक्य आहे, असे आढळून आले. कारण तेथील बहुतेकांना इंग्रजी फारसे येत नव्हते आणि त्यांचा सर्व व्यवहार जपानी भाषेतून होत होता. हा दाखला देण्याचे कारण इतकेच, की राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रात उद्योग आणि व्यापार वाढवावयाचा असल्यास इंग्रजी भाषेचा वापर अपरिहार्य आहे आणि याउलट मराठी भाषा ही एक अडचण होऊन बसेल अशी जी एक समजूत आहे ती चुकीची आहे.

उद्योग आणि वाणिज्य क्षेत्रात - म्हणजे प्रत्यक्ष व्यवहारात आणि त्यामुळे आपोआपच पर्यायाने विश्वविद्यालयीन वाणिज्य अध्यापनात - मराठी माध्यमाचा वापर करता येणे शक्य आहे का याचे उत्तर 'होय' असेच ठामपणे देता येण्यासारखे आहे. केवळ मराठी भाषेचा आपणास अभिमान आहे म्हणून 'होय' असे उत्तर आहे असे नव्हे. जिथे जिथे प्रयत्नपूर्वक आर्थिक व्यवहारात आणि विश्वविद्यालयीन वाणिज्य शाखेत मराठीचा आजपर्यंत ज्यांनी वापर केला, त्यांना आपली मराठी भाषा ही त्या दृष्टीने वापर आणि विकास करण्यास अतिशय समृद्ध आहे असे आढळून आले.

**सारांश**

<u>उद्योगक्षेत्रात मराठीचा वापर</u>

राज्यात व्यापारी व औद्योगिक क्षेत्रांत मराठीचा वापर का होत नाही आणि केल्यास सुलभतेने होईल का याची अद्यापिही चर्चा करावी लागते. प्रगत देशांत व्यापारी आणि औद्योगिक क्षेत्रांत मातृभाषेचा अभिमानाने व सुलभतेने वापर होतो. साहजिकच त्यांच्या विद्यापीठांतूनही ती आवर्जून वापरतात. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रात व्यापारवाढीसाठी इंग्रजी अपरिहार्य आहे आणि मराठी अडचणीची आहे ही समजूत चुकची आहे; हे जपानमध्य व्यापारव्यवहारात जपानीचाच वापर होतो यावरून कळेल. प्रत्यक्ष व्यवहारात व साहजिकच विश्वविद्यालयीन वाणिज्य अध्यापनात मराठीचा वापर शक्य आहे. कारण अनुभव असे सांगतो की मराठीच्या अंगी असे सामर्थ्य आहे.

**उतारा क्र.१**

महाराष्ट्र राज्यातील जी नियतकालिके-म्हणजे दैनिके, साप्ताहिके, पाक्षिके, मासिके, त्रैमासिके वगैरे - युद्धापूर्वीच्या काळात भरभराटीत होती, ती युद्धकाळात तशीच राहिली नाहीत आणि युद्धोत्तर काळात तर पुष्कळच उलथापालथी होत आहेत. पहिलाच वाचकवर्ग पुढे राहिलेला नाही. नव्या वाचकवर्गाच्या आकांक्षा निराळ्या, अभिरुची निराळी, त्याच्या ज्ञानाचे स्वरूपही निराळेच. त्या सर्वांचा विचार करून जी वृत्तपत्रे आपले धोरण आखतील, त्यांनाच .यश मिळण्याचा संभव परक्या ब्रिटिश सत्तेशी संग्राम हा एकच विषय गेल्या स्वातंत्र्यपूर्व काळात हिंदी पुढाऱ्यांपुढे प्रामुख्याने होता. त्या पुढाऱ्यांनी सरकारी अन्यायाचे निर्दालन व जनतेची जागृती करण्यासाठी जसे व्याख्यानांचे दौरे काढले, तसेच वृत्तपत्रांत लेखही लिहिले. बहुतेक देशभक्त संपादक होते. आणि बहुतेक संपादक देशभक्त होते. संपादकीय व्यवसय हा तेव्हा धंदा नव्हता-धर्म होता; ध्येयाची साधना होता. सतीचे वाण होता. हजारो रुपयांचे जामीन भरून, वारंवार

खडतर तुरुंगवास सोसून पण जनतेची दुःखे वेशीवर टांगण्याचे धारिष्ट्य करणारे कैक संपादक हिंदुस्थानात निपजले, महाराष्ट्रातही निपजले. श्रीमान् अरविंद बोस यांचे 'वन्दे मातरम्', मोतीलाल घोष यांचे 'अमृतबझार पत्रिका', कै. लाला लजपतराय यांचे 'पीपल' पालबाबूंचे 'न्यू इंडिया' किंवा लो. टिळकांचा 'केसरी' व प्रो. शिवरामपंत परांजपे यांचा 'काळ' ही नुसती नावे आठवली, म्हणजे वृत्तपत्र व्यवसाय हा धंदा आहे की धर्म आहे हे कोडे सहज उलगडण्यासारखे आहे. 'यंग इंडिया' ने तर गांधीजींच्या स्वातंत्र्य-संग्रामाचे वारे स्वदेशात व परदेशात किती खेळवले हे इतिहासप्रसिद्धच आहे. ज्याला गडगंज संपत्ती कमवावयाची आहे

**उतारा क्र. २**

व्याकरण हा लेखनातील महत्वाचा भाग आहे. अतिपरिचयाचा आहे असे म्हटले तरीही चालेल. व्याकरण हा शब्द उच्चारला आणि ज्याच्या कपाळाला आठ्या पडल्या नाहीत किंवा डोके ठणकायला लागले नाही असा माणूस विरळा. व्याकरणाचे काटेरी कुंपण ओलांडल्याशिवाय साहित्याच्या नंदनवनात प्रवेश करता येत नाही, निदान परभाषांतल्या साहित्याचा रसास्वाद हे दिव्य पार पाडल्यावाचून घेता येणार नाही अशी मान्यता आहे. 'ब्रह्मपदी' नाचण्यासाठी लोखंडाचे चणे खावे लागतात. भाषाप्रभुत्वासाठी खायचे लोखंडाचे चणे म्हणजे व्याकरण असेही पुष्कळांना वाटते. ते चावणे आणि पचवणे ही गोष्ट बहुतेक लोकांना इतकी कठीण वाटते की, त्यापेक्षा 'नको ती नवी भाषा' असे म्हणण्याइतकी या विषयाची धास्ती ते घेतात.

व्याकरणा शिवाय परभाषा येणार नाही ही समजूत तर आहेच, पण स्वभाषेवरील प्रभुत्वालाही 'शुद्ध कसे बोलावे आणि शुद्ध कसे लिहावे.' याचे नियम आलेच पाहिजेत असेही मानणारे असंख्य लोक आहेत. आपण बोलतो त्या भाषेच्या स्वरुपापेक्षा आणि माहितीपेक्षा व्याकरण हे काही विशेष वेगळे आहे, असे मानले जाते. जोडे घालून देवळात जाता येणार नाही, त्याचप्रमाणे बोलायची भाषा साहित्यात वापरून चालणार नाही, असा एक जवळ जवळ सर्वसामान्य समज आहे. म्हणजे आपणाकडे रूढ असणाऱ्या 'व्याकरण' या शब्दाचा अर्थ 'लिहिण्याच्या भाषेचे नियम' असा करायला हवा. 'शुद्ध कसे बोलावे' हा विषय या व्याकरणाच्या कक्षेत येऊ शकत नाही.

ही लिहिण्याची भाषा बोलभाषेपेक्षा अनेक प्रकारे वेगळी असू शकेल. व्यवहारात वापरले न जाणारे शब्द तिच्यात असतील आणि व्यवहारात मान्यता मिळालेल्या अनेक शब्दांना तिच्यात मज्जाव असेल, तिच्यातली कित्येक रूप व्यवहारात आणि संदर्भात वापरल्या जाणाऱ्या रूपांपेक्षा वेगळी असतील, तिच्यातली वाक्यरचना आणि प्रयोग आपल्या बोलण्यात आढळणार नाहीत, आणि सरतेशेवटी ज्या लिपीचा उपयोग करून ही भाषा लिहिली जाते त्या लिपीने दर्शविले जाणारे काही ध्वनी बोलण्यात नसतील तर बोलण्यात रूढ असलेल्या काही ध्वनींना त्या लिपीत स्वतंत्र चिन्हे नसतील. व्याकरणाबद्दल सामान्य माणसाला जो दरारा वाटतो तो बोलभाषा आणि लेखभाषा यांच्यातल्या अंतरामुळेच.

**उतारा क्र. ३**

इंग्रजांच्या जुलमी राजकारभारातून देश मुक्त करणे हा अत्यंत महत्त्वाचा भाग होता तरी तो अंतिम कधीच नव्हता. स्वातंत्र्य हवे असते ते कोणासाठी? कशासाठी? या स्वातंत्र्याचा प्रकाश कुठेकुठे पसरणार होता? ज्यांच्या आयुष्यात अंधाराशिवाय काही उगवलेच नाही, त्यांच्यासाठी ही ज्योत लागणार होती का? इंग्रजांच्या, पेशव्यांच्या आणि त्यांच्याही आधीच्या अनेक राज्यसत्तांच्या वेळी, जे आणि जशा स्वरूपात होते. त्याच रूपात ते असूनही, बदल घडण्याची शक्यता कशी स्वीकारणार? ज्या धर्मश्रद्धांनी, चालीरीतींनी, रूढीरिवाजांनी, कर्मकांडांनी दैव-नियतिवादांनी, जन्म-पुनर्जन्मांनी व तथाकथित महाकवींनी मानव हतबल, पराभूत आणि मातीमोल केला होता, त्या उपलब्ध घटितांबद्दल ह्या नव्या स्वातंत्र्याची भूमिका काय करणार होती? त्यातला उच्चाराचा भाग, आचाराचा भाग आणि फलश्रुती यांचे प्रमाण तरी कसे ठरणार होते? आहे त्या अवस्थेत हे स्वीकारून, जागतिक क्षेत्रात मानवी प्रतिष्ठा उंचावणे

शक्यच नव्हते. म्हणूनच ह्या गोष्टीवर श्रद्धा ठेवणारे, निष्ठा दाखविणारे, बुद्धिमंत, विचारवंत आणि राज्यकर्ते व त्यांचे अंतस्थ हेतू पारखून-तपासून घेण्याची स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच खरीखुरी गरज निर्माण झाली आणि क्रांतीचे विचार रुजू लागले.

देशाला स्वातंत्र्याची गरज असते सर्वांगिण उन्नतीसाठी. सामाजिक परिवर्तनासाठी हा लढा लढविला गेला. त्याची हमी दिली गेली. माणसाचा मूलभूत हक्क म्हणून स्वातंत्र्य हवे असते. जन्मजात अधिकार लाभण्यासाठी आणि ते उपभोगण्यासाठी ते मिळवायचे असते. समाजातील सर्व घटकांना आणि स्तरांना एकसंध अंतर्गत सुसंघटनेचा आणि भक्कम इहवादाचा पाया, समान पातळीवर प्राप्त करून देण्याचे कार्य स्वातंत्र्याने पार पाडायचे असते. आणि हे जर होत नसेल, घडत नसेल, तर स्वातंत्र्य आणि परचक्र ह्या गोष्टी भिन्न मानण्याचेही कारण नाही.

## १५.४ संदर्भ ग्रंथ सुची

१) व्यावहारिक मराठी - प्रा. डॉ. सयाजीराजे मोकाशी

२) व्यावहारिक मराठी - डॉ. लिला गोविलकर, डॉ. जयश्री पाटणकर, स्नेहवर्धन पब्लिकेशन हाऊस पुणे.

३) व्यावहारिक मराठी -डॉ. कल्याण काळे, निराला प्रकाशन पुणे

४) व्यावहारिक मराठी -ल.रा. नसिराबादकर, फडके बुक हाऊस, कोल्हापूर

५) व्यावहारिक मराठी - भाग-२ संपादक डॉ. साहेब खंदारे, निर्मल प्रकाशन नांदेड

६) व्यावहारिक मराठी -संपा. स्नेहल तावरे, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.

७) सुबोध मराठी व्याकरण लेखन व वृत्तालंकार — प्रा. चंद्रहास जोशी

८) मराठी शुद्धलेखन प्रदिप - मो. रा. वाळंबे.

❖ ❖ ❖